नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत **विदर्भ साहित्य संघ, नागपूर** ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या **युगवाणी** ह्या नियतकालिकाच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून विदर्भ साहित्य संघाद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. हे अंक सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुरस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर/ संस्थांवर असणार नाही.


सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत

अनुक्रमणिका



अनुक्रमणिका

विदर्भ साहित्य संघाचे वाङ्मयीन नियतकालिक

युगवाणी

एप्रिल । मे । जून २०१७



चित्र : सुनील यावलीकर

कथा वैदर्भी

अनुक्रमणिका

श्रद्धांजली

सुविख्यात शास्त्रीय गायिका
किशोरी आमोणकर
१० एप्रिल १९३१ - ३ एप्रिल २०१७

~~~

संख्याशास्त्राचे तज्ज्ञ आणि अनेक सामाजिक संस्था-चळवळींचे आधारस्तंभ
डॉ. जगन्नाथ वाणी
११ सप्टेंबर १९३४ - ५ मे २०१७

~~~

नाटक व चित्रपटसृष्टीतील प्रसिद्ध अभिनेत्री व कलावंत
रिमा लागू
२१ जून १९५८ - १८ मे २०१७

~~~

दलित चळवळीचे लेखक, संशोधक व नाटककार
डॉ. रामनाथ चव्हाण
१९५२ - २० एप्रिल २०१७

~~~

हिन्दी चित्रपटसृष्टीतील प्रसिद्ध अभिनेते
विनोद खन्ना
६ ऑक्टोबर १९४६ - २७ एप्रिल २०१७

~~~

अनेक सामाजिक चळवळींच्या अग्रणी व लेखिका
मेहरून्निसा दलवाई
२५ मे १९३० - ८ जून २०१७

~~~

प्रसिद्ध कवी आणि नाट्यलेखक
प्रा. भीमसेन देठे
१९४६ - ६ मे २०१७

~~~

सुप्रसिद्ध लेखक व अभ्यासक
डॉ. जगन्नाथ नाईकवाडे
८ डिसेंबर १९२६ - २४ मे २०१७

~~~

सुप्रसिद्ध लेखक आणि नाटककार
दिलीप वि. चित्रे
१९४३ - ३० जून २०१७


मकर संक्रांत १९२३

विदर्भ साहित्य संघाचे
वाङ्मयीन नियतकालिक

युगवाणी

वर्ष ७२ वे

एप्रिल । मे । जून २०१७



अनुक्रमणिका

विदर्भ साहित्य संघाचे वाङ्मयीन नियतकालिक

युगवाणी

वर्ष ७२ वे

एप्रिल | मे | जून २०१७

संपादक
डॉ. अनिल नितनवरे

संपादक मंडळ
डॉ. मोना चिमोटे
सदानंद बोरकर
डॉ. पद्मरेखा धनकर
डॉ. तीर्थराज कापगते

रेखाचित्रे
वसंत आबाजी डहाके
संतुक गोलेगावकर
प्रमोदकुमार अणेराव

मुखपृष्ठ
सुनील यावलीकर

विशेष सहकार्य
प्रदीप दाते, वर्धा


मुद्रितशोधन
दीपक रंगारी

प्रकाशक
विलास मानेकर
सरचिटणीस, विदर्भ साहित्य संघ,
सांस्कृतिक संकुल, झाशी राणी चौक,
सीताबर्डी, नागपूर-४४० ०१२
दूरध्वनी : ०७१२-२५२३९२९, २५५३७६७

अक्षरजुळवणी, मांडणी व मुद्रण
माधव लोखंडे
मलय ग्राफिक्स
सुभाषनगर, नागपूर
भ्रमण : ९३२६९९९०१५

या अंकाचे देणगी मूल्य : १०० रुपये
वार्षिक वर्गणी : २०० रुपये
त्रैवार्षिक वर्गणी : ५०० रुपये

संपादकीय पत्रव्यवहार
डॉ. अनिल नितनवरे,
'जातक', २३/२४, स्नेहनगर,
नागपूर मार्ग, भंडारा - ४४१९०४
भ्रमण : ९८५०५५५०४९
ई-मेल : yugwani.nagpur@gmail.com
nitnaware.anil@gmail.com



- महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने 'युगवाणी'च्या प्रकाशनार्थ अनुदान दिले आहे.

अनुक्रमणिका

संपादकीय

विसाव्या शतकातील मराठी लघुकथेने मराठीतील साहित्यव्यवहारावर आपल्या ऐश्वर्याची आणि विलक्षण प्रभावाची समृद्ध मुद्रा उमटविली आहे हे खरेच आहे. कथन हा आत्मभूत घटक असलेल्या कथा या प्राचीनतम वाङ्मयप्रकाराने एकूणच समाज, विविध धर्मसंस्कृती, नागर-अनागर भाषा, बोली, लोकपरंपरा या सर्वांना कवेत घेत आपली समृद्ध परंपरा निर्माण केली आहे. आपल्याकडे संस्कृत, पाली, मागधी, प्राकृत, अर्धमागधी, महाराष्ट्री इ. प्राचीन भाषा-बोलींमधील कथन परंपरेचे अनेकविध आविष्कार उपलब्ध असलेत तरी मराठीतील लघुकथा प्रामुख्याने इंग्रजी राजवटीतील 'शार्ट स्टोरी'शी अधिक घट्ट जुळलेली आहे. गोष्ट, स्फूट गोष्ट, संपूर्ण गोष्ट, लघुकथा, नवकथा अशा विविध स्थित्यंतरांनी मराठी कथा समृद्ध होत आली आहे. गेल्या सव्वाशे वर्षांतील मराठी कथेचा प्रवास जसा कथेचा तसाच मराठी लोकमानसाच्या अंगोपांगांना, ताण-तणावांना उलगडणाराही राहिला आहे. अर्वाचीन काळातील ही मराठी कथा पुन्हापुन्हा आपल्या आशयाभिव्यक्तीच्या रुपबंधांची कात टाकत सतत नव्याने सळसळत राहिली आहे. प्रारंभीची 'श्रवणीय' कथा पुढे कॅप्टन लिमये व दिवाकर कृष्णांच्या 'वाचनीय' कथेत कशी पालटली हे तेव्हा कळलेही नव्हते. स्वातंत्र्यपूर्व काळातील एकूण मराठी कथा स्वप्नरंजन, तंत्रप्राधान्य, मध्यमवर्गीकरण, विचारप्रवाहांचे प्रभावचित्रण आणि प्रादेशिकता अशा अनेकांगी वळणांनी कधी विकसत, तर कधी अडखळत पण प्रवाहित होत राहिली. स्वातंत्र्योत्तर काळातील बहुप्रवाही कथावाङ्मयात आशयाभिव्यक्तीच्या विविधांगी कळा प्रखरपणे व्यक्त होत गेल्यात. श्री. म. माटे, कुसुमावती देशपांडे, वामनराव चोरघडे यांनी कथेचे आवर्त छेदण्याचे प्रयत्न केलेत. महायुद्धोत्तर नवकथेच्या अवतारामुळे एकूणच कथेतील सांकेतिक आवर्त दूर भिरकावले गेले. मुख्यतः मराठी कथेचे 'साधन'रूप संपुष्टात आले. वाचकांच्या कुतुहलपूर्तीपाशी थांबणारी एकपदरी मराठी कथा आता प्रशस्त व बहुपदरी झाली. एककेंद्री व्यक्तिमनाचे गाभारे धुंडाळणारी मराठी कथा आता समुहाभिव्यक्तीच्या शक्यतांचा वेध घेऊ लागली. या काळातील कथा आता अधिकाधिक 'कथानकविरहित' होत गेली. गंगाधर गाडगीळ यांच्या कथेतून मानवी जीवनाविषयीचा 'मुंगीवाद', मानवी श्रद्धा-मूल्यांचे ढासळलेपण आणि माणसाचे अतिरेकी दुभंगलेपण हे तीक्ष्णपणे प्रकट झाले. पुढील काळात अरविंद गोखले, जी. ए. कुलकर्णी, पु.शि. रेगे, चि. त्र्यं. खानोलकर, दि. बा. मोकाशी, पु. भा. भावे, शांताराम, व्यंकटेश माडगूळकर, अण्णाभाऊ साठे, शंकरराव खरात, सदानंद रेगे, बाबुराव बागूल, श्री. दा. पानवलकर, शंकर पाटील, दिलीप चित्रे, कमल देसाई, गौरी देशपांडे, जयवंत दळवी, रा. रं. बोराडे, आनंद यादव, राजन गवस, रंगनाथ पाठारे, भारत सासणे, इत्यादींच्या सशक्त कथालेखनानाने साठोत्तरी कथाप्रवाहात नवनवे घाट व वळणे निर्माण झालीत. या नव्या वळणांनी, विविध अंतःप्रवाहांनी मराठी कथा विलक्षण बहरत गेली. मराठी कथेचा हा प्रवाह तसा अपेक्षित वाटा-वळणांनी धावणारा आणि नव्या ठराविक प्रवाहांच्या मर्यादित सुडौल व आखीवरेखीव कुंपणांच्या काठाकाठाने वाहणारा नव्हताच. कथेने आपल्या अभिव्यक्तीच्या, आकार-प्रकारांच्या रेखीव तटबंद्यांना वेळोवेळी झुगारले आहे. उण्यापुऱ्या सव्वाशे वर्षांचा मराठी कथेचा हा प्रवाह उत्तरेतील ब्रह्मपुत्रेसारखा स्तिमित व चकित करणारा राहिला आहे. आशयाभिव्यक्तीच्या अनेक अनपेक्षित उंच पठारांवरही हा प्रवाह खळाळताना दिसतो. हा मराठी कथाप्रवाह असा बहुप्रवाही, बहुरूपिणी व बहुकेंद्री राहिला आहे.

मराठी साहित्यव्यवहारात मराठी कथा आणि नियतकालिकांचा अनुबंध हा अतीव लक्षणीय व निर्णायकही मानला जातो. मराठी कथा ही विविध नियतकालिकांच्या अंगाखांद्यावरच खेळत अन् वाढत

अनुक्रमणिका

आली आहे. मासिक मनोरंजन, रत्नाकर, यशवंत, किर्लोस्कर, सत्यकथा, स्त्री, मनोहर, साधना, प्रतिभा, ज्योत्स्ना, कथाश्री, हंस, अभिजात, अस्मितादर्श, विशाखा अनुष्टुभ इत्यादी नियतकालिकांनी कथेचे भरणपोषण केले. विविध वृत्तपत्रांच्या पुरवण्यांनी व दिवाळी अंकांनी कथेला पुरेसा अवकाश दिला. परंतु साधारणतः नव्वदोत्तर काळातील जागतिकीकरणाच्या प्रभावापासून माध्यमांचे स्वरूप व धारणा बदलत गेल्या. रविवारच्या वाङ्मयीन पुरवण्या अधिक चिंचोळ्या आणि अधिकाधिक अ-वाङ्मयीन होत गेल्यात. याच काळात मराठी साहित्यातून 'कथापर्व' अस्ताला जाते की काय असे तळमळीतून लिहिले व बोलले जाऊ लागले. दि. २३ जानेवारी १९९४ च्या दै. महाराष्ट्र टाईम्सच्या अंकातही प्रा. म. सु. पाटील यांनी हीच खंत व्यक्त केली होती. परंतु याच नव्वदोत्तर काळात जागतिकीकरणाच्या अटळ वास्तवाला, जीवन, भाषा व संस्कृतीच्या गुंतागुंतीला, विस्कटलेल्या समाजभानाला आणि नव्या प्रयोगशीलतेला मराठी कथा अधिक थेटपणे भिडत गेली आहे. नव्या सिनेमॅटिक शैलीची जयंत पवारांची कथा, महानगरी अधोलोकातील स्त्रीजीवनाचा 'जहन्नम' रेखाटणारी प्रतिमा जोशींची कथा, जात आणि अर्थकारणविषयक नवी गुंतवळ मांडणारी जी. के. ऐनापुरेंची कथा, स्त्री-पुरुष संबंधातले नवे विषमतोल उलगडणारी नीरजा आणि मेघना पेठे यांची कथा, ढासळते कृषिजीवन चितारणारी सदानंद देशमुखांची कथा, सामाजिक, सांस्कृतिक शोषणाचा तळगाळ ढवळणारी प्रज्ञा दया पवारांची कथा तसेच मनस्विनी लता रवीन्द्र, मोनिका गजेन्द्रगडकर, आसाराम लोमटे या लेखकांच्या विभिन्न शैलीतील कथा ही सगळी कथारूपे नव्वदोतर मराठी कथाप्रवाहाची शक्तिस्थळेच होत. मराठी कथा आपल्या सव्वाशे वर्षांच्या प्रवासात कोणत्याही आवर्तापाशी फार काळ रेंगाळली, अडखळली नाही. तिने आपले नवे ऊर्जास्रोत शोधलेत आणि पुढे धावत राहिली.

वैदर्भीय कथा हा तसा स्वतंत्र कथाप्रवाह नव्हेच. तर ते निराळ्या प्रवृत्तींचे रसरशीत जीवनानुभव चितारणारे एक कथादालनच म्हणावे लागेल. साठोत्तर काळात वैदर्भीय कथा उद्धव शेळके, शांताराम यांनी आणि नव्वदोत्तर काळात आशा बगे, योगेंद्र मेश्राम, रवीन्द्र शोभणे, बाबाराव मुसळे, प्रतिमा इंगोले, सदानंद देशमुख यांनी समृद्ध केली आहे.

'युगवाणी'च्या प्रस्तुत अंकात आम्ही विदर्भातील अलीकडील कथालेखनाचा समावेश केला आहे. या अंकातील सदानंद देशमुख, चंद्रकांत वानखेडे, अरुणा सबाने, वसंत वाहोकार, अनंत भोयर, मनीषा अतुल, सुभाष किन्होळकर, देवेन्द्र पुनसे, मंजूषा सावरकर, ज्ञानेश्वर गटकर, प्रमोदकुमार अणेराव, लखनसिंह कटरे, माधवी भट, क्रांती साडेकर आणि नितेश राऊत या कथाकारांच्या कथांतून जीवनाशयाचे व रुपबंधांचे वैचित्र्य, विस्कटलेली कृषिमाया, मध्यमवर्गीय जाणिवेतले टोकदार पेच, वंचितांमधील उमलते प्रगल्भ भान आणि कथानिर्मितीतील काही प्रयोग हे सारे आपणास जाणवेलच वैदर्भीय कथेचा पोत अजूनही वास्तवनिष्ठ आणि घटितप्रधानच राहिल्याचेही आढळेल. समकालीन मराठी कथाप्रवाहातील ही आजची 'वैदर्भीरीती' समकालीन कालभानाला थेट भिडणारी, रसरशीत व आश्वासक ठरेल यात शंका नाही.

'युगवाणी'च्या अंकाला पृष्ठसंख्येच्या काही मर्यादा आहेतच. वैदर्भीय कथेचे हे चित्र पुरेसे प्रातिनिधिकही नाही हे आम्ही जाणतो. नव्या उमेदीच्या लेखकांच्या कथांना आम्ही आवर्जून सहभागी केले आहे. काही सशक्त कथांना आम्ही या अंकात स्थान देऊ शकलो नाही याची खंत आहेच. विदर्भ साहित्य संघाच्या आणि ग्रंथसहवासच्या कार्यवृत्तांना या अंकात सामावता आले नाही. ही कार्यवृत्ते पुढील अंकात येतीलच.

या अंकातील सर्व कथाकारांचे आणि रेखाचित्रकारांचेही मनःपूर्वक आभार मानतो आणि थांबतो.


। संपादक

अनुक्रमणिका

विदर्भ साहित्य संघाचे वाङ्मयीन नियतकालिक

युगवाणी

एप्रिल । मे । जून २०१७



अंतरंग



जीवकाचणी

सदानंद देशमुख

दिवस मावळू लागला. घरांच्या, झाडांच्या आणि समोरच्या गढीतील बुरुजाच्या सावल्या लांब लांब लांबल्या. गावातल्या रस्त्यावरून धूळ उडवीत गाईगुरं गोठ्याकडे परतून आली. शेतावर कामावर गेलेल्या बायका डोक्यावरची घमेली सावरीत घरी परतल्या. तरी अजून सासऱ्याचा पत्ता नव्हता. शोभा वाट पाहून पाहून कासावीस झाली.

आतापतोर सासऱ्यानं घरी परतून यायला पाहिजे होतं. याअगोदरही तीन-चार वेळा सासरा अकोल्याला गेला होता. पण परतायला असा वेळ कधी झाला नव्हता. सकाळच्या चिखली-अमरावती एक्स्प्रेसनं जाणारा सासरा, संध्याकाळी चार वाजायच्या आत परतून यायचा. प्रत्येक वेळी ती अशीच डोळ्यांत प्राण आणून त्याची वाट पाहात बसायची.


तिचा पती भास्कर अकोल्याला दवाखान्यात भरती झाल्यापासून सासऱ्याची ही पाचवी वारी होती. भास्करजवळ तिची सासू आणि मावस दीर राहायचे. सासरा परतून यायचा. कारण घरच्या शेतकामाचा त्याच्यावाचून खोळंबा व्हायचा. त्यात पुन्हा हंगामाचे दिवस. शेतकामाला ऊत आलेला... कापूस वेचणं, हायब्रीड खुडणं, गहू पेरण्यासाठी शेत ओलावणं, सगळ्या कामाचा धबडगा उठलेला. भास्करला दवाखान्यात भरती केल्यापासून घरा-शेतावर अवकळाच पसरली होती. महिन्यानं एक मैंदार होता. पण त्याच्या कामाला थोडीच मालकाच्या कामाची सर येणार! मालक घरी नाहीत असं पाहून उलट त्यानंच काही तावटातावटी करायची भीती होती.

काल-परवाच एवढा दिवाळीचा सण येऊन गेला. पण या वर्षी दिवाळी आलीच नाही असं वाटत होतं. घराचा एकुलता एक मालक असा आजारानं घायाळ झाला. मग कशाची दिवाळी न फिवाळी?

नवऱ्यासोबत सासू गेलेली. सासराही असा चार दिवसांतून मोहाडीच्या देवाच्या कराव्यात तशा अकोल्याच्या वाऱ्या करतो. म्हणून या वर्षी शोभाला दिवाळसणासाठी माहेरीही जाता आलं नव्हतं. कसं जायचं? बरं दिसलं असतं का ते? नवऱ्याच्या तब्येतीच्या काळजीनं जिवाची सारखी उलघाल होत होती. भाऊबीजेच्या दिवशी भाऊ येऊन गेला. पण शोभाचं कशा-कशातच लक्ष लागत नव्हतं. कुंकवाचा, गळ्यातील काळ्या पोतीचा धनी जिथं मानगीनं असा घायाळ झाला तिथं माहेराचं काय? ज्याच्या संगतीनं अवघा जनम घालवायचा त्याचंच आयुष्य बोरीच्या कुपाटीत अडकलेल्या कापडासारखं झालं होतं. त्याची चिंता मनातून रात्रंदिवस जाता जात नव्हती.

कधी कधी आपण त्याला भेटून यावं, पाहून, बोलून यावं असं वाटत होतं. पण सासरा नेत नव्हता. म्हणूनच नवऱ्याच्या खुशालीसाठी मन असं वेडं की बावळं होऊन जायचं...

वाट पाहून पाहून डोळे थकून गेले. सासरा आलाच नाही. हळूहळू दारातील सगळं ऊन नाहीसं झालं. मावळतीच्या कातर सावल्यांनी गाव वेढून घेतलं. शेजारचा सुरेशही बैलगाडी घेऊन शेतावरून परतून आला. त्याच्या शेतावरून यायला बसस्टॅन्डवरूनच रस्ता होता. त्याला अकोल्याकडून गाडी आली की काय, माहीत असेल... सासरा परतून आला की काय? येऊन तिकडेच फाट्यावर थांबला की काय? त्याला माहीत असेल. माहिती काढायची म्हणून तिनं त्याला विचारलं, ''भावजी! मामांजी दिसलेत का हो फाट्यावर?''



''नाई वयनी! कावून? आजून आले नाईत वाट्टे काका आकोल्याहून वापीस?''

''नाई नं! हामिशाच्या हिशोबानं त्याह्यनं यायले पाह्यजेल व्हतं आतालोक.''

''येतीन नं मंग मांगलच्या गाडीनं! कशाले घोर करता एवढा?''

असं म्हणून त्यानं गाडीचे बैल सोडले. ते शेजारच्या गोठ्यात नेऊन बांधू लागला.

''काहो भावजी. पण हामिशाची आकोला-चिखली एस.टी. गेली का चिखलीकडी?''

''हाव, ती एस.टी. तं हामिशाच्या वक्तालेच गेली तिच्या. चार वाजताच.'' सुरेशचं हे बोलणं कानावर आलं आणि ती उदास झाली.

सुरेश गोठ्यातलं चारा टाकणं आटोपून जुवातल्या शिवळा-बेल्ह्या घेऊन शेजारच्या आपल्या घराकडे निघाला. तशी ती पुन्हा म्हणाली,

''सुरेशभावजी, मामांजी जर आले नाईत तं आत्याले म्हणा तुमाले शोभावयनीनं आज रातरी झोपायले बलावलं!''

''बरं बरं, सांगतो! पण तुमीबी येजा मायले आठोन करून द्यायले!''

असं म्हणून सुरेश निघून गेला. ती दारातच उभी होती. दिवेलागणीची वेळ झाली होती. घरात जाऊन दिवा लावणं आवश्यक होतं. अशा तिन्हीसांजी दिव्याच्या प्रकाशातून घरात लक्ष्मी येते. अशा वेळी घरात अंधार असणं अशुभ, दळभद्री समजलं जातं. पण तिला आज तेवढंही जिवावर आलं होतं. सुन्या घरात जावंसंच वाटत नव्हतं. एवढ्या मोठ्या घरात तिला एकटीला हुरहुरल्यासारखं होत होतं. ती आत गेलीच नाही. दाराच्या चौकटीचा टेकू घेऊन दारातच उभी राहिली. रस्त्यावर पाहू लागली. दुपारच्या वेळी सुनसान असणारा रस्ता आता माणसांच्या वर्दळीनं फुलून आला होता.

ती रस्त्यावर पाहत होती. पाहता पाहता एकदम पायाला विंचू झोंबावा तशी ती दचकली. अंगाला निखारा झोंबल्यासारखंच झालं होतं.

रस्त्यावरून फासेपारधी जात होता. त्याची आणि तिची नजरानजर झाली आणि तो थांबला. चांगलं एकटक डोळ्यानं तिच्याकडे पाहू लागला. भेदक, ओंगळ, भीती वाटावी अशी त्याची नजर!... हा... हा त्योच आशिन का? डोक्याचे केस लांब लांब वाढलेले. त्यातले काही डोईच्या दुपाट्यातून बाहेर डोकावत होते. अंगावर मळकटलेला, घामानं, मळानं मूळचा रंग हरवून गेलेला सैल कोट! कमरेला लंगोटी लावलेली. खालच्या उघड्या, वाळक्या लाकडासारख्या दिसणाऱ्या पायांवर घामाचे वाळलेले ओहळ चमकत होते. पायात वहाणा नाहीत. अनवाणीच! टिचलेल्या तळव्याचा. चेहरा वानरासारखा. मिचमिच डोळे, भयप्रद, किळसवाणं ध्यान! त्याच्या खांद्यावर कमठ्याचा पिंजरा होता. पण तो रिकामा होता. गावात ससे, तितर, लावे विकायला आला असावा. ते विकून आलेले पैसे कनवटीला लावून, आपल्या जंगलातल्या पालाकडे निघाला होता.

हा म्हणजे तोच तो असावा का? या भीतीने ती गर्भगळीत झाली. तो तिच्याकडेच मिचमिच डोळ्यानं पाहत होता. तिच्या अंगाला दरदरून घाम फुटला. अंग

अनुक्रमणिका

थरथरू लागलं. काळीज बेडकीसारखं उडायला लागलं. पारध्याच्या त्या नजरेनं तिला ती भलतीच जीवघेणी जाणीव झाली. आपल्या अंगावर वस्त्रच नाहीत, आपण नग्न आहोत असं वाटायला लागलं. तिनं पदरात आपलं सगळं अंग झाकून घेतलं. तरीही ती जाणीव...

...तेव्हा पारध्यानं असंच एकटक पाहिलं होतं. पण तेव्हा सगळा देह वस्त्रहीन. नग्न होता. तसा तो आता नव्हता... पण तरी ही जाणीव! ती अस्वस्थ झाली. अवघडून दारातच उभी राहिली. पावलांत घरात वळून जाण्याइतकीही शक्ती राहिली नाही. पारध्याच्या त्या भेदक, पिंगट, पिवळ्या मिचमिच डोळ्यांनी तिला दारातच जखडून ठेवलं. विस्फारल्या डोळ्यानं ती त्याच्याकडे पाहू लागली...

...पण हा त्योच आशीन का? आपल्याले तसं पाह्यणारा? नक्कीच! म्हणून तं आसा न्याहाळून राह्यला मुडदा... आरे देवा रे! आता काय करू मी?

तिला गरगरल्यासारखं व्हायला लागलं. हातातील दाराची चौकट तिनं गच्च गच्च आवळून धरली. आपले पिंगट पिवळे पिवळे डोळे तिच्यावरच खिळवून तो म्हणाला,

''बाई, एखांदी भाकर द्यानं आशीन तं! मले लय भूक लागली...''

तशी ती भानावर आली. तिला वाटलं होतं, भलतंच काही बोलतो की काय? त्या दिवशीची आठवण काढतो की काय? तिनं सुस्कारा टाकला.

शेजारची कौसल्या आत्या अंगणातून दाराकडे येत होती. तिनं पारध्याचं बोलणं ऐकलं. आणि ती त्याच्यावर खेकसली. ''जाय रे, रस्ता सुदर ना मुड्या! कोनं भाकरी टाकून ठेवल्यात इथी तुह्यासाठी? मेले सगळं शिवार पायाखाली घालून गरीब जीव पकडतात. त्याह्ले इकून घड्याळी न रेडिओ घेऊन शोक करतात. सोनं-चांदी इकत घेतात. अन् भिकाबी मांगतात... चाल व्हय पुढी! भाकर नाई मिळणार... व्हय पुढी...''

तिच्या ह्या खडसावण्यावर तो जागचा हलला. तुरुतुरु चालत शेतरानाकडे निघून गेला. त्याच्या जाण्यानं शोभाला जाळ्यातून सुटल्यासारखं वाटलं. तिनं चेहऱ्यावरचा घाम पदरानं टिपून घेतला.

कौसल्या आत्या आत आली अन् आतला काळोख पाहून ती म्हणाली, ''कावं शोभा, आजून लाईटबी नाई लावलेत तुवा घरातले? तरी बरं, आता तुमच्या जमान्यात लय सुख हाये. दाबलं बटन की लागला लाईट. आमच्या वक्ती तं चिड्या भरा, कंदिलाचे काच पुसा... लय लय तरास होता. तरी आम्ही सांजीले घरात कधी आसा काळोख ठेवत नव्हतो. लक्ष्मी यायची येळ हाये बाई ही! लाईट लाव!''

बोलणं कानावर आलं तसे पुन्हा शोभानं कपाळावरचे घामाचे थेंब पदरानं टिपून घेतले. अजूनही थरकाप होतच होता. पण आत्या आल्यानं धीर आला होता. तेवढंच बरं वाटत होतं.

''येत नाई मनावं का आता भास्करचा बा?''

असं म्हणून आत्यानं आपल्या ओटीतील तुरीच्या शेंगा खाली ओतल्या आणि उद्याच्या भाजीसाठी तिनं शेंगा सोलायला सुरुवात केली. तुरीच्या शेंगांतून निघणाऱ्या दाण्यांकडे पाहून शोभा म्हणाली,

''काय सांगावं! येतीन बी या लागले तं आखरी गाडीनं!''

''मले बी तसंच वाटते. येईलच त्यो! उशीर होईल आमासाक... पण त्याले करमते का आल्याबिगर? तुवा सयपाक केला का नाई आजून?''

''नाई नं! माही काई वासनाच नाई जेवणावर आत्या...''

तशी कीव केल्यासारखी आत्या म्हणाली,

''कशी राहीन वं माय? जान जवान नवरा आसा मानगीनं घेरला. कसं वाटत आशीन माय तुले? पण जाऊ दे... आता व्हईलच भास्कर बरा... तू काई लय चिंता नको करत जाऊ! आंधीबी हालत नाई राह्यली एवढ्या सकवार रूपाची. देव तरी कावून आसे भोग देत आसंल एकेकाच्या वाट्याले का जणू बिचारा.''

तिच्या ह्या बोलण्यानं शोभाच्या टपोऱ्या डोळ्यांत टचकन आसवं आली. आसवांचे थेंब तिच्या गोऱ्या गालांवर घळघळले.

तिला कौसल्या आत्याच्या गळ्यात पडून हंबरडा फोडावा वाटू लागला. पण तिनं तसं काही केलं नाही. मोठ्या कष्टानं तिनं आलेला कढ आवरला. फुटणारा बांध थोपवला. पदरानं डोळ्यांतील आसवं टिपून घेतली.

''जाऊ दे बाई! देवादिकायले नाईत चुकले हे भोग... आपून तं माणसं... जाय पेटव चूल... सयपाक कर. सासरा आला रातच्या उशिरा तं त्याले जेवायले काय वाढशील मंग?''

तशी आठवण आल्यासारखी शोभा म्हणाली,

''तुमाले सुरेशभावजीनं सांगलं का नाई?''

''नाई! काय ते?''

''आज मामांजी नाई आले आकोल्याहून त तुमी इकडीच येजा झोपायले... मले हुरहुर वाटील एकटीले...''

''हाव येईन मी! जाय पेटव तू चूल!''

• • •

''बरं'' म्हणून शोभानं चूल पेटवली. चुलीत जाळ झाला. तिनं कोपरात भाकरीचं पीठ घेतलं आणि ती भाकरीसाठी उंडा मळू लागली. उंडा मळता मळता तिला पुन्हा ते पारध्याचं ध्यान, भेसूर रूप आठवलं आणि तिच्या अंगाचा थरकापच झाला.

...पण हा म्हणजे त्योच आसंल का? काई समजतबी नाई... समदे मेले एकासारखेच दुसरे दिसतात. अन् आपुन तरी कुठी मन लावून पाह्यलं व्हतं म्हणा त्याले... वळखू यायले? पन हा त्यो नसंलच... दुसराच आसंल...

अशी स्वतःच्या मनाची समजूत घालून ती सावरू लागली.

• • •

ह्या पारध्यापायीच भास्करचं हे असं झालं होतं. पण घरी आणि गावात हे त्या दोघांशिवाय कोणालाही माहीत नव्हतं. फक्त भास्करच्या एका मित्राला, त्याला आणि तिलाच हे माहीत होतं. मित्रालाही तो जिवाभावाचा होता म्हणून सांगितलं होतं. बाकी दुसऱ्या कोणालाही माहीत नव्हतं. एखादा मंत्र आपण आपलाच जपून ठेवावा तसं त्यांनी हे गुपित जपून ठेवलं होतं. अशानं असं झालं म्हणून कोणाला सांगायचीही लाज होती.

पीठ मळता मळता पुन्हा तिची ती आठवण फणा काढून उभी राहिली... कोणताही सणवार असला की स्वतःच्या मळ्यातील महादेवाच्या पिंडीला नैवेद्य दाखवायचा, पूजा करायची, असा घराचा पूर्वापार रिवाज होता. मळाही काही फारसा दूर नव्हता. गावातून बाहेर पडून एक ओढा ओलांडला की ओढ्याच्या वरच्या अंगाला भगवान जाधवाचं शेत होतं. त्याच्या धुऱ्याला धुरा लागून गुलाबराव भालेरावचं शेत. त्याला लागूनच महादेवाचा मळा. मळ्यात विहिरीजवळ चिंचेचं जुनं थोरलं झाड. झाडाखाली ओटा. ओट्यावर महादेवाची उघडी पिंडी. पिंडीच्या समोर दगडी नंदी. आणखी एक-दोन देवांच्या लहानसहान मूर्ती!

कितीतरी वर्षांपासून महादेवाची ही पिंडी होती. त्यामुळे कोणत्याही नवीन कामाला सुरुवात करण्यापूर्वी अगोदर पिंडीला नारळ फोडला जायचा. पूजा केली जायची. दुसऱ्या कायी महत्त्वाच्या कामासाठी जायचं असलं तरी अगोदर पिंडीला नारळ फुटायचा.

त्या दिवशी दसऱ्याचा सण होता...

घरच्या रूढीप्रमाणं स्वयंपाक आटोपल्यावर शोभा शेतात आली. भास्कर अगोदरच मळ्यात आलेला होता ती आल्यावर दोघांनी मिळून पिंडीची पूजा केली. अगरबत्त्या, राळ, धूप जाळला. पिंडीवर फुलं आणि बेलपानं वाहिली. प्रसाद दाखवला.

सूर्य माथ्यावर आला. अजून जेवणाला, दसऱ्याचं सोनं लुटायला देवीच्या माळावर जायला संध्याकाळपर्यंत अवधी होता, म्हणून दोघं विहिरीच्या काठावर येऊन बसली. गप्पागोष्टी सुरू झाल्या...

सभोवार सगळं शिवार शांत होतं. आसपासच्या शेतात कोणीही नव्हतं. मळ्यातही सण असल्यामुळे आज काही काम सुरू नव्हतं. गडी बैल चारायला माळाच्या शेतावर गेलेला. सभोवार मुकी, अबोल शांतता. क्वचितच चिंचेच्या झाडात दुपार पाखरू चेव आल्यासारखं घुमायचं. पुन्हा गप्प गप्प व्हायचं.

काठावर बसून शोभा विहिरीच्या वर आलेल्या पाण्यात एक एक दगड भिरकावत होती.

''दगड नको टाकू... गाळ व्हईलनं...'' भास्कर हसत म्हणाला.

''मग काढायले हायनं तुमी?'' असं म्हणून शोभाही हसली.

- पण आता तिनं विहिरीत दगड टाकायचं थांबवलं. आणि ती विहिरीत डोकावू लागली. विहिरीतलं तिचं प्रतिबिंब तिला खूपच गोंडस, सकवार दिसलं. आता विहिरीच्या पाण्यावर बुडात दडून बसलेली कासवाची जोडी वर आलेली. दोघं मन लावून कासवांचा खेळ पाहू लागले. कासव कासवीच्या मागे धावत होता. धावताना पाणी कापण्यासाठी पाठीखालच्या पायांची जलद हालचाल होत होती. मध्येच दोघंही तळाशी जात होते. पुन्हा वर येत होते. त्यांचा हा खेळ पाहताना मनाला पंख फुटत होते.

...तशातच एकाएकी भास्करच्या अंगावर काटा दाटून आला. शोभाच्या मुसमुसल्या देहावर त्याची नजर अधाशी झाली. कधी नाही तो आज शेतरानातला मोहतुंबी एकांत गवसला होता. लग्न झाल्यापासूनच

त्यानं शेतातल्या पिकातल्या शृंगाराचं एक स्वप्न काळजाशी जपून ठेवलं होतं. पण त्या स्वप्नाची अजून, इतक्या दिवसांतही पूर्ती झालीच नव्हती. मळ्यात कामाचा धबडगा असायचा. म्हणून कोणी ना कोणी असायचंच. पण आजचा एकांत मोहिनी घालत होता. त्याच्या मनात नाजूक हळव्या फुलपाखराचे पंख हुळहुळू लागले...

सभोवार लावलेली कपाशीची झाडं कंबरेइतकी उंच वाढली होती. उंच वाढूनही घेरदार झालेली. मध्येच सहाव्या तासानंतर तुरीच्या दोन तासी ओळी घातलेल्या होत्या. तूर तर उराबरोबर उंच वाढलेली. गडदगच्च झालेली. पिवळ्या फुलांच्या भारानं लवून पडलेली. तिला काही कळायच्या आतच त्यानं तिला तुरीच्या ओळीजवळ ओढलं... पिवळ्या फुलांवरच्या मधमाशा घोंगावल्या. त्याच्या मोरपंखी सूचक स्पर्शानं तिच्याही अंगावर थरार दाटून आला. शेतातल्या पिकावर गहन गहिरी तृप्ती दाटून आलेली... दूर कुठल्यातरी माळावर गुराखी बासरी वाजवीत असावा. दूरवरून वाऱ्याच्या झुळकेवर येणारे बासरीचे मंजूळ स्वर शिवाराला वेटाळून टाकीत होते... दोघं एकदेही झाले...

...आणि एकाएकी काय झालं, भास्करला कळलंच नाही. कोणीतरी अंगावर जोरात येऊन आदळलं. ठेच लागून पडावं तसं अंगावर येऊन कोसळलं. फुलांच्या सुगंधी थरावर दुर्गंधी दाटून आली.

शोभा केवढ्यांदा तरी चीत्कारली. भास्कर भांबावून गर्भगळीत झाला. त्याच्या पुढ्यात हेलपाटून पडलेला पारधी आता सावरला होता. विस्मयचकित होऊन शोभाकडे पाहत होता. तिचा नग्न देह त्याला डोळ्यांच्या मिठीतून सोडवत नव्हता. डोळ्याची पापणी लवता लवत नव्हती.

शोभाला धांदलीत लवकर सावरताच आलं नाही. घाई करून तिनं आपली साडी अंगावर ओढून घेतली. भास्करही सावरला. पण काय बोलावं सुचत नव्हतं. शरमेनं मनं मरून गेली होती. पारधी त्यांच्याकडे पाहून हॅ... हॅ... करून हसत होता. निर्लज्जासारखा!

''सशाच्या पावलाच्या मोडीवर येत व्हतो. तुरीच्या वळीआडी तुमी दिसलेच नाई... ह्यॅ...ह्यॅ...ह्यॅ!''

असं म्हणून हसत हसतच खांद्यावरचा कमठ्याचा पिंजरा सावरीत पुनःपुन्हा मागे पहात तो निघून गेला. खाजगी सुखद क्षणाच्या बिल्लोराचा पारध्याच्या येण्यानं तडकून चुरा चुरा झाला.

पारधी दिसेनासा झाल्यावर शोभा रडायलाच लागली. एका रानटी पारध्याला आपला वस्त्रहीन देह दिसावा याची खंत असह्य होती. ती कासावीस झाली. तगमग करू लागली.

तिला समजावता समजावता त्याच्या नाकी नऊ आले. ती त्याच्यावर कातावली, रागावली, खंतावली अन् पुन्हा त्याच्या गळ्यात पडून रडायला लागली...

मनात एक समाधान होतं. बरं झालं, पारध्याच्या जागी गावातला कोणी ओळखीचा नव्हता. नाहीतर साऱ्या गावात बोंब होऊन हशा झाला असता. बदनामी झाली असती. कोण कुठला पारधी... पुन्हा दिसतो न दिसतो! दुःखात सुख... तेवढंच बरं वाटत होतं. गावातील, घरातील कोणी असता तर जन्मभर त्याच्याकडे मान वर करून पाहता आलं नसतं...

• • •

पण रात्री भास्कर हादरून गेला. दुपारी मळ्यातील पारध्याच्या अस्तित्वानं घात केला होता. फुलाच्या झाडावरच्या साऱ्या फांद्या खचाखच घाव घालून तोडाव्यात, सरोवरातील तरंगणारी कमळपुष्पं कोणी बोचकारून न्यावी आणि सरोवर उजाड, ओकं दिसावं तसं झालं होतं... आपल्यातील पौरुषत्व उल्केसारखं गळून पडल्याची त्याला जाणीव झाली आणि तो उन्मळून पडलेल्या झाडागत झाला. प्रचंड हादरून गेला. कसंतरीच उदास भणंग वाटू लागलं. पालीच्या तुटलेल्या शेपटीसारखं मन तणतणू लागलं. शोभा त्याची ही अवस्था पाहून पुन्हा कासावीस झाली.

''शोभे, शोभे... मी माणसातून गेलो वं आता. तुह्या काई कामाचा राह्यलो नाई... तुले काई पोरगं देऊ शकत नाई आता मी... आपल्याले काई लेकरू बाळ व्हनार नाई जनमभर...''

शोभाच्या गळ्यात पडून तो रडू लागला. पंख तुटलेल्या पाखरासारखाच तो फडफडू लागला.

त्याला समजवावं तरी कसं? तिला कळेनासं झालं! ती हबकली. खरंच आपल्याले आता लेकरू बाळ व्हनार नाई का? तिच्या डोळ्यांतल्या आभाळातला पाऊस तिलाच थोपवेनासा झाला... कोणी कोणाला सावरायचं? दोघेही एकाच दुःखवाटेचे प्रवासी... एकच दाह सोसणारे...

त्याचा एक जवळचा मित्र होता. त्याला सांगितलं. त्याच्या मदतीनं काहीबाही गावठी उपाय झाले. मंत्र,

तंत्र, गंडेदोरे झाले. पण निखळलेलं फूल पुन्हा फांदीला बिलगायला तयारच नाही.

भास्कर खंगून गेला. जळून जळून मनाचा कोळसा झाला. तब्येत बिघडू लागली. बिघडतच गेली. जेवणखाणं सुटलं. अशक्तपणा खूपच वाढला तेव्हा निर्भय जैनसाहेबांची चिठ्ठी घेऊन अकोल्याला भरती केलं...


डोळ्यांतली आसवं पुढ्यातल्या परातीत पडू लागली. पिठात मिसळून तव्यावर भाकरीत जळू लागली. डोळ्यांत आताशा वारंवार भरून येणारं आसवांचं आभाळ पुन्हा भरून आलं.

''झाल्या नाईत कावं आजून भाकरी?''

तुरीच्या शेंगा बैठकीत सोलत बसलेली कौसल्या आत्या स्वयंपाकघरात येऊन विचारत होती. शोभा तिच्या शब्दानं दचकली. मग सावरली. डोळ्यांच्या कडा पदराने पुसून घेतल्या.

''मी येते भाकरतुकडा खाऊन घरून! तदलोक तूबी जेवून घे! भास्करचा बाप यायचा काई रंग दिसत नाई आता... येते मी झोपायले. माहं आंथरून टाकून ठेवजो!''

असं म्हणून कौसल्या आत्या निघून गेली. घरातलं उदास एकटेपण शोभाला खायला उठलं. थापलेल्या भाकरी तिनं दुरडीत भरून ठेवल्या. भाकरीवर ताट झाकलं. चूल विझवली. चुलीवर पोतेरं ओढून घेतलं. भूक नव्हतीच. तरी ताट वाढून घेतलं. जेवण गेलंच नाही.



कसेबसे दोन घास ढकलून, स्वयंपाकघरातील झाकपाक करून ती बैठक खोलीत अंथरुणावर येऊन पडली.

हळूहळू सारं गाव शांत झालं. सगळ्या माणसांच्या बोलण्याचे, शेजारीपाजारी घासल्या जाणाऱ्या भांड्याचे आवाज रात्रीच्या अंधारात विरून गेले.

डोळ्यांसमोरून मघाशी दिसलेला पारधी हलता हलत नव्हता. त्याच्या आठवणीनं अंगावर पाल पडावी तसं किळसवाणं वाटू लागलं. दाराशी कौसल्या आत्याचा आवाज आला. तिनं उठून दार उघडलं. कौसल्या आत्या आत आली आणि शेजारच्या पलंगावर झोपली.

पुन्हा सारं घर शांत शांत झालं. माडीवरचा तिचा झोपायचा पलंग रिकामाच... टकटक उघड्या डोळ्यानं टिनाच्या नळ्या मोजताना तोच डोळ्यांपुढं दिसू लागला. एकदा वाटलं, वर जावं आणि त्या शेजेवर झोपावं भास्करचा स्पर्श पलंगावरच्या अंथरुणाला झालेला आहे. चादरीला झालेला आहे. उशांना झालेला आहे. त्या गादीवर झोपावं. ती चादर अंगाभोवती घट्ट लपेटून घ्यावी. ते ज्या उशीवर डोकं टेकवून झोपायचे ती उशी घट्ट उराशी कवटाळून घ्यावी. पलंगावरील कापडाला झालेला स्पर्श आपल्या अंगांगात रुतवून घ्यावा.

आणि त्याचबरोबर कसलीशी अनामिक भीतीही वाटू लागली. अस्वस्थता वाढू लागली. मध्येच उठून ती माडीवर गेली. बल्ब लावला. आणि तेथला उदास एकांत आपल्याला उचलून फेकतो आहे असं तिला वाटू लागलं. कसमसून आलं... पुन्हा थरथरणाऱ्या सर्वांगावर घाम आला.

धाड्धाड् जिना उतरून ती पुन्हा खाली आली. धाडकन अंथरुणावर अंग झोकून दिलं. मन भरून रडावंसं वाटू लागलं. पण कौसल्या आत्या शेजारी झोपलेली होती. म्हणून हुंदका आतल्याआत दाबून धरला.

शेजारच्या पलंगावर झोपलेल्या कौसल्या आत्यानं कूस बदलली.

''वाईट वं माय... वाईट... करमाचे भोग...''

असं ती झोपेत बरळल्यासारखी बोलली.

शोभा मनातल्या मनात ओशाळली. तिला वाटलं होतं, ती झोपली असावी पण ती जागीच होती.

रातकिड्यांचे किर्रऽऽऽ आवाज घुमत होते. दूर कुठेतरी भेसूर आवाजात कुत्रं विव्हळत होतं. त्याच्या ओरडण्यानं आणखीच भयप्रद, उदास वाटत होतं. रात्र जणू खायलाच उठली होती. बंद पापण्यांआड डोळे

उघडेच होते. बंदिस्त शरीरात मन तगमगत होतं. झोप येतच नव्हती. वेगवेगळे भास, आभास... किंचित गुंगीत पडणारी स्वप्नं... अस्वस्थता... रात्र खूप खूप मोठी वाटत होती. दहा रात्रींची मिळून एक झालेली...

• • •

सकाळीच अकोला-पुणे एस.टी. नं सासरा आला. त्याला पाहिल्यावर तिला हायसं वाटलं. रात्रभराचा सारा शीण, उदासी पळाली. नवऱ्याबद्दल, त्याच्या तब्येतीबद्दल ऐकायला मिळेल म्हणून ती सुखावली.

"कशी काय हाये त्याह्यची तब्येत मामांजी आता?" तिनं उतावीळ होत विचारलं.

"चांगली हाये!" सासऱ्याचा आवाज वेगळाच वाटला. फटाका फुटल्यासारखा. याअगोदर कधी असा वाटला नव्हता.

"कधी येणार हायेत मंग ते घरी?" तिनं पुन्हा विचारलं.

"कशाले?" असं विचारून सासऱ्यानं डोळे वटारले.

काय उत्तर द्यावं? कशाले म्हणून सांगावं? मामांजी आज काहून आसं घुरेलावाणी करून राह्यलेत म्हणावं?

गड्यानं दुधाचं भांडं आणून स्वयंपाकघरात ठेवलं. तिनं चहा केला. चहाची कपबशी सासऱ्याच्या हाती दिली. मन अधीर झालेलं.

"कवा देणार हायेत डॉक्टर सुट्टी त्याह्यले?" हिंमत धरून तिनं पुन्हा विचारलंच.

तसे सासऱ्यानं आपल्या वटारल्या डोळ्यांतले निखारे तिच्या डोळ्यांत फेकले आणि कर्कश आवाजात तो म्हणाला,

"कशाले? वावरात जाऊन धिंगामस्ती करायले? तुमाले काय घर कमी पडत व्हतं का गधड्यायहो? नसत्या झंझटी मागं लावून घेतल्या... रात्री डाक्टरनं खोदू खोदू इच्यारल्यावर सगळं सांगतलं भास्कऱ्यानं डाक्टरले. अन् डाक्टरनं मले... कशानं काय झालं... भास्कऱ्या कावून बिमार झाला... समदं समजलं मले. घोडचूक आपून करायची अन् पुन्हा नामानिराळं राह्याचं. दुसऱ्याले तरास द्यायचा..."

सासऱ्याचं बोलणं कानावर आलं. डोक्यात कुणीतरी घणाचे घाव घालीत आहे असं वाटू लागलं. स्वतःचं शरीर कुठेतरी लपवावं वाटू लागलं. कारण सासऱ्याच्या ठिकाणी तिला तो पारधीच बसलेला दिसत होता...

शेवटी मंत्रासारखं मनाशी दडपून ठेवलेलं ते गुपित उघड्यावर आलंच होतं. सासऱ्याला कळलंच होतं. तिला आपल्यापुढे पारधीच बसलेला आहे असं पुनःपुन्हा वाटू लागलं...


सासरा रागेजून काहीबाही बोलतच होता. पण त्याचं बोलणं आता ऐकायला येतच नव्हतं. तो काय काय बोलतोय हे कळतच नव्हतं...

(आगामी 'जमीनजुमला' या कथासंग्रहातून.)



डॉ. सदानंद देशमुख
जन्म : ३० जुलै १९५९
कथासंग्रह : लचांड, उठावण, महालूट, रगडा, खुंदळघास, गाभुळगाभा
विशेष : • 'बारोमास' कादंबरीसाठी साहित्य अकादमी पुरस्कार (२००४)
• म. सा. परिषद, वि. सा. संघ, मॅजेस्टिक प्रकाशन आणि महाराष्ट्र शासनाचे विविध पुरस्कार.
• अध्यक्ष, विदर्भ साहित्य संमेलन, चंद्रपूर (२०१६)
पत्ता : 'बारोमास', शिवाजीनगर, जानेफळ, ता. मेहकर, जि. बुलडाणा-४४३ ३०४.

अनुक्रमणिका



निर्णय

: चंद्रकांत वानखेडे

पाटीलसाहेब लगबगीनं दोन-तीन फायली हातात धरून महसूलमंत्र्यांच्या दालनात दाखल झाले. मंत्रीसाहेब एका फायलीतील मजकूर वाचण्यात दंग होते. त्यांच्यासमोर राज्यमंत्री शिंदेसाहेब व आणखी एक इसम असे दोघेच बसलेले होते. आत येताच पाटीलसाहेब मंत्रिमहोदयांना नमस्कार करीत म्हणाले,

''नमस्कार साहेब!''

मंत्र्यांनी मान उंचावून त्यांच्याकडे बघितलं आणि चेहऱ्यावर हास्य उमटवत ते म्हणाले,

''नमस्कार... या पाटीलसाहेब. बसा. एका अत्यंत महत्त्वाच्या कामासाठी मी तुम्हाला बोलावलेलं आहे. बसा.''

पाटील मंत्र्यांच्या समोरच्या खुर्चीवर बसले. मंत्रीसाहेबांनी त्या फाईलवर काहीतरी लिहिलं आणि फाईल बंद करीत म्हणाले,

''हे बघा पाटीलसाहेब, मी एक महिन्यासाठी शासकीय कामानिमित्त परदेश दौऱ्यावर जात आहे. त्यामुळे आपल्या खात्यातील एक नियुक्तीचं प्रकरण त्वरित निकालात काढायचं होतं. परंतु आता मला मुळीच वेळ नाही. या फाईलवर तशी शासकीय प्रक्रिया पूर्ण झालेली आहेच; शिवाय राज्यमंत्र्यांचीही सही झालेली आहे. आता याबाबत अंतिम आदेश काढावयाचा आहे आणि निर्णय घ्यायला माझ्याकडे वेळ नाही. तेव्हा...''

मंत्रीसाहेब बोलता बोलता थोडे थांबले. पुढ्यातली पाण्याची बॉटल तोंडाला लावून दोन-तीन घोट पाणी प्यायल्यावर ते शांतपणे म्हणाले,

''आता तुम्ही असं करा. ही फाईल नीट पडताळून पहा आणि शासकीय नियमांच्या अधीन राहून नियुक्तीचा आदेश काढा. तुम्हाला काय निर्णय घ्यायचा तो घ्या. तसा अहवाल तयार करा. या प्रकरणावर अंतिम निर्णय घेण्याचा संपूर्ण अधिकार मी तुम्हाला दिलेला आहे. त्यामुळे आदेश काढायला तुम्हाला अडचण जाणार नाही.''

ते ऐकून पाटीलसाहेब अवघडतच म्हणाले, ''परंतु सर, मी आदेश कसा काय काढू शकेल? त्यावर राज्याच्या मुख्य सचिवांची सही लागेल ना सर.''


''ते मला माहीत आहे. म्हणूनच तर मी यावर आधीच एक टिपणी लिहून या प्रकरणात आदेश काढण्याचे सर्व अधिकार महसूल खात्याच्या मुख्य सचिवाकडे दिलेले आहेत. अर्थात ते अधिकार तुम्हाला दिलेले आहेत. तेव्हा तुम्ही या प्रकरणाचा नीट अभ्यास करून राज्याच्या मुख्य सचिवांच्या सहीने आदेश काढावा. ही बघा माझी नोट आणि ही माझी सही.'' असे म्हणतच मंत्र्यांनी ती फाईल पाटीलसाहेबांच्या पुढे सरकावली. नंतर ते गंभीर होत म्हणाले,

अनुक्रमणिका

''पाटीलसाहेब, माझा तुमच्या बुद्धिमत्तेवर व तुमच्या कार्यक्षमतेवर पूर्ण विश्वास आहे. तुम्ही जो निर्णय घ्याल तो योग्यच असेल आणि म्हणूनच मी निघण्यापूर्वी ही महत्त्वाची जबाबदारी तुमच्यावर सोपवत आहे. मला अनेक अवघड निर्णयांत तुमची फार मोलाची मदत मिळालेली आहे. मला तुमच्यावर पूर्ण भरवसा आहे. याही प्रकरणात तुम्ही योग्य निर्णय घ्याल अशी मला खात्री आहे.''

त्यांना मध्येच अडवत पाटीलसाहेब म्हणाले, ''सर, तुम्ही ही फार मोठी जबाबदारी माझ्यावर टाकत आहात.''

''पाटीलसाहेब, तुमच्या कार्यकुशलतेमुळेच ही जबाबदारी मी तुमच्यावर सोपवत आहे. ठीक आहे. हे कार्य नीट करा. मी उद्या निघणार आहे. मी बरीच कामे तुमच्यावर सोपवून जात आहे. तसा आदेशही मी राज्याच्या मुख्य सचिवांना काढायला सांगितलेला आहे. तेव्हा प्लीज, तुमच्या सहकार्याची अपेक्षा करतो. बेस्ट ऑफ लक! बरं आता ती फाईल ताब्यात घ्या आणि निघा. मला जरा मुख्यमंत्र्यांकडे जायचं आहे बरं! या शिंदेसाहेब. निघू या चला!'' असे म्हणतच मंत्रिमहोदय उठले आणि निघून गेले. पाटीलसाहेबही ती फाईल घेऊन आपल्या कक्षात येऊन बसले. तोच राज्यमंत्री शिंदेसाहेब त्यांच्या कक्षात आले... त्यांना पाहताच पाटीलसाहेब उठून उभे झालेत.



''या साहेब, जयभीम!''

''जयभीम! बसा...'' पाटीलसाहेब आपल्या खुर्चीत बसले आणि म्हणाले, ''बोला साहेब... कसं काय येणं केलं?'' असं म्हणतच पाटीलसाहेबानं बेल वाजवली, तोच शिपाई आला. त्याला पाहाताच पाटील म्हणाले,

''दोन चहा सांग आणि सोबत बिस्किटंपण.''

''खरं तर मी तुमचं अभिनंदन करायला आलो आहे पाटीलसाहेब.'' शिंदेसाहेब पाटीलसाहेबांना म्हणाले, ''महसूलमंत्र्यांनी फार मोठी जबाबदारी टाकलेली आहे तुमच्यावर. डॉ. बाबासाहेबांच्या पुण्याईनं तुमच्या हातात सत्ता आलेली आहे. आता तुमच्यासारखी उच्चपदस्थ माणसंच डॉ. बाबासाहेबांचं स्वप्न पूर्ण करताना दिसत आहेत, नाही का?''

''खरं आहे तुमचं. आपण बाबासाहेबांची माणसं आहोत. बाबासाहेबांनी आयुष्यभर अन्यायाचा प्रतिकार केला; परंतु कुणावरही अन्याय होऊ दिला नाही. अन्यायाच्या विरोधात त्यांनी नेहमीच संघर्ष केला. प्रसंगी स्वार्थ, त्याग, पद, पैसा याची पर्वा केली नाही. बरं ते जाऊ द्या. आपण कसं काय येणं केलं साहेब?''

''हे बघा पाटीलसाहेब, महसूलमंत्र्यांनी जी फाईल तुम्हाला दिलेली आहे ना ती आपल्या दृष्टीने फार महत्त्वाची फाईल आहे आणि तुम्हाला तर या प्रकरणात सर्व अधिकार देऊन टाकलेले आहेत. हे फार छान झालं. आता तुम्हाला आपल्या माणसासाठी तुमच्या पदाचा उपयोग करून घेता येईल.''

''तो कसा?''

''हे बघा पाटीलसाहेब आपला एक उमेदवार महसूल आयुक्त पदासाठी दावेदार आहे. सोपान गोमाजी जवादे आणि त्याला नियुक्ती देणं तुमच्या हातात आहे. तो डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा माणूस आहे. आपल्या समाजाचा माणूस आहे; शिवाय तो पात्र आहे. टॅलेंटेड आहे. त्याने सर्व पात्रता पूर्ण केलेल्या आहेत. आता फक्त तुम्हाला त्याचा आदेश काढावयाचा आहे आणि तो अधिकारही तुम्हाला आहे. तेव्हा आपल्या माणसाची नियुक्ती झाली पाहिजे. डॉ. बाबासाहेबांच्या विचारावर अंमल करावयाची तुम्हाला संधी मिळालेली आहे. तेव्हा...''

''मग त्यात काय कठीण आहे. सोपान जवादे जर पात्र असेल तर मिळेल ना त्याला हे पद. तुम्ही चिंता करू नका, मी आहे ना. आपला माणूस पात्र असेल तर त्याला न्याय देणं माझं कर्तव्य आहे.''

एवढ्यात शिपाई चहा घेऊन आला. शिंदेसाहेबांनी इकड-तिकडच्या गोष्टी करीत चहा संपविला ते उठले. उठता उठताच म्हणाले, ''आपल्या माणसाचे काम झाले पाहिजे पाटीलसाहेब.'' ते निघून गेले.

चारपाच दिवसांत पाटीलसाहेबांनी त्या प्रकरणाचा बारकाईने अभ्यास केला. सर्व मुद्दे, मिळालेले गुण,

मुलाखतीचे तपशील, शिफारशी, निरनिराळी टिपणे अशा अनेक बाबी पुन्हापुन्हा पडताळून पाहिल्या. त्यावर विचार करीत गेले. या प्रकरणात मंत्रिमहोदयांनी त्यांच्यावर टाकलेला विश्वास. स्वतःचे कर्तव्य आणि जबाबदारीची जाणीव, सामाजिक भान, मनात रूजवून ठेवलेले तत्त्वज्ञान हे सारं त्यांच्या मनात सारखं धुडगूस घालीत राहिलं. एकीकडे मंत्र्यांनी त्यांच्यावर टाकलेला विश्वास तर दुसरीकडे राज्यमंत्री शिंदेसाहेबांनी केलेला सामाजिक जाणिवेचा उपदेश. अशा विचारचक्रात ते सापडले. याच विचारांच्या वादळात त्यांचे चार-पाच दिवस निघून गेलेत.

तो सुटीचा दिवस होता. दिवाणखान्यात ते एकटेच ती फाईल चाळत बसले होते. तेवढ्यात दारावरची बेल वाजली. पाटीलसाहेब फाईल मेजवर ठेवून उठले. दारात एक गृहस्थ उभे होते. पाटीलसाहेबांना पाहाताच ते गृहस्थ म्हणाले,

''नमस्कार साहेब. मी बालाजी सरदेसाई. पुण्यावरून आलो आहे.''

''कोण पाहिजे तुम्हाला?'' पाटीलसाहेबांनी चौकशी केली.

''मला मुख्य सचिव पाटीलसाहेबांना भेटायचं आहे...'' ते गृहस्थ म्हणाले.

''असं व्हयं... या. या आत या. मीच पाटील आहे.'' असं म्हणतच पाटीलसाहेब त्यांना दिवाणखान्यात घेऊन आले.

''या, बसा...''

सरदेसाई दिवाणखान्यात इकडे-तिकडे पाहात सोफ्यावर बसले. थोड्यात वेळात नोकर मेजावर पाण्याने भरलेले पेले ठेवून गेला. पाटीलसाहेब त्या गृहस्थाकडे पाहात म्हणाले. ''घ्या, पाणी घ्या.''

त्या गृहस्थांनी पाणी घेतले. पेला परत मेजावर ठेवला. तेव्हा पाटीलसाहेब म्हणाले.

''हं. बोला काय काम काढलंय माझ्याकडे?''

पाटीलसाहेबांच्या थेट प्रश्नानं म्हातारेबुवा थोडे गडबडले. नंतर स्वतःला सावरत म्हणाले,

''साहेब, माझ्या मुलाने एम.पी.एस.सी.त टॉप केलंय आणि त्याची नियुक्ती महसूल विभागात होणार आहे, असं कळलंय. आपण महसूल विभागाचे मुख्य सचिव आहात. तेव्हा या संबंधात तुमची भेट घ्यावी असं वाटलं. म्हणून आलोय भेटीला.'' त्या गृहस्थाने एका दमात सारं काही सांगून टाकलं.

''काय नाव आहे तुमच्या मुलाचं?''

''सूर्यकांत बालाजी सरदेसाई.''

''छान! मग तुमची काय अपेक्षा आहे माझ्याकडून? आणि हे बघा सरदेसाई, मी जरी त्या विभागाचा प्रमुख असलो तरी जे नियमानुसार व शासकीय धोरणानुसार असेल तेच मला करावं लागेल. त्यामुळे या बाबतीत तरी माझ्याकडून अशी वेगळी काही अपेक्षा करू नका. मी माझ्या कर्तव्याला आणि शासनाच्या नियमांना बांधील आहे. तेव्हा...''

''साहेब, मी तुम्हाला नियमबाह्य काही करा, असे म्हणणार नाही. परंतु माझे दोन शब्द तरी तुम्ही ऐकून घ्यावे, अशी माझी आपणास विनंती आहे साहेब.'' म्हातारा कळवळत म्हणाला.

''बरं, तुमचं जे काही आहे ते ऐकून घेतो. परंतु एक लक्षात असू द्या, मला कुठलीही गळ घालू नका किंवा विनवणी करू नका आणि जे काही सांगायचं आहे ते अगदी थोडक्यात सांगा. ठीक आहे?''


''ठीक आहे साहेब.'' ते गृहस्थ अत्यंत केविलवाणे होऊन सांगू लागले, ''मी पेन्शनर आहे साहेब. मोठा मुलगा अमेरिकेत आहे. परंतु आम्हाला काहीही उपयोग नाही. तो तिकडे गेला तेव्हापासून परत आलाच नाही. माझा दुसरा मुलगा सूर्यकांत फार हुशार आहे साहेब. तोच आता आमचा आधार आहे. मुलगी लग्नाला आलेली आहे. घरची स्थिती बेताचीच आहे. मुलाला जर नोकरी मिळाली तर आमचं पुढील जीवन बरं जाईल. भविष्याची चिंता सुटेल. तसं मी तुम्हाला फार आग्रह किंवा विनंती वगैरे करणार नाही. माझा मुलगा जर त्या पदासाठी पात्र असेल तरच त्याची निवड करावी. परंतु त्याच्यावर अन्याय होईल असं काही करू नका साहेब. माझी तुमच्याकडून एवढीच अपेक्षा आहे साहेब.''

''मिस्टर सरदेसाई, तुम्हाला असं का वाटलं की, मी तुमच्या मुलावर अन्याय करेन?'' पाटीलसाहेबांच्या या प्रश्नानं ते अगदी स्तब्ध झाले. काय उत्तर द्यावं ते त्यांना सुचेना. ते खाली मान घालून गप्प बसले. तेव्हा पाटीलसाहेब म्हणाले,

''अहो सरदेसाई, अन्याय करणे ही आमची संस्कृती नाही. आम्ही मात्र पिढ्यान्‌पिढ्या अन्याय सहन केलेला आहे. अन्यायाचा प्रतिकार करा परंतु इतरांवर मात्र अन्याय करू नका ही आम्हाला डॉ. आंबेडकरांची शिकवण आहे. मग आम्ही दुसऱ्यांवर अन्याय कसा

करणार? तुमची माझ्याबद्दल तशी समजूत झालीच कशी? इतरांच्या संस्कारात आणि आमच्या संस्कारात फार अंतर आहे मिस्टर सरदेसाई. परंतु तुम्हाला घाबरण्याचे कारण नाही. तुम्ही म्हणता त्याप्रमाणे तुमचा मुलगा त्या पदासाठी योग्य असेल तर त्याच्यावर अन्याय होणार नाही याची खात्री बाळगा. ही डॉ. आंबेडकरांची संस्कृती आहे. तीच आम्हाला शिकवण आहे. तुम्ही निश्चिंत रहा. जे योग्य असेल तेच होईल, समजलात? चहा घेणार का तुम्ही?''

''नको नको, तुमच्याकडून एवढीच अपेक्षा आहे साहेब. बरं चलतो मी.'' असं म्हणतच ते गृहस्थ निघून गेलेत. पाटीलसाहेब पुन्हा विचारात मग्न झाले. त्यांच्या मनात आता कमालीची अस्वस्थता दाटली होती. त्यांच्या चेहऱ्यावर तणाव येऊ लागला. त्यांनी या प्रकरणाचा अत्यंत बारकाईने अभ्यास केला होता. एकूण बावीस उमेदवारांतून सूर्यकांत सरदेसाई व सोपान जवादे टॉपवर होते, त्या दोघांतून एकाला आयुक्त, दुसऱ्याला उपायुक्त पदावर नियुक्ती मिळणार होती. दोघांनाही सारखेच गुण होते. सर्वच निकाल पडताळून पाहण्यात आले. त्यामुळेच पाटीलसाहेब अजूनही कोणत्याच निर्णयाप्रत पोहचत नव्हते आणि आताही ते त्याच विचारांच्या भोवऱ्यात गरगर फिरत होते. निर्णयाचे पारडे सारखे वरखाली सरकत होते. त्यामुळे सोपे काम अवघड वाटत होते.



कधी नव्हे ते आता त्यांचे मन आणि अंतःकरण दोन्ही ढवळून निघाले होते. एकीकडे समाजाविषयीची आस्था. आपल्या समाजावर हजारो वर्षे झालेला अन्याय. त्यामुळे हातात असलेल्या सत्तेचा उपयोग करण्याची संधी. समाजाचे ऋण फेडायची उदात्त भावना. तर दुसरीकडे कर्तव्य आणि जबाबदारीशी इमान राखण्याचे व्रत. कर्तव्यदक्षता की भावनाविवशता या विचारांच्या द्वंद्वात ते अडकले होते. त्याच विचारांच्या तंद्रीत ते गटांगळ्या खात बसले होते. तेवढ्यात त्यांच्या पत्नीने चहाचा कप त्यांच्यापुढे आणून ठेवला. त्यांच्या शेजारी बसतच ती म्हणाली,

''अहो, ती नाही का माझी मावसबहीण निर्मला, तिचा फोन आला होता. ती म्हणत होती तिच्या दिराचं काही काम आहे तुमच्याकडे.''

पाटीलसाहेब चहाचा घोट घेत म्हणाले, ''काय काम काढलं तिनं माझ्याकडे?''

''ती म्हणत होती तिच्या दिराच्या बाबतची फाईल तुमच्या महसूल विभागाकडे आलेली आहे. त्यासाठी तुम्ही प्रयत्न करावे, असं म्हणत होती ती.''

''कसली फाईल? काही डिटेल्स वगैरे सांगितले काय तिनं?''

''हो तर- ती म्हणाली, तुमच्या विभागातर्फे तिच्या दिराला महसूल आयुक्त पदावर नेमणूक द्यावी, असं ती म्हणाली.''

''मग, तुझं काय मत आहे?'' पाटीलसाहेबांच्या या प्रश्नानं ती पार गडबडली. ती स्वतःला कशीतरी सावरत म्हणाली, ''मी असं म्हणते की, बाबासाहेबांनी आपल्या हातात अधिकाराची चावी दिली आहे. तर त्याचा उपयोग आपण आपल्या समाजाच्या हितासाठी केला पाहिजे.''

''तुझं मत अगदी बरोबर आहे. आपण बाबासाहेबांची लेकरं आहोत. याचं भान मला आणि तुलाही आहे. तेव्हा आपली जबाबदारी आहे.''

''होय, खरं आहे तुमचं.'' पत्नी म्हणाली.

''आपण बाबासाहेबांची माणसं आहोत. मग आपण जशी न्यायाची अपेक्षा करतो तशी आपणावर जर दुसऱ्याला न्याय देण्याची पाळी आली तर आपण दुसऱ्यांवर अन्याय करायचा का?''

''नाही, आपण न्यायासाठी भांडू; पण दुसऱ्यावर कधीही अन्याय करणार नाही.'' त्यांच्या पत्नीने सडेतोड उत्तर दिले.

''हे बघ, आपण सुशिक्षित आहोत आणि बुद्ध, फुले, आंबेडकर यांचे विचार आपल्या अंगवळणी पडलेले आहेत. आपण आता विवेकशील व विचारी झालेलो आहोत. परंतु आपला समाज मात्र फार भावनाशील होत चाललेला आहे. कारण आपल्या माणसाकडून त्यांच्या काही अपेक्षा असतात. ते आपल्याकडून त्यांच्या

हिताची उमेद बाळगून असतात. त्यांची अपेक्षा रास्त असते. त्यामुळेच आपलं अधिकारावर असणं अवघड होऊन जातं. परंतु अशा वेळी आपणास एकांगी विचार करून चालत नाही आणि आपली ही अवस्था आपण समाजाला सांगूही शकत नाही.''

''जाऊ द्या. टेंशन घेऊ नका. मी सांगते तिला. जे शासकीय नियमात असेल त्यानुसार जे शक्य असेल ते करू तिच्यासाठी.'' असे म्हणतच ती रिकामा कप उचलून निघून गेली. पाटीलसाहेब पुन्हा विचार करू लागले. तसे तर ते प्रकरण त्यांच्यासाठी फार अवघड नव्हते. परंतु त्यांना भेटणाऱ्यांनी ते पार अवघड करून टाकले होते. राज्यमंत्री शिंदेसाहेब, ते म्हातारे गृहस्थ, त्यांच्या पत्नीची मावसबहीण या सर्वांमुळे त्यांचे विचार दोलायमान झाले होते. त्यांना कधी डॉ. आंबेडकरांचे ते वचन आठवायचे. ''अन्यायाचा प्रतिकार अवश्य करा. परंतु त्याचबरोबर कुणावर अन्याय होणार नाही याचेही भान असू द्या.'' याच आधारावर आपणास आज निर्णय घ्यावयाचा आहे.

मग मी काय करू? त्यांनी स्वतःलाच प्रश्न केला. आपण समाजाविषयी इमान राखायचे की त्यांच्याशी प्रतारणा करायची? आपल्या लोकांच्या अपेक्षा पायदळी तुडवाव्यात की कर्तव्याची पाठराखण करावी? आपल्या माणसांना न्याय द्यावा की त्यासाठी इतरांवर अन्याय करावा? आता आपण काय करावे? अशा विचारांची चक्रे त्यांच्या मनात फेर धरून नाचू लागली.

त्यांनी पुन्हा एकदा मनातून हे सर्व विचार झटकून दूर केले. त्यांनी एका निर्धाराने ती फाईल जवळ घेतली. संपूर्ण प्रकरण पुन्हा एकदा डोळ्यांखालून घालू लागले. वीस-बावीस उमेदवारांतून दोनच नावे आघाडीवर होती. एक सूर्यकांत बालाजी सरदेसाई. दुसरे सोपान गोमाजी जवादे. दोघेही स्पर्धक तुल्यबळ होते. दोघांनाही नोकरीची गरज होती. त्यातील एक आपला दुसरा 'परका' होता. आपण कुणाची बाजू घ्यावी? एकाला उजवा तर दुसऱ्याला डावा ठरवावयाचे होते आणि नेमके हेच अवघड होते.

त्यांनी शैक्षणिक अर्हता तपासून पाहिली. एम. पी. एस. सी.च्या गुणांची जुळवणी केली. ती सारखीच होती. मग त्यांनी ठरवले. या दोघांनाही महसूल खात्यात नोकरी करायची आहे. त्या दृष्टीने त्यांनी प्रश्नपत्रिका आणि उत्तरांची तपासणी केली आणि त्यांचा गुंता सुटला. त्यांच्या चेहऱ्यावर हास्य तरळले. निर्णयाचा मार्ग मोकळा झाला. यात सूर्यकांत बालाजी सरदेसाई वरचढ ठरले. सोपान गोमाजी जवादे दुय्यम ठरले. त्यांनी अत्यंत निर्धाराने टिपणी टाकली. आदेशाचा मसुदा तयार केला. त्यांनी मनात गाठ बांधली. आता समाजाच्या रोषाला सामोरे गेले पाहिजे. कर्तव्याचा भावनेवर विजय झाला. त्यांनी फाईल पूर्ण केली तेव्हा रात्रीचे बारा वाजले होते. फाईलवर धाडसाने सही केली व ती बंद केली. मग ते झोपायला निघून गेले. आता त्यांना शांत झोप लागणार होती.



चंद्रकांत वानखेडे

जन्म : १ जुलै १९४४

प्रकाशित लेखन : 'मयतीची फुलं', 'भूक' आणि 'विटाळ' हे तीन कथासंग्रह.

विशेष : • 'मयतीची फुलं'साठी समाजप्रबोधन पुरस्कार • 'विटाळ' कथासंग्रहासाठी राज्यस्तरीय यशवंतराव चव्हाण पुरस्कार • 'भूक' या कथासंग्रहासाठी विदर्भ साहित्य संघाचा कै. वामन चोरघडे कथा पुरस्कार • कॅनडा येथील आंबेडकर मिशनचा डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुरस्कार.

पत्ता : १२, शिक्षक कॉलनी, रेल्वे स्टेशनमागे, गोधनी रेल्वे, ता. जि. नागपूर - ४४११२३.



न झालेला काकस्पर्श

▫ अरुणा सबाने

माईसाहेबांचा बंगला गाढ झोपेत होता. दोन मजली भव्य इमारत आजूबाजूच्या मोठमोठ्या झाडाझुडपात लपलेली होती. माईसाहेब इथे राहायला आल्या तेव्हाच त्यांनी आंबा, पेरू, अशोका, बॉटलब्रश अशी मोठमोठी झाडं लावली होती. झाडांचा कचरा बघितला की सुजल रोज ओरडायचा; पण उन्हाळा सुरू होत नाही तोच सगळीकडे उष्मा वाढला तरी आपला बंगला कुलर न लावता कसा गार राहतो, याचं तो कौतुकही करतो. ''माई, खरंच तुला केवढी ग दूरदृष्टी! आम्हाला या झाडांचा केवळ पालापाचोळाच दिसतो. तू मात्र त्यांचे केवढे फायदे बघतेस! घरच्या घरीच कैऱ्या खायला मिळतात, गोड गोड पेरूचा तर नुसता सुकाळ. बदाबदा पडतात ते पेरू दिवसभर अंगणात. लालभडक गोड-आंबट सेतूक खाण्याची लज्जत काही औरच.'' मात्र या झाडांमुळे रात्रीच्या नीरव शांततेला एक गूढ रहस्य उगाचच प्राप्त होतं, हे मनोमन माईलाही मान्य होतं. वारा आला की सूऽऽसू होणारा तो आवाज. त्या आवाजाच्या भयापोटीच झोपाळ्यावर मध्यरात्री जाऊन बसणं त्यांनी अलीकडे बंद केलं होतं. अशी अवेळी जाग आली, की मग त्यांना खूप चिडचिडायला व्हायचं. कारण एवढ्या रात्री काय करायचं हा प्रश्नच राहायचा. आज नेमकं तेच झालं. रात्री त्यांना झोपायलाच दीड वाजला. दुसऱ्या दिवशीच्या केसची तयारी करण्यात घड्याळाचा काटा किती सरकतोय, इकडे त्यांचं लक्षच नव्हतं. भावाभावांच्या भांडणात एका भावाने दुसऱ्या भावाचा खून केलेला होता; पण प्रत्यक्ष साक्षीदार कुणीच नव्हतं. मात्र मृत भावाच्या पत्नीची तशी तक्रार होती आणि तिच्याच आईवडिलांचा या गोष्टीला विरोध होता. विधवा सुनेला आपलं आयुष्य सासरीच काढायचं आहे, तर त्यांच्या विरोधात जायचं कशाला? असा त्यांचा आग्रही विचार होता. मात्र तिला ही केस लढायचीच होती. आपल्या मृत पतीला त्याशिवाय शांती मिळणार नाही, अशी तिची खात्री होती. तिच्या मनाची पूर्ण तयारी असल्यामुळेच माईसाहेबांनी तिला मदत करायची असे ठरविले होते. त्याच केसच्या तयारीत आज त्यांना रात्रीचा दीड वाजला होता आणि आता त्यांची झोपमोड झाली होती. कशाचा तरी आवाज येतोय, त्यांना झोपेतच जाणवलं. गाढ झोपेतून आवाजाची नोंद घ्यायला त्यांना जरा वेळच लागला. पापण्यासुद्धा इतक्या जडावल्या होत्या, की त्यांनी पूर्णपणे उघडण्याचा जणू असहकारच पुकारला.

काही वेळात त्यांच्या लक्षात आलं, हॉलमधला फोन वाजतोय. एवढ्या रात्री? त्या मनाशीच दचकल्या. क्षण-दोन क्षणानंतर त्यांनी हात लांब करून आधी पलंगाजवळच असलेलं बटण दाबलं. प्रकाशात घड्याळाकडे बघितलं. पावणेचार झाले होते. एवढ्या पहाटे कुणाचा बरं फोन? त्यांनी जागेवरूनच सुजलला हाका मारल्या; पण तो कसला उठतो? मुख्य म्हणजे या

खोलीतला आवाज त्या खोलीत जाण्याइतपत त्या खोल्या लागूनही नव्हत्या. फोनची रिंग मात्र न थांबता सारखी वाजतच होती. खरं तर त्यांच्या मनात आलं, एवढं असेल कुणाचं आणीबाणीचं काम, तर करेल माझ्या नाहीतर सुजलच्या मोबाईलवर फोन; पण या विचारावर त्या क्षणभरही स्थिर होऊ शकल्या नाहीत. नको. उठावंच. तेवढ्यात वॉचमनच्याही शिट्टीचा आवाज आलाच. त्या पायऱ्या उतरून खाली हॉलमध्ये येतायेताच फोन मात्र बंद झाला. तेवढ्या रात्रीही सुजलच्या आळशीपणावर त्यांनी मनातल्या मनात ताशेरे ओढलेच. किती दिवसांचा त्याला कॉडलेस दुरुस्त करून आणायला सांगतोय आपण, पण हा मेला ऐकतच नाही. कसा ऐकेल? त्याचे सारे फोन, त्याच्या मोबाईलवरच येतात ना. फोन बंद झाला म्हणून त्या किचनमध्ये पाणी प्यायला वळल्या. तोच परत फोन वाजला. पाण्यानं भरलेला ग्लास तसाच ओट्यावर ठेवून त्या आधी फोनकडे वळल्या आणि रिसिव्हर हातात घेऊन म्हणाल्या,

''हॅलो...हॅलोऽऽ''

पलीकडून मात्र क्षणभर काहीच आवाज आला नाही. माई परत म्हणाल्या,

''हॅलो...हॅलोऽऽ''

''कोण माईसाहेब?''

''होय बोलतेय. कोण आपण?''

''मी... मी सौरभ बोलतोय. सुजलदादा आहे काय?'' रडवेल्या आवाजात कुणीतरी सुजलला विचारत होतं.

''सौरभ? कोण सौरभ? आणि एवढ्या पहाटे सुजलशी काय काम?''

''माई...मा..ई..'' पुढं पलीकडून बोलणं होईना. त्याला हुंदकाच फुटला.

''अरे रडतोस काय? कोण तू? काय झालं? काय काम आहे सुजलसोबत?''

कसंबसं रडू आवरत तो मुलगा म्हणाला,

''माई मी सौरभ साळुंखे. सुजलदादाला फोन द्या.''

सौरभ साळुंखे? माईसाहेबांना शंभर व्होल्टचा शॉकच बसला. या कारट्याचा इथे फोन आलाच कसा? आणि याचं सुजलशी काय काम? तेही एवढ्या पहाटे? माईचं डोकच बिथरलं.

''काय रे, सुजलसोबत काय काम आहे तुला? आणि हा आमचा बदललेला नंबर कुणी दिला तुला? एवढी वर्षं तुझ्या बापाने आमचा पिच्छा सोडला नाही. जिवंतपणीच आमच्या मानगुटीवर भुतासारखा बसून राहिला. आणि आता तू? .. तू असा अवेळी फोन करून त्रास देणार आहेस होय?... तो रात्रीच्या दोनपर्यंत फोन करायचा... तू पहाटे सुरू केलास. खबरदार! यानंतर इथे फोन केलास तर, तुझ्या बापासमोर तुझं थोबाड फोडीन.''

''माई... अहो माई माझे पप्पा गेलेत.'' एवढं बोलून पोरगं ओक्साबोक्सी रडायला लागलं.

''गेलेत?... परत घर सोडून गेलेत? आता घर सोडून जायला काय झालं तुझ्या वाह्यात बापाला? आता तर त्याच्या मनासारखी बायको आहे. मनासारखा संसार आहे. आम्ही नको असलेले तर कुणीच नाही ना. जाऊ दे गेला तर. त्यात सुजलचा काय संबंध? तू सुजलला कशाला फोन केलास? सुजल त्याला शोधाबिधायला अजिबात येणार नाही. आमचा त्याच्याशी काहीही संबंध....

पलीकडून मुलाला वाटलं, आता माई फोनच आपटणार. म्हणून घाईघाईत त्यांचं बोलणं मध्येच थांबवून तो मुलगा एकदम ओरडलाच,

''माई, माझे पप्पा घर सोडून नाही गेले. ते गेलेत... गेलेत, मेले...मेलेत...डेथ झाली त्यांची. दादाला सांगा. इथे कुणीच नाही. मी... फक्त मी आहे इथे. या घरात...एकटा मी आहे... मी... एकटा मी. ते गेलेत... गेलेत ते.''

एका दमात सौरभ नावाचा तो मुलगा ओरडलाच. आणि त्याने दाणकन फोन आपटला. त्याचं रडू केव्हाच पळालं होतं. तो आता करवादला होता. माईंच्या डोक्यात आत्ता कुठे त्या मुलाच्या बोलण्याचा अर्थ स्पष्ट झाला होता. परत किचनमध्ये गेल्या. पाण्याने आधीच भरून ठेवलेला ग्लास उचलला. ओठांना लावला आणि एका घोटात त्या भराभर पाणी प्यायल्या. हातातला ग्लास मोरीत ठेवून त्या परत हॉलमध्ये आल्या. आधी त्यांनी सगळे दिवे लावले. सगळा हॉल प्रकाशाने उजळून निघाला. मग हॉलची दारं, खिडक्या सगळं उघडलं. पडदे बाजूला केले. बाहेरच्या हवेचे थंड झोत घरात शिरले. त्यांना छान वाटलं. मोकळं. गुदमरलेला श्वास सुटल्यासारखं. मनात काहीतरी धुमसत होते. ते धुमसणं जणू शांत झालं होतं. बाहेरचं ओलं वादळ त्यांनी आत ओढून घेतलं. त्यांनी वॉचमनला आवाज दिला,


अनुक्रमणिका

''जी मॅडमजी.'' म्हणत वॉचमन तत्परतेनं धावतच आला.

''बाहर के गेट का लॉक खोलना नही। कोई आया तो उसे अंदर नही आने देना। और तुम गेट के पासही रूकना। मुझे बताये बिना जाना नही। रामजीको भी बताना।''

''जी मॅडमजी!''

माईसाहेब पुढे काही बोलत नाहीत, असं बघून वॉचमनने माईंना सलाम ठोकला आणि गेटकडे जाऊ लागला. तो गेल्यावर माईंनी पंखाही लावला आणि सोफ्यावर बसल्या. खरं तर हॉलमधल्या सगळ्या लाईट्‌सची अजिबात गरज नव्हती. दारं-खिडक्या उघडल्यामुळे बाहेरचाच पहाटेचा थंडगार वारा आत येऊन पोहचला होता. पण माईंना पंख्याचीच काय सगळ्या दिव्यांचीसुद्धा गरज वाटली. दारं-खिडक्या उघडल्यामुळे त्यांना मोकळं वाटायला लागलं. जणू आतमध्ये खूप काहीतरी कोंडून ठेवलेलं बाहेर पडतंय. माईंना क्षणभर धड निर्णयच घेता येईना. त्यांच्या मनात सर्वप्रथम हेच आलं की, डॉ. साळुंखेचा मृत्यू झाला हे सांगण्यासाठी त्या पोरानं आपल्या घरी फोन करावाच का? आणि सुजलला सांगावंच का? पण लगेच त्यांच्या हेही लक्षात आलं की, काही झालं तरी तो माणूस सुजलचा बाप आहे. आणि तो पोरगा सुजलला चांगलाच ओळखत असावा. पण कसा? सुजलचा आणि त्याचा संबंध येण्याचं कारणच काय? बरं ते जाऊ दे. पण आता आपण सुजलला झोपेतून उठवून हे सांगायला हवं काय? की तो उठल्यावर सांगावं? नाहीतरी सुजल आता तिथे जाऊन काय करणार? नाहीच सांगितलं तर... असू दे. उठल्यावर सांगू या. माईसाहेब स्वतःशीच असा विचार करीत होत्या. तोच सुजलच खाली उतरून आला.



''अगं माई, काय चाललंय? किती वाजले? आणि एवढ्या पहाटे इथे काय अशी सारे पंखे, लाईट्‌स लावून बसली आहेस? काय झालं? अगं तुला बरं नाही वाटत आहे की काय? आणि दारही काय असं सताड उघडं टाकलं आहेस?''

'' अरे...अरे... केवढे प्रश्न! मी विचारच करीत होते. तुला उठवायचं की नाही ते.''

''अगं माई, तू वॉचमनशी काय जोरजोरात बोलत होतीस? त्यामुळेच मला जाग आली. काय झालं? काय सूचना देत होतीस तू त्याला एवढ्या पहाटेच्या? कुणी चोरबिर तर नव्हता ना आला? आणि हे काय त्यांनीच या खिडक्या उघडल्यात की काय?''

''नाही, आता कुणी चोरबिर येणार नाही. संपला तो सासुरवास. खिडक्या दारं मीच उघडलीत. अरे सुजू, त्या सौरभ साळुंखेचा फोन आला होता.''

''सौरभचा फोन? एवढ्या पहाटे? कसा काय? काय झालं?''

''त्याचे पप्पा गेले. ही इज नो मोअर.''

त्यांनी अतिशय थंड आवाजात सुजलला बातमी दिली.

''काय?...माई, तू काय बोलतेस? स्वप्न पडलं की काय तुला?''

सुजल एकदम भांबावूनच गेला. माईच्या थंडपणाची या वेळी त्याला कधी नव्हे एवढी चीड आली; शिवाय 'त्याचे' पप्पा. सौरभचे पप्पा. काय ही भाषा!

''मुळीच नाही. अशी भलतीच स्वप्नं कशाला पडतील मला? त्या सौरभच्या फोनमुळे उलट माझी झोपमोड झाली. एवढ्या पहाटे ही बातमी इथे सांगायची काय गरज होती? आणि तुला सांगायचीही काय गरज होती? म्हणे मी एकटा आहे. आणि तुला ही बातमी सांगावीशी वाटण्याइतपत तुझे-त्याचे काय रे संबंध?''

''माई... अगं काळवेळ पाहून तर बोल. अगं त्याचे काय आमचेही पप्पा गेले. आमच्या वडिलांच्या मृत्यूची बातमी आहे ही. त्याचे-माझे काय संबंध हा लेखाजोखा वाचण्याची वेळ आहे का ही? कसे गेले ते? हार्ट अटॅकच काय? पण दुसऱ्याच अटॅकमध्ये?''

''म्हणजे आधी एक अटॅक येऊन गेल्याचं तुला माहीत होतं?''

माई बोलत होत्या; पण तेवढ्यात सुजल जिना चढून वरही गेला. जिना चढतानाच रमाला जोरजोरात

आवाज द्यायला लागला.

"रमा...ए रमा... अगं ऊठ. आपल्याला रामनगरला जायचंय."

रमा सुजलच्या आवाजाने दचकून जागी झाली. क्षणभर तो काय म्हणतोय, हेच तिला कळेना. "काय झालं भाई? कसला हा आरडाओरडा?"

"रमा, सौरभचा...म्हणजे साळुंखे... सौरभचा फोन आला होता. डॉ. साळुंखे गेले. एक्सपायर्ड झाले ते. मी चाललो. तू चलतेस ना?"

"मी?..मी?...येऊ काय? ती बया असेल ना?"

"तिच्याशी आपल्याला काय देणंघेणं? बघ ठरव तू. मी आटोपतो आपलं. यायचं असेल तर दहा मिनिटांत तयार हो."

सुजल रमाच्या खोलीतून बाहेर पडलाही. त्याच्या मनात नेमक्या कोणत्या भावना या बातमीने आल्या हे त्यालाही सांगता आलं नसतं; पण माई किंवा रमाएवढा तो निश्चितच तटस्थ नव्हता. आपला बाप हे जग सोडून गेला आहे. ज्या बापाजवळ आपण लहानपणापासून राहिलोच नाही, त्या बापाबद्दल त्याला फार स्नेह होता असं नाही; पण खूप रागही निश्चितच नव्हता. त्याला वाटत होतं की आपण आता या क्षणी लगेच त्यांच्याजवळ जायला हवं. सौरभने फोनवर काय काय सांगितलं, हे माईला विचारण्यात अर्थ नव्हता. पप्पांच्या मृत्यूच्या बातमीचा माईशी काहीएक संबंध नाही. ती काहीच नीट सांगणार नाही; किंबहुना सौरभने तिला फार काही सांगितलेही नसेल. सुजलने आपल्या खोलीत येऊन लगेच अनूला-आपल्या पत्नीला आवाज दिला. नुकतीच दोन महिन्यांपूर्वी लग्न होऊन आलेल्या या अनूला घराचा इतिहास अद्याप पूर्णपणे लक्षात यायचा होता; पण या घरात डॉ. साळुंखेंचं नाव घेतलेलं चालत नाही, हे मात्र तिने आपल्या मनाशी पक्कं रुजवून घेतलं होतं. त्यामुळे "पप्पा, गेले. आपल्याला तिकडे जायचं आहे. चल पटकन आवर." हे सुजलचं वाक्य चटकन तिच्या लक्षात आलं नाही.

"काय म्हणताय हो तुम्ही?" हा तिचा प्रश्नही माघारी तिच्याच कानावर येऊन आदळला. कारण तोवर सुजल टॉयलेटमध्ये घुसलाही होता. तरीही सुजल म्हणाला तसे त्याचे सो कॉल्ड पप्पा एक्सपायर्ड झालेत. आणि आपल्याला आता त्यांच्याकडे जायचं आहे, एवढं मात्र तिच्या मेंदूपर्यंत नक्कीच शिरलं. ती तडक उठली आणि ब्रश घेऊन स्वतःचं पटापट आवरायला लागली. दहा-पंधरा मिनिटांत दोघेही आवरून खोलीबाहेर पडले.

रमा खोलीच्या बाहेर येऊन सुजलला म्हणाली,

"भाई, तुम्ही दोघं निघा पुढे. मी आत्तापासून तिथे येऊन काय करणार? नंतर येईन मी. शिवाय आपण सारेच गेल्यावर माई घरात एकटीच राहणार."

"ठीक आहे. हरकत नाही. चल अनू."

"अहो, मी पण तिथे येऊन काय करणार? मीही नंतरच आले तर नाही का चालणार? मी तर तिथे कोणाला ओळखतही नाही."

"अनू, मी चाललो म्हणून तुला यायला हवं."

बोलता बोलता एव्हाना तो पायऱ्या उतरून हॉलमध्ये आलाही. त्याच्यापाठोपाठ अनूही उतरली. माई अद्याप तिथेच बसल्या होत्या. सोफ्यावर. त्यांच्या डोक्यावरचा पंखा अजूनही मघासारखाच गरागरा फिरत होता. दोघांनाही दाराशी जाताना पाहून त्या म्हणाल्या,

"सुजू, तू तिकडे जातो आहेस, हे ठीकच आहे; पण अनूला कशाला नेतोस?"

"कशाला म्हणजे? अगं बायको आहे ती माझी."

"होय. तुझी बायको आहे, म्हणूनच तिचं साळुंख्यांच्या मरणात काय काम?"

"ते साळुंखेच योगायोगाने माझे बाप आहेत म्हणून."

"बाप आहे नाही, होता. आणि आता बापाचा मृतदेह बघायला तू जातोस ते ठीक आहे. पण अनूला-त्या नव्या नवरीला नको नेऊस तिकडे. त्या बयेच्या दृष्टीला नको पाडूस तिला."

अनू भांबावून सुजलकडे बघायला लागली. सुजलने नजरेनेच तिला धीर दिला आणि दारातून तो माघारी वळला. मग माईंच्या खांद्यावर हात ठेवून अतिशय शांत-समजूतदार स्वरात म्हणाला,

"माई, अशी काय करतेस? तू एवढी समंजस-समजूतदार. प्रत्येकाला समजून घेणारी. आज असा आडमुठेपणा कशाला करायचा? अगं, तुम्हा दोघांमधून विस्तवही जात नाही हे खरं. तरी आम्हाला जन्माला घालण्यात डॉ. साळुंखेंचाच हातभार आहे ना? हे तर तुला मान्य आहे ना? मग त्या अर्थी तो आमचा बाप आहेच माई. आता ते मृत्यू पावले आहेत. त्यांच्या अंत्ययात्रेच्या तयारीत मी मोठा मुलगा म्हणून माझं काही कर्तव्य आहे की नाही? आणि माझा बाप मेला असताना माझ्यासोबत राहाणं माझ्या बायकोचं कर्तव्य

अनुक्रमणिका

आहे की नाही? माई, अनूचे सासरे वारले आहेत. तिथे माझ्या आजोळची सारी मंडळी येणार. आणि साळुंखेंच्या घरची सूनच तिथे नाही हे बरं दिसेल काय?''

''तुझ्या बापाने जिवंतपणी आपल्या सुनेचं तोंड कधी पाहिलंय काय?''

माई उठून उभ्या राहिल्या. त्यांनी खांद्यावर ठेवलेले सुजलचे हात झिडकारले.

''ज्या बापाला जिवंतपणी सूनमुख बघायला फुरसत नव्हती त्यांच्या अंत्यदर्शनासाठी माझ्या सुनेने जाण्याची गरज नाही.''

''माई, आपण त्यांना सूनमुख बघायची संधी दिली काय? आपण त्यांना माझ्या लग्नाला बोलावलं?''

''त्यांचा काय संबंध तुझ्या लग्नाशी? का बोलवावं मी?''

''अगं, आपण जर बोलावलंच नाही, तर त्यांनी का यावं? ते माझ्या लग्नाला यायला आपणा कुणालाच नको होते ना? यावर आपलं एकमत होतंच. त्यामुळे त्यांनी लग्नाला येणं किंवा सूनमुख बघणं हा प्रश्न कुठे येतो? आणि माई, आता या वादविवादाला काही अर्थच उरलेला नाही. तू शांत राहा. तुला मी समजू शकतो माई. अगं अनू तिथे गेल्याने काही फरक पडत नाहीये. ती तुझीच सून आहे. पण डॉ. साळुंखेंसंदर्भातली ही माझ्या आयुष्यातली शेवटची रीतभात आहे. तेव्हा प्लीज तूही मला समजून घे. माणूस असेपर्यंतच हा कणा ग. तो गेल्यावर आता काय? मृत अस्तित्वासोबत कसला झगडा? चल अनू.''

भांबावलेली, घाबरलेली अनू माईकडे बघायला लागली. तिला काही सुचेचना. आपण नेमकं कसं वागावं? काय करावं? पण सुजलच्या हाकेने ती तिथून हलली खरी, मात्र माईंच्या नजरेतला विखार तिला अस्वस्थ करून गेलाच. माईंना या क्षणी आपण दुखवू नये असं तिला मनापासून वाटलं; पण परत सुजलच्या हाकेने ती बाहेर पडली. सुजल पोर्चमधली गाडी बाहेर काढायला लागला. अनू गाडीत बसून दार लावणार तोच माई ओरडल्या,

''सुजल, गाडी घेऊन जाऊ नकोस. माझ्या कोणत्याच वस्तूवर तिथली नजर पडता कामा नये.''

खरं तर या क्षणी सुजलला खूप संताप आला होता. काय भलत्याच वेळी माई अशी अडवणुकीने वागते आहे! त्याच्या डोक्यात एकदम सनक येऊन तो काहीतरी वेडंवाकडं बोलण्याच्या मनःस्थितीतच दार उघडून गाडीच्या बाहेर आला; पण त्यानं माईकडे बघताच त्याचे शब्द तोंडातच अडखळले. माईंच्या नजरेतले ते विचित्र भावच त्याला जास्त अस्वस्थ करून गेलेत आणि तो चूप बसला. त्याने अनूला गाडीतून उतरायला सांगितलं आणि गाडी लॉक करून तो परत हॉलमध्ये आला. गाडीची चावी जिथल्या तिथे ठेवली. आपल्या बाईकची चावी घेतली आणि माईंकडे न बघताच गाडीकडे गेला. आता माईंकडे बघितलं तर जणू आपलाच निर्णय डळमळीत होईल की काय अशी भीतीच त्याला वाटली. बाईकला कीक मारून अनूला घेऊन तो वेगाने तिथून बाहेर पडला.

सुजल रामनगरमध्ये जेव्हा डॉ. साळुंखेंच्या-त्याच्या बालपणीच्या घरी पोहचला तेव्हा मोजकीच माणसं तिथे होती. शेजारचे दोन-चार पुरुष, त्यांचे दोन-तीन मित्र, नागपुरातच असलेली त्याची आत्या आणि सौरभचे मामा-मामी एवढेच. सुजल आणि अनूने जेव्हा हॉलमध्ये पाय ठेवला तेव्हा डॉक्टरांची बॉडी हॉलच्या मधोमध ठेवलेली होती. सुजलला बघताच सौरभ धावतच येऊन त्याला बिलगला.

''दादा...दादा... पप्पा मला सोडून गेले रे! दादा....पप्पा...''

सौरभच्या केविलवाण्या रडण्याने सुजलचेही डोळे पाणावले. याच वयात आपण या घराला परके झालो होतो आणि याच वयात सौरभही पोरका झाला. मी बापाचं घर सोडून आणि सौरभ बाप राहिला नाही म्हणून! अनू भांबावल्यासारखी नुसती इकडे तिकडेच बघत होती. तिला काहीही सुचेना. बसावं की उभं राहावं, तेही समजेना. शेवटी काही न समजून तिने सुजलला बिलगलेल्या सौरभलाच जवळ घेतलं. सौरभला अनूने जवळ घेतल्यामुळे सुजलची सुटका झाली. सुजल तिथून बाहेर पडायला लगेच वळला. तोच बॉडीजवळ बसलेल्या त्याच्या आत्याने त्याच्या पायाला विळखा घातला.

''फार बरं झाल रे बाबा तू आलास ते. मला तर शंकाच होती तुझ्या येण्याची. अरे कोणी नव्हतं रे इथे. एकटा बिचारा सौरभ. मी आले तेव्हा भयभीत झाला होता तो.''

''त्याची आई कुठे गेली त्याला एकटं इथे ठेवून?''

''माहेरी. काही काम होतं म्हणे तिला तिच्या भावाशी.''

''आणि यांना नेमकं...''

अनुक्रमणिका

''अरे, दादाला रात्री छातीत खूप दुखत होतं म्हणे. म्हणून त्याने काहीतरी औषधं वगैरे घेतली म्हणतो सौरभ. पण रात्री बारानंतर त्याच्या छातीत जरा जास्तच दुखायला लागलं. दरदरून घाम सुटला. सौरभला काहीच सुचेना. ते लहानसं पोर बिचारं घाबरून गेलं. त्याने मग मलाच फोन केला. मी डॉ. गोल्हरांना घेऊन आले. पण त्याने काही म्हणता काही करायला संधीच दिली नाही. जबरदस्त अटॅक होता. रात्री पावणेदोनला त्याचा प्राण गेला. आम्ही रात्रीच संध्याला फोन केला, ताबडतोब ये म्हणून. ती येईलच. सुजल आयुष्यभर तुम्हा दोन घरांचे जे काय वांधे होते, रुसवे फुगवे होते, ते आता त्याच्या जाण्यासोबत विसर रे बाबा! आता हे सारं तुलाच निस्तरायचं आहे. मोठा मुलगा आहेस तू त्याचा. आणि रमा वगैरे नाही आली? तिला सोबत नाही का आणायचं?''

''ती येईल मागाहून. पण माई येणार नाही. तिला तू चांगली ओळखतेस. आणि तिने आता इथे यावं, असा मीही आग्रह करणार नाही.''

''सुजल, चार लोकांत बरं दिसेल काय? लोक काय म्हणतील?''

''आत्या, लोकांचा विचार आम्ही केव्हाच सोडलाय. तुम्हीच तो आम्हाला केव्हाच सोडायला लावला होता. आता ही वेळ जास्त बोलण्याची नाही. मी आलोय, त्यात भरून पावले. लोक काय म्हणतील यासाठी मी माझ्या आईला जास्त दुखवू शकत नाही आणि यांनीही तिला काय त्रास दिला हे मी या क्षणीही विसरू शकत नाही. त्याचीच शिक्षा त्यांना ही अशी मिळाली. एका लहानशा लेकरादेखत 'आपल्या माघारी त्याचं काय होईल?' याची काळजी करत त्यांना प्राण सोडावा लागला. आम्ही या घरातून बाहेर पडलो तेव्हा मीही याच वयाचा होतो.''

''हे बोलण्याची ही वेळ आहे काय सुजल?''

''तेच मी म्हणतोय. तुम्ही कुणीही आम्हाला असं बोलण्याची वेळ आणू नका.''

• • •

नात्यातले मोजकेच लोक डॉ. साळुंखेची राख सावडायला गेले होते. रामटेकला अस्थिविसर्जन करायचं त्यांचं ठरलं होतं. अंत्यविधीच्या वेळी सौरभच्या मामाने सौरभला पुढे करून साऱ्या रीती पार पाडल्या होत्या. मोठा मुलगा म्हणून वडिलांच्या प्रेताला अग्नी देण्यासाठी पुढे आलेले सुजलचे पाय जागीच थांबले. कारण सौरभच्या मामानेच सौरभचा हात हातात घेऊन त्याच्या हाताने मुखाग्नी देववला. तेव्हा अमरावतीच्या आत्याच्या यजमानांनी म्हटलेही,

''अरे, अग्नी काय एवढ्याशा पोराच्या हाताने देता? सुजल करेल हे सारे क्रियाकर्म. काही झालं तरी डॉक्टरांचा मोठा मुलगा आहे तो.''

पण मामाने हेतुपुरस्सर दुर्लक्ष केलं. आणि सौरभलाच पुढे केलं. सुजल जागेवरच थिजला. त्या क्षणी त्याच्या डोळ्यांपुढं प्रकर्षानं माईचा चेहरा आला. माईचंच वागणं बरोबर आहे. हे लोक कधीच सुधरू शकत नाही. माई बोलते ते आपल्याला दिसतं. पण लहानपणापासून या रानटी लोकांनी माईंवर असेच कितीतरी आघात केल्याचे आपण पाहिले आहे.

एवढ्याशा सौरभला खरं तर आपल्या वडिलांना अग्नी देताना खूप भीती वाटत होती. मृत्यू म्हणजे काय हेही न कळण्याचं त्याचं वय. तिरडीवरून उचलून सरणाच्या ओझ्याखाली आपल्या पप्पांना ठेवलेलं बघूनच त्याचा जीव पिळवटून गेला होता. आणि आता चक्क आपल्याच हातांनी त्यांना जाळायचं. छे! भयंकर होतं हे! प्रेताच्या भोवती मडकं घेऊन प्रदक्षिणा घालताना त्याला काहीच वाटलं नाही. पण जळत्या लाकडांनी वडिलांनाच मुखाग्नी द्यायचा... तेही आपल्याच हातांनी.

''नको नको मामा... मी नाही.... मी नाही... अग्नी देणार पप्पांना. मी नाही जाळू शकत माझ्या पप्पांना.'' तो कळवळला.

''असं काय करतोस बाळा? तू डॉक्टरांचा लाडका लेक. तुझ्या हातांनी अग्नी दिला तरच त्यांच्या आत्म्याला शांती मिळेल.''

सौरभला आत्मा, शांती काही काही कळलं नाही. तो क्षणभर स्थिरावला. सारी गर्दी आपल्याकडे रोखून बघत आहे याची जाणीव त्याला झाली. ब्राह्मणांचे गंभीर आवाजातले मंत्र त्याच्या कानावर पडले. त्या मंत्रांचा अर्थ काय, शब्दही त्याला कळत नव्हते. पण त्या मंत्रांच्या आवाजानेच त्याला त्या गंभीर वातावरणात एक प्रकारचा धीर आला आणि त्याने वडिलांना अग्नी दिला. क्षणात भडका उडाला. आणि मामाला विळखा घालून सौरभ जोरजोरात रडायला लागला. साऱ्या गर्दीतून हळूहळू मागे जाऊन उभ्या असलेल्या सुजलने हे सारं दुरूनच पाहिलं. अमित-त्याचा मित्र त्याच्या खांद्यावर हात ठेवून उभा होता. अंत्ययात्रेच्या साऱ्या

अनुक्रमणिका

अनुभवांमुळेच आज सुजल रामटेकला आला होता खरा, पण सहज. अगदी इतर सहभागी झाले तसाच! अपेक्षेप्रमाणे माईशी त्याचा वाद झालाच. पण आज माईशी वाद घालताना त्याच्या आवाजात ठामपणा नव्हता. पुढील आयुष्यात आपण आपल्या एखाद्या कर्तव्यापासून दूर राहिलो, ही रुखरुख वाटू नये म्हणून त्याला या कार्यक्रमात सहभागी व्हायचं होतं एवढंच. त्याच्यासोबत त्याचे दोन मित्र होते. तिघेही एका झाडाखाली छान जागा बघून बसून राहिले. ब्राह्मण आपली पूजा करीत होते. पूजेचा सगळा विधी आटोपला आणि पिंडदानाचा तेवढा कार्यक्रम सुरू झाला. भाताचे नऊ गोळे ब्राह्मणांनी केळीच्या पानावर ठेवले. एक पिंड बाजूला ठेवला. दही, दूध, तूप, शहद, बेलपत्री, सारं सारं वाहून झालं. हळूहळू सारे नातेवाईक पिंडदानाभोवती जमा झाले. एवढी सारी पूजा करून सौरभ थकलाच. त्याने त्याच्या मामाला प्यायला पाणी मागितलं. ब्राह्मण म्हणाला, ''बाळ थांब, एवढा वेळ थांबलास, आता अगदी थोडा वेळ थांबा. या पिंडाला एकदा का कावळा शिवला की तुझा उपवास संपला.''

सौरभ गप्प बसला. दहा दिवसांचे हे सारे क्रियाकर्म तूच नीट पार पाडायचे. कुणालाही मधे-मधे करू द्यायचं नाही, नाहीतर तुलाच पाप लागेल. आणि पप्पांना शांती मिळणार नाही. हे सारं त्याच्या आईने पहिल्याच दिवशी त्याच्या गळी उतरवलं होतं. त्यामुळे जो जो, जे जे, जसं जसं सांगेल तेवढंच सौरभ करत होता. पण बराच वेळ झाला तरी कावळा काही पिंडाकडे फिरकेना. एक दोन कावळे अधेमधे येऊन गेले; पण आजूबाजूला पडलेल्या भाताची शिते त्यांनी मटकावली. पिंडाकडे त्यांनी ढुंकूनही पाहिलं नाही. जसजशी वेळ जात होती, तसतसे सारेच लोक कंटाळले होते. मामा हात जोडून सारखा काहीतरी बडबडत होता.

''डॉक्टर, चिंता करू नका. मी सौरभला आणि संध्याला कधीच अंतर देणार नाही.'' सौरभचे मोठे काका नमस्कार करून म्हणाले,

''मी सौरभची सर्वोपरी काळजी घेईन. त्याचा शेतीतला हिस्सा त्याला नीट देईन.''

- पण कावळा काही पिंडाला शिवायला तयार नव्हता. डॉक्टरांचं कशात मन राहिलं असेल म्हणून सारे एकमेकांसोबत चर्चा करीत होते. सौरभ आणि संध्याची काळजी घ्यायला मामा सर्वोपरी तयार होता. मुळात काळजी घ्यायचीच काय होती? रग्गड पैसे सोडून गेले होते डॉक्टर. आणि डॉक्टरांच्या संपत्तीचा एकमेव वाटेकरी सौरभच आहे, हे वेगळ्यानं कुणालाही सांगण्याची गरजच नव्हती. सुजल किंवा सुजलची आई यांचा त्यांच्याशी आता काहीही संबंध उरलेला नाही, हे जगजाहीर होतं आणि माईला डॉक्टरांची कवडीही नको होती. सुजलही स्वतंत्र बाण्याचा मुलगा होता. ज्या हक्काच्या घरातून एका त्रयस्थ स्त्रीसाठी आपल्या बापाने आपल्याला बेघर केलंय, त्या बापाबद्दल त्याच्या मनात कवडीचाही आदर किंवा प्रेम नव्हतं. फक्त त्याच्या स्वभावाची बाजू ही होती की, कुणालाही बोलून दुखवायचं नाही. आपल्याला जे वाटतं ते करायचं. आणि आयुष्यात पश्चात्ताप होईल, असं कधी वागायचं नाही. मात्र एकदा बेघर झाल्यावर कोणत्याच गोष्टीसाठी त्याने बापासमोर कधीच हात पसरला नाही. आमचे अधिकार तुम्ही हिरावून घेतले. आमचं बालपण, आमचं वयात येणं, आमचं तारुण्य... कशाकशाचा तुम्हाला पत्ताही नाही लागला. एक डॉक्टर असून ना तर तुम्ही आमची बायोलॉजी समजू शकलात ना सायकॉलॉजी. आमची आई हिमतीची म्हणून आम्ही आज असे ताठ मानेने उभे राहू शकलो. आमच्या प्रगतीचं एकएक पाऊल म्हणजे माईचाच विजय होता. तो आपल्या बापाने बघावा, आणि मनातल्या मनात का होईना, खजील व्हावं. त्या घरातून बाहेर पडल्यावर कधी एखाद्या वाढदिवसाला साधं पेनही घेऊन न देणाऱ्या बापाला माईने आपल्या विसाव्या वाढदिवसाला घेऊन दिलेली बाईक दिसावी आणि त्यांनी 'गिल्टी' व्हावंच, यासाठीच जुन्या मित्रांना भेटण्याच्या निमित्ताने तो चारदा रामनगरला जाऊन यायचा. आजचा मृत्यू त्याच्यालेखी डॉ. साळुंखेंचाच मृत्यू होता. पर्यायाने आपल्या बापाचा. आणि ज्या बापाचा मी मोठा मुलगा असताना माझा अग्नी देण्याचा अधिकार नाकारला गेला, तिथे आता आपला काही रोल राहिलाच नाही, हे तो उमगून होता. त्यालाही तशी काही उत्सुकता नव्हतीच. केवळ उद्या काका, आत्या वगैरे लोकांनी आपल्यावर उणीदुणी चर्चा करू नये म्हणून तो आज इथे हजर होता एवढंच.

प्रत्येकाचं साकडं घालून झालं तरी कावळा काही पिंडाला शिवेना. डॉ. साळुंखेंचे भाऊ, बहीणजावई, मेहुणे, मित्र साऱ्यांनीच आपापल्या परीने पिंडाला वचनं देऊ केले. पण काहीही उपयोग झाला नाही. मोठ्या काकाने सौरभला डॉक्टर करण्याचं वचन दिलं तरी कावळा बधला नाही. सगळे थकले, शेवटी काहीच

अनुक्रमणिका

उपाय नाही, भाताचाच कावळा करून तिथे ठेवायचा आणि माघारी वळण्याचं ठरलं. उरलेले सोपस्कार पूर्ण करून ब्राह्मण गाशा गुंडाळायला लागला. तोच आत्याचे यजमान भाऊमामा सुजलजवळ आले. म्हणाले, ''सुजल, अरे तू डॉक्टरांचा थोरला मुलगा. तुझ्याकडून त्यांच्या काही अपेक्षा असतील ना?''

''माझ्याकडून? छे. शक्यच नाही.''

''अरे, असं काय करतोस?''

''खरं तेच बोलतोय. मामा, सौरभशिवाय आपल्याला काही अपत्य आहे, हेच ते साफ विसरले होते. मग माझ्याकडून कसल्या आल्यात अपेक्षा?''

''सुजल, तुझ्या भावना मी समजू शकतो. तुझा रागही मला कळतोय; पण आता ही वेळ नाही रे ती. डॉक्टरांच्या जाण्यासोबतच आता सारंच संपवा. सौरभला कोण आहे तुझ्याशिवाय?''

''एक मिनिट, एक मिनिट भाऊमामा. एक मिनिट. भलतेच काहीतरी समज उराशी बाळगू नका. ज्या बापाचा आणि माझाच काही संबंध नव्हता, तिथे सौरभचा आणि माझा काय संबंध? आणि सौरभच्या पाठीशी त्याची आई आहे, त्याचा मामा आहे, त्याचे काका आहेत, झालंच तर तुम्ही सारेच आहात ना. आजपर्यंत या साऱ्या महाभारतात त्या पोराचा काय दोष, या भावनेनं मी त्याच्याशी बोललो, वागलो. त्याची आई, माझ्याशी कशीही वागली तरीही एका अशिक्षित, मूर्ख स्त्रीचं बोलणं म्हणून मी तिच्याकडे कधी लक्षच दिलं नाही. एकदाच तिला निक्षून सांगितलं होतं, 'माझ्यासोबत पंगा घेण्याच्या भानगडीत पडू नका. फार महागात पडेल.' पण सौरभला मी यातून वेगळंच पाहिलं. ते लहानसं पोर. त्याच्या-माझ्यात वीस वर्षांचा फरक आहे. त्याच्याशी काय हेवादाव्याने वागायचं? जसा मी परिस्थितीचा बळी आहे, शरीरशास्त्राच्या नियमाप्रमाणेच केवळ हा माणूस माझा बाप होता, तसाच काहीसा, तशाच नियमाने सौरभचं नि माझं नातं. बस्! बाकी काहीच नाही. शेजारच्या साऱ्याच पोरांशी आपला काही संबंध असतो काय? पण आपण त्या लहान पोरांकडे 'बाळ' म्हणून बघतो ना. बस. तेव्हा भाऊमामा, प्लीज...''

''सुजल, तू नको, मीच तुला प्लीज म्हणतोय. मला माहितीय, डॉक्टरांनी तुमची कधीच वास्तपुस्त केली नाही, तुमची काळजी घेतली नाही. पण त्यांचा तुझ्यात जीव नव्हताच असं कसं? अरे, जन्माला घातलं त्यांनी तुला. त्यांचं बोट पकडून चालायला शिकलास. तुमचं सारं चांगलंच चाललं होतं, म्हणून त्यांनी कधीच तुमच्याकडे लक्ष दिलं नाही; पण मला माहितीय, त्यांचा जीव आता तुझ्यात अडकलाय. सौरभमध्ये अडकलाय. तू त्याला काहीतरी साकडं घाल रे. बघ. कावळा पटकन शिवतो की नाही ते. सौरभची काळजी आहे त्याला. तू त्याच्याकडे मोठा भाऊ म्हणून लक्ष घालावंस ही अपेक्षा आहे त्यांची. सुजल, मृत्यूनंतर त्यांचा जीव इथेच घुटमळावा, असं वाटतं का तुला?''

''जिवंतपणी ज्यांनी आमची कदर केली नाही, त्यांच्या मृत्यूनंतर मी त्यांचा विचार करण्याचं कारण नाही. त्यांचे भोग त्यांनी भोगावेत. चला रे.''

आपल्या सोबतच्या मित्रांना सुजलने आवाज दिला. एक जोरदार जांभई दिली. हात मागे करून त्याने हाडं कडाकडा मोडली. पूर्ण अंगाला आळोखेपिळोखे दिले. कंबर एकदा डावीकडून आणि एकदा उजवीकडून मोडली. आणि मित्रांच्या खांद्यावर हात ठेवून चालायला लागला. भाऊमामा फक्त मागाहून त्याच्या आकर्षक बांध्याकडे आणि आत्मविश्वासू चालीकडे बघतच राहिले. माईच्या ताठ कण्याला त्यांनी मनोमन अभिवादन केलं. मनातच पुटपुटले, ''याला म्हणतात, मुलं घडविणं. त्या ताठ कण्याच्या स्त्रीलायक नव्हताच हा डॉक्टर!''



अरुणा सबाने

जन्म : २९ मे १९५९

प्रकाशित लेखन 'जखम मनावरची', 'अथांग', 'अनुबंध' आणि 'आक्रोश' हे चार कथासंग्रह. 'विमुक्ता' व 'मुन्नी' या दोन कादंबऱ्या आणि ललित, वैचारिक प्रकारांत विपुल लेखन.

विशेष : • 'आकांक्षा' मासिकाचे संपादन • अ.भा. जलसाहित्य संमेलनांचे आयोजन • देश-विदेशात शोधनिबंधवाचन • अनेक वाङ्मय पुरस्कारांनी सन्मानित • सामाजिक, वाङ्मयीन व सांस्कृतिक चळवळींचा दीर्घ अनुभव.

पत्ता : ए-५०६, गणेशगौरी, कोतवालनगर, नागपूर - ४४००१५

अनुक्रमणिका

सुजल तिथून निघाला आणि गाडीजवळ येऊन उभा राहिला. तिथून एक नजर त्याने मागे वळून पिंडदानाच्या जागेवर टाकलीच. ब्राह्मणाची सगळी आवराआवर झाली होती. नऊ पिंड भाताच्या रूपात केळीच्या पानावर ठेवलेले होते. ब्राह्मण उठला. पिंडाला परत सौरभला नमस्कार करायला लावला आणि तिथली दक्षिणा उचलून खिशात ठेवली. सुजलच्या मनात सहज विचार आला-भाऊमामा म्हणाले तसं खरंच डॉ. साळुंखेंच्या मनात काही असेल काय? मेल्यानंतरही डॉ. साळुंखे मात्र स्वार्थीच राहिले म्हणायचे. भाऊमामा म्हणाले तसं ज्या बोटांच्या आधाराने मला चालायला शिकवलं, तोच आधार काढून घेऊन त्यांनी मला या समाजाच्या महापुरात त्याची सवय होण्यापूर्वीच ढकलून... अक्षरशः ढकलूनच दिलं ना! माईंसोबतचे त्यांचे वादविवाद मी समजू शकतो. पण आम्हा मुलांचा त्यांच्या भांडणाशी काय संबंध? माई म्हणते तेच खरं. त्यांना जबाबदारी नको. कोणतीच जबाबदारी नको. आताही ते आपली जबाबदारी पार पाडण्यापूर्वीच गेले. पहिल्यांदा त्यांनी त्यांच्या जगातून आम्हाला बाहेर केलं आणि आता सौरभच्या कर्तव्यातून स्वतःच बाहेर पडले.

भ्याड!

स्वार्थी!!

स्वार्थी माणूस!!!

मला बाप होता; पण मी अनाथच राहिलो, पोरका. आयुष्यभर पोरका. भरपावसातही एखादी आडोशाची जमीन कोरडीच राहावी तसा.



ओले हळदीचे ऊन

▫ वसंत वाहोकार

पन्नाशीतही त्या अजून जशाच्या तशा म्हणजे कोणाही अठराविशीतल्या लेकरानंही त्यांना पाहून गिरकीच घ्यावी अशा. राजस, लोभस, देखण्या, रूपस अशा सगळ्या विशेषणांनी एकत्र नांदावं अशाच. त्या फारसं बोलत नाहीत, पाहतात सारख्या. पण पाहणं जीवघेणं. एखादी कविता असते जमून आलेली भन्नाट आणि आपल्या गळ्यातच हात घालते तशा. आणि त्यांच्या तोंडून निघालेला एखादाही प्रश्न असा की...

तिसराच प्रहर भरदुपारचा. बाहेर ऊन होतं. झाडं शांत होती. पाखरांचाही कुठे स्वर नाही. रहदारीही जेमतेम, रस्ते जरा या कुशीहून त्या कुशीवर. पलीकडच्या आमराईतून, दाट गर्दीतून एखादा स्वर उमटत असे तो कोकिळेचा. कॉलेज होतं एवढं मोठं आणि ऐसपैस परिसर व्यापून. तिथंही पोर्चसमोर चारदोन कार तेवढ्या उभ्या. एरवी शांत... निरागस... परंतु सेशन सुरू असते तेव्हा, रंगांची आणि चैतन्याची नुसती जत्रा. त्या बाल्कनीतून शांतपणे न्याहळत असतात, ते नवे दिवस. नवलाई. घरकामाची बाई निघून जाते घाईत. मग दूधवाला, कधी असाच कोणी... आणि नंतर मग जगच संपून जाते जसे. शेजारची तीन लहान मुले यायची शाळेतून परत आल्यावर दुपारची, मग त्यांनी स्वतःची घरं केलीत आणि निघून गेलीत शहरात दुसरीकडे. मग पुन्हा आपलं सुखाचं, शांत, झोपाळू आयुष्य आलं चालून. त्यांना ते प्रिय होतं. तेच प्रिय होतं. होतं प्रिय मग?

''तुझ्या लग्नाचं ठरतं की नाही रे अजून काही? किती दिवस असा इकडून तिकडे भटकत राहणार तू... किरण?''

फार दिवसांनी पुन्हा एकदा त्यांनी हा प्रश्न विचारला होता आणि गांगरून गेला होता किरण. काय उत्तर असेल या प्रश्नाचे? कंपनी जॉईन केली त्याला आता दोन वर्षे होतील. स्थिरस्थावर झालोत असंही म्हणता येत नाही. गावी जावं तर घरच्यांचं असतं, विशेषतः थोरल्या वहिनींचं, ''मनावर घे रे लग्नाबद्दल किरणदादा. आम्ही मुली शोधायच्या आपल्यातल्या की तू जमवलं आहेस आपलं कुठे काही? असेल तर तसं सांग. आम्ही घेऊ मनावर रे. आपले आई-बाबा त्यालाही नाही म्हणणार नाहीत. खरं सांगते किरणदादा!'' मोठी वहिनी आहे गावाकडचीच. ती त्याला किरणदादाच म्हणे अगदी सुरुवातीपासूनच. त्याच्या डोळ्यांसमोर ते सारं उभं राहातं. आणि त्यावर यांचा हा प्रश्न. असा खिंडीत गाठणारा. अलीकडे तर तो विचारही...

''किती दिवस असा इकडून तिकडे भटकणार आहेस तू?''

आज दुपार फ्री मिळाली. बॉस फोनवरच म्हणाला, ''अब आके भी क्या करेगा तू...

अनुक्रमणिका

मत आ... एंजॉय युवरसेल्फ...'' म्हणून मग तो सरळ लंच घेऊन इकडेच आला होता. त्यांच्या दरबारात थेट. नेहमीसारखा. तर त्यांचा हा प्रश्न... ''किती दिवस?''

त्याचं नक्की काय उत्तर असणार होतं, या क्षणी?

मग त्या उठून आत गेल्या. येताना चहाचे कप घेऊनच आल्या. मघापेक्षा अधिक ताज्या आणि टवटवीत. अधिक स्वागतशील... मग त्याच्या डोक्यावर हात ठेवत म्हणाल्या, ''ले... चाय ले... पण घरचा काही वेगळाच असतो रे! नाही?''

त्यानं मान वर करून त्यांच्याकडे पाहिलं. चहाचा कप समोर ठेऊन त्या आपल्या ऐसपैस खुर्चीत विसावल्या. दोन्ही हातांत चहाचा कप धरून.


''हमारे में ना रे... पोरापोरीच्या लग्नाची साऱ्यांनाच घाई असते. एकदा का पोरगा-पोरगी नोकरीत लागले की झालं मग घरच्यांचं ते सुरू त्यांच्या मागे... तुणतुणं... म्हणतात ना ते... लकडा लगाते है पिछे घरवाले... आणि नाते-रिश्तेवाले तर जरा आगाऊच...!''

चहा बराच गरम होता. त्याला अंदाज न आल्यानं गडबड झालीच, चटका बसलाच. त्यांच्याही ते लक्षात आलं. म्हणाल्या ''घाई कशाला? हळू रे!''

''जास्मिन नंदा मला भीक घालत नाही... लग्नाचं नाव काढत नाही... मी काढलं तरी मला ठोकरून लावते. 'इडियट' वगैरेही म्हणते फाट्दिशी...'' त्याच्या मनात आलं, हे त्यांना आता सांगूनच टाकावं, पण तसं काहीही झालं नाही. धांदरटपणा तेवढा झाला आणि त्याच्या तोंडून फटकन् बाहेर पडलं...

''आमच्यात पण तेच असतं ना... तेच... आता आता कुठे असतात शिकलेल्या, नोकरीतल्या पोरी!''

जराशी कळी उमलली जणू त्यांची. काहीतरी बोलेलच ... याचं असेल का कुठे काही? लवकर जमवतात ही स्मार्ट पोरं... चक्कर जल्दी चल जाता है इनका... नाही तो... ते आमच्या वेळी चिठ्ठीचपाटी कारभार... चाललेच चालले बाबा... 'नौ महिने ढाई कोस का' जानलेवा मामला... 'याचं असेल तसं एखादं पंछी...' त्यांचं मन पाखरू होऊन



भिरभिरत राहिलं... कारण नसताना.

'सरजी? ते कधी येतील परत. भेट झालीच नाही आमची खूप दिवसात... आहेत कुठे, म्हणजे कोणत्या सिटीला...!' त्यानं त्यांच्या मिस्टरांची चौकशी केली.

'हिमाचल प्रदेश सुरू आहे रे सध्या. तिकडे नवा प्लांट उघडलाय ना कंपनीनं... यांना धावावं लागत आहे... इधर उधर... या वयातही.'

त्याचा अनपेक्षित प्रश्न त्यांनी एवढा सहज उचलला. मग पुढे म्हणाल्या, ''नेक्स्ट वीक. पुढील आठवड्यात येतील असं वाटते. कंपनी आहे. पैसा देते, पण जीव घेते... सारखं धावावं लागतं त्यांना, वैतागतात ते या वयात...''

तो पाहात होता. त्या निवांत बसल्या होत्या. पाय लांब करून. समोर चार हात अंतरावर... त्यांचे ते गोरेपान तळवे... नखांना आता आता केलं असावं असं चकाकतं पॉलिश आणि ते पाय... मधूनच हलणारे... मग काहीतरी सुचल्यासारखं म्हणाल्या,

''जेवायलाच ये ना रे रात्री... फिश आली आहे फ्रेश. तुला तर अतीच प्रिय आहे ना कोकणातली मासोळी... मारोती घेऊन आला आजच सकाळी... आयेगा फिर? आयेगा? ये ना!''

तो नुसताच पाहात होता. हो म्हणावं की नाही... तेवढ्यात टुण्णकन् उडी मारून एक लालपिवळा धिप्पाड सरडा धाडकन् आला आणि मान वाकडी करून निघूनही गेला. त्याला वाटलं त्या ओरडतील, घाबरून किंचाळतील... पण त्या अगदी सहज होत्या. त्याला पुन्हा म्हणाल्या ''मेहमान है वो यहां का... आम्ही पाळला आहे तो... झूमर!''

''मग येतोस जेवायला? ये... पूर्णिमाला पण बोलावलं आहे मी. ती मुक्कामालाच येणार इकडे दोन दिवस...!''

''नाही जमणार आज. शुक्रवार म्हटलं की आमचे सैतान बॉस... आंगात येते त्यांच्या... धमाल असते बाप रे!'' तो स्पष्टपणे म्हणाला. त्यावर त्या काही बोलल्या नाहीत.

मग तो उठला. तो निघणार म्हणून त्या झर्रकन् आत गेल्या.

येताना कसलासा बॉक्स घेऊन आल्या. त्याला देत म्हणाल्या, ''आता कधी रे येशील?'' त्यावर त्यानं नुसतीच मान तिरपी केली. डोळे मोठ्ठे केले.

त्याची बाईक वेगात निघाली, कॅम्पस्‌मधून... त्या बाल्कनीत उभ्या होत्या... कितीतरी वेळ. क्षणांची भिरभिरणारी फुलपाखरं इकडून तिकडे.

• • •

आणि प्लेन उशिराच पोहचलं. बराच उशीर. मग मधेच काय तर जॅम लागला. गाड्या खोळंबल्या. माणसं अडकून पडली. त्या बाल्कनीत खुर्ची टाकून वाट पाहात होत्या. आता येईल गाडी, मग येईल... कितीतरी वेळ निघून गेला. मोबाईलदेखील काम करीत नव्हता.

डोळा लागला बसता बसता. तेवढ्यात गाडीचा हॉर्न वाजला. ओळखीचा, दोनदा तीनदा. सरजी उतरले. ड्रायव्हरनं गाडी पार्क केली.

''हाय जानेमन!'' हात उंच करीत सरजी त्यांना म्हणाले... त्यांनीही हाताची कमान करीत स्वागत केले... मनातल्या मनात म्हणाल्या, ''अजूनही किती ताठ आहे हा माणूस... फिफ्टीफाईव्ह क्रॉस किया फिर भी...''

त्यांनी दार उघडलं तर त्या उतावळ्या नवऱ्यानं वेढूनच घेतलं. मग थोड्या वेळात ड्रायव्हर लगेज घेऊन आला, ते त्यानं ठेवलं. सरजींनी खिशातून पैसे काढून त्याला दिले. ''जा, जा के मजा कर ले... रात को सात बजे फिर आयेगा, समझा ना? और जरा कम ही पिते जाना बे, ऐय्याश!'' काहीच बोलला नाही ड्रायव्हर, पाठमोरा झाला. जिन्यातून खाली उतरला. मग त्यांनी दार बंद केलं आणि सरजींनी त्यांना कसके वेटाळून घेतलं. त्या काय बोलणार होत्या! भर ओसरल्यानंतर त्या म्हणाल्या, ''बसा आता निवांत. चहा घेऊन येते. मग बोलूच... नाऊ रिलॅक्स! सर...''

''अभी चाय? चाय! अच्छा पिला दो यार... मग अंघोळ वगैरे. रात्री सात वाजता पुन्हा जायचं... कॉन्फरन्स ठेवली साल्यांनी आजच... रात्रीचं जेवण पुन्हा तिकडेच होईल...'' त्यांनी आदेशच बजावला जसा.

त्या आताही काय बोलणार होत्या! आत निघून गेल्या. सरजींनी सिगारेट पेटवली आणि पेपर हाती घेतला.

''सुन अरे! सुजला कॅनडाला चाललीय... सांगितलं असेल ना त्यांनी तुला? बात हुई क्या?'' सरजींनी माहिती पुरविली.

''हो हो... माहिताय मला... झालं बोलून आमचं... जावईसुद्धा फार खूश दिसलेत... काय काय ठरत असतं हो या लोकांचं... आणि किती फटाफट...''

एकुलती एक मुलगी आता दिल्ली सोडून कॅनडाला जायला निघाली होती. तेही ऑगस्टमध्ये... दीडेक महिन्यात लगेच. इथे होती तर अधूनमधून सहज भेटता तरी येत होतं... आता इतकी लांब दूर जाईल तेव्हा? जावयाला तर सतत उडण्याचीच हौस. इथे होते तर निदान त्यांना मूल व्हावं असं काही पाहता आलं असतं तरी... आता. काहीतरी सुटत चाललं होतं जणू.

''ज्याचं त्याचं नशीब बाबा, होय ना हिमानी? आपण काय दखलअंदाजी करणार त्यांच्या संसारात? त्यांचं काम, त्याचं करिअर, त्याचे वेगवेगळं जॉब... सब कुछ बहोत फास्ट हो रहा है... सिंपली टेरिबल यार! हिमानी तुला सांगतो यार...!''

''घ्या. चहा घ्या आधी!'' त्यांनी पुखराजांच्या हातात कप दिला आणि म्हणाल्या, ''तुमचा सगळ्यांचा जमाना आहे आता... तुमचा, त्या पोरीचा, त्या जावयाचा... तुम्हा सगळ्यांचा. माझं काय? मी आपली बरी बाबा गेल्या जमान्याची... काय म्हणतात ते जॉबलेस...''

'नाही बाबा हिमानी! तसं कसं' पुखराज म्हणजे 'सरजी' म्हणाले, ''तू आहेस म्हणून तर... आमची दुनिया आबाद है सरकार!'' खरं असेल म्हणणं नवऱ्याचं. पुखराज सरजींचं... त्या त्यावर काही बोलल्या नाहीत. काळजीच्या सुरात एवढंच म्हणाल्या -

''जरा ती सिगारेट फेकता का बाहेर... सहन नाही होत आता तिचा वास...''

'अरे यार!' म्हणून त्यांनी ती सिगारेट पायाखाली चुरगाळली आणि उठून धडपडत बाथरूमकडे निघून गेले.

• • •

थोड्या वेळापूर्वी बऱ्यापैकी ऊन होतं. झाडांची पानं हिरवीकंच, लख्ख लुसलुशीत, शांत होती. पाखरं नुकतीच पानांआडून निघून बाहेर झेपावत होती तर आभाळ गढूळ झालं... सावल्या उतरत गेल्या... सावळे ढग काळे होत गेले... मधूनच आवाज, गर्जना... लकाकणारी एखादी विजेची नागीण सळसळती... मग एकदम वेटोळून टाकणारा धुंद, सैराट वारा आणि ताड्‌ताड् थेंब... मातीवर उमटलेली वाफेरी धुंद लय

आणि तो मृद्गंध... मग पाऊस अनावरपणे कोसळत राहिला. एकसारखा... न थकता. पाऊस...

त्या बाल्कनीत बसून होत्या, कशाचीही पर्वा न करता, कशाशी काही नातंच नाही अशा... मग एकेक कविता आठवत गेल्या. आवडलेल्या, पाठ केलेल्या. वहीत उतरवून ठेवलेल्या... कविसंमेलनांमधून वाचलेल्या. त्या वयात झपाटून लिहिलेल्या अवतीभवती, घरीदारी, भासात, श्वासात...

बाहेर हा असा धसमुसळा पाऊस... आणि मनात हा कवितांचा आणि मग पुन्हा प्रश्न, आता का लिहून होत नाहीत कविता? का सुचत नाहीत? का लिहावीशी वाटत नाही एखादीही कविता? काय हरवलं आहे या सगळ्या पसाऱ्यात? मग कधीतरी पावसाचा भर ओसरला. हलक्या हळुवार सरी तेवढ्या भुरभरत राहिल्या. त्यांनी शेजारी ठेवलेल्या मोबाईलवर बोटं फिरवली. तिकडून एंगेज्ड टोन येत राहिला. त्यांनी पुन्हा प्रयत्न केला. पुन्हा एंगेज्ड. मग पुन्हा... आणि लागला एकदाचा. ''बाबा रे... काय हे?''

''बोला सरकार... बोला कशी आठवण केलीत संध्याकाळची...''

''काय झालं? बोलत का नाही तुम्ही? बोला ना...''

पुन्हा त्या स्तब्धच. असं काय होतंय? नुस्ताच फोन हातात. ''काय सांगायचं याला, या किरणला, की काय होतंय ते! त्याला कळू नये का, की...''

न बोलताच त्यांनी फोन बंद करून टाकला. तरी पुन्हा फोन वाजलाच. तर तिकडून तोच... किरण. ''येतो... येतो... लगेच नाही... अर्धा तास तरी लागेल बाबा...''

अर्धा तास? काय करू आता... अर्धा तास... कॉफीच केलेली बरी... म्हणून त्या बाल्कनीतून उठून पुन्हा आत गेल्या. कॉफी तो कॉफीही सही... चल् बाई कॉफी!

पाऊस आता शांत झाला होता... त्याचा सुखद गारवा, ओल्या भिजल्या झाडांचा वास आणि त्यात त्या वाफाळल्या कॉफीचा स्वाद.

वो जो तुम में हममें करार था
तुम्हे याद हो के न याद हो...

तेव्हा त्यांना सहज आठवल्या या ओळी... ओठात आल्या. गुणगुणत राहिल्या. 'तुम्हे याद हो के न याद हो...' आणि मग त्या स्वतःशीच शहारल्या. आता आठवत असेल. शशीला, त्या दिवाण्या शायरला... त्याच्या अंगणातल्या तुळशीशेजारी आपण दिवा ठेवत होतो, महालक्ष्मीच्या दर्शनाला जाण्याआधी.

त्याची थरथरत्या केळीसारखी थोराड आई म्हणाली होती त्यावेळी, 'ईश्वर देगा तुझे, तू जो चाहे वैसा... तुझ्या मनासारखं होईल सगळं हिमानी!'

झालं. हो! झालं सगळं मनासारखं... आशीर्वाद असतात म्हणून असतात... असर होता है, न होता है... किसे पता?

मग थांबली त्याची बाईक... मैदानाशेजारी... गुलमोहोराच्या बाजूला. ती त्याची लाडकी जागा... त्या पाहात होत्या बाल्कनीतून... उंच, रुबाबदार, सावळा... ताडमाड... तो ऐटीत येत होता... भिजला होता की काय पावसात? मग बेल वाजली, दार लॉक नसूनही... मग तो आला... हॉलमध्ये बसला. त्या उठून बाल्कनीतून आत आल्या. तो पाहातच राहिला.

''बस जरा निवांत... कॉफी आणते... आताच बनवली रे...'' म्हणून मग पुन्हा आत गेल्या. ट्रेमध्ये कॉफीचे मग घेऊनच आल्या.

''घे... गरम आहे. एकदम... भिजलास की काय? बारिश वहां भी तो होगी...'' त्यानं दोन्ही हात केसांमधून फिरवले... कॉफीचा घोट घेतला... मग म्हणाला, ''फोन केला... तर मग... सांगायचं, बोलायचं नाही का? मी काय समजायचं, बरं आहे. नाही... काही प्राब्लेम झाला?''

'प्राब्लेम झाला खरा!' त्या मनात म्हणाल्या... मग त्याच्याकडे थेट पाहात म्हणाल्या, ''भीती वाटत होती रे त्या पावसाची! काय तो पाऊस ना... पहिला पाऊस...''

''पण मग ते तरी सांगायचं ना! मी तर घाबरूनच गेलो होतो... खरं सांगतो.''

'घाबरट!' मनातच त्या म्हणाल्या, मग त्यालाच विचारलं, 'का रे! का बरं?'

तेवढ्यात मोबाईल वाजला. फोन सुजलाचा होता. तिचा लाडकीचा लाडका प्रश्न एकच.

''ममा... घरीच आहेस नं?''

''हां, क्यूं? घरीच आहे रे बाळा मी... काय म्हणतेस?''

''आनंदाची गोष्ट आहे. ममा सांगू? बोल, बता दू. मेरी मदर!''

''मेरी मदर! अगं बोल ना!''

अनुक्रमणिका

''आम्ही येतोय सॅटर्डेला. वुई बोथ... गूड न्यूज है ममा... गूड न्यूज...!''

तो कान टवकारून ऐकत होता वेडा... त्या एकदम शहारल्या... ''सच?''

''येस मॉम... आजी होणार तू आता... म्हातारी... बुढी माई... नानी!''

'कॉंग्रॅट्स्... माझी बाई गं... अभिनंदन दोघांचंही... वाटू पेढे? मिठाई बाटुंगी मै तो!''

''ना... ना... ना. ममा... थोडी वाट पाहा... आम्हीच येतोय नेक्स्ट विकला... हमही ले आयेंगे मथुरा का पेढा.''

''पप्पा कों बता दूं मै... बाबा इथे नाहीयेत. मुंबईला गेलेले दोन दिवसांपासून...''

''ना... अभी नही... आम्ही भेटूनच सांगू त्याना... सरप्राईज मेरी मदर! कोणी आलेलं आहे का गं आता तुझ्याकडे ? आई!''

त्या किंचित थबकल्या. श्वास मोकळा करीत म्हणाल्या, ''हो गं... किरण! युवर बेस्टी...!'' ''ओके देन मम्मा... ठेवते मी... रात्री बोलू डिटेल्समधे...'' मग तिचा फोन बंद झालाही.

''सुजला होती. आमची मुलगी... ती येणार आहे पुढच्या आठवड्यात इथे...''

''हो ना. गुड... पण ती तर वेगळं काही...'' त्याचा आपला एकूण अंदाज...

''हो... वेगळंही!'' त्यांनी मान्य केलं.

'अभिनंदन!' त्याला त्यांचे हात हातात घ्यायचे होते... पण तसं काही झालंच नाही. तो तसाच बसून राहिला. आज्ञाधारक. शिष्ट.

-मग त्या आजी होतील... आजी?

त्या नुसत्याच बसून होत्या. आणि तो नुसताच नजर रोखून. नजरेत साठवण्यासाठी धडपडत.

पुन्हा पाऊस सुरू झाला. आधी रिमझिम... हलका... सरींचा... आणि पाहता पाहता पुन्हा थेंब वाढले. तडाखे सुरू झाले आणि मग धुवाधार... धुवाधार...

• • •

मग आलेच ठरल्यानुसार सुजला आणि प्रसन्न दोघंही... पुखराज अजून परत यायचेच होते. पुण्यात अडकून पडले होते. म्हणाले की उद्या, नाहीच तर परवा मात्र पोहचलोच समजा.

-मथुरेचा पेढा आणलाय... चांगला तीन मोठे बॉक्स आणि इतर कितीतरी मिठायांची कार्टुन्स... डब्बे... लोणची-अचार वेगवेगळे आणि साखर पिवळी जाड. असं काय काय. घरच डोक्यावर घेतलं आल्या आल्या. शेवटी सुजलाला शांतपणे बसवत त्यांनी बजावलं... ''बेबी! आता उनाडपण बंद बरं... आता शांत राहायचं. आता उछलकूद बंद बेटा... समजलं लेकरा!'' मग प्रसन्नला- जावयालाही तेवढीच ताकीद दिली... ''आता धावपळ कमी करायची रे तू पण... घरात वेळ द्यायचा जास्तीत जास्त... जपायचं... हो ना?'' मग थोडा वेळ थांबल्या. काहीसं आठवत म्हणाल्या, ''प्रसन्न! आईला माहीत आहे की नाही तुझ्या अजून? कळवलंस ना?'' तो वेंधळा इकडून तिकडे नाचत होता लॅपटॉप घेऊन. तसाच म्हणाला,

''आईला ना... मेरी ममी को... हां, नही बताया अभी... आधी तुम्हाला सांगून मग त्यांना...''

''का? आई तुझी ती... तिला...''

''सुजला बोली... आई बोलेल त्यांचेशी...''

''म्हणजे मी? मी त्यांना सांगू... मी?''

''हां आप! आपही... नानी बताएगी, दादी को...''

''ये ठीक नही... चूक आहे हे... बाबा... चूक... आधी ही आनंदवार्ता तुमच्याकडून कळायला हवी रे... त्यांना... आई आहे ती...''

''सुजला... ऐक! ममी काय सांगतात ते, ऐक आधी...''

''चूप भी करो! हां मीच बोलते आता त्यांचेशी... मीच बात करते...''

आणि तिने लगेच कानपूरला फोन लावला. तिकडे त्याची उतावीळ आई.

''मॉंजी! हांजी... हां... सुजला बोल रही हूं... हा यहां नागपूरसेही... आईकडूनच...''

मग प्रसन्नची आई आणि सुजला यांचा दीर्घ संवाद सुरू झाला. तेवढ्यात त्या फराळाच्या प्लेटस् घेऊन आल्या. हातातला पेढा जावयाला भरवत म्हणाल्या, ''घ्या... पहिला अधिकार तुमचा...!''

''अरे... अरे... हे काय? आधी तुम्ही. तुमचा अधिकार. दादी बनणार ना तुम्ही... मग!'' आणि त्यानं तो पेढा सासूला त्यांना भरवला.

सुजलानं लगेच कॉमेंट पास केली. ''किती सेल्फिश आहात रे दोघंही तुम्ही?''

• • •

ठरल्यानुसार दुसऱ्या दिवशी सकाळी पुखराज मेघराज सरजी पुण्याहून परत आले.

घरात पार्टीचा बेत होता. त्याचा सुगंध तिथंही जाणवला जणू त्यांना... अजून त्यांना ती आनंदवार्ता कळायचीच होती. तर एकदम सुजला आणि प्रसन्न लगबगीनं आले. त्यांच्या पायांवर वाकले... झुकले... नमस्कार केला. पण हे वाकणे, नमस्कार इतर वेळेपेक्षा वेगळेच वाटले. ते किंचित संभ्रमित झाले... ''अरे अरे! उठा बाबा आता... पुरे पुरे...'' त्या दोघांनाही उठवण्याची त्यांची धडपड.

सुजला तशीच म्हणाली, ''नाही''.

मग त्याच म्हणाल्या, ''अहो! पाहाताय काय असे? द्या त्यांना आता आशीर्वाद. मनापासून... तहे दिलसे.''

''मनापासून... अरे बाबांनो ते असतातच मनातून.''

''हो पण आता वेगळे... हां... नानाजी बनणार आहात तुम्ही...''

''क्या बात...!'' म्हणून ते वाकले. त्या दोघांनाही थोपटलं. मग सुजलाला छातीशी कवटाळलं. तिच्या गालांना स्पर्श करीत म्हणाले,

''प्रभू की कृपा है सब! आशीर्वाद! मुलांनो आशीर्वाद.'' आणि त्यांनी वर पाहात ईश्वराला हात जोडले...

मग त्यांनी मथुरेचा पेढा सरजींच्या हातात दिला. म्हणाल्या,

''खिला दो यार! पेढा भरवा त्या दोघांना... मिठी बात है ये!''

आणि सरजींनी दोघांना पेढा भरवला. जावयाला छातीशी कवटाळत म्हणाले,

''तो हो जाए यार... हो जायें अब तो... मी येतो लगेच फ्रेश होऊन...'' आणि ते बाथरूमकडे वळले...

मग सासरे-जावयांची पार्टी सुरू झाली... रंगात आली. समोर वेगवेगळे खाद्यपदार्थ सजधजके येत होते. ...सुजलाही त्यात येऊन बसली. त्यांनी घाईतच विचारलं, ''अरे भई! मग ते कॅनडाचं... काय?'' ''आता दोन वर्षे तरी आम्ही हलणार नाही इथून... मग बघू!'' सुजला दृढ निश्चयानं म्हणाली.

त्या किचनमधून निघून बाहेर आल्या, बसल्या त्यांच्यात. खाणे-घेणे, गप्पा सुरूच होत्या. तेवढ्यात त्यांचा मोबाईल वाजला. एकदा... दोनदा... मग सरजी म्हणाले, ''अरे बघा बावा... कोण बोलतंय ते...!''

त्यांनी मोबाईल घेतला. पलीकडे किरण होता... त्या तशाच उचंबळून म्हणाल्या, ''बोलू रे नंतर... तू ये संध्याकाळी... जेवायलाच ये... ये नक्की!''

• • •

घर पुन्हा एकदा रिकामं झालं. दोन दिवसांत सुजला व प्रसन्न निघून गेले. एक दिवस मोठ्या कष्टानं बायकोसाठी राखून सरजीसुद्धा पुन्हा एकदा आपल्या कंपनीसाठी बंगलोरला निघून गेले.

घरात पुस्तकं होती. जुनी होती आणि नवीही होती. आता कथा-कादंबरी-कविता मागे पडत होते. त्याऐवजी आत्मचरित्रं-प्रवासवर्णन-उद्योग आणि विज्ञान अशी वेगळ्या विषयांवरची पुस्तकं, काही जर्नल्स आणि मासिकं येत होती. भरपूर वैभव होतं घरात. सुसज्ज ग्रंथालय म्हणता येईल एवढं... किती घेणार? किती वाचणार? अलीकडे तर कधीतरी असंही व्हायचं की, पुस्तकं समोर दिसायची, पण त्यांना स्पर्श करण्याची, हात लावण्याची इच्छाच जणू मरून गेली होती. कधीतरी कार्यक्रम होत असायचे शहरात, ग्रंथांचे, पुस्तकांचे, प्रदर्शनं असत कुठे कुठे. नियमित जावंसं वाटायचं. निमंत्रणंही येत कुठून कुठून सतत. उत्साह होता त्या दिवसांत, अगदी कालपरवापर्यंतही होता. हे एक वेगळंच जग आपलंसं वाटत होतं. अशाच एका ठिकाणी किरणशी भेट घडली. गाठ पडली. आणि निमंत्रण न देताही किरण घरी येत राहिला.

त्या उठल्या. वर टेरेसवर गेल्या. झाडांकडे-कुंड्यांकडे बरंच दुर्लक्ष झालं होतं. पानं फार गळली होती आणि रोपट्यांची वाढही अस्ताव्यस्त झाली होती. एकूणच त्या वैभवाला जणू अवकळा आली होती. त्यांना अपराधी वाटलं. आपणच असे सतत हरवलेल्या प्रदेशातले.

• • •

दिवस सकाळपासूनच उदास होता. अपराधीच जसा. ना धड सूर्य होता आकाशात, ना धड सावल्या, आणि मधेच क्वचित कदाचित उन्हाची चुकार तिरीप. झाडांनी माना टाकलेल्या. मग त्या कामाला लागल्या. झाडापानांची छाटणी-कटाई-मातीची खोदखाद आणि नंतर भरपूर पाणी... त्या भूक-तहान विसरल्या. मोबाईल विसरल्या आणि किचनही. कधीतरी वाटलं निदान चहा तरी घ्यावा, म्हणून खाली आल्या. मग मोबाईल चेक केला. त्यांना लक्षात आलं... मोबाईलवर तीन-चार

मिस्ड् कॉल होते. त्यात दोन किरणचेच होते. त्यांनी चहा ठेवला. वाटलं करावा त्याला फोन. पण नाहीच झालं. मोबाईल निमूट बसून राहिला.

आता जावं का पुन्हा टेरेसवर? की संध्याकाळीच? ही घालमेल सुरू होती. तेवढ्यात पुन्हा मोबाईल वाजला.

''हं! बोल रे,काय म्हणतोस? कसा आहेस बाबा तू आणि आहेस तरी कुठे?'' त्यांचा स्वर उत्सुक होता.

''गावी-गावीच होतो. सकाळीच परतलो... नंतर फोनही केला. पण... जाऊ देत... आता आहे का वेळ. आलो तर चालेल का?'' त्याचाही उतावीळ स्वर. त्या मग गोंधळल्या. तशातच म्हणाल्या, ''परवानगी हवी का तुला रे! ये ना... ये... येच!'' आणि फोन बंद केला.

अभी ना जाओ छोडकर, के दिल अभी भरा नही...

अशातच चटकन् ते गाणं... ओठांवर आलं... अंगच शहारलं... नुसता शहारा... फार वेळ न घालवता त्या आंघोळीसाठी निघून गेल्या.

मग आलाच तो रिमझिम सावन. आला. बसला. त्या सारख्या पाहात होत्या. हा काही बोलेल, काही सांगेल... नवे-जुने काहीही. घरचे-दारचे.

तोही पाहात होता. त्या आता-आता दवबिंदूंनी न्हालेल्या... ताज्या... आणि टवटवीत आणि प्रसन्नही... कपाळावरची ती भलीट पोरी बिंदी... ती मोकळी, लहराती जुल्फें... आणि हातातलं ते सोन्याचं जाड कडं.. ती निमुळती टणक लांब बोटं... त्यावरचं ताजं गर्दजांभळं पॉलिश... पावलांची संथ हालचाल. काळा गुलाब लहरत आहे की काय हिरवळीवर...

''बोल रे! बाबा... काही तरी बोल... बोल ना... गावी कशासाठी गेला होतास? न सांगता, अचानक?'' त्यांनी विचारलं. तो नुसताच पाहात होता. मग हसला. मंद आणि उदास. काय बोलावं... त्या पुन्हा अजीजीनं म्हणाल्या, ''सांगशील काही... दम घुटतोय रे माझा!''

''शेवटी झालं तुमच्या मनासारखं'' तो संथ लयीत म्हणाला. मग पुन्हा खालच्या पट्टीत म्हणाला त्यांच्याकडे न पाहता, ''लग्नं ठरवलंय माझं घरच्यांनी... त्यांनीच ठरवलं आहे सारं!''

''अरे व्वा! अभिनंदन मग.'' असं उचंबळून म्हणायचं होतं त्यांना, खरं तर. समोर येऊन त्याचे हात हातात घ्यायचे होते. पण तसं काहीही घडलं नाही... त्या उठल्या... उठता उठता म्हणाल्या, ''पेढा चालेल ना रे तुला की अजून काय आणू? बंगाली मिठाई चालेल ना?''

त्यानं काहीही उत्तर दिलं नाही. त्या उठल्या. आत निघून गेल्या. डोळे तरारले की काय? त्यांना वाटलं.

खूप वेळ आतच होत्या. मग नंतर चेहरा धुतला, पुसला, कपाळावरची ती लालगर्द बिंदी पडली कुठेतरी अशीच, तेही विसरून गेल्या. मग आल्या हॉलमध्ये... संथ पावलांनी.

हॉलमध्ये किरण नव्हता. निघून गेला होता.

'किरण' त्यांनी आवाज दिला. ''किरण... किरण कुठे आहेस रे तू?''

पण त्यांच्या हाकेला प्रतिसाद आला नाही. त्या उठल्या. मग बाल्कनीत आल्या. गुलमोहोराखाली त्याची बाईक नव्हती. नुसता पाचोळा आणि गळत्या फुला-पानांचा ढीग सर्वदूर... मोकळ्या मैदानात.

त्यांना वाटलं मोबाईल घ्यावा... लावावा फोन त्याला... त्या मोबाईल घेण्यासाठी उठल्या...

बाहेर दारावरची बेल तेवढी वाजत राहिली.



वसंत वाहोकार

जन्म : १० डिसेंबर १९५२

प्रकाशित लेखन : 'वंशवेल' व 'खेळिया रे' हे दोन कथासंग्रह आणि 'स्वप्नांवरून हत्ती झुलत जातात' आणि 'मनातील ऋतूंच्या नोंदी' हे कवितासंग्रह प्रकाशित.

विशेष : • 'वंशवेल' कथासंग्रहासाठी यशवंतराव चव्हाण वाङ्मय पुरस्कार • काव्यलेखनासाठी विदर्भ साहित्य संघ काव्य पुरस्कार • तुका म्हणे पुरस्कार आणि अंकुर साहित्य पुरस्कार ही प्राप्त.

पत्ता : जानकी अपार्टमेंट्स्, २६, गजानननगर, वर्धा रोड, नागपूर- ४४० ०१५

अनुक्रमणिका



चकल्लस

□ अनंत भोयर

तहानलेल्याला पाणी पाजणं, म्हणजे पूर्वी पुण्याचं काम समजलं जाई. कुठं वर्षभर, तर कुठं भरउन्हाळ्यापुरत्या जागोजागी पाणपोया स्वखर्चानं चालवल्या जात. फक्त मानवी गरज म्हणूनच नाही; तर काही लोक पाखरा-कोकरांसाठीसुद्धा घरी, गावालगत वा शेतात माठाचे खापरं, टाके, हळ अशा माध्यमांतून पाण्याची उपलब्धी करून देत. गायीसाठी चारा अन् पाखरांसाठी ज्वारी-तांदळाचे दाणे अंगणात टाकण्याची परंपरा आताही क्वचित कुठं दिसून येते. काही जुने शेतकरी गव्हाच्या ओंब्या, ज्वारीची कणसं खास पाखरांसाठी घराच्या वळणीला लटकवून ठेवत होते.

पण आता काळ बदलला. आमच्या धारणाही बदलल्यात. प्रत्येकच गोष्टीला देवाणघेवाणीच्या स्वरूपात पैशांचं शेपूट कायम चिकटून बसलं. हरेक वस्तूचं बाजारीकरण होऊ लागलं. दाण्याच्या बदल्यात काम करणारे शेतमजूर, गावकारागीर आता धान्याऐवजी थेट पैसे घेऊ लागले आहेत. आधी ठेल्या-टपरीवर तहानलेला कोणी गेला, तर तिथल्या माठातलं पाणी घरच्यावानी पोटभर पिऊन तुडुंब होई. अलीकडं मात्र तसं राहिलं नाही.

आमचं गाव तसं मुख्य सडकेपासून कोसभर आत. गावात आतमध्ये येणाऱ्या गाड्या कमी. बऱ्याचदा गावकऱ्यांना मुख्य सडकंवरच्या फाट्यावर जाण्याचा वा उतरण्याचा आटापिटा कायम लागलेला. भरउन्हाळ्याच्या दिवसांत एका मोडक्या शेडमध्ये एक माठ अन् एक रोजगारी माणूस वाटसरूंना पाणी वाटण्यासाठी हमखास असे.

आता तिथं फाट्यावर आल्यागेल्यांना पाणीपाऊच विकणाऱ्या एकदोन टपऱ्या उघडलेल्या आहेत. तिथं चिवड्याचे तयार पाकिटं, मॅगी, थम्सअप, फ्रुटी, बिडीकाडी, चहा, पेट्रोलचे पव्वे असं काहीबाही नव्यानं आलं. येणारा माणूस घटकाभर विसावतो. पुढं निघून जातो. पाणपोयांचे माठ आटलेत तसा त्यामागं असणारा सेवाभावही सरला कायमचा.

आमच्या गावचा नारबा नावाचा एक गायी-बकऱ्या चारणारा गवारी. ऐनभरात असताना बायको त्याला सोडून गेलेली. पुढं त्याचं वय वाढलं तसं गोहोण सुटलं. काही काळ बकऱ्या चारायचा. एक गाय खुट्याला होती. ती त्यानं त्याच्या वाढत्या वयातही सांभाळून ठेवलेली. साधाबाधा स्वभाव. आवा नाही न् गावा नाही... पण तेच नडलं त्याला.

पोरंसोरं त्याला बिनबायकोचा म्हणून चिडवू लागले. 'लगन कव्हा करतं?' म्हणून भंडावून सोडू लागले. नारबा त्यावर चिडून उठे. तोंडात येईल तसं बोलून घेई. काही दिवसांनी त्यानं लग्नाऐवजी पाटाची बायको घरात आणली. पण तीही टिकली नाही.पुढं पुढं तर त्याला 'बायको इकतं का?' असं विचारून, पिसाळून सोडण्याचा नादच लागला गावकऱ्यांना - कोणं असं विचारलं म्हणजे नारबा मिळंल ते हातात उचलून विचारणाऱ्याला फेकून मारी-कमरंखालच्या शिव्या देई.

अनुक्रमणिका

आजूबाजूच्या लोकांना दातकडं काढायला तेवढंच मनोरंजन. वयानुसार नारबाचा शिव्या देण्यावरचा ताबा सुटत चालला तसा चिडवणाऱ्यांनी 'बायको इकतं का?' ऐवजी 'बकरी इकतं का?', 'गाय इकतं का?' असे प्रसंगानुसार बदल करत नेलेले. गावकऱ्यांचं फुकट मनोरंजन वाढत गेलं अन् नारबा अधिकाधिक चिडचिडा होत गेला!

त्या दिवशी तो असाच रस्त्यानं चौकाकडं चाललेला. त्याला पाहताच पानठेल्यावर बसलेला मुरली टपकला. पुढं जरा रस्त्याकडं धपकाळून विचारू लागला,

''काय नारूभौ, कुठं चाल्ला इकडं?''

''कुठं नाऽय... बा, जरा गाय गोह्यठानावर नेऊन सोडतो.''

''बरं, नारूभौ...'' मुरल्यानं हळुवार फासा फेकला, ''तुही गाय इकऱ्या निंघाली म्हून आइकलं म्या... खरं आहे का?''

अंगाची लाही झाल्यावानी नारबा पिसाळला, ''याच्यासाठीच थांबोलं का रे भडव्या, इथं-भर रस्त्यामंधी? हरामखोरा! माह्या गायीचा लिल्लाव मांडला का म्या? आपली मायबहीन इकानं तुमी! मले कायले इकाले लावता गाय? माह्या खुट्ट्यावर मरंन थे. काऊन एवढी फिकर यिऊन पडली रे, वान्नेरंहो? घेनं ना देनं, नुसतं गाभन ठेवनं!''

''बरं बरं, नारूभौ... नोको इकू गाय... पन आता शिवा नोको देऊ बा जास्त.'' मुरलीनं आवाज बारीक केला, ''इथं आजूबाजूले बायामानसं हायेत.''

''मग एवढा लाजंसरमचाच हाये, तं अशा खुट्टीउपाड गोस्टी कायले इच्यारतं रे मले, ऑ? लाज नाय वाटत जरासी!''

नारबाचं जोरजोरानं बोलणं ऐकून आजूबाजूचे दातकडं काढू लागले; तसा तो आणखीच कातावला, ''आत्ता तू जातं ऽऽ का देऊ यक दगड कनपटात?''

''बरं बरं, जातो मी... पन दगडं नोको मारू ब्वॉ, आमाले!''

दोघांची चकमक ऐकणाऱ्या पक्याला राहवलं नाही. तो मध्येच तोंड मारून बोलला, ''काऊन गा, मुरलीभाऊ... तुनं घेतली का नारूभौची गाय? मलेबी गरज होती गायीची. तुमचा सौदा पक्का नसंन तं मी पुन्ना पाश्शे रुपे वरताडा देतो अंखीन. सांग, मंग पटकन.''

''पक्या लेका ऽऽ उब्बारचोटा... आता तू आला का खेव घेवाले? अवघे यक्काच माळंचे मनी आहात लेकोहो तुमी!... भडव्या, लेका ऽऽ... यखांदी बकरी तं पोसून दाखो पह्यले, मंग गोस्टी करजो गायीच्या! चांगली यक कनपटात देल्ही, तं फलंफलं मुतशीन लेकाऽ चेड्डीमंधी! व्हतं का नाई घरी?'' नारबानं रस्त्याकाठच्या दगडाला हात घातला.

असे पोरासोरांनी चिडवण्याचे प्रसंग नारबावर दिवसाकाठी बऱ्याचदा येत. गावातल्या बहुतेकांचा त्याकडं पाहण्याचा दृष्टिकोन टाईमपास मनोरंजनाचाच असे. त्यामुळं नारबाची सहनशीलता आपोआपच कमी होत गेलेली. ती अशी शिवीगाळीच्या रूपाने बाहेर येत असे.

पण त्याची त्याच्या गायीवर अपार माया होती. कोणंतरी अशाच देऊन टाकलेल्या बारक्या कालवडीला नारबानं मनापासून जपलेलं. तिला घासातला घास खाऊ घातला. उन्हातून सावलीत नेलं. पोटच्या गोळ्यावानी लहानाचं मोठं केलं. घरात दुसरं कोणी माणूस-कुणूस नव्हतंच. बायको ना पोरं. एकटा जीव सदाशिव. त्यामुळं त्याचा गायीवर जीव जडलेला. तो तिच्याशी बोलायचा. दुखलं खुपलं सांगायचा तिला. त्यामुळं गायीच्या विकण्याची भाषा त्याला त्याच्या सहनशीलतेचा अंत पाहणारी वाटायची.

त्याच्या गायीला एक सवय होती. दररोज सकाळी गोहणात घालण्यासाठी त्यानं तिला खुंट्याची सोडली, की ती दुडदुडतच रस्त्यानं निघे. गोहठाणालगतच्या रस्त्यावर सत्तारचं घर. ती तिथं धावतपळत जाई. रूकसानानं-सत्तारच्या बायकोनं तिच्यासाठी घमेल्यात काढून ठेवलेल्या ताज्या-शिळ्या पोळ्या, भाजीचे देठं, किडके वांगे असं काहीबाही खाऊनच ती पुढं सरकायची. दररोज तिचा हा नेम चुकायचा नाही. बऱ्याचदा तर घरी कोणी नसलं तर ती दारातून थेट सपरीत जाऊन गोल गोल फिरायची.एकदोनदा हंबरून घरच्यांना आपल्या येण्याची जाणीव करून द्यायची.

गेल्या दोन वर्षांपासून सत्तार तलावाच्या चौकीदारीवर मुक्कामी असल्यानं त्याला हे ठाऊक नव्हतं. आठवड्यातून एकदा तो बाजाराच्या सुटीच्या दिवशी दुपारी घरी येई. सांजचा पुन्हा चौकीदारीला निघून जाई. पण आता तलावातल्या मासेमारीचा ठेकेदार बदलल्यानं तो एवढ्यात घरीच होता.

अनुक्रमणिका

सकाळची वेळ. एकाएकी सतं-वतंनं घरात घुसलेली गाय पाहून त्याचा माथा भनकला-

''अरेSS अरे SS इधर कहा घर में घूस रही हय, साली?''

गायीनं घमेल्यात तोंड घातलेलं पाहून बायकोला म्हणाला, ''अरे वो, रूकसाना SSS इधर घमेले में क्या रखा हय आंगनमे? वो देख गाय मुंह डाली हय उसमें।''

''खाने दो जी... उसीके लिए रखी मैने- बासी रोटी.''

''क्युं? बहुत तालेवार की बेटी हय क्या तू? रोटी खिला रही हय गायकू? ऑ? कुछ कुटके-बिटके करने के बजाय वो आवारा गायकू खिला रही हय, लौंडी!''

रूकसानानं गायीबद्दल दाखवलेल्या उदार आपुलकीमुळं सत्तारच्या जखमांवर मिठाचा खडा चोळल्यावानीच झालेलं. तो काडी घेऊन गायीला मारू लागला. तशी रूकसाना चेकाळली, ''अरे, वो गरीब गाय को क्युं मार रहे हो? वो आवारा नही, उधर हेटीपर रहनेवाले नारबाकी हय गाय. हरदिन आती हय अपने घर. बासा-बचा खाती हय बेचारी... तुम्हारा क्या जा रहा हय उसमें?''

नारबाचं नाव ऐकताच एकाएकी झटका बसल्यावानी सत्तारनं पुसलं, ''कौन नारबा? वो बह्यताड नाऱ्या क्या? साला जानवर हय एकदम. लोग उसकू चिढाते हय गाववाले.''

''बह्यताड कायका? लोगोने बनाया उसकू पागल.''

नारबाच्या गायीची खात्री होताच सत्तारला आगीत तेल टाकल्यावानी झालं. तो सोटा घेऊन पुन्हा गायीमागं धावला.नारबाला अन् बायकोला एकाचवेळी शिव्या घालू लागला, ''लोगोकू पत्थर मारता साला, वो नाऱ्या. उस हरामजादे की गाय को खिला रही हय ये लौंडी!''

''अरे मत मारो उस गायको? वो होंगा भला पगला, लेकिन उसकी गाय का क्या कसूर हय इसमें? उसने क्या बिगाडा हमारा?''

गायीला रस्त्यावर पिटाळून आलेला सत्तार दम टाकत बोलला, ''क्या बिगाडा याने? इक बार उस साले हरामजादेकू ऐसेही पुछा था मैने, गाय बेचता क्या करके; तो उसने एकदम पत्थर उठाकर फेका था. अच्छा हुआ कही कनपटमें नही लगा. नही तो दवाखानेमें ही भरती होना पडता उसी समय!''

''पर तुमने क्युं पुछा उसकू-गाय बेचने का? अपने को थोडी ही लेनी थी गाय?''

''अरे, ऐसाही पुछा था मजाक में. मेरे पास वो पवार का जोत्या बैठा था बजार चौक में. सामने से यह नाऱ्या आता दिखा, तो जोत्याने गाय बेचता क्या करके उसकू पुछनेकू लगाया मेरेकू. साला मै बेमालूम पूछ बैठा... और बालबाल बच गया उस दिन. तबसे उससे अनबन हो गयी मेरी. साला पागल और गवार आदमी हय वो. कही दिखा, तो मेरा भेजाही सटक जाता अब.''

नारबाची गाय त्यानं घरून सोडताच दुडदुडत पुढं निघून येत होती खरी. पण नारबाला मात्र गोहठाणापर्यंत पोचायला बराच उशीर लागत असे. रस्त्यानं कोणी ना कोणी हटकणारं त्याला हमखास भेटे. त्याचा शिव्याशाप सुरू झाला म्हणजे त्यात बराच वेळ निघून जाई.



आताही गायीमागून नारबा बऱ्याच उशिरा गोठाणाकडं उगवला. नेहमीच्या सवयीनं त्यानं सत्तारच्या अंगणाकडं नजर टाकून गायीचा अंदाज घेतला. अंगणात उभा असलेल्या सत्तारला त्यानं विचारलं. ''अरे सत्तारभौ, माही गाय गेली का इकडं-गोह्यठानाच्या रस्त्यानं?''

सापाच्या शेपटावर पाय दिल्यावानी सत्तार फुस्कारला, ''मय क्या तेरे बापका नौकर हूं क्या रे, नाऱ्या? क्या तू दुसरों के घरोमें घुसने के लिए पालता ह्य क्या गाय? इतना ही गाय पालने का शौक हय तेरेकू तो अपने घरमें बांधकर रखते जा, नही तो साथमें घुमाते जा उसको. दुसरों के घरोमें कायकू घुसाता हे, भडवे?''

''आरेS तं सतारभौ, म्या सोतावून हाकललं का तिलेतुह्या घरामंधी? तू आपली कवाडी काऊन नाई लावून ठेवत? चांगल्या मतीनं इच्यारून राह्यलो, तं

बिनकामाची शिव्यागाळी करून राह्यला मले.''

''शिवा नही देऊ, तं क्या करू रे? दिनदहाडे तेरी गाय लोगोंके घरोमें घुसेंगी तो क्या फुलों का हार पह्यनायेंगा क्या कोई उसकू और तेरेकू भी? बडा आया, साला... उल्टा चोर कोतवालकू डाटनेवाला!''

आता नारबाचीही सहनशक्ती सरत आल्यावानी झाली, ''हे पाह्य, सत्तार... तू अंखीन तोंड नोको ढिलं सोडू आपलं... पह्यले जेबान काबूत ठेव आपली, नाय तं मंग मनशीन कसं झालं म्हून!''

चिडलेला सत्तार नारबाच्या बोलण्यानं त्याच्या छातीशी भिडला, ''क्या करेगा रे नाऱ्या तू मेरा? अं...? ले SS क्या करेंगा...? की देऊ एक कनपटमें?''

आता रूकसानाला राहवलं नाही. ती नवऱ्याला लगाम लावत बोलली, ''तुम क्यूं मुंह बजा रहे हो जी अपना? छोडो, जाने दो उसकू रास्तेसे...'' मग नारबाला म्हणाली, ''नारूभाऊ, तू बी जा बापा आता गोह्यठानावर. गाय मंघाशीच पुढं गेली रस्त्यानं. उगेच सब्दाले सब्द वाहाडवू नोका आता.''

नारबा रस्त्यानं वळत बोलला, ''जातो बाई, मी. पन हे उगंच्या उगंच शिव्याशाप सह्यन नाय होनार आपल्याले. हौ, सांगून ठिवतो.''

नारबा नजरेआड होताच रूकसाना सत्तारला समजावत म्हणाली, ''कायकू फाल्तूकी गालिया बक रहे हो उसकू? उसने कया किया? उसका तो कोई कुसुर नही उसमें. फाल्तूच बडे का तेल बैंगनपर निकाल रहे तुमभी. कुछ पापमें तो नही गया नं गाय को खिलाया तो? उलटा पुण्य मिलता हय उसे खिलाने से...''

''जाने दे रूकसाना... मेरा भी माथा सरक गया था. वो नाऱ्याकी पिछलीवाली हरकतसे. साले ने मुझे बहुत गालिया बकी थी- भरे बजारमें.''

''अरे, तो उसने खूद जानबुझकर तो नही दी थी न गाली? पह्यले तुमनेही तो उसकू छेडा था करके बोल रहे तुम. फिर वो चिढेंगा नही क्या? एक तो गाव के लोगोने उस अच्छे इन्सान को चिढाचिढाकर पगला बना दिया हय. तुम भी शामील होंगे क्या उनमें?''

खरंच होतं रूकसानाचं. नारबा सरळसोट मनाचा माणूस. कोणाच्या काल्यात ना कथल्यात! संसारातल्या सुखाला पारखा झालेला. घरात एकटाच असल्यानं अंगावरचे कपडे नेहमीच विटके-मळके घालून फिरणारा-डोक्याला कळकटलेला लाल दुपट्टा, हातात काडी. पण गाववाल्यांनी त्याला खाजवून खाजवून पुरता खरजिला करून टाकला होता.

रूकसानाला तिच्या अब्बाजानापासूनच गायीविषयी माया होती. ती तिच्या माहेरी असताना तिच्या अब्बूच्या सांगण्यानुसार दररोज गायीला घासकुटका लावायची. तिच्या पाठीवरून मायेनं हात फिरवायची. माहेरची आठवण नारबाच्या गायीच्या रूपानं तिनं इथं सासरीही जपलेली होती. सत्तारला बिडी फुंकत बसलेला पाहून तिनं हटकलं, ''अब बिड्याही फुकते रहोगे, की कुछ दूद-वूद का इंतजाम करेंगे? चायका वक्त टल गया कबका. जाओ, दूध देखो कही मिलता हय क्या तो. एक तो गावमें डेअरी आयी तबसे कपभर दूधबी मिलना मुश्कील हो गया हय-चायके वास्ते. गाव के दूध की गंगा शहर की तरफ बह्यती हय और शहर की दारू गाव मे नंगानाच कर रही हय.''

आता बायकोचं भाषण पुढं आणखी लांबू नये म्हणून सत्तार जागचा उठला. गडवा घेऊन रस्त्यानं एकेका गल्लीतून भटकत निघाला.

• • •

सत्तार अन् नारबाच्या गायीवरून झालेल्या भांडणाचा गायीवर मात्र कवडीचाही प्रभाव नव्हता. तिचा सत्तारच्या घरी जाण्यात अजिबात खंड पडला नाही. तिला काय व्हावं त्याचं? तिच्या लेखी प्रेमानं भरवला जाणारा घास महत्त्वाचा. रूकसानानं तो नेम कधी चुकवला नाही. कुठं बाहेर गेली तरी ती शिळंपाथं अंगणातल्या घमेल्यात काढून ठेवायची.

त्या दिवशी दहा वाजायला आलेतरी घमेल्यातलं शिळं तसंच पडून होतं. अंगणात उभ्या असलेल्या सत्तारचं तिकडं लक्ष गेलं. एवढा उशीर तर कधी होत नव्हता गायीला. त्याला नवल वाटलं... तसं त्यानं बायकोला विचारलं-

''रूकसाना, आज गाय नही आयी क्या वो, घरमें?''

''दिखी तो नही मेरेकू''

''कही सिधी तो नही निकल गयी- गोह्यठानमें?''

''नही नही... वो अपने घरमें दर्शन दियेबगर बिल्कुल नही सरकती आगे.''

''फिर आज क्यूं नही आयी होंगी?''

एवढ्यात नारबा रस्त्यानं येताना दिसला. रूकसानानं अधीर होऊन विचारलं, ''अगा SS नारूभाऊ... आज गाय काऊन नाई आली घरी?''

अनुक्रमणिका

''आता काय सांगू भाबी! काल गोह्यनातून चरून आली, तं लंगडतच होती. पाऊलबी फेकनं न्हौतं होत तिच्यानं. पाह्यतो तं, पायखुरी दिसली तिले. थ्या खुरीनं पाय टेकवनं मुश्कील झालं, म्हून घरीच ठेवली बांधून अज. आता कुपाकाटीचा जरा हिरवा चारा आन्तो तिच्यासाठी कुठून...''

सत्तारला मध्येच काहीतरी आठवल्यासारखं झालं, ''गायीच्या कोठ्यात गोवरी पेटवून त्याच्यावर वान्नेराच्या लेंड्या टाक. त्याच्या धुपटानं खुरी कमी होते म्हंतेत.''

''आता वान्नेराच्या लेंड्या आनासाठी मी कोन्त्या भड्याच्या कळपात जाऊन बसू बापा SS ? पह्यलेच तं बिनबायकोचा रांडवा मानुस मी.''

''त्याले कायले कळपात जाऊन बसा लागते नारूभाऊ? आमच्या घरामांगच्या आज्जनावर नेयमीच येते वान्नेरं. लागंन तितक्या लेंड्या सापडतेत झाडाखाली. बरं, तू जा आता चाऱ्याले. तोपावतर मी लेंड्या जमा करून आन्तो. घरावरच्या शेनाच्या गोवऱ्याबी काहाडून ठेवतो चारपाच. तू तिकडून पलटून आला म्हंजेन घेऊन जाजो आठोनीनं.''

मान डोलवून नारबा रस्त्यानं लागला खरा, पण पुढं यमदूतासारखा पक्या रस्त्याकाठीच उभा होता. नारबाला पाहताच तिथले एकदोघं खिक्क करून हासले. नारबा जरा सावध झाला. त्यानं त्यांच्याकडं डोळे वटारून पाह्यल्यावानी केलं. तोच पक्या पुढं आला. आवाजात घरगुती मवाळपणा आणून नारबाला म्हणाला,

''का S य, नारूभौ... आमचे पयसे कव्हा भेटंन आता?''

न समजून नारबानं विचारलं, ''कायचे पयसे रे? माह्यावर कायचं कर्ज हाये तुहं?''

''कर्ज म्हंजेन? आठ दिवस झाले त्याले. काशिनाथ पाटलाचा गोऱ्हा लावला होता-तुह्या गायीले. थ्या पाटलाच्या गायक्याजौळ तं काई बिदागी द्या लागेन कनाई? नाय तं थ्या गोऱ्हाले काई ढेप सरकी खाऊ घाला लागंन न? गायक्यासाठी एखाद्या पव्व्याची सोय लावा लागंन.''

पक्यासोबत असलेला त्याचा साथीदार कवडू पक्याची बाजू भक्कम करत बोलला, ''पह्यलेच तं लमचे अजकाल गोहोनामंधी गावरान गोऱ्हे नाई राह्यलेत सप्पा. ह्या जेर्सीच्या इंजेक्शेनाइनं सारा गोवंशच नासवून टाकला गावरान गायीचा. दिसली गाय का टोच इंजेक्शन. दूध मनान तं फलफल पानी न् कालच्यावानी!''

कवडूमुळं पक्याची हिंमत आणखी वाढली, ''नारूभौ, मंग आता दोंशे रुपे देऊन टाक- गाय फळोन्याचे.''

''पन आता ह्या वक्ताले कुठचे माह्याजोळ पयसे? तिकडं गाय खुरी येऊनसन्या घरी आदळली, तं मी तिच्यासाठी चारा आनाले चाल्लो होतो... थांबून जा आता आठ-पंधरा दिस अंखीन...''

''बापरे? यवढे दिवस? कमाल झाली तुहीबी, नारूभौ.'' पक्याचा सूर उपरोधिक होत गेला,''कायले मंग, गाय जंदल्यावरच देजो एकासोयीनं! ...तू काय ब्यांकीचं क्रापलोन समजून राह्यला का हे -पिकल्यावर फेडण्यासाठी? बरा मानुस हाये तूबी!''

नारबा केविलवाण्या स्वरात बोलला, ''आता ह्या घडीले नायत माह्याजोळ पयसे, तं कुठं डाका-दरोडा घाल मन्तं का मले पक्या?''

''दरोडाच घातला पाह्यजेन का गाS'' - पक्यानं बोलता बोलताच एक डोळा बारीक केला, ''गाय आहे नं तुह्याजौळ. तिले इकून टाकनं यकासोयीची, इचिबहीन ना रहेगा बास, ना बजेगी बासरी!''

पक्यानं गाय विकण्याची गोष्ट छेडताच आतापर्यंत कष्टानं दाबून धरलेली वाफ नारबानं मोकळी केली, ''तुह्या आज्या-बापानं काय मले बक्षीस देल्ही का बे पक्या गाय? यवढा पन्हावून राह्यला तं भडव्या? तुह्यासांगड्या फोतरेलाले इकासाठी पाळली का म्या तिले? तुह्यावर कोनाचे पयसे असले म्हंजेन तू का मंग मायबहीन इकतं का रे आपली?'' -नारबाच्या अंगाचा तीळपापडच झाला होता, 'चाल, फुट्ट इथून-माह्या नजरंपुढून! का उचलू गोटा?''

पक्या खिदळतच रस्त्यानं निघाला. त्याच्यामागं कवडूनंही आपलं तोंड काळं केलं. पण नारबाच्या कोंडमाऱ्याच्या उकळ्या मागून उकळ्या फुटतच होत्या. आजूबाजूच्या मुखऱ्या मुखऱ्या हासणाऱ्या लोकांकडं नजर टाकून नारबा बोलला, ''काS S य लोक मनाव यकेक! गाय इकून टाक मनते, भडवा... शेतमावली पिकोन्याचे पयसे निंघाले नाईत म्हून अख्खं वावरच इकनारा सुदारीत शहरी शेतकरी समजता का रे मले? कुठं भरान लेकहो हे पाप? वा रे जमाना! उद्या लोकहो पयश्यासाठी मायबापाले इकान तुमी! तुमचं काय,

अनुक्रमणिका

गधडेहो! कमरंचे धोतर सोडून त्याचा डोक्शाले फेटा गुंडाळनारी अवलाद तुमची! पाहीन तुमालेबी देव... त्याच्याजौळ न्याव हाये सारा!''

नारबाची गाय खुरी आल्यापासून आठवडाभर घरीच बांधून होती. सत्तार अन् रूकसानाला मात्र सारखी बैचेनी जाणवायची. घरातला एखादा जीव बाहेरगावी गेल्यावानी वाटे. पण उपाय नव्हता. गायीला खुरीमुळं धड हिंडता फिरता येत नव्हतं. चाराही खात नव्हती. तिचा हालहवाल मात्र अधूनमधून नारबाकडून कळायचा. चिडवणाऱ्यांनी त्याला सुखासुखी रस्त्यानं जाऊ दिलं तरच त्याच्याशी गाठभेट होई.

एक दिवस सत्तार अंगणात बिडी फुंकत बसलेला. एकाएकी दुडदुडण्याचा आवाज आला. पाहतो तर नारबाची गाय त्याच्या अंगणात येऊन उभी. सत्तार घरातल्या दिशेला तोंड करून बोलला, ''अरे SS वो S रूकसाना SSS देख क्या...? गाय आ गयी घरमें आज. लाव, जल्दी कुछ होगा वो लेके आव.''

रूकसाना घरातूनच बोलली, ''आयी SSS''

सत्तारचं लक्ष गायीच्या खुराकडं गेलं. अजून लचक कायम होती. रूकसानानं घरातून आणलेलं घमेलं गायीपुढं ठेवलं. सत्तार तिच्या गळ्याची पोळी खाजवत बोलला, ''ले, अब रोटी खा ले जरा... बहुत दिनमें नही खायी नं?''

कटोऱ्यातली पोळी खाणाऱ्या गायीकडे पाहात रूकसाना सत्तारला म्हणाली, ''देखो, सत्तारमियाँ... अब एक आदमीमें कितना फरक पड गया हय. ज्यो आदमी पह्यले गाय को मारता था, वही आज उसकू खुजलाने लग गया हय! अल्ला की लीला अगाध हय, बावा!''

सत्तार जरा गंभीर होऊन बोलला, ''ये अगलेवाला पाव हय ना, इसमें ज्यादा लचक दिख रही... देखू तो जरा.'' म्हणत त्यानं गायीचा पुढला पाय उचलून धरला. गायीला कळ उठल्यावानी झाली तसा चुचकारत बोलला, ''अर्रेS ठहर जरा... प्पा SSS प्पा SS कुछ नही करता...''

सत्तारनं खुरातल्या पाचसात असाड्या बाहेर काढल्या असतील तेवढ्यात नारबा उगवला. सत्तारला किडे काढताना पाहून बोलला, ''पाह्या बरं, सत्तारभाऊ SS तुह्यापुढं कसी देवावानी उभी हाये गाय. मी खूर पाहाले गेलो, तं लमची आसोडे मारत होती मले. मनलं आता अंखीन कितीक् दिवस ठेवाव इले बांधोडी? हिंडलं-फिरलं तं बरं राह्यते ढोरवासरू. म्हूनसन्या अजच सोडली तिले घराबाहीर. थेबी लमची लय दिसाची गाठभेट नसल्यावानी आली इथं दुडदुडत.''

''अयसा हय, नारूभौ... आपन जर मुक्या जिवाले पिरम देह्लं, माया लावली नं, तं थेबी आपल्यावर जीव लावते.''

रूकसानानं थट्टेची संधी सोडली नाही. ''ये तुम सत्तारभाई बोल रहे हय अपने मुह से, कि मस्जिद से कोई अजान देनेवाला बोल रहा हय?''

''अब तू अपना मुंह बंद रख... जा, जरा हल्दी लेके आ अंदरसे. मख्खी बहुत बैठ रही है इसके खूर पे.''

नारबाला गायीचं नवल वाटलं, ''गाय कोनाले तिसऱ्या मानसाले हात नाय लावू देत सत्तारभौ... आनं इथं पाह्य कसी? ...जाऊ द्या. तुमचा जीव हाये एकमेकाइवर. हे गाय ठेऊन घ्या तुमी आता. ''

''नाही नारूभाऊ...'' रूकसाना कानकोंडली होऊन बोलली, ''आमच्याकून कुठं घेनं होते गाय?''

''आरे S तं इकत नाय मनत मी भाबी...'' नारबा एकाएकी बोलला, ''माह्याकून बक्षीस म्हून समजा तुमाले!''

''आरे नही नही, नारूभौ...'' सत्तारलाही हे अनपेक्षित होतं, ''तू इतना तालेवार नही - बक्षीस देनेलायक!''

''मानुस तालेवार असून उपेगाचं नाय सत्तारभौ. मन तालेवार पाह्यजेन मानसाचं. तुमी तिच्यावर जीव लावता, म्हून इथं मन रमते तिचं. तुमच्या घरी सुकात



अनंत भोयर
जन्म : १९६५
प्रकाशित लेखन :
'मायाजाळ' (१९८३), 'हराळी' (१९८४) आणि 'शिरान' (२०००) हे तीन कथासंग्रह, 'आभाळझुंज' ही कादंबरी आणि 'गावकुसातले हबकमुंडे' हा ललितगद्यसंग्रह प्रकाशित.
विशेष : • कृषिक्षेत्रात विविध प्रयोग,
• काष्ठशिल्पांचा व चित्ररेखाटनांचा छंद.
• दूरदर्शन व आकाशवाणीसाठी मालिकांचे लेखन.

पत्ता : 'शिरान', कचारी सावंगा, ता. काटोल, जि. नागपूर - ४४११०३

अनुक्रमणिका

राहीन माही गाय.''

''नाई पन, नारूभौ...'' रूकसाना कळवळून बोलली. ''तूबी आमच्यावानी गरीब मानुस. उघड्याच्या घरी नागडा गेला आनं सारी रात हिवानं मेला, असं नाई व्हाआले पाह्यजेन मंतो मी.''


''नाय भाबी... मले पुरा भरोसा हाय. गायबी सुकात राहीन आनं तिच्यासंगं तुमीबी. माह्य काय... कोनी मांगं ना पुढं... यकटा जीव मी. कुठंबी गुजरान होते आपली. कोन्याबी कडीकोंट्यात पडलं राह्यते मानुस. पन ह्या गायीची उगंच काळजी राह्यते जिवाले. तिच्यावरून लोकबी चेष्टा उडोतेत माही. थ्यापेक्ष्या आता तुमीच पोसा तिले.''

सत्तारचा आवाज घोगरला, ''लेकिन फोकट में कैसे?''

''फुकट कायची?... गाय जंदल्यावर चाहापुरतं दूद नेत जाईन नं मी इथून हक्कानं! पोहचवून दे सत्तारभौ आता तिले गोह्यनात.''

एवढं बोलून नारबा पलटला. मागं वळून न पाहता रस्त्यानं लागला.

अनुक्रमणिका



नोकरी संपण्याची गोष्ट

▫ मनीषा अतुल

एका निर्जन रस्त्यावरून आसिफ झपाझप चालत निघाला. रस्त्याच्या दुतर्फा वृक्षरांगा लांबलचक नदीच्या काठासारख्या पसरलेल्या. काळ्याकुट्ट डांबरी रस्त्यावर पिवळ्याजर्द पानांचा खच पडलेला. पानगळ नुकतीच सुरू झालेली. पावलागणिक प्रत्येक वृक्ष आपल्या विरळ होत चाललेल्या धुंड्या फांद्या पुढे-पुढे करून आपल्या खालीपणाची पावती देऊ लागलेला होता! सांडलेली पाने अजूनही ओल धरून होती. त्यामुळे पावलांचा अजिबात आवाज येत नव्हता. कितीतरी मिनिटे... मग तास... आसिफ किती वेळ चालत होता कोण जाणे. रस्ता संपत नव्हता, की कुठे कसलेही वळण नव्हते. झाडे गच्च रस्त्याला धरून होती. एकदा त्या मार्गात प्रवेश केला की अंतापर्यंत कुठेही हलता येणार नव्हते. फक्त पुढे-पुढेच जायचे होते. आश्चर्य म्हणजे आसिफला अजिबात थकवा येत नव्हता. उलट पावलागणिक त्याला अधिकाधिक उत्साही वाटत होते.

आता अंधार पडायला सुरुवात झाली होती. जांभळा-काळा उजेड झाडांमधून रस्त्यावर झिरपू लागला होता. हळूहळू रस्ताच दिसेनासा होऊन, त्या जांभळ्या-काळ्या ढगांतूनच तो चालत होता. आता चालता-चालता पावले रस्त्याला लागेतचना. ती ढगांवरच वरच्यावर पडू लागली आणि जरा वेळातच आसिफ तरंगू लागला. ते घट्ट काळे होत चाललेले ढग त्याला झाडांच्याही वर उडवून नेऊ लागले.

अचानक एका जुन्या वाड्याच्या खिडकीशी तो उभा होता. खिडकी उघडीच होती. तो खिडकीतून आत आला. आता त्या खिडकीतून पिवळेधम्मक ऊन आत येऊ लागले आणि त्याच खिडकीकडे तोंड करून एक सुंदर मुलगी उभी होती. त्या संपूर्ण खोलीत खिडकीतून येणारा तेवढाच प्रकाशाचा तुकडा होता. बाकी खोलीत उजेडही नाही अन् अंधारही नाही असे शून्य भरून होते. आसिफ तिच्याकडे ओढला गेला. तिच्यामागे उभा राहिला. तिच्या केसांना त्याने बोटाने स्पर्श केला आणि तेच बोट तिच्या पाठीवरून फिरवत खाली नेले. ती वळली. तिने आसिफच्या शर्टची बटणे उघडायला सुरुवात केली. तेवढ्यात बाहेर बायकांचा शोक करण्याचा आवाज येऊ लागला. कुणाच्या मृत्यूनंतर डोक्याला पांढरे कपडे गुंडाळून करतात तसा. आसिफ तसाच विवस्त्र बाहेर आला. बाहेर त्याची बुआ आणि खूप साऱ्या अपरिचित बायकांचा तांडा पिवळेधम्मक दागदागिने घालून, डोक्याला जरीचे कापड गुंडाळून ऊर बडवून घेत होता. समोर प्रेत पडले होते. सगळीकडे उजेड असला तरी त्या प्रेतावर गच्च अंधार होता. आसिफ डोळे फाडफाडून अंधारापलीकडले प्रेत कुणाचे आहे हे बघण्याचा प्रयत्न करीत होता. पण त्या अंधाराच्या तुकड्याने प्रेताचा परिचय गिळंकृत केलेला होता. बुआ लालभडक डोळे करून प्रेताला बोटाने दटावू लागली. अंधारातून कुठूनतरी आसिफची सहा वर्षांची मुलगी

बिल्कीस झेप घेत त्याच्या कडेवर चढली. आपल्या अंगावर कपडे नाहीत याची त्याला जाणीव होती.

'गुडिया डर मत... ना बेटा...' तो तिला थोपटू लागला.

एवढ्यात आसिफ खडबडून जागा झाला. शरीर घामाने डबडबले होते. त्याने उशाशी ठेवलेला मोबाईल ऑन केला. तीन वाजायला बराच वेळ होता. म्हणजे तो फार थोडा वेळ झोपला होता. रात्री दोनपर्यंत विचारचक्र सुरूच होते. पण आता उठायलाच हवे होते. रमजान सुरू आहे. पहाटे चार वाजता फज्र की नमाज़ सुरू होईल. ईद-उल-फित्र, रमजानचे रोजे चांगले व्हावेत म्हणून ही पहाटेची सलाह. त्याने कूस वळवली. रुमाना गाढ झोपेत होती. तिला उठवावेसे वाटेना. दिवसभर धावाधाव करून दमलेली असते ती. रोजा सगळेच ठेवतात, परंतु बायकांना दिवसभराची कामे आणि दगदग चुकत नाही.

रुमानाच्या डोक्यावरून त्याने मायेने हात फिरवला. तिच्या केसांच्या बटा हळूच कानामागे खोचल्या. त्याच्या स्पर्शाने तिची झोप सावध झाली. हळूच सरकून ती त्याच्या कुशीत शिरली. बाळाला जोजवतात तसे त्याने तिच्या पाठीवर हलकेच थोपटले. तिच्यावर झोपेचा अंमल परत ढळला. हे नेमके कसले नाते म्हणायचे दोघांमध्ये? अलगद तिचा हात बाजूला करून तो उठला.



पाऊस सुरू होता. गॅलरीत खुर्ची ओढून आत उडणाऱ्या पावसाच्या थेंबांना अंगावर घेत तो बसून राहिला. इमारतीबाहेर पावसाने गल्ल्या तुंबल्या होत्या. तोवर दोन-चार घरातील माणसे खाली उतरून जमलेली. घाण-कचरा फावड्याने उपसणार नाही तोवर हे पाणी असेच साचून राहील अन् त्या घाण पाण्यात हैदोस घालणाऱ्या मुलांना आवर घालणे कठीण होईल. नोकरी संपण्याची गोष्ट रुमाला कशी सांगावी याची जुळवाजुळव काही पूर्ण होत नाही. रुमाची लगबग, धावपळ, बिल्कीसने पहाटे उठून गळ्यात टाकलेले हात, तिच्या लाडिक मागण्या, इसरार आणि मुकिम या मुलांचा धिंगाणा या सगळ्या चित्राला अचानक काळा रंग फासला जाईल का? बस आता हे शेवटचे दोन दिवस, की आटोपले सगळे!

एव्हाना समोरच्या इमारतीत, स्वयंपाकघरातील लाईट टिमटिमू लागले होते. पावसामुळे अधिकांश दारे बंदच होती. त्या जुन्या इमारतीचा काळपटपणा उजळणाऱ्या अंधारात, पावसाने आणि जमू लागलेल्या शेवाळाने अधिकच ठळक वाटू लागलेला होता. तो नॉस्टेलजिक झाला. त्याला आठवले अलिगढला दादाजींच्या जुन्या हवेलीतले दिवस. हवेलीच्या मागील बाजूस पावसाळ्यात मोठ्या वाढलेल्या गवतामधून जाताना जंगली झुडपांचा तुरट वास त्याला खूप आवडायचा. शेवाळल्या काळपट भिंतीवर नाजूक वेली चढायच्या. पावसात भिजलेली त्यांची पोपटी पाने आणि वेलीवरील पांढरे बारीक तुरे; शिवाय गवतावरील जांभळट, लिंबोणी तुरे यांनी तो परिसर अलिबाबाच्या कथेतील गुहेच्या आसपासचा वाटायचा. हवेलीत दादी नमाज पढण्यासाठी जानमाज़ अंथरून, डोक्याला ओढणी गुंडाळून पाय मुडपून बसली की, त्या भारावल्या शांततेची आदरयुक्त भीती वाटायची. जणूकाही लहानशा खिडकीच्या झरोक्यातून किरणांवर बसून आत्ता अल्लाउद्दिन येईल आणि त्या हवेलीतील अंधारात दडवलेल्या साऱ्या व्यथा, साऱ्या काळज्या चुटकीसरशी दूर करेल.

दादी उठली आणि तिने प्रेअर मॅट घडी करून आलमारीत ठेवायला घेतली की तो मागून बिलगे. त्या लहानशा गालिच्यासारख्या विणलेल्या मखमलीवरून हात फिरवी, ''दादीजी मुझे यही जानमाज़ चाहिये। मैं भी रोज नमाज़ अदा करूंगा फिर, देख लेना! आप दादाजीसे कहिये दूसरा दिलवा दे आपको''

दादी प्रेमाने त्याच्या गालावर चापट मारायची, ''बेटा, ये मेरे मामूजीने इरान से दिलवाया था मुझे।उनकी आखरी निशानी है। मेरे बाद तुम रख लेना हाँ।'' आसिफ जरासा खट्टू, परंतु खूप जास्त आनंदी व्हायचा. दादीच्या प्रॉप्रर्टीतही खूप मोठा हिस्सा त्याच्या वाट्याला येणार होता म्हणून.

प्रॉपर्टी आणि हिस्से हेच ऐकत आला होता तो समज आल्यापासून. आजोळीदेखील काही वेगळी परिस्थिती नव्हती. तिथे सहा मामा सतत कुठल्यातरी वस्तूंवर हक्क दाखवून एकमेकांच्या जीवावर उठत.

लहान मामूच्या तोंडात सतत तंबाखूचा बकाणा भरलेला असे. बोलताना तो ओठांच्या कडेने किळसवाणा सांडे. मोठ्या मामूचे डोळे सदा दारूने टवकारलेले असत. अहमद सांगे की मधले मामू गांजा पण घेतात आणि घरातील प्रत्येक मुलाला त्यांच्यापासून दूर राहण्याची सूचना असे. त्याच्या आसपासही कुणी आढळले तर नानी त्याची धुलाई करीत असे. अम्मी सदा दुःखी राही की, नानूंसारख्या सज्जन माणसाला असल्या अवलादी झाल्याच कशा? त्याचे नानू एकदम सज्जन गृहस्थ. त्याला नानूंसह गावात हिंडायला आवडायचे. तो छोटासा कस्बा त्यांचा आदर करी. दोन्ही हात पाठीमागे बांधून, डोके किंचित झुकवून जरा ढिला कुर्ता-पायजामा घालून शांतपणे चाललेले नानू बघितले की क्रोशाची तीच गोल टोपी मला हवी म्हणून तो नानीजवळ हट्ट करी. नानी कर्कश स्वरात त्याला झिडकारून देई; ''चल हट्! भाग यहाँ से! और क्यूं रे, तेरा अपना तकीया नही है... अँ? अपने अब्बू से मांग, यहाँ तेरी जायदाद नही धरी पडी।'' नानीचा स्वभाव नानांच्या एकदम विरुद्ध. तसेच तिकडे दादाजीचा स्वभाव दादीच्या एकदम विरुद्ध, जरा रागीट होता. चाचूच्या मुलांना ते सदा बुकलून काढायचे. परंतु आसिफने कधीच त्यांच्या हातून मार खाल्लेला नव्हता. कदाचित तो दादीचा लाडका नातू असल्याने असेल. दादाजीला दोन बायका होत्या. दादी त्यांची लाडकी बायको आणि तिच्या लाडक्या लेकाचा, हमरानचा, पहिल्या बायकोचा पाचवा मुलगा आसिफ. दोन्ही बायकांचे मिळून नऊ मुलगे आणि दोन मुली. यातले सख्ख्ये कोण, सावत्र कोण याने कोणाला काहीच फरक पडत नसे. कारण मुले आपापल्या भरवशावर होती. अब्बू सदा बाहेरच असत आणि त्यांच्या दोन्ही बायका, कायम एकमेकींवर डूख धरून असत.

अब्बूने निदान एकच चांगले काम केले होते, की मुलांना शाळेत घातले. आसिफ आणि त्याचे दोन भाऊ कुशाग्र बुद्धीचे होते. आसिफ या सगळ्यांमध्ये वेगळा होता. त्याला खूप प्रश्न पडायचे. मग तो नुसरत आपाला भंडावून सोडायचा; ''आप हमारे साथ खेलने क्यूं नही आती आपा? ये हिजाब क्यूं?'' नुसरत आपा नुसतीच डोळ्यांत पाणी आणून त्याच्या डोक्यावर टपली मारायची. आसिफला सगळ्या गोष्टी फक्त नुसरत आपालाच सांगाव्याशा वाटायच्या. ती कधीच कुणापाशी त्यातलं काहीच बोलत नसे. मात्र त्याच्या कुठल्याच प्रश्नांची उत्तरेही ती देत नसे. दादीची गोष्टच निराळी असे. ती त्याला बऱ्याच गोष्टी सांगे. त्यात प्रामुख्याने अल्लाच्याच गोष्टी असत. अल्लाला काय प्रिय आहे, काय नाही. कुराणामध्ये काय सांगितलेय, पवित्र रमजानमध्ये सच्या मुस्लिमांचे कर्तव्य काय आहे या गोष्टीत आसिफचे मन रमत नसे. त्यात सांगितल्याप्रमाणे त्याच्याच आसपासची माणसे का वागत नव्हती मग? ती का इतकी गोंधळलेली आहेत? त्याची बौद्धिक भूक भागत नसे. तो नानूकडे जाण्याची वाट बघत बसायचा. नानू मात्र त्याला सदैव नव्या जगाची ओळख करून देत. छोट्याशा कस्ब्यात राहूनही अगदी खालमाने असलेले नानू हे त्याच्या नवीन जगाचा दरवाजा होते. ते शहरात गेले की एखादे इलेक्ट्रॉनिक गॅझेट मुलांसाठी आणत. त्याचा पहिला मोबाईल आणि त्याही पूर्वीचा पेजर नानूंनीच घेऊन दिलेला होता आणि ते ठेवण्याकरिता बेल्टला अटॅच असलेले लेदर पॉकेटसुद्धा ठिकठिकाणी पायपीट करून मिळवले होते. वस्तू विकत घेतली, की लांब कुर्त्याच्या मोठ्या खिशात हात घालून रुमाल काढीत. त्यात घड्या करून ठेवलेल्या नोटा बोटाला थुंकी लावून मोजत. आसिफला एकदा त्यांच्या लांबलचक खिशात हात घालून बघायचाच होता. तोही कुर्ता त्यांच्या अंगावर असताना. परतीच्या प्रवासात चौकात रिक्षा थांबवून ते कधी हलवायाकडून रसभरित जिलेब्या बांधून घेत तर कधी खुरम्यासाठी खास दुकानासमोर रिक्षा उभी करीत. घरी आले, की मधल्या चौकात उभे राहून एकदाच मोठ्याने आवाज देत. नानी लगबगीने थाळी घेऊन येई. पण तोवर मुलांनी हात घालून फस्त करायला सुरुवात केलेली असे. नानू टोपी काढून डोक्यावरचा घाम पुसत प्रसन्न चेहऱ्याने मुलांच्या चेहऱ्यावरचा आनंद निरखत.

आपण आठवणींच्या नेमक्या कुठल्या मुळापर्यंत जातो आहोत, काय शोधतो आहोत भूतकाळात? त्यातला कुठला धागा धरून आजच्या समस्यांमधून बाहेर येता येणार आहे त्याला? रेझ्युमे पाठविण्याकरिता नव्या कंपन्यांचा शोध घ्यायचा सोडून भूतकाळात का पळतोय तो? की पळायला कुठे जागाच नाही? नुसरत आपा असती तर? या परिस्थितीतून बाहेर पडण्याचा मार्ग सुचवू शकली असती! ज्या बहुराष्ट्रीय कंपनीतील त्याच्या नोकरीचे वैभव बघून नानू धन्य धन्य झाले होते. पाठीवर प्रेमाने थोपटून त्यांनी आनंद व्यक्त केला होता आणि गावी परतल्यावर संपूर्ण गावाला मेजवानी दिली होती, त्याच कंपनीतून आसिफला अचानक डच्चू

देण्यात आला हे सांगू शकला असता तो? नुसरत आपाने तरी नुसतेच ऐकून घेतले असते आणि त्यांच्या प्रश्नांची उत्तरे देण्यापेक्षा डबडबल्या डोळ्यांनी नेहमीप्रमाणे त्याच्या डोक्यावर टपली मारली असती. पण आता नानू नाहीयेत. आता आपा नाहीये. त्याची ती मोठ्ठी नोकरीही तिचा संसार वाचवू शकली नाही, की तिलाही वाचवू शकली नाही. दहेजच्या नावावर तिचा छळ होत होता तेव्हा कुठे होता आसिफ? नानू उपचारांविना गेले तेव्हा कुठे होता हा? कंपनीच्या दौऱ्यावर भटकंती करीत, दर चार दिवसांआड विमानाने बिझनेस क्लासने सफर करीत होता. मोठाल्या भव्य हॉटेलमध्ये उतरत होता आणि फोनवर रूमाकडून आपाच्या छळाच्या बातम्या ऐकत होता. मनात संतापत होता. परंतु ही ढीगभर मुलेही त्याच्या अब्बूंची जबाबदारी होती. त्याने एकच बायको केली होती आणि सध्यातरी तीनच अपत्ये होती. मुलींच्या छळाच्या गोष्टी ऐकल्या, की आजकाल तो कासावीस व्हायचा. बिल्कीसला पोटाशी धरून म्हणायचा, ''गुडिया मैं तुझे बहुत पढाऊँगा। तुझे तेरे भाईयों के भरोसे कभी ना रहेना पड़े।''

रूमालाही तो खूप जपायचा. मात्र तिच्या संकोची स्वभावाची, लाजरेपणाची त्याला कधी कधी भयंकर चीड येत असे. स्वभावामुळे ती त्याच्याशी कायम एक अंतर ठेवून राही. शौहरशी अदबने राहावे ही शिकवण तिच्या अंगी भिनली होती. त्याला ती मोकळी हवी होती. त्याच्याशी वाद घालणारी, हक्काने मागून घेणारी, बौद्धिक चर्चा करणारी, मिस्कीलपणा करणारी आणि अगदी टोमणे मारणारीही! पण ती अगदीच थंड असे. तिने आखून घेतलेल्या सभ्यतेच्या मर्यादा कदाचित तिला कधीच ओलांडता येणार नव्हत्या. रात्री तिची जवळ येण्याची कितीही इच्छा असली तरीही ती कधीच दर्शवत नसे. पण त्याला वाटे, आपला सोळा वर्षांचा संसार झालाय, तिने जवळ यावे अधिकाराने आपला वाटा वसूल करावा. त्याने न दिले तर ओरबाडावे, चिडावे, रागवावे. पण यातले काहीही ती करीत नाही. कायम तलाकच्या दहशतीत असलेल्या महिलांसारखी एका न दिसणाऱ्या भयाच्या दोरखंडाने आवळलेली असते. आसिफच्या घरी तिला पूर्ण स्वातंत्र्य आहे. तिने इतर समाजातील महिलांइतकेच मोकळे वागावे अशी त्याची इच्छा असते. कधी रात्री ती त्याच्याजवळ सरके. अंगावर हळूच हात ठेवी. त्याला समजणार नाही याची काळजी घेत, सहज बटणांशी चाळा करी. तिची मजल इथपर्यंतच. त्याला वाटे आजतरी तिने बटण उघडावे. इतके न दाखवल्यासारखे करीत सुरू असलेल्या शृंगाराचा त्याला वीट आला होता. त्याला तिचा राग येई आणि तो झट्कन तिचा हात झटकून कूस पालटून पडून राही. जरा वेळ तिचा हुंदके दाबून मुसमुसण्याचा आवाज येई आणि ती घोरू लागे. आसिफ धगधगत राही.

आता अंगावर पाणी येऊ लागले. रूमा केव्हा पाठीमागे येऊन उभी राहिली त्याला कळलेच नाही. ''क्या देख रहे हो? भिग गये आप तो बिलकुलही!'' ''मुझे क्यूँ नहीं जगाया?'' जितका हा प्रश्न निरर्थक होता तितकेच त्याचे उत्तरही.

''सो लेती और थोडी देर। मैं तैयारी कर लेता नमा़ज की।''

आता बोलायला विषय उरला नाही आणि असे समोरासमोर उभे राहाणे दोघांनाही अवघडल्यासारखे होते. मुलेबाळे होऊनही ते अजूनही अपरिचितच आहेत एकमेकांना. तिच्या नजरेत कायम प्रश्नांची गर्दी असते. परंतु ते उच्चारापर्यंत पोहचत नाहीत कधी. असे चुकून मिळालेले एकांताचे क्षणही जड-जड होऊन अंगावर येऊ लागले, की दोघेही व्यावहारिक गोष्टींचा आधार घेत. उत्कट नाही अन् कोरडेही नाही असे विचित्र संकोचाचे नाते आहे दोघांमध्ये.

आसिफ स्वयंपाकघराकडे वळला. पाठोपाठ रूमा ''आप रहेने दिजिये, मैं कर लुंगी।'' ''नही, तुम रहने दो। फ्रेश हो जाओ, फिर बच्चोंको जगा देना।'' मोठेच दडपण दूर झाल्यासारखी ती बाथरूमकडे पळाली. आसिफने फ्रीज उघडून अन्न बाहेर काढायला सुरुवात केली. एक एक बाऊल मायक्रोवेव्हमध्ये सारला. दरसाल रमजानच्या महिन्यात हाच खेळ चालतो. संसार असाच सुरू आहे. फक्त मुलांची वयं बदलतात. पुढला रमजान कसा असेल? काचेचा बाऊल सट्कन निसटला हातातून. बिर्याणी इतस्ततः विखुरली. रूमाना धावली. क्षणभर स्तब्ध उभी राहून निरीक्षण केले आणि ओढणी खोचून सावडायला घेतले. कितीतरी विखुरलेले, विस्कटलेले क्षणच ती निपटून काढतेय असं वाटलं त्याला. समाधानाची एक लाट त्याच्यावरून गेली.

तयार होऊन आसिफ ऑफिसात निघाला. आज आणि उद्याचे लास्ट एक्झिबिशन त्याच्या जबाबदारीत पार पडणार होते. त्याच्या या कंपनीचे मटेरियल किती

अत्युत्तम आहे आणि ही कंपनी कशी जगातली एकमेव विश्वासार्ह कंपनी आहे हे हसतमुखाने त्याला पटवून द्यायचे होते आणि या उरलेल्या शेवटल्या दोन दिवसांत तासन्‌तास खपून तो हे करणार होता. तिसऱ्याच दिवशी त्याला आणि त्याच्यासारख्या हजारो एम्प्लॉईजना हीच कंपनी निर्ममपणे बाहेरचा रस्ता दाखविणार होती. मग ही माणसे टोळ्याटोळ्यांनी किंवा एकेकटे निमूटपणे नव्या कंपन्यांच्या 'विश्वासार्हते'वर विश्वास ठेवायला निघणार होती.

आसिफची गाडी बघून ड्युटीवर असलेला गार्ड नेहमीप्रमाणे धावला. हा गार्ड आसिफच्याही आधीपासून इथे कामाला आहे. त्या गार्डचा त्याला क्षणभर हेवा वाटला. त्याच्याकडे निदान नोकरी आहे आणि मार्केटमध्ये कितीही क्राईसेस आलेत, कंपनीला कितीही लॉस झाला तरी याची गरज कंपनीला कायम असणार आहे. सवयीप्रमाणे आसिफने त्याला चावी दिली आणि गाडीतले सामान काढायला सांगून चावीसोबत काही नोटा समोर केल्या. गार्डने त्यातली फक्त चावी घेतली. नोटा नाकारत म्हणाला, ''नहीं साब, रहने दो।'' आसिफ आणि जाधवचा चेहरा खर्रकन् उतरला. दोघे झटकन आत आले.

आसिफच्या केबिनमध्ये दोघे बसले होते. जाधव अगदीच विमनस्क अवस्थेत होता. ही दोघे काय नि यांच्यासारखे कंपनीने 'ले ऑफ' केलेले जवळपास तीन हजार एम्प्लॉईज काय, सगळ्यांना कंपनी बाय-बाय करणार होती आणि पुन्हा नव्या कंपनीचे उंबरे झिजवायला हा नवा अनएम्प्लॉईज लोंढा नव्या बेरोजगारांच्या लोंढ्यात मिसळणार होता. त्यातला प्रत्येकजण जीवाच्या आकांताने कंपन्यांनी फेकलेले उरलेसुरले जॉबरूपी तुकडे वेचायला सरसावत होते. कुणाला तीन महिन्यांचे कंपन्सेशन देऊन उपकृत करण्यात येणार होते, तर कुणाला सरळ अर्धचंद्र मिळणार होता. त्या उपकृतांपैकी आसिफ एक होता. त्यामुळे या क्षणी जाधवपेक्षा तो स्वतःला भाग्यवान समजत होता.

''आसिफ, कसं करू यार? माधुरीला आज सुट्टी मिळणार आहे हॉस्पिटलमधून. सिझेरिअनचे पैसे भरायचे आहेत.''

''ओह! बधाई हो बाप बनने की! किती दिवस झाले आज?''

''बस एकाच दिवशी या दोन्ही बातम्या आल्या समज नं. साला, कंपनीला पण आताच क्राईसेस फेस करायचा होता?''

''चिंता नको करू जाधव. लवकरच आपल्याला दुसरा जॉब मिळून जाईल.'' शिंदेने काल आसिफकडे फेकलेला सहानुभूतीचा तुकडा त्याने आज जाधवकडे सरकवला.

''केव्हा? काय करू तोवर, काय करू?''

या काय करूला कुणाच जवळ उत्तर नव्हते.

जाधवची चुळबुळ वाढली. दोन्ही हातांचे पंजे एकात एक गुंफून ते झटक्यात सोडवण्याचा त्याचा चाळा सुरू झाला. 'आम्हाला कंपन्सेशन पण दिलं नाही. भिक्कार डिपार्टमेंट आहे आमचं. म्हणे नो प्रॉफिट डिपार्टमेंट म्हणून खर्चात कपात! मग आम्ही रात्रंदिवस मरत होतो. ते प्रॉफिट गेलं कुठे?'

जाधवच्या चेहऱ्यावरची चिंतेची अन् प्रश्नांची घट्ट जाळी आसिफला चांगली परिचित होती. समोरच्याचं मरण तर आत्ताच समोर येऊन ठेपलंय. आपलं निदान लांबणीवर आहे. त्याचा हात ड्रॉवरकडे गेला. चेकबुक काढून त्याने एक महिन्याचा पगार लिहून, जाधवच्या हातात चेक दिला. जाधवच्या चेहऱ्यावरचे भाव समजण्यापलीकडे झाले. आज सारेच पुरुष स्वतःला पराभूत समजत होते. एकमेकांसमोर रडण्याची आता कसली लाज? झटकन डोळे पुसत जाधव उठला. 'थँक्यू!' घशातल्या घशात आवाज काढून तो वेगाने तिथून निघाला. जणू क्षणभरात आसिफचा विचार बदलला तर? पैशाची गरज आज मेंदूवर हावी होती.

फक्त काहीच सेकंद आसिफचा ऊर भरून वगैरे आला. स्वतःबद्दलचं अतीव समाधान वाटलं आणि पुढल्याच मिनिटाला प्रचंड विषाद दाटून आला. का केलं त्यानं असं? काय करून बसला होता तो? इथे तो एकटाच नव्हता उरला जाधवला मदत करायला. मागितली असती त्याने मदत इतर कोणाला. शिंदे आहे की! त्याची नोकरीही शाबूत आहे. शब्बीरने प्रॉमिस केल्याप्रमाणे. दुबईच्या जॉबचं जमलं नाही तर? तो घाबरून उठला. वेगाने बाहेर पडला. कॅरिडोरमध्ये येईपर्यंत जाधव मुख्य दरवाजातून बाहेर पडलेला दिसला. त्यालाही कदाचित हाच क्षण टाळायचा असावा. आता इलाज नव्हता. मूर्खपणा करून झाला होता. होईल सगळं ठीक. अल्ला रहेम करेल. तो स्वतःला सांत्वन देत एक्झिबिशनसाठी निघाला.

आसिफला घरी यायला बरीच रात्र झाली.

अनुक्रमणिका

'नमाज-ए-मगरिब' नंतर खाण्यापिण्याचा सुरू झालेला दौर अजूनही सुरूच होता. अम्मीची मोठी बहीण सलमापा आपल्या दोन मुली आणि त्यांचे मुलगे घेऊन आलेली होती. बाहेर बायकांची बैठक जमलेली होती. आसिफला बघतच रोज बॅग घ्यायला समोर येणारी रूमाना जागेवरून हलली नाही, की नेहमीप्रमाणे सलमापा लांबलचक हेल काढून, 'अमाँ आसिफ मियाँ, बडे जेच रहे हो!' अशी आरोळी ठोकत त्याला मिठी मारायला धावली नाही. नाहीतर गुदमरेपर्यंत ती त्याचे डोके तिच्या थुलथुलीत छातीशी गच्च दाबून धरते आणि तिच्या मिठीतून हसत हसत सुटका करून घेत, केस सावरत तो म्हणतो, 'चाय-शाय पिलो सलमापा'

''अरे चाय-शाय तो क्या पुरा दिन दावत उडाके जाऊंगी मैं। कंजूस कहीं का! ये तो मेरी बहू अच्छी है तुझसे।''

आज यातले काहीच झाले नाही. बायका सुतकी चेहरा करून बसलेल्या होत्या. हाय-हॅलो करून आसिफ आत गेला. डोके प्रचंड दुखायला लागलेले होते. कपडे न बदलता तसाच डोक्यावर हात ठेवून तो पडून राहिला. रूमाने त्या गदारोळातून धावत यावे, डोके चेपून द्यावे, त्याची विचारपूस करावी अशी इच्छा त्याच्या डोकेदुखीत अधिकच भर घालत गेली.

बाहेर मुलांच्या भांडणाचा आवाज आला. इसरार आणि मुकीम आपापसात भांडत होते. आज त्यांची भांडणे सोडवण्याची ऊर्जा आसिफमध्ये नव्हती. तो तसाच पडून राहिला. वाढती मुले सांभाळणे रूमानाच्या ताकदीबाहेरचे काम होते. ती नेहमीच त्यांच्या भांडणाकडे दुर्लक्ष करी. अगदीच एकमेकांची टाळकी फोडली तर आसिफकडे तक्रार जाई. बाहेरचा आवाज प्रचंड वाढला. आता बिल्कीसच्या किंचाळण्याचा आवाज आला. आसिफ बाहेर धावला. सलमापाचा नातू इम्रान बिल्कीसचा फ्रॉक धरून तिला फरफटत नेत होता. इसरार मुकीमला लाथा घालत होता. मुकीमचे डोके फुटले होते आणि बायका घाबरून गोंधळ घालत होत्या. 'ये क्या हो रहा है?' आसिफ किंचाळला आणि त्याने इम्रानच्या हाताला झटका देऊन बिल्कीसला सोडवले. इम्रानच्या दोन थोबाडीत दिल्या आणि बिल्कीसला उचलून रूमाच्या कडेवर जवळजवळ आदळलेच. 'इसे संभाला करो पहले! तीन बच्चे नहीं संभाले जाते तुमसे?'आणि तो इसरारकडे वळला. इसरारला त्याने अक्षरशः फोडून काढले. तो गयावया करू लागला. परंतु आसिफचा संताप डोक्यात गेला होता. गोष्ट जास्त बिघडलेली पाहून मुकीम मध्ये पडला. ''पापा छोड दो उसको। छोड़ दो पापा! प्लीज...! प्लीज पापा, उसकी गलती नही है। गलतफहमी हो गयी थी।'' आसिफने मध्ये पडलेल्या मुकीमलाही दोन-चार भडकावल्या. सलमापा चवताळून अंगावर आली. ''हो क्या गया है तुझे शैतान? छोड बच्चों को। अपना गुस्सा उनपे क्यूँ उतारता है? उन्होंने छुडवाई है क्या तेरी नोकरी?'' तिचे हे शब्द गरम तेलासारखे त्याच्या कानात शिरले आणि त्याचे हात थबकले. तो रागाने थरथर कापू लागला. त्याचा तो अवतार पाहून मुले भीतीने गर्भगळीत झाली. यापूर्वी कधी त्याने मुलांना मारलेच नाही असे नव्हते. मुले नियमित मार खात होती; पण असे भान हरपून बेदम चोप देताना त्याचा तोल प्रथमच सुटला होता.

तो आता गेला आणि खोलीचे दार जोरात आपटून बंद केले. लाईट बंद करून तोंडावर उशी घेऊन तो पडून राहिला. बाहेरचे आवाज, हुंदके, धुसफूस, खुसफूस, लुडबूड होत थांबले. बाहेर अगदी काहीही झाले तरी घरात पाहुणे आल्यावर रूमा खोलीत येणार नव्हती. तो बाहेर आल्यावरच, सार्वजनिक संवादाच्या रूपात त्यांच्यात देवाण-घेवाण होणार होती. आजतरी रूमाने यावे, खायला-प्यायला विचारावे, अशी त्याची तीव्र इच्छा झाली. आज तिच्या कुशीत शिरून त्याला खूप रडावेसे वाटत होते. अगदी त्यालाही कुणी ठोकून काढावे आणि इसरार-मुकीमसारखे त्याने किंचाळत मनसोक्त रडावे, अशी इच्छा झाली. तो उशीतच डोके खुपसून तळमळत राहिला.

पहाटे पावणेचारला रूमाने आवाज दिला, 'उठो नमाज का समय हो रहा है।' पुन्हा उठायचे, आवरायचे, त्याच कंपनीत जायचे. त्याला पहाट नकोशी झाली. आज काही न करता झोपूनच राहावेसे वाटले. डोक्यावरून हात फिरला. ती सलमापा होती. ''ऊठ, इस वक्त सोते नही. ये सलाह सब खुशियां लौटा देगी देखना.'' आसिफ उठला. वाटले एकाच रात्रीत तो आमूलाग्र बदलला आहे. हे शरीरच इतर कुणाचे आहे. एकदम परके, लहानपणीच्या आसिफच्या कुठल्याच खुणा त्याला स्वतःमध्ये शिल्लक दिसल्या नाहीत. आपल्यालाही संवेदना होत्या यावर त्याचा विश्वासच बसेना. त्याचे हात-पाय अधिक काळे झाले होते. इच्छा-आकांक्षांची, वासनांची, चिडेची-संतापाची एक

अनुक्रमणिका

काळीख पोतल्या गेली होती देहभर आणि सत्-असत्च्या मध्ये विभागल्या गेलेल्या त्याच्या जीवाचा तडफडाट तेवढा त्याला मोठ्याने ऐकू येत होता.

रूमाना कामात व्यस्त होती. काल दिवसभर रोजा ठेवल्यानंतर, रात्रीही त्याच्या पोटात काही गेले नाही याची कुठलीही खंत तिला नव्हती. ती एक परकी, खूप अनोळखी स्त्री वाटली त्याला. त्याच्या व्यथेशी कवडीचाही संबंध नसलेली. आजची तिची ही लगबग उद्यापासून पैशांची आवक थांबल्यावर कशाच्या भरवशावर सुरू राहील? तिच्या बेरोख वागण्याची क्रूर शिक्षा म्हणून त्याला हा विचार क्षणभर समाधान देऊन गेला. पण अशा आनंदाची किंमत किती भयंकर असेल हा विचार हृदय चिरून गेला. मुलाबाळांनी भरलेल्या घराचा राबता असाच राहो, अशी मनोमन अल्लाला प्रार्थना करायला तो उठला.

सगळी आवराआवर करून तो ऑफिसला निघाला तेव्हा सलमापाने त्याला आवाज दिला.

''सुन आसिफ, बैठ यहाँ। कुछ बात करनी है।''

त्याने नोकरी सुटल्याचे घरी का सांगितले नाही म्हणून विचारले. ही गोष्ट घरी कुणी सांगितली म्हणून त्याने विचारल्यावर आपा म्हणाली, ''जैसे तेरे ना बताने से पता ही नहीं चलता। जहाँ सारी दुनिया जानती है, घर में भी बता ही देता।''

आसिफने रूमानाला आवाज दिला. तिने सांगितले, की जाधवच्या बायकोचा हॉस्पिटलमधून फोन होता. एवढ्या अडचणीतही त्याने एक महिन्याचा पगार देऊ केला, त्याबद्दल तिने अत्यंत आभार मानले आहेत. ती रडत होती फोनवर खूप आणि आता आपण कसे करायचे म्हणून शोक करीत होती. आसिफने पगार दिल्याचे ऐकल्याबरोबर सलमापा खवळली.

''क्या जरुरत थी तुझे बेवकुफ? कोई अपने बच्चोंके मुँह से निवाला छिनकर औरोंको देता है भला? अभी दुस्री नोकरी भी नहीं मिली। बच्चों के हाथ में क्या कटोरा दोगे?''

''क्या बोल रही हो आपा? कुछ तो रहेम करो, रमजान चल रहा है, ऐसी बददुआये तो ना निकालो। इन्शाल्ला, अल्ला बरकत देगा। और भिक क्यूँ माँगे हम? इतनी जायदाद धरी पडी है दोनों तरफ से, ये हवेलीया दिखाने को है? मांग ही लेंगे हम भी अपना हिस्सा।'' रूमाचे असे आक्रमक होणे आसिफला अनपेक्षित होते.

''ओSSय होSSय तो बहुरानी की अकल निकल आई है, एकदम से। तुम्हारे अपने दादाजी के तो हजारों हिस्से होवे है, शायद ही इस जिंदगी में बंटवारे हो सके। और हमारे इधर की तरफ तो तुम मुंह ही ना मारो। आसिफ के नानू ने मरने से पहले ही बांट दी थी सबको। अब उसके अब्बू सारी बेच के खा गये तो कोई क्या करें, अब इधर ना देखना कहे देती हूँ।''

''कुछ दिया धरा नहीं। इनकी अम्मीने बताया था मुझें, वो मर गयी तो खा गये तुम सब।'' रूमाचे हे रूप आसिफला असह्य झाले. अगदी एकाच दिवसात परिस्थिती एवढी बदलते, की माणसे माणसाचे शत्रू होतात. सलमापा नवरा मेल्यानंतर वारंवार आसिफकडे मुलांना घेऊन येते. सासरच्यांनी विचारणेच सोडलेय तिला. सगळे सण-वार, हौस-मौज करवून घेते. एका मुलीच्या नवऱ्याने तिला टाकली आणि दुसरीचा नवरा एकदम बैठ्या! कमाई कवडीची नाही, त्रास ढीगभराचा. हक्काने नातवांना घेऊन उतरते. 'अब तो आसिफ मियाँही हमारा सबकुछ है' म्हणत त्याची थुंकी झेलायलाही मागे-पुढे न पाहणारी ही बाई अचानक हे रूप दाखवते. त्याला किळस आली. सलमापाची आणि रूमानाचीही. एक शब्दही न बोलता तो फणकाऱ्याने निघून गेला. जवळपास दोन मजल्यांच्या पायऱ्या उतरेपर्यंत त्या दोघींचे एकमेकींवर खालच्या स्तरात ओरडणे ऐकू येत राहिले.

• • •

ऑफिसचा शेवटचा दिवस पूर्ण करून, रात्रीपर्यंत अगदीच पिळवटून निघालेला आसिफ घराकडे निघाला. शरीर-मन अपार थकले होते. घरी परत जाण्याचीही इच्छा होत नव्हती. गाडीत बसल्याबरोबर त्याने शब्बीर भाईला फोन लावला. हा गेल्या महिनाभरात त्याने लावलेला पन्नासावा तरी फोन असेल. शब्बीर दुबईत आहे. त्याचा तिथे मोठा उद्योग आहे. तिथे किंवा आखातात नोकरी देतोच असे ठामपणे बोलणारा शब्बीर आता फोन उचलायलाही टाळाटाळ करतो आहे. कंपनीच्या स्ट्रॅटेजी चेंज झाल्या आणि आता नॉनप्रॉफिटेबल बिझनेस सेल करायला सुरुवात झालेली आहे हे कळताच त्याने महिनाभरापासूनच इतरत्र प्रयत्न सुरू केले. विदेशातल्या प्रत्येक दौऱ्यावर तो भविष्यातले जॉब शोधत होता. त्यातल्यात्यात शब्बीरकडूनच त्याला बऱ्यापैकी आश्वासन मिळाले होते.

शब्बीरने फोन उचललाच नाही. त्याऐवजी मेसेज बॉक्समध्ये त्याचे दोन-तीन मेसेज येऊन पडले. त्यात

अनुक्रमणिका

आताची बदललेली जागतिक परिस्थिती, मंदी आणि मुख्य म्हणजे मुस्लिम कम्युनिटीबद्दल जगभरात असलेली उदासी यामुळे जॉब मिळणे अशक्य असल्याचे स्पष्टपणे सांगितले होते. भारतातही तीच परिस्थिती आहे. नाव ऐकले की लोक बिचकतात. पण शब्बीरसाठी काय कठीण होते? त्याला शब्बीरचा खूप राग आला. त्याने मोठ्याने डेक सुरू केला. तेवढ्यात रिनाचा, त्याच्या मैत्रिणीचा फोन आला. रोज औपचारिकतेची मर्यादा पाळणारा आसिफ तिच्याशी मोठ्याने आणि मोकळेपणाने बोलू लागला, 'गाना सुनोगी?' त्याने डेकच्या आवाजात आवाज मिसळून मोठ्याने गायला सुरुवात केली. रिनाच्या खळखळून हसण्याने त्याला एकदम हलके वाटले. 'रिना फोटो भेजना तेरा!' दोनच मिनिटांत रिनाने त्याला फोटो पाठवला. नुकतीच आंघोळ करून आलेली रिना, एकदम उत्तेजक फोटो होता तो. आसिफचे गाल सळसळून लाल झाले. कितीतरी वेळा तो फोटो बघत होता.

घरात शिरला तो मुकीम रूमानाशी वाद घालीत होता. त्याला आत्ताच्या आत्ता पँट ऑनलाईन ऑर्डर करायच्या होत्या आणि आता असं ऊठसूठ गोष्टी ऑर्डर करणे शक्य नाही म्हणून रूमा दटावत होती. इसरार-देखील नव्या स्मार्टफोनसाठी हट्ट धरून तिच्या रागात भर घालत होता. किशोरवयात आलेली मुले आपल्या गरजांसाठी प्रचंड आक्रमक झालेली होती.

"मुझे अभ्भी चाहिये।" मुकीमने टेबलवरची फोटोफ्रेम जमिनीवर आपटली. "पैसे क्यूं नहीं है? अभी तो पापा के पास दो महिने की सैलरी है ना?"

"तो उसे खतम कर दोगे? खाओगे क्या फिर? आपादीदीने तो पहलेही कटोरा थमा दिया है हमारे हाथ में।" बिल्कीस रूमाला बिलगली, "अम्मी हम लोग गरीब हो गये क्या?"

स्तब्ध होऊन आसिफ हे सारं बघत होता. हा त्याचाच संसार होता? त्याच्याकडे लक्ष गेल्यावर रूमाना इसरारला उचलून धुमसत आत गेली. मिसरूड फुटू लागलेल्या इसरारचा चेहरा लालबुंद झाला होता. मुकीमच्याही नजरेत जवळपास हेच भाव होते. काहीही प्रतिक्रिया न देता तो सरळ बेडरूममध्ये शिरला. आज नानू असते तर? दादी असती तर? जमीनजुमला नसेल मिळाला त्यांच्याकडून, पण जी अनमोल प्रॉपर्टी त्याला बालपणी मिळाली, तिची आजच्या जगात काहीच किंमत नाही का? 'नानू, बस एक दिन के लिये आ जाओ।' वाहत्या डोळ्यांनीच त्याने झोपेत प्रवेश केला.

आसिफ बंगल्याच्या लॉनमध्ये उभा होता. चहुबाजूंनी पाऊस कोसळत होता; परंतु भरपावसात उभ्या असलेल्या आसिफच्या अंगावर थेंबही पडत नव्हता. तो कोरडा ठण्ण होता. देशी गुलाबांच्या फुलांचा गंध वातावरणात दरवळत होता. समोरून पावसात भिजत रिना आली. झिरझिरीत गच्च भिजलेल्या गाऊनमधून तिच्या नितळ मांड्या आणि पोट स्पष्ट दिसत होते. त्याची नजर हटेना. ती धिटाईने चालत त्याच्याकडे आली आणि काही कळण्याच्या आत त्याला घट्ट बिलगली. आश्चर्य म्हणजे अचानकच त्याच्यावर पाऊस कोसळू लागला. रिना कोरडी होत गेली आणि हा एकटाच भिजत राहिला. आसिफ चुळबुळला. हे काय होतंय? अंधारात रूमाना त्याच्या शरीराशी झटापट करीत होती. त्याच्या शर्टच्या बटणा ओरबाडून तिने त्याचा शर्ट बाजूला केला. लग्नानंतरच्या सोळा वर्षांनंतर प्रथमच रूमा आक्रमक होऊन त्याला ओरबाडू लागली.

"रूमा... क्या कर रही हो?" त्याने बोलण्याचा प्रयत्न केला. तिने घट्ट ओठांनी त्याचे तोंड बंद केले. तो लुटत राहिला. बाहेर वादळाचे प्रचंड तांडव चालले होते. आज तो सगळीकडून लुटला गेला.



मनीषा अतुल

जन्म : ८ ऑक्टोबर १९६८

प्रकाशित लेखन :
'डेल्टा' कथासंग्रह (२००८), सहा कवितासंग्रह आणि दोन कादंबऱ्याही प्रसिद्ध.

विशेष • 'डेल्टा'ला कथासंग्रहासाठी विदर्भ साहित्य संघाचा पुरस्कार. • काव्यलेखनासाठी वि.सा. संघ, पद्मगंधा, साहित्यसाधना इत्यादी संस्थांचे अनेक पुरस्कार. • अनेक कविता, कथांचे इंग्रजी अनुवाद प्रसिद्ध.

पत्ता : प्लॉट नं ६, फ्लॅट नं. २०१, महर्षि विनायक अपार्टमेंट, स्केटिंग ग्राउंडजवळ, स्वावलंबीनगर, नागपूर - ४४००२२

अनुक्रमणिका



आगडोंब

▫ सुभाष किन्होळकर

सूर्यास्ताची लाल-भगवी किरणं अवतीभवतीचा परिसर अधिक उजळून काढत होती. चौफेर साजेसं वातावरण पसरलं होतं. उन्हउतरणी झाली होती. नाही म्हटलं तरी आज नेहमीपेक्षा जास्तच झळा जाणवल्या होत्या. अंगातून गच्च घाम फुटला होता. या सगळ्या गोष्टीला श्रीरंग सारंगही अपवाद नव्हता. उन्हाळ्यातल्या प्रत्येक दिवसाला त्याच्या थंड पाण्याच्या दोन अंघोळी ठरलेल्या. काम असो अथवा नसो. सकाळी आणि तिसऱ्या पाऱ्याला त्याला अंघोळ केल्याशिवाय करमत नसायचं.

आताही सवयीप्रमाणे श्रीरंग तिसऱ्या पाऱ्याची अंघोळ आटपून ओट्यावर मांडी मारून बसला. ओट्याला लागून कडूनिंबाचं झाड डौलात उभं होतं. त्याची लांबलचक सावली ओटाभर पसरली होती. त्याचं घर गावरस्त्याला लागून असल्यामुळे येणारा-जाणारा थोडा वेळ आपलीही मांडी घालून त्याच्याजवळ बसायचा. गार सावलीचा आनंद घ्यायचा. बरेचसे तर संध्याकाळ झाली की, याच निंबाजवळ येऊन बसायचे रोज. त्यातला एक होता अभिराम पंढरी. त्याचं आणि श्रीरंगचं चांगलं जमतही होतं. दोघेही एका विचाराचे होते. त्यांच्यात चुकूनही वाद नाही का चुगली नाही. नेहमीप्रमाणे त्याचं येणं ठरलेलं. आताही श्रीरंगला पाहून अभिराम पंढरी ओट्यावर येऊन बसला. तोच श्रीरंग त्याला पाहून म्हणाला,

''जास्त तापलं वाट्टे गळ्या आज.''

''हाव नं भौ. कालपरवापेक्षा लयच ऊन व्हतं. तसं पाहिलं तं अजून जास्तीच ऊन तापीन म्हना.''

''अखाजीचा मह्यना हाय नं. लयच तापत आस्ते ह्या मह्यन्यात.''

''तसं काही नस्ते अखाजीच्या मह्यन्यावर, उनाचा पाराच चढत असतो दरसाल अन् त्याले कोणत्या सणावाराशी काय घेणंदेणं. ह्ये सगळे सनबिन माणसानेच लादले हाये. सन आला की मस्त मजा राह्यते. खायापियाची चंगळ आस्ते. कानोले, कुऱ्हड्या अन् वड्याची धमाल आस्ते.''

''तुले तं नुस्तं खायाचंच पडले आस्ते हमेशा.''

''अन् तुले?''

दोघंही एकमेकांच्या बोलण्यावर खदखदून हसले. त्यांच्यामधे आता देवराम दलपतही येऊन हजर झाला. येतायेताच त्याची नजर त्या दोघांवर पडली. त्यांचं हसणं गुळण्या फोडत होतं. त्यांना पाहून तो हसून म्हणाला.

''काहीबी गुयन्या फुटून राह्यल्या! चांगली भट्टी जमेल दिसते अखाजीची, नाई?''

अनुक्रमणिका

"कशाची भट्टी अन् कशाचं काय चार दिवसावर अखाजी आली तरीबी तूर पळेलची पळेल हाये." श्रीरंग मिस्कीलपणे म्हणाला.

"तुले काय कमी हाये. काय सांगा!"

"म्हंजे ?"

"बँकेमधी पैसे पळेल हाये तुह्ये."

"दोन महिन्या आधी लगन केलं पोरगीचं. त्यातच तं सगळा पैसा लागला. अन् लगन काई सोपी गोष्ट नस्ते. लय पैसा लागतो. कोन्त्या टायमाले काय इघ्न इन याचा काई नेम नस्तो. बँकेत पैसा पळेल व्हता म्हणून बरं झालं. नाईतं सस्त्यामंधी तूर इकना पडली आस्ती मले."


"कितीक तुरी हाये ?"

"हाये दहाएक पोते."

"बाऽऽपरे!"

"आता मात्र खराब हून राह्यल्या त्या. तरीबी दोनदा ऊन दिऊन पाह्यले तुरीले. पण कायबी फायदा नै झाला. ऊन देल्यावर दहाएक दिवस बऱ्या राहता अन् मंग पुना सवसारख्या व्हता. काय करशीन सांग ?"

"इकून टाक लवकर मंग. एकदा धनोर लाग्याले सुरवात झाली की काई खरं नै राहत तुरीचं. पोकय हून जाता त्या. वजनबी घसरते अन् भावबी."



अभिराम पंढरी त्या दोघांच्याही बोलण्याकडे टक लावून पाहात होता. त्याच्याही तुरी अजूनही जशाच्या तशाच घरामधे पडून होत्या. श्रीरंगनं तरी दोनदा ऊन दिलं होतं. पण अभिरामनं तेवढंही केलं नव्हतं. त्याच्या तुरीले किती धनोर लागले असतील विचारता सोय नाही. त्यालाही मलकापूरला तुरी विकायला न्यायच्या होत्या. पण भाव पडेल असल्यामुळे त्याची इच्छा काही विकायला व्हायची नाही. तरीही त्यानं श्रीरंगला भावाबद्दल विचारलं,

"काय भाव हाये तुरीले आता ?"

"तुरीले काय एकाच परकारचा भाव आस्तो ? काई जाव्ळ्या आस्ता तं काई बारीक, काई लालभळक आस्ता तं काई ढब्ब्या. माल पाहून भाव आस्तो."

"पण तरीबी..."

"तसं नै सांगता येत. मार्केटमंधी गेल्यावरच समजते ते सगळं. आणि बसल्या बसल्या नै समजत."

"आता कितीक दिवस ठेव्याच्या घरात. हात आख्ळून राह्यला सगळा. न्याचं म्हणतो कालची."

"काई हरकत नी. तूही तयारी असीन न्याची तं होऊ इकून मोकये. पण अंदाज तं घेना पळीनं भावाचा. गेल्या दोन-तीन दिवसात नेल्या काय कोनं मार्केटले तुरी रे, देवराम ?" देवरामकडे पाहात श्रीरंग म्हणाला.

"नेल्यानं." अंदाज घेत देवराम म्हणाला.

"कोनं ?"

"त्या दसरत खंडूनं."

"काय भाव गेला काय सांगा ?"

"सात हजार रुपै किंटल."

"आरेऽ व्वा. मंगतं चांगला भाव हाये."

"पन त्याच्या तुरीबी तशाच व्हत्या. एकदानी टणकतळक्या."

"दोन-तीनशे कमी भाव इन आपल्याले त्याच्यापेक्षा. जराशा खराब हाये आपल्या तुरी त्याच्यापेक्षा म्हणून. मले वाट्टे कर तयारी कालची. एकदाचे होऊ मोकये. कितीक दिवस ठेवतू आता. भावबी जरा बरे हाये. म्हंजे वाढेलच हाये हंगामासारका."

"ठीक हाये. कर मंग तयारी कालची. शनवारचा दिवसबी हाये मस्त. बाजारबी होऊन जातो अनसायासी."

गप्पांच्या ओघात बराच वेळ झाला होता. ओट्यापुढच्या खांबावरची ट्यूबलाईट झळकली होती. आता मात्र जेवणाच्या निमित्तानं अभिराम आणि देवरामनं काढता पाय घेतला. श्रीरंगही घरात आला. अजून मात्र सगुणाचा स्वयंपाक चाललेलाच होता. तसा तो म्हणाला,

"टाईम हाय काय सैपाकाले अजून ?"

"काहून ?"

"एक फोन लावून इयाचा व्हता संदिपच्या डबल्यावरून."

"कोनाले लावता फोन?"

"टरकवाल्याले."

"टरकवाल्याले?"

"कालची तुरी नियाचा इचार हाये मलकापूरच्या मार्केटले, म्हणून म्हणतो धामनगावच्या टरकवाल्याले सांगून ठेवावं. गावातून इयाचं. नाईतं ते सरळ निगून जाता. त्यासाठी आधी सांगून ठेवले असलं की बरं राह्यते."

"भावगीव बराहे?"

"सात हजारलोग हाये."

"बरा हाये मंग, इक्याले काई हरकत नाई. तेवळाच हात मोकया हून जातो. पोरगीच्या लगनापासून जरा बिपतच हाये पैशाची."

"म्हणून म्हंतो टाका इकून. एक-दोन लोकाईचे पैसे राहेले हाये द्याचे. ते मागत नाई म्हणून का आपून द्याचे नाई? अन् पुढे पेरणीचा टाईमबी हाये. अशा वक्ताने कोन पाहते तुरीले फिरून मंग. जाईन आनखी भाव घसरून तं बसना पडीन बोंबलत. हाये की नाई?"

"टाका इकून आपल्या तुरी खराबच हून राह्यल्या. जा. या लावून फोन त्या टरकवाल्याले. घरातली अळचनबी दूर हून जाते."

श्रीरंग फोन लावायला संदीपच्या दुकानापाशी गेला. त्याच्याकडे ट्रकवाल्याचा नंबर होता. पण त्याच्या दुकानात गिऱ्हाइकांची गर्दी होती. त्यामुळे त्याला थोडा वेळ थांबल्याशिवाय गत्यंतर नव्हतं. एकदाची गर्दी ओसरली तसा संदीपनं त्याला फोन लावून दिला. काम फत्ते झालं. ट्रकवाला उद्या यायचं होय म्हणाला. तशातच हळवं हास्य ओठावर झळकवत घरात पाय ठेवला. तशी सगुणा विचारती झाली,

"जमलं? लागला फोन?"

"लागला. पहाटेच येतो म्हणे."

"पोते टाक्याले मानसं पाह्यजा."

"मानसाईची तशी काईबी गरज नाई. टरकवाल्याजोय असता हमाल. आपली मानसं करता का असे जड काम! हलके फुलके कामं पाह्यजे त्याहीले त्ये तं एकाच पोत्यात थंडेगार व्हतीनं. हमालाईचं नेहमीचं आस्ते. आयडिया ठाऊक आस्ते त्याहीले कुठी हूक लावा ते. अन् आपल्याले तोंड वाजवायचंबी काम पळत नाई."

"बरं हाये मंग तं. बरंऽ बसा आता जेव्याले. सैपाक तयार व्हयेल हाये."

दोघंही गप्पांच्या ओघात जेवायला बसले.

जेवणानंतरही श्रीरंग चूप बसला नाही. सुतळी आणि दाभण घेऊन त्यानं फाटलेली पोती शिवायला घेतली. बऱ्याच ठिकाणी पोती फाटलेली होती. काही ठिकाणी तर उंदरांनी टरकावलेली जाणवत होती. काहीचे धागे उचकटले होते. बऱ्याच उशिरापर्यंत त्यानं टाके मारण्याचं काम चालूच ठेवलं. रात्रीचा पडदा गडद होऊ लागला होता. अशातच त्यांना केव्हा झोप लागली कळलेही नाही.

• • •

दुसऱ्या दिवशी सोनकिरणांसोबत श्रीरंगच्या ओट्यासमोर ट्रक येऊन उभा राहिला. भराभर हमाल खाली उतरले. श्रीरंग ट्रकचीच वाट पाहात होता. अभिरामही ट्रकसाठी उत्सुक झाला होता. बऱ्याच दिवसानं त्याची तूर मार्केटला चालल्याचं समाधान त्याच्या चेहऱ्यावर दिसत होतं.

दहा-पंधरा मिनिटांतच हमालांनी श्रीरंगची तूर ट्रकमध्ये टाकली. तसा त्यानं सुटकेचा निःश्वास टाकला. लगेच ट्रकची चाकं गरगरली आणि ट्रक अभिरामच्या घराकडे निघाला. श्रीरंगच्या घरापासून पाचवंच घर होतं अभिरामचं. चटदिशी हमालांनी त्याचीही तूर भराभर उचलली. आपलं काम मनासारखं झालं म्हणून दोघेही खूश झाले आणि हमालांची हमाली देऊन मोकळे झाले. वरून दोघांनी चहापाण्यासाठीही पन्नास रुपये मनसोक्तपणे दिले. त्यामुळे हमालांचाही चेहरा उजळला. आणखी कोणाचा माल टाकायचा आहे का याची शहानिशा करून घेतली. पण तूर विकून गावकरी कधीचेच मोकळे झाले होते.

ट्रकची धूरधूर सुरू झाली. तसा ट्रकवाला श्रीरंगकडे पाहून म्हणाला,

"तुमी येतानं सोबत?"

"नाई."

"काहून?"

"तुह्य चालतेच फिरणं या गावाचं त्या गावाले. पान्हेरं झालं की तपोवन. मंग सासेव अन् पोफयी अनं चावदा."

"माल नाई टाकला तं कसं भागीन आमचं. नुसत्या तुमच्या मालानं टरक भरतो काय? लय लागते बापा टरकाले."

"तुह्यबी बरोबर हाये म्हना. पोटतिळकीसाठी

भटकनाच पळते या गावाचं त्या गावाले. कसं जमनार हे त्याच्याशिवाय.''

''आता कसं बोलले मनासारकं. मंग येता सोबत की काय करता?''

''नाई जाऊ दे तू टरक पुढे. आमी येतो मागून एसटीनं. तुम्ही पोहचेलोग तं आमी येऊन टेकतो.''

''जाऊ दिऊ मंग?''

''हाऽव जाऊ दे. आमी येतोच मांगून आठ-नऊच्या गाळीनं. अजून तं आमच्या भाकरीबी व्हायच्या राहेल हाये. हाये की नाई अभिराम?''

श्रीरंगच्या बोलण्यावर अभिरामनं मान डोलावली. तसा पुन्हा ट्रकवाला म्हणाला,

''कोनत्या अळतवर टाकू माल?''

''ते आपला नेहमीचा...''

''जलाराम अळत.''

''हाऽ तोच.''

''ठीक हाये'' म्हणून ट्रकवाल्यानं ट्रक सुरू केला अन् निघालाही. दोघांनीही पुन्हा टाकलेल्या मालाकडे पाहिलं. माल व्यवस्थित रचलेला होता. प्रत्येकाला आपल्या मालाची काळजी असते ना!

• • •

दोघंही आपापल्या घरी गेले. अंघोळी केल्या. नऊची गाडी पकडायची असल्यानं श्रीरंगनं सगुणाला डबा तयार करायला सांगितला. डबा सोबत असला की टेंशन नसते. आपला डबा काढला की झालं सुरू. त्याला हॉटेलचं फारसं आवडत नसेही. अन् अभिरामचंही तसंच होतं. म्हणजे त्याच्यासारखंच.

सगुणानं झटपट स्वयंपाक आटोपला. एका धोतराच्या पालवात कळण्याच्या दोन भाकरी अन् वाटीभर लालमिरच्याच्या खुळा बांधल्या. श्रीरंगनं गाठोडं उचलून एका वायरच्या थैलीत ठेवलं. एवढ्यात अभिरामही निपटनापट करून आला आणि बाहेरूनच आवाज दिला,

''झालं रेऽ भौ?''

''झालं.''

''मग काहून टाईम लावून राह्यला? सैपाक राह्येल हाये की काय?''

''डबा तयार हाये. पण पैशाचा डबा दिसून नाई राह्यला हिले. दोन मिन्टं थांब.''

''पैशाचा डबा!''

''भाळ्याले पैसे नी पाह्यजे काय? हाऽ सापळला.''

शंभरची नोट खिशात टाकून अन् पायात चप्पल घालत श्रीरंगनं घराच्या बाहेर पाय काढला. जरासा पुढे जात नाही तोच पाठीमागून सगुणानं आवाज दिला.

''अहोऽ एव्हळ्या पायातल्या साकया आनसान काय उजवून? जे घीन ते घीन.''

''ह्या बायकाईचं असंच अस्ते ऐन निग्याच्या टायमाले. कालपासून ठाऊक हाये तुले का मी मलकापूरले जाऊन राह्यलो.'' श्रीरंग राग आल्यागत बोलला.

''ते सगळं खरंहे, पन मले आत्ता आठोन आली नं''

''आन बापा, आण.''

सगुणानं पुढे होत त्याच्या हातात चांदीच्या साखळ्या ठेवल्या अन् त्यानंही त्या पटकन खिशात घातल्या आणि अभिरामकडे पाहून म्हणाला,

''चाल लवकर, नऊची गाडी सापड्याले पाह्यजे आपल्याले.''

झपाझप दोघंही बसस्टँडच्या दिशेने निघाले. जसे ते बसस्टँडवर पोहचले अगदी त्याच टायमाला समोरच्या वळणावरून बसचा हॉर्न ऐकायला आला. बस थांबताच दोघेही बसमध्ये चढले.

''बोला, कोठलं फाडू?'' कंडक्टरनं त्यांना विचारलं.

''दोन मलकापूर फाडा.'' श्रीरंग उत्तरला.

''मलकापूर?''

''हाव. मलकापूर''

''बोर्ड वाचला का गाडी कोठे चालली ते?''

दोघेही एकदम दचकले.

''मलकापूरले नाई जात काय?'' अभिरामनं विचारलं.

''नाही.''

''कुठी चालली मंग गाळी?''

''बुलडाण्याले.''

''अरेऽ बापा बेल मार मंग. थांबव गाडी. आमाले वाटलं मलकापूरले जाते की काय. थांबवा गाडी उतरू द्या आमाले!''

एव्हाना श्रीरंगनं बेल मारलीच होती. बस थांबली. दोघेही भांबावल्यागत खाली उतरले. खाली उतरताच त्यांना जरा शहाण्यासारखं झालं होतं. कारण गाडीतल्या बायामाणसांनी त्याना कसनुशा नजरेनं पाहिलं होतं.

लिहणं-वाचणं असून त्यांना अडाण्यासारखं झालं होतं. त्यांना कंडक्टरनं पुन्हा एकदा न्याहाळून गुराट श्वास घेतला आणि पुन्हा डबल बेल मारली. बस निघाली.

दोघंही हिरमुसल्यासारखे होऊन पुन्हा अर्ध्या कि.मी.वरून पायी पायी बसस्टँडवर आले. पुन्हा कंटाळल्यागत बस यायची वाट पाहायला लागले. बस यायला वेळेपेक्षा अर्धा तास जास्त झाला होता. पण बसचा काही मागमूस दिसेना. दोघेही पुन्हा पुन्हा रोडच्या दिशेने पाहात. थुका गिळत. जेमतेम अर्धा-पाऊण तास त्यांना स्टँडवर बसावं लागलं. झालंऽ एकदाची बस आली. यावेळी मात्र बोर्ड वाचून घेतला. बस मलकापूरलाच जाणारी होती. बस थांबताच त्यांनी आत उड्या घेतल्या. बस निघाली.

अधेमधे अनेक थांबे घेत तासाभरात बस मलकापूरला पोहचली. बसस्टँडपासून मार्केट बऱ्याच अंतरावर होतं. त्यांना वाटलं ॲटो करून जावं; पण दोघांनीही विचार केला की ॲटोच्या भाड्याच्या पैशात तर आपला चहापाणी होतो. जाऊ बोलत बोलत अन् अजून ट्रक पोहचलाही नसेल. मग काय करावं पुढे जाऊन?

शनिवारचा दिवस म्हणजे बाजाराचा दिवस. बाजार नावाजलेला. सकाळपासूनच बाजार भरायला सुरुवात झालेली होती. खेड्यावरून येणाऱ्या लोकांच्या हातात बाजारासाठी थैल्या दिसत होत्या. रस्त्याच्या आजूबाजूला केळवाले, संत्रावाले, सफरचंदवाले मोठमोठ्याने गलका करत होते. येणाऱ्या-जाणाऱ्याला हाका मारत होते. भवतालचं सगळं चित्र न्याहाळत श्रीरंग आणि अभिराम मार्केटच्या रस्त्यानं निघाले होते.

एकदाचं मार्केट आलं. पाहतात तर काय, वाहनांची तोबा गर्दी तिथे! माणसांना खेटून माणसं. नवीनवाल्यांची तर त्रेधातिरपीटच. ट्रक कुठे? माल कुठे? अडत्या कुठे? कुठे येऊन थांबायचं? त्यांना काहीही कळत नव्हतं. नुसतेच इकडून तिकडे चकरा चालल्या होत्या बिचाऱ्यांच्या.

प्रत्येकाचा अडत्या ठरलेला. आपल्याला कोणत्या अडत दुकानावर माल टाकायचा हे ज्याचं त्याचं आधीच ठरलेलं आणि त्याविषयी ट्रकवाल्यालाही आधी सांगून ठेवलेले. त्यामुळे ठरलेल्या अडत्याच्या दुकानासमोर ट्रक बरोबर उभा राहायचा. बाकीचे मात्र वैतागून जायचे. वैतागल्यामुळे त्यांना वाटायचं की आपल्याकडच्या लहानसहान दुकानदारालाच माल विकून मोकळं होऊन जायचं. मार्केट म्हणजे डोक्याचं खोकं करणं होय. दिवसभर माणसं जाम वैतागतात. ना तिथं प्यायला चांगलं पाणी, ना चहा, ना जेवण.

श्रीरंग आणि अभिरामही आपला ट्रक आला की नाही याचा अंदाज घेऊ लागले. याला त्याला विचारू लागले. त्यांना त्यांच्या मालाचा ट्रक कुठेच दिसेना.

''मी म्हनो की आपून टरकाच्या पह्यले पोहचू. तसंच झालं. टरक अजून मागेच हाये.'' श्रीरंग.

''इन तो गावगाव घेत.'' अभिराम.

''बरं झालं आपून त्याच्यात बसून नाई आलो.''

''लयच कंटाळा आला असता. हैरान हून गेलो असतो आपून, अजून कितीक टाईम लागीन काय सांगा?''

''इन अर्ध्या तासात.''

''तदलोग जेवून घेतू काय मंग?''

''काई हरकत नाई. घिवू आटपून एकदाचं जेवन. जेवलं की टेंशन राहत नाई. मंग कितीबी टाईम लागो.''

''घे ते थैली अन् चाल त्या हाटेलकडे.''

दोघेही जेवणासाठी समोरच्या हॉटेलकडे जायला निंघाले अन् एवढ्यात त्यांच्या मालाचा ट्रक आला. त्यांची पावलं माघारी वळली. ट्रक अगदी जलाराम अडत जवळच थांबला. हमाल भराभर माल उतरवू लागले. कोणाची ज्वारी होती तर कोणाचा गहू होता. अजून कोणाच्या तुरी होत्या. बघता बघता जलाराम अडतवर त्यांच्या तुरीची पोती पडायला लागली. दोघे आपल्या पोत्याकडे बारकाव्याने पाहायला लागले. त्याचं कारणही तसंच होतं. मागच्या महिन्यात त्यांच्याच गावच्या चंदू बोबडेच्या गव्हाचं एक पोत वरच्यावर मारलंना हमालानं! म्हणून त्यांच्याही मनात तीच धाकधूक होती. एखादं पोतं जर इकडेतिकडे पाडलं तर बोंबलतच बसावं लागेल. त्यासाठीच त्याचे डोळे ज्योतीसारखे सताड पेटलेले होते. म्हणून त्यातला अभिराम थेट हमालासोबतच येत-जात होता दर पोत्याला. आणि श्रीरंग ठेवलेल्या मालाजवळ उभा होता. त्यामुळे पोतं बेपत्ता व्हायचं कामचं नाही. तसे ते दोघं एकमेकांना सूचना करत असतच.

''बरोबर ध्यान ठेव बरं.''

''तुही बरोबर ध्यान ठेव.''

''माह्य तं पक्क ध्यान हाये.''

''माह्यबी हाये.''

अनुक्रमणिका

"नाई तं राहशीन पुढे उभा अन् उचलीन मागून कोनी पोतं, काई खरं नाई मार्केटचं. लुचाड धंदे हाये सारे. बिचारे शेतकरी अंगातून घाम फुटेस्तोवर काम करता एकाएका दाण्यासाठी अन् आथी जिकडे पहा तिकडे लुटने चालू अस्ते."

"पाह्यनं तो एक माणूस कसा बोंबलून राह्यला. माह्य एक गव्हाचं पोतं गेलं म्हंतो,"

"म्हणून म्हंतो आपल्या मालावर बरोबर ध्यान ठेव."

एकमेकांना सूचना देत देत अखेर त्यांची पोती ट्रकमधून उतरवली गेली. ट्रकवाल्यानं सगळी पोती मोजून उतरवली होती. अगदी अभिरामच्या डोळ्यांदेखत आणि मालाच्या ठिकाणी मोजून पाहिली तर श्रीरंगच्या पोत्यातलं चक्क एक पोतं गायब झालेलं. आता मात्र त्यांनी डोक्याला हात लावला. श्रीरंग अभिरामला म्हणाला,

"हे तं लयच कठीण गोष्ट झाली गड्या."

"हावनं मी तं हरेक पोत्यासोबत व्हतो."

"मीबी कुठी हटलो ?"

"काय फायदा झाला आपून आथी असून! अखेर जे व्हायंच नी तेच झालं."

"असं कसं झालं असीन बरं?"

"टरकवाल्यानं मोजून टाकलं नं बरोबर!"

"मंग."

"कुठी मारला असीन डल्ला?"

"तेच तं समजून नी राह्यल."

"कसा काय संशय घ्याव कोनावर? उगाच संशय घेतला अन् निगालं खोटं, तं तो आपल्याले जोड्यानं मारीन."

"यापेक्षा आपुनं धामणगावलेच तुरी इकल्या असत्या तं हे असं झालं नसतं. जरासा भाव कमी आला असता तं असता. आता कोन्त्या भावात पडलं हे!"

"आपुन दोगं असल्यावर असं काई घडीन कोनाले वाटीन?"

"पन दिवसाढवळ्या ठेवल्या नं हातावर तुरी."

"बरंऽ तकरार करा तं कोनापाशी?"

"तेच तं समस्या हाये. सगळ्यात पह्यले आपल्यावर इस्वास तं ठेवाले पाह्यजे नं लोकाईन. की याह्यची पोती खरंच पयवली म्हणून!"

"मंग आता?"

"आता काय! पश्चात्तापाचे दोन आसू सांड अन् व्हय मोकळा. त्याच्याशिवाय काय हाये आपल्या हातात?"

तसं पाहिलं तर आधीच त्यांच्या डोळ्यांत आसवं दाटून आली होती. इतकंच नाही तर ती नकळत गालावरूनही ओघळली होती. आणि त्यांच्या सांत्वनासाठी तिथं एकमेकांशिवाय कोणीही नव्हतं. अखेर त्यांनीच एकमेकांना सावरलं अन् हर्राशी व्हायची वाट पाहू लागले.

नाही म्हटले तरी आज मार्केट गच्च भरलं होतं. आसपास कोठंही पाय ठेवायला जराशीही जागा उरली नव्हती. ज्यांना माल ठेवायला जागा मिळाली नाही त्यांनी समोरच्या पटांगणात माल टाकला होता. त्यातल्या त्यात तुरीचा माल तर मोठ्या प्रमाणात आला होता. टोलेजंग माल येऊन पडला होता. मार्केटमध्ये सगळ्यांचे डोळे आता हर्राशीकडे लागले होते. केव्हा हर्राशी होते अन् केव्हा आपण मोकळं होतो? जमलेल्यांतून हाच सूर निघत होता. उतावीळ झाले होते हर्राशीसाठी सगळे.

दुपारचा एक वाजला तरीही हर्राशीचा ठावठिकाणा नव्हता. माल जसाचा तसाच पडलेला. अजून किती वेळ मालाची राखण करावी लागेल याचा मागमूस कोणालाच घेता येत नव्हता. हमालही माल पसरवून पसार झाले होते. इतक्यात श्रीरंगला समोरून एक हमाल येताना दिसला. हमालाला पाहून त्याला एकदम हायसं वाटलं. त्याच्याकडे करून पहावी चौकशी, म्हणून तो पुढे धावला आणि त्याला थांबवत म्हणाला,

"कारेऽ भौ. कितीक टाईम हाये अजून हर्रासीले?"

"काहून? कंटायले की काय?"

"नुस्ते कंटायलोच नाई, वैतागवाडी हून राह्यली."

"अजून बराच टाईम हाये."

"तरीबी?"

"तीन-साडेतीन तं नक्कीच वाजतीन."

"तदलोग काय भजन करत बसा मंग?"

"भजन करा नाईतं एकमेकाईले पिटा. मले काय करणं हाय. बाजाराचा दिवस हाये तं उशीर तं लागीनच म्हणा. शेटलोकं कामात अटकून हाय जरा."

"आरेऽ सकाळपासून आमच्या पोटात भाकरीचा घासबी नाई गेला. चहालेबी तोंड नाई लावलं.

अनुक्रमणिका

पाण्याचा एक घोटबी नाई गिळला. आता व्हईन हर्राशी, तव्हा व्हईन हर्राशी, नुस्ते डोये फाडणं हर्रासीसाठी.'' बोलता बोलता श्रीरंगचा चेहरा लालभडक पडला होता. जशी काही पळसाची फुलंचं त्याच्या चेहऱ्यावर रंगली होती अन् हमाल अजूनच त्यावर आग पाखडत होता.

''मले म्हणून काय फायदा हाये. जा नं तेथी तुमच्या बापाजोय. म्हणानं त्याले. आमी हमाल लोकं. जसं आमचं कान टोचलं तसं करतो आमी.''

''पण काई दयामाया हाये का नाई त्याहीले शेतकऱ्याची? त्याहीच्याच तं भरवशावर डेरगे भरून राह्यले. भोसळीचे साले...''

''एऽ गाया शिया द्याचं काम नाई. आमचे मालक हायेत ते.''

''मालक हायेत तं काय झालं रेऽ आमीबीतं मालकाचे मालक हाओत नं.''

''इतकं जर वाटत असीन तं मंग घिऊन जा नं माल घरी परत.''

''आरे, जास्त दमदाटी करून राह्यला काय? कानाखाली काढणं पडतो काय आवाज तुह्या. भादरून राह्यला जास्तीचा!''

श्रीरंगचा वाढलेला आवाज ऐकून अवतीभवतीचे दहा-बारा माणसं जमा झाले त्यांच्याभोवती. काय झालं म्हणून सगळं विचारायला लागले अन् श्रीरंग मोठ्यान्नं बोंबलून त्या घटनेचं स्पष्टीकरण करत होता. त्याच्या बोलण्याचा सूर धरत जमलेल्यांच्याही मनात रागानं उचल खाल्ली. अशी रागाची भट्टी पेटवून काय फायदा? बोलण्या बोलण्यात हमालानं तिथून केव्हा पाय काढला कोणालाच समजलं नाही.

अवघं वातावरण धगधगत्या आगीसारखं तापलं होतं. ज्याच्या त्याच्या बोलण्यात नवा सूर होता. आवेग होता.

''जोड्यानं हानलं पाह्यजे लेकायले.''

''चामळी सोलली पाह्यजे फोकणीच्याईची.''

''शेतकऱ्याईच्या मालाची जराबी कीव नाई भोसळीच्याईले.''

''मस्तावले साले.''

''ढोपरं शेक्याले पाह्यजे लेकाईचे.''

''मी म्हंतो, आपुनच मॅड हाओत.''

''कसं का?''

''एकी नाई नं आपल्यात. नाईतं त्याहीची काय मजल. आपल्या मालाले एवढा टाईम पळू राहू देतीन?''

''कधी व्हईन मंग एकी?''

''देव जाने!''

सगळे हवालदिल होऊन आपापलं मन मोकळं करत होते. मन मोकळ केल्याशिवाय दुसरं काय करू शकणार होते ते.

घड्याळाचा काटा आता चारवर येऊन ठेपला होता. तरीही हर्राशीच्या स्थितीत जराही बदल जाणवत नव्हता. जैसै थे स्थिती होती.

• • •

एका तासानंतर समोरच्या गेटमधून तीस-चाळीस माणसांचा घोळका आत शिरला. तसा लोकांनी मोकळा श्वास घेतला. समोर पांढरे कपडे घातलेले अडतधारी. त्यांच्यामागे हमाल. त्याच्या हातात पोती-दाबण-सुतळी अन् माल भरायला बादल्या. त्यांना पाहिल्यावर मालवाल्यांच्या जीवात जीव आला. सगळे उठून उभे राहिले.

हमालांनी काटा लावला. पूजा केली. चार-पाच लोकांच्या कपाळाला कुंकवाची बोट लावली आणि हर्राशीला सुरुवात केली. श्रीरंग आणि अभिराम हर्राशीसाठी उतावीळ झालेलेच होते. त्यांना वाटायचं लवकर आपल्या मालाची हर्राशी व्हायला पाहिजे. आधीच त्याचं एक पोतं लंपास झालेलं होतं. त्याचं दुःख अजून त्यांच्या काळजाआडं गेलेलं नव्हत. म्हणून त्यांना वाटायचं. दिवसाच झटकन हर्राशी झाली पाहिजे. रात्रीचं काही खरं नसते.

गव्हापासून हर्राशीला सुरुवात झाली. मार्केटमध्ये गहूही बऱ्याच प्रमाणात आलेला होता. भाव ऐकून गव्हवाल्या शेतकऱ्यांचा चेहरा जाम कोमेजला होता. आतून चिड-आवेग भडकत होता. वाटायचं, कशाला आपण आज माल आणला मार्केटला? भावाची घसरण झाल्यामुळं त्यांच्या विचाराचा तोलही ढासळत चालला होता.

गव्हाची हर्राशी संपायला संध्याकाळचे सहा-साडेसहा वाजले. बोली बोलणं, पोती भरणं, दाभण-सुतळीनं टाचणं... यात बराच वेळ गेला होता. जो तो अडत्यापाशी यायचा आणि कनवाळूपणे म्हणायचा.

''जवारी लावा आता.''

''हरबरा लावा.''

''मुंग लावा.''

''मका लावा.''

"तूर लावा."

प्रत्येकाच्या बोलण्यावर अडते नुसते 'हाव हाव' म्हणायचे अन् आपलं काम तसंच चालू ठेवायचे. पण आता काही का असेना त्यांची पावलं तुरीच्या गंजाकडे वळली तसा तूरवाल्यांच्या आनंदाला पारावार उरला नाही. तुरीचाही माल मोठ्या प्रमाणावर आलेला होता. झाली एकदाची तुरीची हर्राशी सुरू. बोलीवर प्रत्येक जण लक्ष ठेवून होता. श्रीरंग आणि अभिरामही त्याला अपवाद नव्हते. भावाचा कानोसा घेणं सुरू होतं. बोली बोलणं चाललेलं होतं.

"चार हजार पाचशे रुपै."

"चार हजार सातशे रुपै."

"पाच हजार रुपै."

"पाच हजार-एऽक. पाच हजार-दोऽन. अन् पाच हजार-तीऽन."

पाच हजार रुपये भाव ऐकून तूर मालकांच्या कानाच्या अक्षरशः चिंधड्या उडाल्या. काल-परवा सात हजारांवर असलेला भाव पाच हजारांवर आला होता. उतरलेला भाव ऐकल्यावर प्रत्येकाचं काळीज चरचरायला लागलं. तसे ओठही पुटपटायला लागले.

"हा तं लयचं मातीमोल भाव झाला."

"लंबे लावणं चालले त्याहीनं आपल्याले."

"त्याहीचा का कोनी बाप हाये?"

"पन ही तं लयचं मनमानी झाली."

"काल-परवा सात हजारावर अन् आता पाच."

"खरंतर सनाच्या आधी मार्केटले माल आनला पाह्यजे होता इकायले."

"त्याहीले काय राबना पळते वावरात."

"कधी त्याहीनं शेतकऱ्याचा घाम पाह्यला?"

"राक्षस लेकाचे."

जो तो आपलं मन हलकं करत होता अन् शेतकऱ्याच्या नरडीचा घोट घेत घेत हर्राशी पुढे पुढे सरकत होती. काहींना पाच हजार तर काहींना एकोणपन्नासशे-साडे एकोणपन्नासशे भाव मिळत होता. कितीही चांगल्या तुरी असल्या तरीही भाव असातसाच. त्यामुळे तूरमालकांच्या चेहऱ्यावर उदासीनता पसरली होती. स्वप्नातही त्यांनी या भावाची कल्पना केली नसावी; पण जे काय घडत होते ते सगळं उघड्या डोळ्यांसमोर घडत होतं.

या पडलेल्या भावानं माल विकायचा नाही म्हटला तर पुन्हा परत घरी न्यायची सोय नव्हती. अडतमध्ये माल ठेवला आणि पुन्हा भावाला घसरण लागली तर काय करावं! इकडे आड तिकडे विहीर अशी अवस्था झाली होती. वेळ भराभर पुढे चालली होती.

रात्रीचे आठ वाजायला आले होते. नव्हे, वाजलेच होते. आणखी दोन जणांच्या तुरीची हर्राशी झाली आणि त्यानंतर हर्राशी बंद करण्यात आल्याचं अडत्यांनी जाहीर करून टाकलं. तोच सगळ्यांची एकच धावाधाव सुरू झाली. जवळपास पंचवीस-तीस जणांचा माल अजून पडून होता. तोच अडत्यांचा म्होरक्या पुढे येत म्हणाला,

"आता रात हून राह्यली. त्यामुळे हर्राशी डायरेक बंद करण्यात आलीहे. ज्याले माल परत घरी न्यायचा असीन त्यांनी घेऊन जावा. ज्याला माल अडतमधी टाक्याचा असीन त्याहीनं टाकावा."

"अन् त्यानंतर कधी व्हईन हर्राशी?" श्रीरंगनं आवंढा गिळत विचारलं.

"डायरेक मंगयवारी. काहून का काल रयवार हाये. परवा सोमवार. अखाजी. अखाजीले मार्केट सालाबादाप्रमाणे बंदच आस्ते."

"करून टाकानं राजेहो हर्राशी."

"काईबी केलं तरीबी जमनार नाई आज. शेठलोकं निघून गेलेहे. अन् आमच्या हाती काय हाये धत्तुरा!"

"मंग काहून उशिरा आल्ते हर्राशीले?"



सुभाष किन्होळकर

जन्म : १५ एप्रिल १९७०

प्रकाशित लेखन 'झळ' आणि 'शिक्षणसेवक कृष्णा डोळसे' या दोन कादंबऱ्या आणि ललित गद्य, बालकविता इत्यादी वाङ्मय प्रसिद्ध.

विशेष : • 'झळ' या कादंबरीसाठी विदर्भ साहित्य संघाचा पु. य. देशपांडे पुरस्कार.

• 'शिक्षणसेवक कृष्णा डोळसे' या कादंबरीसाठी स्व. रावसाहेब वरणगावकर वाङ्मय पुरस्कार इत्यादी

पत्ता : मु + पो. धामणगाव (बढे), ता. मोताळा, जि. बुलडाणा - ४४३१०४

अनुक्रमणिका


"एऽ बोल्याचं नाई अजिबात."

"बोल्याचं नाई! काहून बोल्याचं नाई. आमी काय चोर आहोत काय रेऽ गुंगानं ऐक्याले?"

श्रीरंग तोंडात येईल ते भळभळा बकत होता. त्याच्या आवाजानेही परिसीमा ओलांडली होती. आवेश थांबत नव्हता. त्याच्या प्रत्येक शब्दातून लालबुंद गोळे भकभक बाहेर पडत होते. अभिराम त्याला सावरण्याचा अतोनात प्रयत्न करत होता. पण काहीही केल्या त्याचा काहीच परिणाम होत नव्हता. तसं पाहिलं तर सगळ्याच तुरीवाल्यांच्या डोळ्यांत आगडोंब उभा ठाकला होता. पण तो नुसताच आगडोंब होता थंड ज्वालांचा. आवाज उठवायची कोणाचीही हिंमत होत नव्हती. म्होरक्यानंही काढता पाय घेतला होता. त्याला काढता पाय घेताना पाहून सगळ्यांनी नुसतंच मूग गिळून एकमेकांकडे पाहिलं. आता या मालाचं काय करावं? कुठं न्यावा? कुठं ठेवावा? असे कितीतरी प्रश्न त्यांच्यापुढे उभे ठाकले होते. आणि अडत्यांचा मागमूस घेत श्रीरंग हातवारे करत आपल्या तोंडातून शिव्यांचा भडिमार करतच होता. काहीही केल्या त्याच्या तोंडाची भट्टी आवरता आवरत नव्हती. अशातच अंधाराची गडद छाया भोवताली पसरली आणि त्यामध्ये अख्खं मार्केट सामसूम झालं मयतासारखं...

साभार–पोच

- **एकांतातल्या कविता :** (कवितासंग्रह) : रमेश सावंत, एकता कल्चरल अकादमी प्रकाशन, विरार(पूर्व) मुंबई, २०१६, मूल्य १०० रुपये
- **उन्हाचे घुमट खांद्यावर** (कवितासंग्रह) : अनुजा जोशी, लोकवाङ्गृह, मुंबई, २०१७, मूल्य १६० रुपये
- **सूर गज़लेचे** (कवितासंग्रह), रमेश सावंत, एकता कल्चरल अकादमी प्रकाशन, विरार (पूर्व) मुंबई, २०१६, मूल्य १०० रु.
- **ऐसा चेतला अभंग** (संपादित अभंगसंग्रह) : संपा. किशोर कवठे, सप्तरंग प्रकाशन, राजुरा, जि. चंद्रपूर, २०१७, मूल्य १०० रुपये
- **उजेड मागणारी आसवे** (कवितासंग्रह) : अविनाश पोईनकर, पायगुण प्रकाशन, अमरावती, २०१७, मूल्य ४८ रु.
- **पारवा** (कथासंग्रह) : प्रमोद नामदेवराव बोरसरे, हरिवंश प्रकाशन, चंद्रपूर, २०१७, मूल्य २०० रु.
- **काळजाची स्पंदने** (कवितासंग्रह) : सप्तरंग प्रकाशन, चंद्रपूर, २०१५, मूल्य ८० रु.
- **दाखल खारीज** (कवितासंग्रह) : नरेशकुमार बोरीकर, संवेदना प्रकाशन, खापरखेडा, नागपूर, २०१६, मूल्य १२० रु.
- **मी आनंदी सुखी...** (आत्मचरित्र) : मनोज बोबडे, शिवाई प्रकाशन, यवतमाळ, २०१६, मूल्य ६० रु.
- **व्हीलचेअर** (कवितासंग्रह) : मनोज बोबडे, वत्स-विनायक प्रकाशन, पुणे-नागपूर, (दु.आ.) मूल्य १०० रु.
- **रमाईकार प्रभाकर दुपारे यांची नाट्यसृष्टी,** (समीक्षा) : डॉ. अरुण गजभिये, संकेत प्रकाशन, नागपूर २०१५, मूल्य ६० रु.
- **अष्टांग योग की अष्टांग मार्ग** (वैचारिक) : डॉ. धनराज डाहाट, संकेत प्रकाशन, नागपूर, २०१७, मूल्य ९० रु.
- **डॉ. आंबेडकर आणि काश्मीर समस्या** (वैचारिक) : डॉ. धनराज डाहाट, संकेत प्रकाशन, नागपूर (सु. आ. २०१७) मूल्य ८० रु.
- **साहित्यानुभूती** (समीक्षा लेखसंग्रह) : डॉ. शशिकान्त लोखंडे, लोकवाङ्मय गृह, मुंबई, पुनर्मुद्रण, २०१२, मूल्य ३५० रु.
- **शोध** (समीक्षा लेखसंग्रह) : डॉ. शशिकान्त लोखंडे, लोकवाङ्मय गृह, मुंबई, पुनर्मुद्रण, २०१२, मूल्य २०० रु.
- **नवी जाणीव** (समीक्षा लेखसंग्रह) : डॉ. शशिकान्त लोखंडे, लोकवाङ्मय गृह, मुंबई, पुनर्मुद्रण, २०१२, मूल्य २५० रु.
- **महाकवी वामनदादांच्या कवितेतील भीमपर्व** (समीक्षा) : प्रा. विश्वजीत कांबळे, संकेत प्रकाशन, नागपूर, २०१६, मूल्य ७० रु.



स्वतःच्या निर्मितीप्रक्रियेशी अत्यंत प्रामाणिक राहून जीवनानुभवातील अनेक दृश्य-अदृश्य प्रतिमा सामर्थ्याने प्रकट करणारी गिरीश सपाटे यांची ही कविता समकाळातील एक महत्त्वाची कविता आहे. त्याचे कारण म्हणजे अलीकडच्या काळात आपल्या सर्वांच्याच अनुभवाचे क्षेत्र अपरिहार्यपणे आधुनिकतेशी जोडले गेले आहे. भलेही आपण महानगरात राहात असू अथवा महानगरी परिघाबाहेर. या काळाने आपल्या व्यक्तिगत जीवनात मोठी अस्वस्थता आणि विखंडता निर्माण केली आहे. अशी विखंडता जिने माणसाच्या संवेदनशीलतेवर तीव्र आघात केला आहे. अशा वेळी ही कविता वास्तवाशी अंतर्बाह्य बांधील राहून समाजजीवनातील माणसांच्या आंतरविश्वाचा शोध घेते. बाजारीकरणाने निर्माण केलेल्या विविध पैलूंच्या मनोविकारांचे विश्लेषण करते आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे सामाजिक, सांस्कृतिक आणि राजकीय कोलाहलाने हवालदिल झालेल्या वर्तमानाला शब्दबद्ध करते. सामान्य माणसाचा पेच हा या कवितेच्या केंद्रस्थानी आहे. या माणसाचे विकल, परात्म आणि असहाय होत जाणे कवीला अस्वस्थ करणारे आहे. अशा वेळी केवळ नव्या प्रतिमांचा कलात्म ढाचा तयार करण्याची कोणतीच कारागिरी न करता कवी थेट, सरळ आणि सहज भाषेत व्यक्त होतो. सजग आणि समंजस भान व्यक्त करत कवी मानवी सुख-दुःखांच्या तळाशी जाण्याचा प्रयत्न करतो आणि वाचकाला जाणिवांच्या वेगवेगळ्या प्रदेशांत घेऊन जातो. 'काळोख गडद होत चाललाय' ही निर्मिती म्हणूनच खूप अर्थपूर्ण आहे.

काळोख गडद होत चाललाय

गिरीश नारायणराव सपाटे

प्रथमावृत्ती : २८ मार्च २०१७
मूल्य १०० रुपये

काव्याग्रह प्रकाशन
वाशिम

अनुक्रमणिका



तुरीच्या घुगऱ्या

□ देवेंद्र पुनसे

काशीनाथ बसल्या जागी घामेजून उठला. हुडहुडी भरल्यागत थरथर कापू लागला. गळ्यातही खरखर दाटल्यावानी झाली. डोळ्यांपुढं काहीसं झावरझावर झालं. कनपटी अंगारल्यावानी झाल्या. नाकंही फेंदारून उठलं. काहीशा कापऱ्या हातानं त्यानं कपाळावर डवरून आलेला घाम पुसला अन् घाबराघुबरा झाल्यावानी तो अंगणात पसरवून ठेवलेल्या तुरीच्या राशीवरून भकासले डोळे फिरवू लागला. 'आता ह्येस् माह्य् धन...' तोंडातल्या तोंडात तो पुटपुटू लागला,

कापूस झाला. सोयाबीन झालं. आता तूर उपानली. सोंग नाचोन राह्यले सारे. गोचूड कसं रगत पेते गायीबैलायचं, तसे येऊन जाऊन सारे कास्तकारायचं रगत पेऊन राह्यले. वरडून राह्यले. सोंगं घिऊन भोंगे वाजोन राह्यले. कास्तकारी का मजाक वाटून राह्यली राजेहो तुमाले? आंगातला घाम वाहा लागते, पायाच्या पोटऱ्या फोडा लागते, रगताचं पानी करा लागते, उरावर जिवाचा भार वाहा लागते, तवा कुटं राजा एका संजीची ताव्यावर भाकर शिजते. कास्तकाराची जिन्गानी; फुटक्या मडक्यावानी. एशीची गाडी वागोनाऱ्यायले तुरीची तडकामार 'दालफ्राय' तेवडी ठाऊक. मस्त लागते. मिटक्या मारून खाले वावर थोडीस् तुडवा लागते? पऱ्हाटीच्या-सोयाबीनच्या पेऱ्यामांगं पाचसात तासाआड दोन तासानं पेरा लागते. थे तूर होये. शिरव्या-ईरव्यातून, डवऱ्याडुवऱ्यातून हातावरच्या फोडावानी वाचवा लागते त्याले तूर मन्ते. पान्यापावसाच्या रपाट्यातून राखा लागते, तिच्यावरचा चुड्डा, रोगराई सोसा लागते राज्या, सोताच्या आंगावर माहारोगाच्या खांडकावानी, तवा सन्यानी चार शेंगा धरते तुरीचं झाड! थे सरकारी थुतकाडी शिश्टीम थोडीस् हवोये? इतं कास्तरायची शिश्टीम दम फाकाले लावते. चार शेंगा पाऊसपान्याच्या, चार शेंगा रोगराईच्या, चार शेंगा जंगली जनावरायच्या, चार शेंगा चोरीचपातीच्या खात्याले सोडून मंग कास्तकाराच्या फाट्क्या पोतड्यात पडते थ्या दोन शेंगा! थे होये तूर -त्याले मन्ते तूर!

त्याची तुरीची आठ पोती बाजारात उघडी पडून होती. छातीच्या पिंजऱ्यातून काळीज बाहेर काढून ठेवावं तसा त्याच्या घामानं निथळून पिकवलेला तुरीचा ऐवज उघड्यावरच ढीग मारून पडला होता. आज पाचवा दिवस उलटून सहावा दिवस उजाडला, तरीही तुरीच्या खरेदीवरून उठलेल्या वादाला लगाम बसला नव्हता. शेतकरी कामधाम सोडून शिजत असलेल्या राजकारणाच्या वाफेवरून गाडीच्या इंजिनवानी धावत, तोंडावर आलेल्या पीकपेरणीच्या हंगामाची हेळसांड करीत, वेळेचं धन फुकागरीत झोकत होते. सारा गाव कर्जमाफीचं काहीतरी आंबटगोड फळ चाखायला मिळेल या आशेच्या वाटेवरून वाटचाल करीत होते. कास्तकारीच्या झाडावर निकोप फळ कधीच गाभूळत नाही. त्याच्या घामाचं मोल बाजारात कधी मिळत नाही.

अनुक्रमणिका

धरतीची कृपा होते; माणसाची हाव मारते. देव देते; भेव मारते. आभाळाएवढ्या चिंतेचा भार त्याच्या डोक्यावर होता. घराच्या अंगणात तो पाय पसरून खाली बसला होता. सकाळपासूनच सूर्याचा ताप वाढू लागलेला.

• • •

काल पंचेचाळीस; आज तीही मर्यादा ओलांडू पाहणारा सूर्य आकाशात वर सरकू लागलेला. पाण्याच्या टंचाईमुळे दोन दिवसांपासून सडा न पडल्या-खरडल्या जमिनीवर तुरीचे लाल-पांढरे दाणे चंद्राच्या कोरीवानी मांडून तो हंगामाच्या खर्चाची वजावट डोक्यात खेळवत एकटक तुरीच्या दाण्यांवर डोळे खिळवून बसलेला. घर वाळवंटावानी ओसाड होतं. मुकाट होतं. मोठी पोरगी, सून, पोरगा कुठे गेले त्याला ठाऊक नव्हते. तसंही घरातलं वातावरण चांगलंच तापलं होतं. आपसूक त्याचे डोळे घराच्या वरच्या सपरीवरून सरकले आणि त्याच्या कंठात गहिवर दाटून आला - तू चाल्ली गेली...

तीनजण त्याच्यापुढे उभे ठाकले.

पहिला : काश्या, झाला चाहा?


तो भानावर नसल्यावानी मुका.

दुसरा : तुरीचे दाने?

तो मनाशीच हसला. नजर उचलून दाण्याकडे पाहात राहिला.

तिसरा पोराबारात नाह्मी खेळून राह्यला?

तो डोळ्यांत कसलेसे अचंबित भाव नाचवत मनातच हसला. खाकरला आणि हळूच हात आभाळाकडे उंचावत म्हणाला, ''राम्या, पो-बारा चांगला. सात-बारा जीव धिऊन राह्यला.''



रामराव चेकाळल्यावानी झाला. काशीनाथच्या डोळ्यांत झाकत म्हणाला, ''शेतकऱ्यायले देशाचा पोशिंदा मन्ते, भाशनाईत मार कास्तकारायले हर्बऱ्याच्या झाडावर नेऊन बसवते, अनं...''

''असा कावा करून त्यायच्याच जिंन्गानीचा सात-बारा कोरा करते.'' गळा खाकरत शंकर उसवला.

''अज खुलनार हाये मने बा मारत्या?'' रामराव.

''अज? साहा दिवसानं मन्जे शनवारले उघडन मन्ते मारके'' बापूराव.

''च्या मायच्या मारी, मन्जे आजून एक आठोडा बसा असेस् फाका मारत.'' शंकर.

''हो राज्या, पन तवपावतर फाका मारासाटी आंगात दम तं लागन!'' रामराव.

''थ्येबी खरंस हाये मना! मले वाटलं भौ, ह्ये साल बरं पिकलं, गुदस्तापेक्शा सोयाबीनबी बरं उतरलं नं कापूसबी, नाई मन्जे बऱ्यापैकी झाला. साहासात पोत्यायवर तूरबी उतरली. आता ह्योईन बा पाचपंचीस हजाराचं उरावरचं कर्ज हलकं, असा ईचार केल्ता म्या! पन ह्ये भलत्यास् कडावर चाल्लं!'' बापूरावनं खोकलून दाटलेला कफ पिचकारीवानी जमिनीवर फेकला.

''भलत्यास् नाही बापूराव, मी तं मन्तो का उलट्यास कडावर गंडलून राह्यलं सब्बंन.'' रामराव.

''भलत्यास् कडावर गंडलून राह्यलं याच्यासाठी का अज कोन्च्यास् मालाले भाव नाही भेटून राह्यला? ना कापसाले, ना सोयाबिनले, ना नासुकल्या भेद्रायले? तूर तं भौ, दुरंस् राह्यली! गुदस्ताबी भाय डुब्लो मी कास्तकारीत. होईक आल्यावानी धुळपेर्नी केल्ती - आता करून तं बस्लोस् बस्लो - तिकडं पान्यानं सारं लंब केलं...!''

''शंकऱ्या!'' त्याची री ओढत बापूराव बोल फेकू लागला, ''येक सांगू? कवा कवा आपून भलतेस् बेवकुबावानी काईबी करून बस्तो! मांगचापुडचा ईचार सोडून भलत्यास् आशा लावून बस्तो नं मंगं अशे फस्तो! आजकाल पान्यापावसाच्या अंदाजाले, पंचांगातल्या नक्शत्रायले फत्राचा मिनिंग नाही राह्यला. हवामान खातं तं टीवीतलं लाप्टर चॅलेंज झालं! या धा वर्षात भाय बदल्लं? कास्तकारीपासून तं शिक्शनापावतर - सारंस् बदल्लं...''

''कास्तकारी तं आपल्या नशिबालेस् लागली - तिकडं येज्युकेशन तं नाह्मी राह्यलं भौ आपल्या हातात! पोट्टे हुशार निंग्ले अस्ते तं धक्ली अस्ती गाडी मोहरं. अरे हो, बापूराव, तुह्या मोठा अशोक लागला मन्ते

नौकरीवर?'' रामराव.

''हो लागला ना. लागला. चांगला जाब भेटला त्याले. पुन्याले टीसीएस कंपनीत लागला अनं त्याले पॅकेटबी चांगलं भेटलं.''

''तरी कितीक?'' रामरावची उत्सुकता रबरावानी ताणली गेली.

''साहा लाखाचं हाये पॅकेट त्याले.''

''मंग आजून का पाह्यजे भौ? एक वर्ष जाऊ दे नं बसंव भौल्यावर लेकाले.'' शंकर.

''थ्याची मर्जी!''

''मर्जी तं देवाची हाये भौ तुह्यावर. दोन पोरीबी चांगल्या घरी पडल्या, पोराले‌बी नौकरी लागली - आजून का पाह्यजे?'' रामराव कन्नावला.

'कुरपा हाये भौ, थ्या गजानन महाराजाची कुरपा हाये आपल्यावर.'' बापुरावनं आभाळाकडे पाहात हात जोडले.

''पाह्यं शंकर भौ, मैनतका फल यैसा रैता मिठा! मैनत है. कोन सांगन आपल्या पोट्ट्यायले? मस्तं नाचून राह्यले राजकारनाच्या तालावर,'' रामराव.

''करू दे त्यायच्या मनानं. आजकाल ढुंगन धुवाची चौव नसनारेय् राजकारन करून राह्यले!'' शंकर.

''थे राजकारन जाओ कोन्चाय् चुलीत!'' रामराव शंकरची री ओढत बोलला. ''त्यायचं थे जाने! आपले पाहा ना बे, कसे आपून ईकूनतिकून बेंडल्यावानी झालोतं? भाय वोर्डत व्होतो - तूर व्होत नाई - तूर व्होत नाई - आनं आता, उलीसक पल्लं हातात जास्तीचं तं तितसाबी बोंबस् बोंब? तिकडं पिकवन्याची बोंब नं ईकडं ईकन्याची बोंब. भोसडीची सारी बोंबस बोंब. म्या तं पंद्रा पोत्यायतून दोन पोते इकले राजा, पस्तुरीच्या भावात. इकनंस् भाग पल्लं. आता तूस् सांग, बापूराव, भईन असा परसंग आल्ता आंगावर का - बेज्जा जाम झाल्तो मी. काई बी झालं तरी आला परसंग वाघावानी झेलास् लागते मानसाले. टाईम कोनासाटी कुटं थांबते? सोयाबीन गेलं उसनवारीत नं कपड्यालत्यात, कापूस खल्लास कर्जात नं दवाईपान्यात, आनं आता ईकडं मिरूग करून राह्यला ढुरुक ढुरुक नं सालाचा ऊभ्भा खर्च बेज्जा तसास् - कस्संस् व्होईन राजा? इकडं तुरीचं कायी सरकता सरकून नायी राह्यलं? मंग काय कर्ते, इकून टाकले दोन पोते तिनच्या भावानं. काऊन का इमरजन्सीस् तशी आल्ती! छाताडात भाय कप झाल्ता मने डाग्टर. थे राज्या, सौंग्रापीत -का -का -भलतंस् व्होये बा थे - फुर्र उल्ले साडेसात त्याच्यातंस्...''

काशीनाथ भानावर नसल्यावानी तुरीच्या दाण्यांवर नजर खिळवून बसला होता. कुठूनतरी दूरवरून टिटवीचा टिट्टर्र घुमला. लागोपाठ बाजूच्या सांदीतून कुत्र्याची हेल उठली. पुन्हा उठली. थांबली.

''अज्चा दिवस काह्यी चांगला दिसत नाही भौ! वज्जर हेंगाडल्यावानी वरडलं कुत्रबी!'' शंकरनं सांदीच्या दिशेनं नजर फेकली. बापूरावनं पुन्हा खाकरून छातीतला कफ खाली पिचकारला आणि रामराव वाळू घातलेल्या तुरीच्या डिगाऱ्यावरून नजर फिरवीत म्हणाला, ''दोनेक पोते असंन ह्ये तूर, नाह्यी?''

काशीनाथ काही बोलला नाही.

''दोन्च्या उपर तं नाह्यी मना,'' बापूराव बोलला. ''पसरलेला मालंस् सांगते.''

''माह्यावाला तं दाहा पोते माल हाये तसास् मार्कीटमंदी. अन् थेय् काटा केल्याबिगर.'' रामराव.

''हमीभाव देतो मन्ते सरकार! कितीक व्होईन गा काशीनाथ भौ?'' बापूरावनं विचारलं.

काशीनाथ काहीच बोलला नाही.

''हून हून कितीक व्होईन? पाचेक हजार?''

''शंकर, तुले माहीत नाही! कालस् तं पेप्रात 'साडेपाच हजार भाव डिक्लेर झाल्ता!'' रामराव.

''मंग काय भारी मंतर मार्ला सरकारनं? चार-साडेचार तं ब्यापारीस् देत व्होते, जराशी ठेव्ली अस्ती तूर तं?''

''बापूराव, तूर अशी ठेपून ठेवाले लय् पयसा आला का बे तुह्याजोय्? ह्ये अशे आपून भाव मांगून राह्यलो मून तं लोकायच्या शिवा खाऊन राह्यलो कानी?'' रामरावच्या डोळ्यांत अंगार फुलल्यावानी झाला.

''शंकर, तुह्यं कारेक्ट हाये.'' बापूराव बोलला.

''आप्ल्या कोरडवाहीच्या पट्ट्यात कापूस नं तूर ह्येस दोन पिकं आपलं पोट जगौनारे. ह्येस् आपल्या धनाचं गाठूडं. आनं त्यालेय भाव नाही मिळत? भाव मिळाला अस्ता तं, भोस्सडीचं कायले असं कुतऱ्यावानी वनवन भटक्लो अस्तो. आपलास् माल आपनंस असा मातीमोल इकाले? मी सांगतो-मांगच्या सोम्मारी मी थ्या रमश्यासंग नाक्पूरवून येतानी बुट्टीबोरीच्या एका धाब्यावर जेवलो. 'दालफ्राय' खिलवली. च्या मायभईन मी तं जाग्चा गलंडलोस् जाग्यावर 'दालफ्राय'चा रेट पाऊन! उलीशी बे उलीशी - ह्ये आपून जेवतो कानी

मोठ्या वाट्यायमंदी - थ्या वाटीच्या डब्बल असंन वज्जरस् झालं तं - आन् त्याचा रेट भौ सादी 'दालफ्राय' काय तं एक्शेवीस रुप्ये पिल्लेट् नं 'तडका दालफ्राय' एक्शेचाळीस रुप्ये? आता मले सांगा, हाटेलात छटाकभर तुरीची दाळ शिजून एक्शेवीस नं एक्शे-चाळीस रुप्याची व्होते आनं आपून तुरीची दाळ करून इकाले बस्लो तं ची भईन साटसत्तर रुप्यालेय् कोनी इचारत नाह्मी? भौ, असा हिसोब काल्ला ना तं कास्तकाराची नुस्ती दाळ काई नाही जास्त तरी दोन हजार रुप्ये किलोनं खपाले पाह्यजेल. आपुन राज्या, शंबर किलोचं पोतं भिकारचोटावानी पाच हजाराले इकून राह्यलो अनं थे बी सरकारच्या शिवा खाऊन, दुनियाभराचे धंगडे झेलून...'' शंकर बोलता बोलता धापिजला.

''अरामानं - अरामानं -'' बापूराव शंकरच्या पाठीवर हात फेरीत बोलला, ''दमान घे. एक्दम टेंशन घिऊन नोको दम लागेपावतर बोलू. तुह्यं सब्बंन रायीट हाये, पन आपल्या नशिबात फत्तरंस् लिह्यले हाये!''

काशीनाथ मात्र मुकाच.

''भौ, तुमी काईस् बोलून नाई रायले?'' बापूरावनं प्रश्न फेकला. शंकरनं तो उचलून धरला.

''आपुनबी किती म्याड बे, आल्तो कायच्या बारी नं...'' रामरावची खोक् खोक् पुन्हा उसळली.

''कितीय् मन्लं तरी नस्ते इसरत मानूस येवड्या लौकर.'' शंकर.

''जिजी गेली पन भाय सोस्ली बा बेमारी तिनं'' बापूराव.

''क्यांसर असास् अस्ते. भाय भोकांत्ते मानसाले?'' रामराव.

काशीनाथ हलकासा हसल्यावानी झाला.

''भौ, माह्या मतापरमानं परकाशनं ह्ये लय उब्बार केलं!'' बापूराव.

''आपल्यापरीस बेज्जा भोगलं दाहाजीनं. सत्तरीवून पार असूनई लंय डेरिंगबाज.'' - शंकरनं डोळ्यांवरचा जाड भिंगाचा चष्मा सावरत तान मारली.

''डेरिंगबाज तं हायेस् मना भौ. - याच्यात वाद नाह्मी!'' बापूराव.

''तेर्वी करायलेस् पाह्यजेन् व्होती.'' रामराव.

''व्हो कराले पाह्यजेन् व्होती ह्ये बराबर हाये पन थो निरनेय् परकाशचा व्होता? त्याच्यात दाहाजीचं काय चुक्लं?'' शंकर.

काशीनाथनं आता कुठं डोळे उंचावले.

''पन, आता दुखातून भाईर या लागंन काश्या तुले. आमचं असं शानपन सांगनं बराबर नाही. तरी तू लय जिगरीचा, लय हिंमतबाज! पन असा नोको बसू. झालं थे झालं. मर्नावर कोनाचास् जोर नाह्मी चालत. आजउद्या मस्नाची वाट हाये. थे नस्ते चुकत कोनाले. भाईर ये. आमी त्याच्या बारीस आल्तो तुह्याकडं. काय अस्ते का चार लोकं भेटले, बोल्ले, तं मानसाचं दुख हलकं व्होते. आता तू माह्यापेक्शा दोनेक वर्सानं मोठा, पन माह्या हक हाये तुले सांगन्याचा.'' रामराव दिलखुलास बोलला.

काशीनाथनं आता कुठं तोंड उघडलं.

''रामराव, ह्ये पाह्यं! माह्याफुडं मांडून ठेव्ले म्या तुरीचे पंचात्तर दाने. अज मी पंचात्तर वर्शाचा झालो. आजून कितीक दाने लिवून ठेव्ले देवानं माह्या नशिबात मले नाह्मी ठाऊक! आता याच्यातून दाहा दाने काडून ठेवतो. ऊर्ले पासट. काऊन? कारन अक्राव्या वर्शापासून- मले समजाले लागलं तवापासून माह्यं खरं जीवन सुरू झालं. शिक्लो नाह्मी, थो जमानास् तसा व्होता. बाप, माय, लायना भाऊ, चार बयनी. बायको, पोर्ग आनं चार पोरी - तेरा. पासटातून तेरा वजा कर. उर्ले बावन. ह्ये बावन वर्श माह्ये. येवडे वर्श जग्लो, पन असं वर्श नाह्मी पाह्यलं! बापुजीनं 'चले जाव'ची घोष्ना केल्ती थे माह्या जनमाचं साल. बेचाळीस. तवापासून खूब पाह्यलं, खूब सोस्लं. पन...'' काशीनाथ एकाएकी अडखळला आणि जराशी उसंत घेऊन म्हणाला, ''आता तं तुरीच्या घुगन्या बी नशिबी नाह्मी.'' त्याचे डोळे पुन्हा घराच्या वरच्या सपरीवरला फेरफटका मारून आले.


तोच वावटळीच्या झोक्यावानी प्रकाश बायको-पोरांसह धडकला आणि जादूची कांडी फिरावी तसं काही घडायच्या आतच रामराव, बापूराव, शंकर, सारेजण चोरावानी तिथून निसटले. काशीनाथही उठला.

काशीनाथ वावराच्या वाटेवर.

उपाशी. अंगात कनकन. उजव्या पायाच्या पोटरीवर जखम. हळदीच्या लेपानं बांधलेली. डोक्यात चिंतेचा सागर. डोळ्यांत आजचा पंधरावा दिवस पार करणारा बुढीच्या मरणाचा प्रसंग. पायात टाचेखाली 'आ'वासलेल्या चपला आणि त्याची जडावलेली, मंदावलेली पावलं तनगडल्यावानी उठताहेत वावराच्या

अनुक्रमणिका

दिशेनं. इनमिन पंधरावा दिवस बुढीच्या मरणाचा. आतून दुःखानं पोखरून निघालेला तो बुढीच्या मरणानं मात्र पुरता हादरून खचल्यावानी झाला होता. आटोकाट प्रयत्न करूनही बुढीची बिमारी आटोक्यात आली नव्हती. तीन वर्षांचा प्रयत्न निष्फळ ठरला होता आणि पहिल्यांदाच क्यांसरची बिमारी कशी यातनामय असते याचा अनुभव त्याला आला होता. पोखरलेलं त्याचं काळीज धडधडत होतं... मले परकाशची कायजी - मोठं सुद्दं पोर्गं - बायकोनं बिगडवलं - आयकत नाई कोनाले - मनात आलं - थेस् कर्ते- करू द्या - आवड - त्याची आवड - हाये - लिडर व्होतो मन्ते -तुमाले नायी पटत - ठाऊक हाये मले - करू देना त्याले - हुरूप एकेकाचा - दिस्ते बी थो - एकांद्या लिडरवानी - मनापरमानं केलं तं - त्याले टोकू नोका - नोका अडवू त्याले - परकाश -परकाश.... थो मन्ते वावर माह्या नावी करा - घरदार मह्या नावी करा - रट लाऊन बस्ला - ठाऊक हाये मले - ह्ये थो नाह्यी मांगून राह्यला - थ्याची बायको मांगून राह्यली - तरी मी का मन्तो - का देऊन टाका ना थ्याले सारं - नाईतरी एकुलतं एक पोर्गं - थ्यालेस् द्या लाग्ते कानी अज नं उद्या सारं...



बुढीच्या शेवटल्या शब्दानं मात्र काशीनाथला मायच्या ममतेची महती पटवून दिली होती. आळशी, बिनकामी एकुलतं पोर्गं. मोठ्या मुलीच्या पाठीवर आलेलं. त्याच्याखाली तीन पोरी. साऱ्या आपापल्या घरी. मोठ्या मुलीच्या नवऱ्यानं तिला सोडलं. सहा वर्षे उलटली. वांझोटी म्हणून खूप छळ उपसला. जावयानं घरातून हाकलून लावलं. आता तिचंही पोषण काशीनाथवरच. सून पोरावानीच दिखाऊ, उधळ्या स्वभावाची. तिच्याच नट्ट्याबट्ट्यातून तिला वेळ मिळत नाही. वर दोन मुलं शहरातल्या कॉनवेंटमधे शिकणारी. आणि हे सर्व सात एकराच्या तुकड्यावर. घागरीत पाण्याचे थेंब चार; पिणाऱ्या सात पोटांचा खर्चिक भार. सारखी चिंता, सारखी पिळवट. 'शकुनी गेली पन पोरानं तेर्वी नाह्यी व्होऊ देल्ली' - तो सारखा गुन्हेगारावानी काळजीत. हेकट स्वभावाचं पोरगं. मिणत्या करून काही फायदा नव्हता. लिडरकी करत, उगीचा दिमाख अंगावर पांघरून चार पैसे कमावणं तर दूरच, उलट चार पैसे बापालाच टोचण्या देऊन खिशात पाडून घ्यायचे आणि गावोगाव फिरायचे, हाच नित्यक्रम. तरीही माय सांगून गेली - परकाश -लय सुद्दं पोरगं... तो विचारानी काठोकाठ हेलकावत होता.

काही नाही करा लागत तेरवी-फेरवी. ट्रॅडिशनल धंदे सारे! मरणारा मरतो. अनं आपण त्याच्या नावानं तेरव्या करून लोकांच्या पत्रावळी सजवतो. गोडधोड करतो, जेवण देतो. गोडधोड खाऊन. लोक ढेकर देतात. खाऊन-पिऊन घराची वाट धरतात आणि आपण- मूर्खावानी दुसऱ्या दिवशी पुन्हा गोड जेवणाची ताटं सजवतो. आपलाच जीव; आपलंच दुःख. थोतांड आहे सारं - निव्वळ थोतांड!

पोरानं लिडरवानी भाषण झोडलं आणि तो मन मारून घुसमटत बसला. पण त्याचं मन आतून चरफडत राहिलं. पोराचे शब्द त्याला चैन पडू देत नव्हते. शेणावरल्या शेणभुंग्यावानी सारखे मेंदूवर घूं घूं घाव घालत होते. बेचैन, अस्वस्थ करून सोडत होते. हातून फार मोठं पाप घडल्यावानी त्याला सारखं टोचत होतं. - शकूने, तेर्वी नाई केली तुह्यी - आत्मा भट्कत राह्यीनं तुहा - शांती कशी मिळंन - दसवा केला - तेर्वी कराले का झाल्तं? - एवडं मर मर मर्तो- रग्ताचं पानी कर्तो- घान्याच्या बैलावानी पायाले भिंग्री लाऊन फिर्तो- घरातली सारी कमाई माह्या पायी - साऱ्या गावात माह्या वयाचा कोनी कास्तकार नाह्यी - कोनी माह्यावानी काम उप्सत नाह्यी - मी मातर राबतो - केवडी सात देल्ली तुनं मले - पाटीमांगचं लोडनं हून कस्टं उपस्ले तुनं माह्यासंगं - आनं आता तुह्यास् तेर्वीसाटी चार पैशासाटी अल्लो.

त्याची भारावलेली चालती पावलं तनगडली. ठोकरली. उजव्या पायाची जखमावली पोटरी भन्नाटली

आणि तो वेदनांनी बहरून आला. अलबत त्याच्या डोळ्यांत आसवं डबडबली. पुढची वाट अंधूक झाली. पावलं थांबली. डोकं भणभणून उठलं. तो त्याही स्थितीत मोठ्या ताठ्यानं पन्नासेक पावलं पुढे चालला आणि महादेव कोतवालाच्या धुऱ्यावरल्या कडूनिंबाच्या झाडाखाली मटकन् खाली बसला. पाय तन्नवला तशी पोटरीतून भयानक कळ उठली. मोठ्या दिलानं तो त्या वेदना साहत राहिला. पण जखमेतून उठणाऱ्या त्या निलाजऱ्या वेदना त्याच्या मेंदूलाच थेट आव्हान देऊ लागल्या. पण, तो अशा वेदनांना शरण जाणारा हतबल प्रवासी नव्हता. इथे थांबणाऱ्या प्रवाशासाठी कोणी थांबत नसतो. काळासोबत न चालणाऱ्या माणसाला काळापुढे हार पत्करावी लागते. हे चांगलं ठाऊक असलेला, कष्टाला कधीही पारखा न झालेला, भन्नाट हिंमत अंगी असलेला, चार बैलांच्या ताकदीनं कष्ट उपसणारा आणि तरीही कोणत्याही परिस्थितीत हार न मानलेला तो पंचाहत्तर वर्षांचा राकट देह होता.

काळाची काही निसटती पावलं पुढं सरकली. तो दम खाऊन ताजा झाला आणि पुन्हा वावराच्या वाटेवर पावलं उचलू लागला. आता त्याच्या डोक्यातून बायको मागे पडली. बाजारात विक्रीसाठी काटा न होताच उघड्यावर पडलेला दहा पोती तुरीचा ढीग त्याच्या डोळ्यांत नाचू लागला. काबाडकष्ट उपसून पिकवलेलं ते सोनंच कास्तकाराचं खरं लेणं! अंगावरच्या पिवळ्या सोन्याचीही सर त्याला येणार नाही. आभाळाएवढे विचार पेलत तो चालत राहिला...

तो वावरात. धुऱ्यावरल्या आंब्याच्या बुंध्याभोवताल वाढलेल्या काटेरी झुड्पात लपवून ठेवलेली कुऱ्हाड काढून त्यानं डोळ्यापुढं धरली. ...तुय् पाजवाले आली - असं काहीसं तोंडातल्या तोंडात बरळला. विचित्रसा हसला. कसून शेला डोक्याला गुंडाळला. भणभणणाऱ्या उन्हात तो वावराच्या दक्षिण टोकावरल्या भागात मनसोक्त वाढलेल्या काटेरी बाभळींच्या झुड्पांवर कुऱ्हाडीचे घाव घालू लागला. वावर नांगरणी, वखरणीसाठी आसुसलेलं. पैशाची नड. पावसाळा पुढ्यात उभा. ट्रॅक्टरचे भाव भारी. तुरीच्या चुकाऱ्यावर उभा हंगाम आणि कुटुंबाची गुजराण. भारच भार आणि आयुष्याचे पंचाहत्तर उन्हाळे सोसलेला तो देह राबतोय्...

राबून, थकून तो आंब्याच्या झाडाखाली आला. उपाशी पोट गडगडून उठलं. गडव्यातलं तापलेलं पाणी पिण्यासाठी त्यानं गडवा तोंडाला लावला तशी त्याला भोवळ आली. सारं वावर डोळ्यांभोवती गरगर फिरू लागलं आणि काही कळण्याच्या आत तो धाडकन खाबटल्या जमिनीवर कोसळला. ... पांढरं - पांढरं - पांढरं - पिवळं - पिवळं - पिवळं - सोनेरी - लख्खं - लख्खं - सोनेरी देह - लख्खं प्रकाश- तेजोमय आभा - तो देह - पुढ्यात उभा - काशीनाथ - थकला - एवढ्यातच थकला - बाणीचा माणूस - जिगरीचा माणूस - कष्टाळू माणूस - थकला - ऊठ काशीनाथ - काश्या - ऊठ - हे पहा - मनुष्य जन्म - असाच - ऊठ - हे पहा - या माझ्या - ओंजळीत तीन फुले आहेत - सारख्या आकाराची तीन रंगांची एक उचल - हो पुढे - तो पाहतो - तीन फुले - पांढरा - काळा - हिरवा - तो वेडावतो गोंधळतो आसुसतो - हिरव्या रंगाचं फूल थरथरत्या हातांनी उचलतो - लोखंडावानी - टणक - वजनदार फूल - फूल एवढं जड - तो कसंबसं डोळ्यापुढे धरतो - तो - तेजोमय देह - हसतो - हळूहळू - फूल फुलतं - फुलाचं रूपांतर - एका शब्दात होतं - कष्ट - काश्या - वाच हा शब्द - कष्ट - यालाच नशीब - असं नाव - हेच तुझं नशीब... कर कष्ट...

तो जागला. समोर माला, मोठी पोरगी त्याच्या पायाशी बसलेली.

''दादा, कावून उस्नावले एवढे?''

तो आता पुरता भानावर आला.

''झोपंस् लागली.''

''पोटात भूक. थकले. लागली झोप. भाकर खाऊन घ्या.''

''भूक नाह्यी.''

''उपाशी राहून का करता?''

तो मात्र दिवसाढवळ्या पडलेल्या स्वप्नाच्या गुंतावळ्यात अडला होता. 'दादा, थकले तुम्ही', मालानं बापाच्या घामानं निथळल्या चेहऱ्याकडे पाहात काळजी झोकली. तो गळल्या अंगानं जागेवरच सरकला. स्वप्नातल्या तेजोमय आकृतीचा काहीसा अंदाज घेऊ लागला. कोरड पडल्या गळ्यातून त्याने पाणी पोटात रिचवलं. घाम पुसला. डोळे साफ केले. जाग्यावरच कलंडावंसं वाटत होतं. माला त्याच्या थकल्या अंगावर नजर रोखीत म्हणाली,

''जेवून घ्या.''

''का कोन जाने भूक नाह्यी मले अज!''

''दादा, एवढी काळजी कायले करता आईची?

अनुक्रमणिका

गेली ते चांगलं झालं ना जास्त हाल होन्यापेक्षा!''

''गेली थे, सुखानं गेली. थे चिंतेच्या पल्याड गेली. आता चिंता सान्यायच्या पोटाची. हंगामाची. कष्ट नं चिंता ह्येस् माह्यं जगनं. मंग हिंमत हारून कसं चालंन, पोरी? कष्टाले भेऊन ह्यो काशीनाथ बस्ला नाह्यी. उलट कष्टालेस् माह्यी लाज वाट्टे? टेंशन हाये बजारातल्या तुरीचं का व्होईन! तशीस् पल्ली हाये बेवारसी!''

''सान्यायचीच आहे. तुमी नोको काळजी करू!''

''सारा तमाशा आता थ्या थातूर-मातूर तुरीवरंस् हाये!''

''हो.''

''माले, तुहा देवावर ईश्वास हाये मनून ईचारतो. मलेस् देव कावून असा सतावत असंन? एकबी काम धड व्होत नाह्यी मावालं एक झालं तं दुसरं तयारंस् राह्यते माह्या म्होवरं लोकं सारं करून चुक्ते तरी सुखातंस् राह्यते. माह्या मांगं सुरूस् राह्यते...'' दूरवर पाहात तो खचल्या स्वरात बोलला. मालाही हेलावली, पण ती तरी आज स्वतःच्या आवाक्यात कुठे होती? घरी भावानं ओढलेल्या जहरी बोलानं तीही आतून खोलवर तुटली होती. ''जा, घरातून. फुकट उरावर बसली आमच्या. धड जगू तरी दे आम्हाले. अशी कशी सोडली नवऱ्यानं? त्याचा काह्यी दोष नाही. दोष तुझा आहे. तुलेच नांदता नाही आलं -वांझोटी...'' माला भावाच्या बोलानं छिन्न भिन्न झाली होती. तिलाच तिचं काही सुचत नव्हतं. पोरीला अशी एकदम मुकाट झालेली पाहून तो शंकावला. हाडाच्या खोबणीत दडलेले मिचमिचे डोळे वटारून पोरीच्या चेहऱ्यावरचे भाव वेचत म्हणाला, ''माले, तू आशाचं लान पोरगं दत्तक घे. जीव लागंन तुहा.''

बापाच्या शब्दातून कैवार घुमला तशी माला विचित्रशी हसली. घरातली मोठी पोरगी आज पंचाहत्तरी उलटेल्या बापाच्या घामानं कमावलेल्या अन्नावर जगते. नवरा सोडून सहा वर्षांपासून बापाच्या अंगावर भार होऊन राहते. साऱ्या गावात बापाची मान शरमेनं खाली झुकविते. ''माला, तुझी तुलाच कशी लाज वाटत नाही?'' तिचा आता मनातल्या मनात काहीतरी निर्धार ठरला. ती बापाला म्हणाली, ''दादा, माही नका एवढी चिंता करू खूप सोसलं तुम्ही. हिंमत ठेवा.'' तो त्यावर हसला.

''माले, तुरीच्या चुकाऱ्यावर पह्यले तुह्यासाटी साडी आन्तो.'' पोरीच्या अंगावरची पदरावर फाटलेली साडी त्याच्या डोळ्याला काट्यावानी सलली. माला उगीच साडीच्या पदराला लपवू लागली.

''जेवून घ्या.''

त्यानं पोरीच्या आग्रहाखातर दोन घास नाइलाजानं पोटात ढकलले. पोरगी बापाच्या कष्टानं झिजलेल्या अंगाकडे पाहून काळजावली. त्याचा उभारीचा निर्धार. तिचा ग्रसित निर्धार.

त्याला पुढची चिंता; तिला मागची.

''दादा, आता पावसाळा सुरू व्होईन, नाही?''

''हो. व्होऊ दे. थो कायले कोनासाटी थांबन? मी सारं बरोबर कर्तो. तेवडी जिगर हाये माह्यात. जानारे जाते जीव देऊन. मले नाह्यी पटत. चिंता मले तुह्यी वाट्टे'' तो बोलत होता पण माला मात्र भलकशा धुंदीच्या लोंढ्यानं वाहात होती.

''काळे ढग, मस्त पाऊस... अनं चमचम विजा... चमचम विजा?'' ती कसनुशी हसली.

''कावून अशी बोलून राह्यली?'' तो हेलकावला.

''तो पाहा, पाऊस उठला...'' ती आभाळाकडे पाहात बोलली.

त्यानं पाहिलं. पूर्वेकडे दूरवर काळ्या ढगांचं सैन्य अवकाली आक्रमणासाठी सज्ज होत होतं. तो चिंतावला, ''माले, तूर पडून हाये वं मारकेट्मंदी - काट्याबिगर -उघड्यावर. वोली झाली तं?''


माला मात्र भान हरपून सारखी काळ्या आकाशाच्या दिशेनं पाहात होती.

काळ पुढे सरकला.

अकस्मात काळ्या ढगाचं सैन्य आभाळभर पसरू लागलं. विजांचा चमचमाट उठू लागला. कडकडाट दाटू लागला. वाऱ्याचे झोत वाहू लागले. काश्या, उभ्भा मेला आता तू - उभ्भा मेला - बजारात तूर पडून हायेरे देवा! आता तं घुगऱ्यास् व्होते त्याच्या. - तो विव्हळला. क्षणात सारं बदललं. सारं आभाळ काळंकुट्ट झालं. विजांचे झोत जवळ येऊ लागले. ढगांचे आवाज घण घातल्यावानी कानावर आदळू लागले. टपोर, टपोर, टपोर थेंब जमिनीवर उतरू लागले आणि वारं भन्नाट आडवंतिडवं वाहू लागलं. 'तूर. तूर पडून हाये-' काशीनाथ जागच्या जागी तळमळला. माला वेडावल्यावानी वाऱ्याच्या झोतावर नाचू लागली.

पाऊस भन्नाट उतरू लागला. विजा जमिनीशी लगट घालू लागल्या. ढगांचा डिजे कानठळ्या ठोकू

लागला आणि वारा उग्र रूप धारण करून आडवा-तिडवा वाहू लागला. धुळीचे लोट उठू लागले आणि क्षणार्धात पावसानं भयानक उग्र रूप धारण केलं. वारा एवढा दाटला की समोरचं काहीच दिसेनासं झालं. काशीनाथ थरथरून उठला. पोरीला म्हणाला, ''माले, अवं इक्डे ये, पोरी. धर, माहा हात धर...'' एक वीज लख्खं लख्खं झेपावली आणि पाठोपाठ कानशिलं फोडणारा आवाज साऱ्या शिवारात घुमला आणि डोळ्याचं पातं लवतं न लवतं तोच माला वेडावून विजेच्या लखलखाटाच्या दिशेनं बेधुंद धावत सुटली. त्याच्या मिचमिच्या डोळ्यांनी एवढ्या तुफानी झंजावातातही पोरीच्या धावत सुटल्या देहाला हेरलं आणि तो अंगातलं सारं बळ एकवटून पोरीच्या मागं धावला. पायाच्या जखमावल्या पोटरीनं दगा केला आणि खालच्या मोठ्या दगडाला ठेचाळून तो नेमका तुरीच्या फूटभर उंचीच्या फणाशेजारी धाडकन खाली कोसळला...



डॉ. देवेंद्र पुनसे

जन्म : १९ ऑगस्ट १९५५

प्रकाशित लेखन : 'पांढरं सोनं' आणि 'पोळा आणि बाहुली' हे दोन कथासंग्रह आणि 'चंद्र आहे साक्षीला' हा कथानुवाद प्रकाशित तसेच 'Burning Pyre' ही इंग्रजी कादंबरी प्रसिद्ध.

विशेष : • 'पोळा आणि बाहुली' या कथासंग्रहाला महाराष्ट्र शासनाचा बी. रघुनाथ पुरस्कार. • 'पांढरं सोनं' या कथासंग्रहासाठी महाराष्ट्र साहित्य परिषदेचा ग.ल. ठोकळ पुरस्कार. • नारायण सुर्वे स्मृति कथासंग्रह पुरस्कार. विदर्भ साहित्य संघाचा कथा पुरस्कार.

पत्ता : १०, राजर्षि शाहूनगर, यवतमाळ - ४४५००१

लेखकांसाठी सूचना

- साहित्य कागदाच्या एकाच बाजूने व सुवाच्य अक्षरांत लिहिलेले किंवा संगणकीय अक्षरजुळणीच्या स्वरूपात पाठवावे.
- लेखकांनी 'युगवाणी'साठी लेखन पाठविताना एक स्थळप्रत आपल्याजवळ राखून ठेवावी.
- 'युगवाणी'साठीचे लेखन इतरत्र प्रकाशित झालेले नसावे. लेखनाची छायाप्रत (Xerox) पाठवू नये.
- पत्रव्यवहारासाठी पुरेसे टपाल जोडावे. भ्रमणध्वनी क्रमांक वा ई-मेल दिल्यास उत्तम.
- आपले लेखन मराठी प्रमाणलेखनाच्या नियमांनुसार असावे. तसेच संपादकांना संबोधणारे पत्र जोडावे.
- 'युगवाणी'ला नव्या प्रवाहांचे, नव्या जाणिवांचे आणि सर्जनाच्या नव्या शक्यता धुंडाळणारे सशक्त लेखन हवे आहे.
- लेखकांनी आपले लेखन डॉ. अनिल नितनवरे, 'जातक', २३/२४, स्नेहनगर, नागपूर मार्ग, भंडारा - ४४१ ९०४ या पत्त्यावर पाठवावे.

अनुक्रमणिका



चुकामूक

□ मंजूषा सावरकर

हिवाळी अधिवेशनाची धुमश्चक्री शहरात सुरू होती. 'चल सोबतीने' म्हणत सर्व भागातून कानाकोपऱ्यातून आलेल्यांनी शहीद गोवारी चौकातील वर्दळ सकाळपासूनच वाढलेली. वाहतूक पोलीस यंत्रणेपासून सर्व शासकीय, प्रशासकीय व्यवस्था, अधिकारी, कर्मचारी संत्रानगरीत मंत्र्यांच्या सरबराईसाठी लागलेले. शहर नवपरिणीत वधूसारखं मोठमोठ्या होर्डिंग्सनी अलंकार ल्याल्यागत सजलेलं. प्रत्येकजण कुठल्यातरी घाईगर्दीत हरवलेला. राजकीय-सामाजिक कार्यकर्ते मोर्चेबांधणीत लागलेले. गर्दीच गर्दी पसरलेली. आपल्या मागण्या वेगवेगळ्या पद्धतीनं घेऊन कुणी आकर्षक वेशभूषा, कर्कश भाषणं, भजनं, कीर्तन, घोषवाक्ये, नारे... आवाज फाटेपर्यंत आरोळ्यांची ओरड, घशांची कोरड आणि रस्ता संपेस्तोवर पायपीट. झिरोमाईल चौकात चारही बाजूंनी माणसांनी रस्ते फुललेले. वाहतूक पोलीस हातात दंडुके घेऊन पाळत ठेवून, कठडे लावून कर्तव्य बजावत. बारा वाजेपर्यंत हे असंच चालणार. त्यानंतर रस्ते केवळ मोर्चेकऱ्यांसाठी. बस, जड वाहनं, चारचाकी, दुचाकी बंद. लहान-मोठी, बाया-माणसं पाठीवर लेकरं, सामान घेऊन इकडून तिकडे रस्ता भरकटल्यासारखे. मधेच शाळेत जाणारी मुलं, ऑफिसला जाणारी रोजची माणसं या दिवसात खोळंबलेली, पुन्हा सरावलेपणानं पुढं चाललेली. ओळखपत्र दाखविल्याशिवाय गाड्या सुटत नव्हत्या. एकमेकांना अनोळखी. अपरिचित. उपाशीतापाशी, कोण कुठली, सारी स्वतःचा चेहरा नसलेली माणसं, तहानभूक विसरून अधिवेशन म्हणजे काय याचा गंध असलेली, नसलेली गावनेत्यांच्या आदेशानं आलेली आणि त्यांच्या गर्दीत शहरी टापूतली सोयीस्करपणे पेरलेली, पसरलेली टवाळ, गुंड, काही शुभ्रधवल खादीच्या वेष्टणाखाली बांधलेली, साचलेली, बसलेली.

सारं दृश्य शासकीय शाळेच्या पहिल्या माळ्यावरील गॅलरीतून दहाव्या वर्गातला मंगाम न्याहाळत उभा होता. स्वतःच्या भग्न उद्ध्वस्त इतिहासाच्या साक्षीनं ती शाळादेखील वर्षानुवर्षे त्याच्या मनासारखं सोशीकपणे पचवत होती. दीडशे वर्षांपासूनचा सांभाळत आणलेला लौकिक आजतागायत सावरत, सांभाळत आता अखेरची घरघर करीत अखेरच्या घटका मोजत होती. पटसंख्या आजूबाजूच्या खाजगी शाळांच्या झगमगाटात रोडावत चाललेली. पण शहराच्या ठिकाणी सोय म्हणून बर्डीसारख्या मध्यवर्ती परिसरातील आजूबाजूच्या झोपडपट्टीतील कष्टकऱ्यांची मुलं-मुली दाखल करून कर्मचारीवर्ग शासनाचा 'बालकाचा शिक्षणाचा हक्क' सर्वार्थानं बजावत होते. मंगामही तसाच शाळेत दाखल झाला होता. पण आज त्यामुळेच हरवलेलं सर्वस्व त्या कोपऱ्यातून तो न्याहाळत होता. डोळ्यात जीव ओतून शोधत होता. कारण आज तारीख होती सव्वीस बारा दोन हजार बारा.

अनुक्रमणिका

''ए... चलो क्लास में, अंदर जाने की बेल हो गई है।''

शिपायाच्या आवाजानं त्याच्या डोळ्यांसमोरची चित्रफीत खसकन ओढली गेली. कोरड्या ठण्णं वाळलेल्या चेहऱ्यावरून त्यानं स्वतःच समजुतीचा हात फिरवला. सारं खदखदून आलेलं वादळवारं थोपवून तो वर्गात पूर्ववत येऊन बसला. पण मन मानत नव्हतं. रुदन करीत होतं. सरणाच्या राखेसारखं मूक धुमसत होतं. गर्दीत सैरभैर सैराट झालेलं.

नाही दिसणार, नाही येणार, हरवलीय, पळवलीय ती त्याची छकुली, 'दादा' म्हणून हाक मारणारी, तासन्‌तास वाट पाहणारी, घासातला घास, घराला घरपण देणारी. तीच गेलीय तेव्हापासून सारंच संपलं. उद्ध्वस्त, उदास... कुणी म्हणतं आईविना भिकारी असतं जग आणि लेकीविना आई! बहिणीविना मी? मीच... मीच जबाबदार साऱ्या गोष्टीला. त्याच्या मुठी आवळल्या, शरीर तापलं... काय सुरू? प्रायश्चित्त, पश्चात्ताप...

अपराधीपणानं तो स्वतःला दोष देऊ लागला. एवढ्यात बाहेर रस्त्यावर कर्कश आरोळ्या, ध्वनिफितीच्या गगनभेदी गर्जनांसह मोर्चेकऱ्यांनी केलेली गर्दी, कल्लोळ. त्याच क्षणी मॅडमचा वर्गात प्रवेश, सहावी तासिका, सारे 'गुड आफ्टरनून मॅम' म्हणत उभे झाले. मंगाम मात्र भान हरवल्यागत बाकावरच खिळून बसलेला. त्यांची नजरभेट होताच तो सावरला. मात्र मॅमसमोर ती आठवण ताजी होऊन काळीज हलवून गेली.

दोन वर्षांपूर्वी अधिवेशन काळातील ती दुपारची सहावी तासिका नुकतीच सुरू झाली होती. नागरिकशास्त्रातली सुरक्षा परिषद वर्गात शिकवणं सुरू झाली होती. इतक्यात एक पाचवी-सहावीतली शालेय गणवेशातली चिमुरडी वर्गातल्या खिडकीतून डोकावली. कुणीतरी कुजबुजलं.

''मॅडम, मंगामची बहीण आली.''

चुणचुणीत, टपोर डोळ्यांची, सावळ्या वर्णाची, कुरळ्या केसांची, लक्षवेधी चेहऱ्याची. ती विचारू लागली,

''माझा मंगाम दादा पाहिजे.''

तिला खुणेनं आत बोलावलं, तेव्हा पाठीवरचं मोठं दप्तर हातातली टिफीन बॅग सांभाळत ती तत्परतेनं आत आली.

''काय झालं गं? कोण हवयं?''

''दादासोबत घरी जायचंय, मंगाम...''

दोघींचीही वर्गभर नजर भिरभिरली, पण मंगाम वर्गात होताच कुठं?

''तो तर वर्गात नाही.''

तिचा चेहरा खर्रकन उतरला आणि तेवढ्याच सफाईन निवळला. ती माघरी फिरताच, लडिवाळपणे तिनं तिला विचारलं.

''काय गं, नाव काय तुझं? कुठल्या शाळेत आहेस?''

''परी माझं नाव, भिडे गर्ल्समध्ये शिकते.''

''मग आज परी लवकर घरी? काही खास वाढदिवस वगैरे...''

तिची नकारार्थी मान हलली.


''मग?''

तिच्या चेहऱ्यावर स्पष्ट संकोच दिसत होता.

''काय झालं?''

''आईनं सांगितलं आज दादासोबत लवकर येऊन जा.''

''का गं''



''बाबा आज घरी नाही म्हणून.''

''म्हणजे?''

''रोज बाबा आईची मलमपट्टी करतात. आज ते गावाला गेले. घरी करायला कुणीच नाही. म्हणून दादाला सांगितलं होतं.''

''काय झालंय आईला?''

''जळली स्टोव्हच्या भडक्यानं, तिला उठताही येत नाही.''

परी स्वतःच दचकली, पार कोलमडलीच, विषयच बदलवला तिनं.

''मग आता काय करशील?''

''दादा मला घ्यायला माझ्या शाळेत गेला असेल.''

"पुन्हा शाळेत जाशील?"

"हो." तिनं मान हलवली.

बाहेर केवढी गर्दी, पुन्हा पायपीट करीत इथून तिथवर आणि चुकामूक झाली तर..."

"नाही होणार. झालीच तर बसथांब्यावर वाट पाहीन त्याची.".

मन शंकित झालं उगाच. तिला हटकून विचारलं.

"कुठे राहणं आहे गं तुमचं?"

"सदर... सदरच्या बसथांब्यापुढची झोपडपट्टी."

"मग एक काम कर... तू निघून जा बसनं पुढे. तो येईलच मागून. खूप गर्दी आहे बाहेर."

"अंहं."

"का?"

"तिथून पुढं भीती वाटते. झोपडपट्टीचा रस्ता सामसूम, आई म्हणते एकटं नाही यायचं."

ती निरुत्तर झाली. नन्ही परी लगबगीनं पाठमोरी वळली.

मोर्चेकऱ्यांचा कल्लोळ अधिकच वाढला होता. गर्दीचा पूर, आता बायकांचा सूरही वाढलेला. बायकांचा आवाज स्पष्ट ऐकू येत होता. ती खिडकीतून डोकावली... मोलकरीण संघटनेचा मोर्चा झिरोमाईलला धडकला होता. चिक्कार गर्दी पसरलेली. आरोळ्या, नारेबाजींनी कानठळ्या बसू लागल्या. परीची क्षणभर काळजी वाटली. आवाजामुळं तिनं खिडकी ओढून घेतली. आवाज मंदावला, तसा परीचा विचारही.

पुढे महिनाभर मंगाम शाळेत दिसलाच नाही. शोध घेतला, चौकशी केली. त्या वेळी कळलं त्याची बहीण परी त्या दिवशी शाळेतून बाहेर पडली. पण घरापर्यंत पोहचलीच नाही. अधिवेशनामुळे बसचे मार्ग बदललेले होते. नेहमीच्या थांब्यावर प्रवासी म्हणून चिटपाखरूही नव्हतं. अधिवेशनमय झालेल्या शहरात तिचा अद्यापपावेतो शोध कायमच होता. कदाचित न लागणारा शोध म्हणून...

तिचं मन गदगदलं. ती मंगामजवळ आली. मंगाम आता इतिहासाच्या पुस्तकात 'युनिसेफ' वाचत होता.



डॉ. मंजूषा सावरकर

जन्म : २० जानेवारी १९७०

प्रकाशित लेखन 'डांगोरा' आणि 'भोवंडा' हे दोन कथासंग्रह प्रकाशित, 'अंबर' कवितासंग्रहाचे संपादन

विशेष : • महाराष्ट्र शासनाचा सावित्रीबाई फुले आदर्श शिक्षिका पुरस्कार. • म.ल. मानकर लोकशिक्षण पुरस्कार. • सुभाष भेण्डे यांच्या कादंबरीलेखनावर पीएच.डी. साठी संशोधन.

पत्ता : 'शिव', २८५, श्री महालक्ष्मीनगर, न्यू नरसाळा रोड, नागपूर - ४४००३४

अभिनंदन

राहुल कोसंबी

'उभं आडवं' या निबंधसंग्रहासाठी


साहित्य अकादमी युवा पुरस्कार (२०१७)



ल. म. कडू

'खारीच्या वाटा' या कादंबरीसाठी

साहित्य अकादमीचा बालसाहित्य पुरस्कार (२०१७)



बटरफ्लाय इफेक्ट

ज्ञानेश्वर गटकर

वर्ष : १९८३, स्थळ : लॉर्डस, क्रिकेटचे मैदान

लॉर्डसच्या मैदानावर सामना सुरू होता... प्रतीक आपल्या आसनावरून व्हिवियन रिचर्डसकडे बघत होता... व्हिवियन क्षेत्ररक्षण करताना त्याला दिसत होता... व्हिवियन रिचर्डस आपल्या स्वभावाला साजेसा मनमौजी आणि बिनधास्त वाटत होता... खरेतर प्रतीकला याच बिनधास्तपणाची काळजी वाटत होती...! व्हिवियनने या क्षणाला तरी थोड गंभीर व्हावं... निदान फलंदाजीला यायच्या आधी प्रतीकने दिलेला चिटोरा तरी बघावा बस...! त्या चिटोऱ्यावर त्याच्या आणि डॉक्टरांच्या मोहिमेची यशस्विता अवलंबून होती... पण जर का तो चिटोरा व्हिवियनने बघितला नाही तर...??? प्रतीक चिंताक्रांत होऊन सामना बघत होता...

• • •

वर्ष : २०१८, स्थळ : भारतीय विज्ञान केंद्र

डॉक्टर चहा घ्यायला कॅन्टीनमध्ये आले. आपल्या नेहमीच्या खुर्चीवर बसले. तिथे सगळे दूरदर्शनवरील भारताचा क्रिकेट सामना बघण्यात मशगूल होते. डॉक्टरांना क्रिकेट अजिबात आवडत नव्हते. त्यांच्यामते क्रिकेटमुळे भारतातील अनेक लोक आपला वेळ आणि शक्ती खर्च करतात. डॉक्टरांना तर तो इंग्रजांचा खेळ म्हणून त्याबद्दल तिटकाराच... त्यापेक्षा हॉकी खूप सुंदर खेळ आहे असे त्यांना वाटायचं... ते हॉकीच्या आकंठ प्रेमात होते... कर्नल ध्यानचंद त्यांचे दैवत... परंतु भारताचा राष्ट्रीय खेळ असल्यावरही हॉकी उपेक्षित राहिला याची खंत त्यांना वाटायची; पण त्यासाठी ते काही करूही शकत नव्हते... हॉकीसाठी त्यांचा जीव तुटायचा... उधमसिंग, लेस्ली क्लोडीअस, धनराज पिल्ले, बलबीरसिंग सिनिअर यांचे कित्येक किस्से त्यांच्या जीवनाच्या आनंदाचे एक कारण होते... धनराज पिल्लेचा खेळ बघायला त्यांना खूप आवडे. तेंडुलकरऐवजी पिल्ले हा भारताचा स्पोर्ट आयकॉन व्हावा असं त्यांना वाटे... त्यांची खूप इच्छा होती, की आपल्या जिवंतपणी भारताने एकदातरी हॉकीचा विश्वकप जिंकावा आणि हॉकीला चांगले दिवस येतील... जसे १९८३ चा क्रिकेट विश्वचषक जिंकल्यानंतर भारतात फक्त क्रिकेट आणि क्रिकेटचाच बोलबाला होता आणि आज क्रिकेटने अक्षरशः लोकांना वेड लावलंय... ते आपल्याच तंद्रीत असताना तिथे त्यांचा विद्यार्थी प्रतीक पोचला. त्यांच्या शेजारी बसत प्रतीकने चहा मागवला.

''सर, कसला विचार करताय?''

''क्रिकेट!! हा खेळ वाटोळं करेल आपल्या देशाचं. त्यात ते स्पॉट फिक्सिंग, मॅच फिक्सिंग...

सारी नैतिकताच घालवलीय... भांडवलशाही खेळ आहे... पूर्वी पाच दिवस, मग एक दिवस, आता ते २०-२०... वर्षभर फक्त क्रिकेट, क्रिकेटच... अरे बाकीचेही खेळ आहेत... ज्यात खरा कस लागतो... जास्त शारीरिक तंदुरुस्ती लागते...''

त्यांना मध्येच थांबवत प्रतीक म्हणाला, ''जाऊ द्या हो सर, आपण काळजी केल्यामुळे काही होणार आहे का?''

''हं...!!! नक्की होईल...! माझ्या डोक्यात एक कल्पना आलीय... सायंकाळी निवांत बोलूयात... तू ये माझ्या बंगल्यावर... आणि आज कार्यालयातील कामे तूच सांभाळ... मला फोन करू नकोस... चल येतो मी... पण तू सायंकाळी न चुकता ये... आपल्याला हे क्रिकेटचं भूत उतरवावंच लागेल.''

डॉक्टर खूपच गडबडीत निघून गेले... नेहमीसारखे... पण आज थोडी वेगळीच झाक त्याच्या डोळ्यांत होती असे प्रतीकला वाटले. संध्याकाळी भेटून नेमकं डॉक्टरांच्या मनात काय सुरू आहे ते कळेल म्हणून तोही चहाचे पैसे देऊन निघून गेला...

• • •

वर्ष : १९८३, स्थळ : लॉर्डस क्रिकेटचे मैदान

प्रतीक व्हिवियनकडे टक लावून बघत होता. जेणेकरून त्याला तो इशारा करू शकेल की तुझ्या खिशातील चिटोरा नक्की बघ... परंतु भारताची फलंदाजी संपली तरी व्हिवियनची नजर त्याला पकडता आली नाही. शेवटी भारताने सर्वबाद १८३ धावा काढल्या आणि सगळे खेळाडू पॅव्हेलियनकडे जायला निघाले. नेमका तेव्हाच व्हिवियनला प्रतीक दिसला. प्रतीकने त्याला चिटोरा वाच असा इशारा केला. व्हिवियन खिशात हात घालून चिटोरा काढला आणि वाचायला लागला. एकाएक जागीच थांबला...

व्हिवियनने तिथल्याच एका सुरक्षा कर्मचाऱ्याला बोलावले व प्रतीककडे बोट दाखवत काहीतरी सांगितले. व्हिवियन पुढे निघून गेला आणि सुरक्षा कर्मचारी प्रतीककडे आला. त्याने प्रतीकला व्हिवियनने ड्रेसिंगरूममध्ये भेटायला बोलावले असल्याचे सांगितले. प्रतीकच्या चेहऱ्यावर समाधान दिसले. आज दुसऱ्यांदा तो ड्रेसिंगरूमकडे जात होता...

प्रतीक पॅव्हेलियनजवळ पोहचला. त्याचीच वाट बघत थांबलेला व्हिवियन त्याचे बखोटे पकडून त्याला आपल्या खोलीत जवळ जवळ ओढतच घेऊन गेला. दार बंद करून त्याने विचारले,

''सामना सुरू व्हायच्या आधी तू विनवणी करून दिलेला चिटोरा मी आता बघितला. कोण आहेस तू? आणि ही काय भानगड आहे? या चिटोऱ्यावरील लिहिलेल्या गोष्टी तुला आधीच कशा ठाऊक?... भारतीय दिसतोस म्हणजे जादूटोणा, भविष्य, काळी जादू तुला येत असेल?'' वगैरे प्रश्नांची सरबती...



त्याला शांतपणे प्रतीक उत्तर देत म्हणाला,

''व्हिव, आधी शांत हो, आणि माझं काय म्हणणं आहे ते ऐकून घे.''

व्हिवियन शांत झाला. प्रतीक बोलायला लागला,

''हा जो चिटोरा मी तुला सामना सुरू व्हायच्या आधी दिला होता तो कागद एका कम्प्युटरच्या माध्यमातून काढलेली प्रिंट आहे.''

''प्रिंट? म्हणजे कसं?''

''या सगळ्या गोष्टी १९८३ मध्ये लोकांना कदाचित कळणार नाहीत, पण तरी तुला समजावून सांगण्याचा प्रयत्न करतो. भविष्यातील २०१८ साली मानवाने विज्ञानात खूप प्रगती केली आहे आणि मी त्या प्रगत काळातून प्रवास करून आजच्या दिवशी इथे फक्त तुला भेटायला आलो आहे.''

''म्हणजे तू काळाचा प्रवास करून आला आहेस!''

''हो.एच.जी.वेल्सने आपल्या कादंबरीत सांगितल्याप्रमाणे २०१८ तील मानव टाईम ट्रॅव्हेल करू शकतो.''

व्हिवियन आश्चर्याने त्याचे म्हणणे ऐकत होता.

''... परंतु त्याचा वापर बेकायदा ठरवल्यामुळे आणि सोबतच खर्चिक असल्यामुळे फक्त अति महत्त्वाचं संशोधनासाठीच शासनाकडून असल्या प्रवासाची

परवानगी दिली जाते... पण ते जाऊ दे, महत्त्वाचं हे की, आता मी तुला भेटायला आलोय खरा, परंतु मी शासनाची परवानगी काढलेली नाही कारण...''

''पण तू भूतकाळात कशासाठी आला आहेस?''

''तुला भेटायला.''

''म्हणजे?'' व्हिवियन दचकूनच म्हणाला.

''तो चिटोरा बघ. १९८३ चा हा विश्वचषक भारत जिंकणार आहे. तुला आधीच दिलेलं भारताच्या फलंदाजीचे ते स्कोर कार्ड बघ...''

व्हिवियन याच गोष्टीमुळे तर अचंबित झाला होता.

सामना सुरू व्हायच्या आधी प्रतीकने व्हिवियनची भेट घेतली आणि त्याची इच्छा नसताना खूप विनवणी करून हा चिटोरा त्याला दिला होता. परंतु सामना सुरू होण्याच्या गडबडीत त्याने तो तसाच आपल्या खिशात कोंबला होता. आता बघतो तर काय त्यातील प्रत्येक गोष्ट तंतोतंत खरी होती.

''व्हिव, हे मी तुला आधीच दिलं असल्याने तुला विश्वास तर बसलाच असेल, की मे जे बोलतो ते सत्य आहे आणि आता हे बघ वेस्ट इंडिजच्या फलंदाजीची आकडेवारी जी मी २०१८ मधून आणली आहे... तू ३३ धावांवर बाद होणार आहेस... आणि पूर्ण वेस्ट इंडिज संघ १४० धावांवर... गारद, या सामन्यात तू ३३ धावांवर बाद होणार आहेस... आणि तू बाद झाला म्हणजे भारत विश्वचषक जिंकेल... तुझा बळी या सामन्यात खूप मोलाचा ठरेल.''

''...!!!???'' रिचर्डसची वाचाच बंद झाली.

''आता तुझ्या फायद्याची गोष्ट ऐक... मला तू हा सामना जिंकावा असं वाटतं... म्हणूनच मी भूतकाळात येऊन तुला भेटतोय. मला तेवढा तुझ्या बाद होण्याचा क्षण बदलवायचा आहे... तुला फक्त मदनलालच्या १४ व्या षटकात... स्वतःला बाद होण्यापासून वाचवायचं आहे... कारण मदनलालच्या गोलंदाजीवर तुझा झेल उडेल आणि कपिलदेव त्याला झेलेल हे ठरलं आहे. पण जर का तिथे तू बचावलास तर तू एकहाती सामना वेस्ट इंडिजला जिंकून देशील...''

व्हिव रिचर्डस सगळ ऐकून अचंबित झाला. त्याला आपण विज्ञानकथेतील एखादे पात्र असल्यासारखेच वाटले किंवा स्वप्नात असल्यासारखे... त्याच्या हातातील भारताच्या फलंदाजीची आकडेवारी तंतोतंत खरी होती... आणि कॅरेबियन फलंदाजीचीही आकडेवारी खूप काही सांगत होती... त्यातील फलंदाजाची उतरंड आधीच ठरवल्यासारखी होती... व्हिवियनला आठवले की त्यांनी कालच्या बैठकीत नेमका हाच फलंदाजीक्रम ठरवला होता आणि तो क्रम वेस्ट इंडिज संघ वगळता इतरांना माहिती असण्याची शक्यता नव्हतीच... म्हणजे प्रतीकच्या बोलण्यावर विश्वास ठेवण्यासारखं खूप काही होतं.

तरी व्हिवियन साशंक होता, ''पण तू भारतीय असून हा सामना भारताने जिंकू नये अस तुला का वाटतं?''

''सांगतो, तेही सांगतो...'' आणि प्रतीक व्हिवियनला सांगायला लागला...

• • •

वर्ष : २०१८, स्थळ : डॉक्टरांच्या बंगल्यावर

ठरल्या वेळी प्रतीक डॉक्टरांच्या बंगल्यावर पोहचला. त्याचीच वाट बघत असलेले डॉक्टर तो येताच त्याला घेऊन आपल्या अभ्यासिकेत गेले. आतून दार बंद केले आणि अगदी लहान बाळासारखे उत्साहित होऊन बोलायला लागले.

''प्रतीक, तू कधी काळ-प्रवास केलाय?''

''नाही सर, का?''

''मी केलाय एकदा, पण तेव्हा मी सुदृढ होतो. असला प्रवास खडतर असतो. या प्रवासात तुमच्या शरीराची चांगलीच झीज होते. काही दिवसांनी ती भरून निघते, परंतु प्रवास करायच्या आधी तुमचे आरोग्य उत्तम असेल तर कधीही चांगलंच... नाहीतर हा प्रवास जीवघेणा होऊ शकतो.''

''सर, हे मला माहिती आहे. पण आज हा विषय माझ्यासोबत बोलताय त्याचं कारण?''

''कारण... कारण म्हणजे तू तरुण आहेस आणि तुला चांगलं आरोग्य मिळालंय... त्यामुळे तू हा प्रवास करू शकतोस... मी करू शकत नाही.''

नेमकं डॉक्टरांच्या मनात काय चाललंय याचा थांग प्रतीकला लागत नव्हता. डॉक्टर पुढे बोलू लागले,

''प्रतीक, आज कॅन्टीनमध्ये आपलं बोलणं झालं तेव्हापासून माझ्या डोक्यात एक कल्पना आली आहे. ती वरकरणी असंभव वाटत असली तरी ती प्रत्यक्षात आणणे तितकेसे कठीण जाणार नाही.''

''कुठली कल्पना, सर?''

'' 'बटरफ्लाय इफेक्ट' तुला ठाऊक आहे...''

अनुक्रमणिका

''हो... पण त्याचं काय?''

''बघ, या थिअरीनुसार, भौतिक जगात घडणारी लहानातील लहान घटना, हालचाल ही महत्त्वाची असते म्हणजे ती छोटीशी घटना जगातील भौतिक गोष्टींवर परिणाम पाडू शकते... आणि मग त्या छोट्याशा घटनेमुळे बदलांची एक शृंखला निर्माण होते. पुढे हीच शृंखला, ते छोटे-छोटे बदल भौतिक जगाचे रूप पालटतात. उदाहरणार्थ, समजा एक मुलगा आहे. त्याला नोकरीच्या मुलाखतीला जायचं आहे. तो रस्त्याने निघालाय आणि मध्येच त्याच्या बुटाची लेस सुटली. आता ती लेस बांधण्यासाठी त्याला वीस सेकंद वेळ लागला असं समजू. ती कृती करण्यासाठी लागलेले वीस सेकंद त्याच्या पूर्ण आयुष्यावर परिणाम करणारे ठरू शकतात. म्हणजे बघ तो लेस बांधून पुढे जातो... लेस बांधल्यामुळे जो वेळ गेला त्यामुळे त्याला पुढे ट्रॅफिक सिग्नलवर थांबावं लागलं. तो सिग्नल पार करून जातो तर त्याला रेल्वे स्टेशनवर जाणारे वाहन उशिरा मिळते आणि कसाबसा स्टेशनला पोहचतो तर रेल्वे अवघ्या काही क्षण आधी निघून गेली असते. तो आता मुलाखतीला वेळेवर पोहचू शकत नाही. त्यामुळे त्याला नोकरी मिळत नाही. ती न मिळाल्यामुळे त्याला दुसऱ्या शहरात नोकरीसाठी जावं लागतं. तिथे त्याला नवीन लोक मिळतात... वगैरे वगैरे... एकंदरीत काय तर त्या वीस सेकंदांतील त्या छोट्याशा कृतीमुळे त्याच्या जीवनाचा प्रवाह बदलला. आता असा विचार केला की समजा ती बुटाची लेस सुटलीच नसती तर...''

''तर... तर कदाचित त्या मुलाच्या आयुष्यात अनेक गोष्टी वेगळ्या प्रकारे घडल्या असत्या. जसे की तो वेळेवर सिग्नल पार करून गेला आणि त्यामुळे त्याला रेल्वे स्टेशनसाठी वाहन मिळाले... तो वेळेवर रेल्वेमध्ये चढू शकला आणि मुलाखतीच्या वेळी हजर झाला. त्याला ती नोकरी मिळाली आणि तो त्याच शहरात स्थायिक झाला...''

''बरोबर, कदाचित तिथून पुढे त्याच्या आयुष्यात वेगळ्या गोष्टी घडल्या असत्या... जर का आपण थोडं मागे गेलो आणि ती लेस सुटण्याची वेळ गाठली आणि तिला सुटू दिली नाही तर...? जगत असताना अशा खूप गोष्टी आपल्यासोबत घडलेल्या असतात की आपण फक्त त्या एका क्षणाला जबाबदार धरत असतो. खूपदा असा विचार करतो की तो एक क्षण मी बदलू शकलो तर... एका क्षणाचं केवढं महत्त्व असतं.!''

''सर, हे खूप अफाट आहे...''

''हं! मग या गोष्टीवर मी दुपारपासून विचार केला आणि आपण दोघे असा प्रयोग करायचा हे ठरवलं... म्हणजे तू सोबत आहेसच. त्यासाठीच दुपारी घरी येऊन संपूर्ण प्लॅन आखलाय.''

''आणि हा प्रयोग यशस्वी झालेला मला बघायचा आहे सर! मी पूर्णपणे तुमच्या सोबत आहे.''

''ऐक तर मग, आजपासून बरोबर तीन महिन्यांनी म्हणजे २५ जून २०१८ ला भारताला १९८३ चा क्रिकेट विश्वचषक जिंकून ३५ वर्षे पूर्ण होतील. आपल्याला हीच वेळ साधायची आहे. विज्ञान भवनातील टाईम मशीनचा उपयोग करून आपण ३५ वर्षे मागे सहज जाऊ शकतो. परंतु ती मशीन वापरायची असेल तर शासनाला सर्व कारणे आणि डिटेल्स द्यावी लागतील. आपण मशीन कशासाठी वापरणार आहोत हे कळल्यावर शासन आपल्याला मशीन वापरण्याची परवानगी देणार नाही. आपल्याला. ती चोरून वापरावी लागणार आहे...''

''पण आपल्याला ती नेमकी कशासाठी वापरायची आहे?''

''अरे हो! ते सांगायचं राहिलंच... भारताला या क्रिकेटने वेड लावलंय. मला हे बदलायचं आहे. भारतात क्रिकेटचा प्रसार का झाला? यावर जेव्हा मी विचार केला तेव्हा लक्षात आलं की, १९८३ चा विश्वचषक भारताने जिंकला आणि त्यानंतर भारतात क्रिकेट झपाट्याने वाढले. समजा भारत तो विश्वचषक जिंकला नसता तर... तर आज जिकडे-तिकडे हॉकीसारखा खेळ खेळला गेला असता. मला क्रिकेटपासून सुटका हवीय. मला हॉकी एक महान खेळ झालेला बघायचं आहे. त्यासाठी भारताला १९८३ च्या विश्वचषकात हरावेच लागेल.''

''पण ते कसं करायचं?''

''जसं की आपण मघाशी बोललो की एक छोटीशी घटनासुद्धा खूप मोठे बदल घडवू शकते, आपल्यालाही तेच करायचं. भारताला विश्वचषक जिंकता आला कारण त्या दिवशी वेस्ट इंडिजचा ख्यातनाम फलंदाज रिचर्डस लवकर बाद झाला. त्याचा कपिलदेवने घेतलेला झेल खूप महत्त्वाचा होता. आता जर का तो क्षण आपण बदलला तर. म्हणजे तू भूतकाळात जाऊन तशी तजवीज केली की रिचर्डसला तेवढा चेंडू बचावात्मक खेळायला लावला तर तो झेलबाद होणार नाही आणि तो सामना वेस्ट इंडिजला जिंकून देईल.''

''पण सर, हे त्याला कसं सांगायचं?''

''त्याची काळजी करू नकोस. तुझी आणि त्याची भेट कशी होईल याची व्यवस्था आपल्याला लावता येईल.''

• • •

वर्ष : १९८३ वेस्ट इंडीजच्या फलंदाजी आधी...

''...आणि अशा प्रकारे मी ३५ वर्षे भूतकाळात येऊन तुझ्यापुढे उभा आहे. नशीब २०१८ सारखी सुरक्षा व्यवस्था १९८३ मध्ये नाहीय... असती तर तुला एवढ्या सहज भेटता आलं नसतं.''

प्रतीकने व्हिवियनला सारा वृत्तांत सांगितला. व्हिवियनने आपल्या हातातील चिटोऱ्यावर नजर टाकली. त्याच्या नावापुढे २८ चेंडूत ३३ धावा लिहिलेल्या त्याला दिसल्या आणि सगळ्यात खाली भारत ४३ धावांनी विजयी असे लिहिलेले दिसले. त्याने एकदा प्रतीकच्या चेहऱ्याकडे बघितले आणि मंदसे स्मित करत प्रतीकची रजा घेतली.

प्रतीक सामना बघायला आपल्या जागेवर येऊन बसला. तिकडे व्हिवियन तयार व्हायला निघून गेला.

व्हिवियन तिसऱ्या क्रमांकावर फलंदाजीला येणार होता. तो अधूनमधून हातातील कागदावर बघत होता आणि तेवढ्यात वेस्ट इंडिजचा पहिला गडी पाच धावांवर बाद झाला... ग्रीनिज... त्याने बारा चेंडूत फक्त एक धाव काढली होती. व्हिवियनने तेव्हाच हातातील कागदाकडे बघितले आणि... त्याला आता सगळे कळून चुकले. त्याने दुरूनच प्रतीकला अंगठा दाखवला. त्याचा अंगठा बघून प्रतीकही समाधानी झाला...

वर्ष : २६ जून २०१८

प्रतीक झोपेतून उठला. कितीतरी वर्षांची झोप घेऊन आल्यासारखे त्याला वाटत होते. तो कामावर जायला निघाला. डॉक्टरांचा त्याला लवकर कामावर ये असा संदेश होताच. त्याने लवकरच तयारी केली. चारचाकीत बसला. तेवढ्यात त्याच्या बुटाची लेस सुटलेली दिसली... ती परत बांधून झाली आणि गाडी सुरू केली. लेस बांधण्यात वेळ गेल्यामुळे पुढल्या चौकात सिग्नलवर त्याला गाडी थांबवावी लागली. तो गाडीच्या काचेतून बघत होता. आपल्या उजवीकडे बघितले तर तिथे त्याला धनराज पिल्ले याचे मोठे पोस्टर लागलेले दिसले. डावीकडे वानखेडे हॉकी स्टेडियम सजवले जात होते. आज भारत आणि पाकिस्तानचा हॉकी सामना होता. त्याला कळले, की डॉक्टर आज कामाला दांडी मारून हॉकी सामना बघायला जातील. या हॉकीमुळे साऱ्या देशाचं वाटोळं होईल एक दिवस, असेही त्याला वाटले. तिकीट घेण्यासाठी मैदानाबाहेर लांबलचक रांग दिसत होती. त्यामुळे पुढे कदाचित ट्रॅफिक जाम झालाही असेल असं त्याला वाटलं. तेवढ्यात सिग्नल सुटला... आज सिग्नलमुळे कामावर पोहचायला त्याला वीस सेकंद उशीर होणार होता...



ज्ञानेश्वर गजानन गटकर

जन्म : २ नोव्हेंबर १९८५

प्रकाशित लेखन विविध नियतकालिकांतून कथा प्रसिद्ध.

विशेष आकाशवाणीवरून कथावाचन.

पत्ता द्वारा, नंदकिशोर जगताप, सुबोध कॉलनी, अमरावती.




हे थिजल्यासारखं दुःखाचं प्रारंभिक...

प्रमोदकुमार अणेराव

दिवसभर उन्हाच्या खूप तप्त झळा आणि अख्खा दिवस घाम काढणारा, कोणतेही चिन्ह नसताना सांजच्याने वळीव धुवाधार बरसतो आहे. सगळीच तारांबळ उडाली आहे. विपिन, मनिंदर, नेहा, ॲबल, नवेश सगळे वाट पाहात असतील आपली. सायंकाळी साडेसहा वाजता मीराच्या पेंटिंग एक्झिबिशनचं उद्घाटन होतेय. हे पहिलचं सोलो प्रदर्शन. प्रभाकर कोलते उद्घाटन करताहेत, मीराच्या या प्रदर्शनाचं. आपण मात्र अडकून पडलाहोत. आपल्याला काय आभारप्रदर्शनच तर करायचे आहे आणि ते करायला आपल्याला अजिबात आवडत नाही. कार्यक्रम लांबतो काहीएक कारणांनी आणि मग लोक कंटाळलेले असतात, अशात आभारप्रदर्शन करायचं. लोक ऐकण्याच्या अजिबात मनःस्थितीत नसतात आणि काय सालं कोणाचे मानभावी आभार मानायचे या औपचारिकतेनं साला सगळ्या उद्दिष्टांचं खोबरं करून टाकलंय आपल्याकडे. वळिवालाही खूप जोर चढलाहे. पिसाटासारखा वारा आडवातिडवा वाहतोय. मागे घेतलेला रेनकोटही भलत्याच ठिकाणी फाटलाहे. बाईकनेही जाता येणार नाहीहे. हा फ्लॅटही हा असा आडवळणावर ॲटो वगैरे मिळण्याची शक्यता कमीच. खूपच दुर्लक्ष करतोय आपण अलीकडे आपल्याकडे. कशातच मन लागत नाही. प्रचंड आळस येतो. काहीच करावेसे वाटत नाही. अगदी अंघोळही. मागे मीरा धाडकन धडकली फ्लॅटवर आणि शी वॉज ॲक्चुली शॉक्ड. माझा अवतार पाहण्यासारखा. बेडवर इकडेतिकडे विखुरलेले मळके कपडे, खाण्याच्या खरकट्या प्लेटा तशाच पडलेल्या दोन-तीन दिवसांच्या, चहाच्या कपांना मुंग्या लागलेल्या, ॲशट्रेमध्ये सिगारेटच्या थोटकांचे उदास ढीगच्या ढीग आणि दोन-तीन दिवसांची माझी अंघोळ नाही. शरीरावरचे सगळेच केस अस्ताव्यस्त वाढलेले. एकूण आदिमानवासारखा झालेला माझा अवतार. मीराने अक्षरशः झापलंच. झापलं म्हणजे काय तिच्या ठेवणीतल्या सगळ्या शिव्या तिने मोजून दिल्या. म्हणजे भुता, नालीतल्या वगैरे. माझी शिट्टी पुरती गुल. मीरा गेल्या काही वर्षांपासून नाईक तलावाजवळच्या बांगला देश नावाच्या झोपडपट्टीत काम करत्येय आणि राहतेही तिथेच. नुरखाँ बकरेवाल्याच्या घरी. त्यामुळे तिचा शिव्यांचा कोश स्ट्राँग झाला असेल कदाचित. मागे मनिंदरच्या रूमवर शिव्यांचा एक मजेशीर खेळ खेळलो. कोणाला किती शिव्या येतात. मी वीस शिव्यांच्या वर नाही. विपिनच्या अठरा. ॲबलच्या ब्लडी, बेगर, रास्कल याच्यावर एकही नाही. मनिंदरला काहीच सुचेना आणि मीराच्या नॉनस्टाप एकशे पाच. तिची एक कुठलीशी शिवी तर सर्वांना भन्नाट वाटली. खूप इनोवेटिव्हही. सगळेच मनमुराद हसले होते तेव्हा. फिशफ्राय आणि बीअर हाणून सगळ्यांनी मीराचा शिवीसम्राट किताब हा सिलेब्रेट केला होता. मीरा म्हणजे मीरॉ, मीरा म्हणजे मीऽऽर्रा. मीरा म्हणजे मीराज आणि भन्नाट काहीकाही आहे.

वळीव थांबायचं नाव घेत नाहीहे. पाऊसही साला हटखोर आहे पुरता. मीराचे दोन कॉल येऊन गेलेत. विपिनचे तीनेक. काय करावे, काय करावे? काही सुचत नाहीहे. समोरच्या कळीकर काकांना विचारलं रेनकोट आहे का म्हणून? तर ते म्हणाले माझा फाटलाहे. काकूंचा देऊ का? आणि ते हसले खोऽऽखो. मान्साचं सारंच फाटलं असतं कारे बाबा. मी म्हणालो चालेल. पावसात कोण बघतंय. खालीच डिक्कीत काढून ठेवू. मिडी आणि वरचे काय ते हॅट सारखं काहीतरी डोक्यावर. सालं आरशात पाहिलं तर हसू आलं. कोणाला दिसू नये म्हणजे झालं. तर नेमका विपिन गेटमध्येच उभा असलेला. मला पाहून खोऽऽखो हसायला लागला. 'अभि, साल्या माल दिसतो मिडीमध्ये सेक्सी हेलन!' एक मारली साल्याच्या पाठीत तर ओय ओय करायला लागला. 'अरे पावसात अडलो होतो यार. काय आलेत का कोलते?'

अजून नाही रे. लोक आलेत, काही पत्रकारही आलेत. नवेश आणायला गेलाहे कोलत्यांना हॉटेल हरसनमध्ये.' एवढ्यात नवेशची गाडी पार्किंगमध्ये शिरली. कोलत्यांना घेऊन नवेश खाली उतरला. मीरामुळे कोलते वगैरे काय प्रस्थ आहे ते आपल्याला प्रथमच कळलं. नाही तर राजा रवि वर्मा, बाबुराव पेंटर, दीनानाथ दलाल यांच्या पलीकडे आपल्यास काहीच माहीत नव्हते.



मीराच्या तीस पेंटिंग्जचं प्रदर्शन भरलंय. 'लॉर्जर दॅन सीन' या शीर्षकासह. सगळे पेंटिंग्स झोपडपट्टीच्या बकाल जीवनावर. मला चित्रातली खरंच तेवढी दृष्टी नाही. पण एका चित्राजवळच खिळून राहिलो. फेकलेल्या उष्ट्या पत्रावळीच्या ढिगात दोन मुले आणि कुत्रे अन्न एकत्र शोधताहेत. कुठेतरी खूप आतमध्ये हललं. खूप अप्रतिम. सगळे जलरंगातले उजळ आणि लख्ख विभ्रम. रेषारेषा जिवंत झालेल्या. मनातल्या मनात मीराला सॅलूट केला. कोलते तर खूपच छान बोलले. त्यांच्याच अमूर्त चित्रशैलीसारखे. पोस्ट मॉर्डनिझम, वास्तववाद वगैरे. मला फारसं काही कळलं नाही. परंतु मीराबद्दल काढलेले उद्‌गार मात्र महत्त्वाचे होते. मीराबद्दल खूप अभिमान वाटायला लागला आणि हेवाही.

प्रदर्शनाच्या पहिल्याच दिवशी प्रेक्षकांचा चांगला प्रतिसाद मिळाला. कोलत्यांनी केलेलं कौतुक विपिनचं बहारदार सूत्रसंचालन आणि माझं जेमतेम झालेलं आभारप्रदर्शन सारंच मनासारखं झालं. त्यामुळे मीराची कॉलर टाईट. नैवेद्यम्‌मध्ये जेवताना मीराने आम्हा सर्व चांडाळचौकडींचा परिचय कोलत्यांना करून दिला. हा विपिन खेरडे आर्किटेक्चर आहे, भवाळकर डेव्हलपर्समध्ये काम करतोय. चांगला गातोय; पण बाथरूममध्ये; अशी नवेशनं मध्येच मखलाशी केली. हा ॲबल चिरामल पूर्णवेळ नाटक करतोय. याचे मराठी ॲक्सेन्ट खूप छान आहे. नुकतंच एलकुंचवारांचं 'मग्न तळ्याकाठी' केलंय यांनी वगैरे... हा हँडसम लंबू नवेश पांडे, भैया आहे युपीतला. याला वाईल्ड फोटोग्राफीमध्ये इंटरेस्ट आहे. याचं प्रदर्शन झालंय मागे बालगंधर्वला. हा अभि सदाकाळे. पत्रकार आहे आजतरी मटामध्ये. आजतरी याच्यासाठी की, याचं बूड कुठे एका जागी टेकत नाही म्हणून, म्हणून म्हणायचे आजतरी उद्याचं याचं काही खरं नसतं. उडता पंछी. कोलते आणि सगळे खोऽऽखो हसायला लागले. कोलते माझ्या अवताराकडे चष्म्याच्या कोपऱ्यातून आरपार पाहात होते. त्याच्या आरपार पाहण्यामुळे मला जरा संकोचायला झालं. त्यांना वाटलं असावं कोठून येऊन बसलाहे हा अनमॅच माणूस. आम्हाला हायस्कूलला राहायचे असले प्रश्न. गटात न बसणारे शब्द शोधा, गटात न बसणारे वाक्य शोधा, गगन, मित्र, खग, सिमेंट, एकूण मजा यायची. एकदा मी गटात बसणाऱ्या शब्दांनाच गटबाह्य केले होते आणि युक्तिवाद असा केला, सर, एकाचाही एक गट राहू शकतो. कारण एक एक एकटा कोणीच नसतोच कधी. एकातही अनेक असतात. मराठीचा मास्तर जागीच थंडा...

रात्रीचे साडेअकरा वाजलेत सगळे आटोपत येईपर्यंत. खाली उतरलो तर बाईकच्या समोरच्या चाकातली हवाच कमी झालेली आणि रस्त्यात कुठे पंक्चरचं दुकानही नाही. तशीच धोपटत नेली बाईक घरापर्यंत. फ्लॅटभोवती तळे साचलेलं. नवीन बांधकाम, नवीन एरिया. त्यामुळे रस्त्यावर दिवेही कमीच. साला सगळीकडे अंधारच अंधार. अंतर्बाह्य. चलो भैया

सेंटिमेंटल होनेका नही. दार उघडून आत गेलो तर सगळे लाईट गेलेले. अंधारातच चाचपडत इमरजेंसी लाईट शोधला. नशीब चार्ज केलेला होता तो. खोलीभर क्षीण प्रकाश पसरला. मीराच्या एक्झिबिशनची रिपोर्टिंग करायचीहे. लॅपटॉप उघडून बसलो. शब्द जुळवू लागलो. जलरंगाची जादूगार मीरा पोतदार. एक संवेदनशील चित्रकर्ती. समाजतळाचा धांडोळा घेणारी आणि पुढचं काहीच सुचेना. विलक्षण थकवा, आळस. अलीकडे असंच होतं. काही लिहायला बसलं की, चार वाक्यांच्या पुढे उत्साहच संपतो. प्रचंड आळस येतो. या चारपाच वर्षांत काहीएक महत्त्वाचे लिहिणे झाले नाही. कविता नाही. कादंबरी नाही की चांगला लेख नाही. सारं मेकॅनिझमच बिघडलंय आपलं. चोविशीत लिहिलेलीही 'न्यूड प्रश्न' ही कादंबरी विलक्षण गाजली आपली. 'संवेदनाने केलेला स्वगताचा कोलाहल'ला अनेक पुरस्कार मिळालेत. त्यामुळे ओळख मिळाली जरा. पण नंतर सगळी सामसूम. सगळं विस्कटलेलं. सगळी असोशी पसरलेली. सगळं सपाट, गुळगुळीत आणि मचूळ...

एव्हाना लाईट आलेले होते. लॅपटाप तसाच सरकवून बेडवर पसरलो. खूप वेळ झोप नाही आणि जरा वेळानं आली तर तेच स्वप्न... उंच सुळक्यावरून दरीत कोसळतोय. जाग आली तेव्हा कॉटखाली पडलेलो. अंगाला प्रचंड घाम सुटलाहे. दोन वर्षे झालीत अधूनमधून, तेच स्वप्न भयावह रक्त आटवणारं.

• • •

सकाळी सकाळी मीराचा फोन. 'अभि लवकर पोहच शुअरटेकमध्ये. विपिनच्या बायकोनं जाळून घेतलंय स्वतःला... लवकर पोहच.' फोन कट... च्या मायला काय सकाळ निघाली आज. आजच्या दिवसाचा सगळा भोसडाच उदास. कसाबसा तयार होऊन बाईकजवळ आलो तर चाकातली अख्खी हवाच गेलेली. ओढत ओढत समोरच्या चौकात नेईस्तोवर पुरा घामाघूम. अंघोळ केलेलीच नव्हती. स्वतःच्याच अंगाचा कसानुसा वास यायला लागला. वाटलं पावसाची जोरदार सर यावी आणि आपण चिंब भिजून निघावं. पंक्चर काढता काढता अर्धा-पाऊण तास गेला. गाडीला किक मारून सुसाट वेगानं शुअरटेकला पोहचलो. तर तिथे मीरा, नवेश, मनिंदर, मंगलानी, पाटील सगळे पोहचलेले. विपिन गुडघ्यात मान घालून सुन्न बसलेला. अगदी रडवेला. मीरा, नवेश धावपळ करताहेत.

डॉक्टर सांगताहेत ऐंशी टक्के बर्न झाल्याचं. कोणीतरी सांगतंय अशा केसेस बऱ्या होता होताच शॉकमध्ये जातात. मागे पोलिसांचा ससेमिरा लागलेला. इन्स्पेक्टर पटवर्धनच्या मदतीने सारं निस्तारलं. विपिनच्या बायकोनं स्वयंपाक करता करता पदर गॅसला लागला असा बयान दिला. इतक्यात विपिन खूप उदास राहायचा. मिसळायचाही नाही फारसा कोणात. त्याचे पिणेही वाढले होते. त्याला ड्रिंकही लवकर लागायची. चढली की भांडणावर यायचा. खूप खेळकर, विनोदी विपिन खूप बदलत चालला होता. कोणाला काही कळायचंही नाही. स्वतःविषयी त्याला अजिबात बोलायला आवडत नसायचं. मीरा सर्वांचा समान दुवा होती. तिला होती पुसटशी कल्पना. तिच्या सांगण्यानुसार विपिन आणि त्याच्या बायकोचे संबंध वर्षभरापासून बिघडलेले होते. विपिनचा मोकळा स्वभाव, मुलींशी मैत्री, कधीमधी पार्टीत घेतलेली ड्रिंक, कामामुळे उशिरा घरी येणं यामुळे बायको सारखी संशय घ्यायला लागली होती. लहानलहान कारणांनी भांडणं उकरून काढणं, सारखा त्याचा पाणउतारा करणं, संधी मिळताच अपमान करणं असं सुरू होतं तिचं. यावर कहर म्हणजे विपिनचे मोबाईल कॉल चेक करणं. मॅसेज पाहणं, चॅटबॉक्स चेक करणं हे होतंच. पँटचे खिसे, वॅलेट तपासणं हेही होतंच. कधी नको त्यावेळी स्कूटी काढून त्याच्या ऑफिसमध्ये जाऊन धडकणे ...विपिनचं सारं कठीण करून टाकलं होतं तिनं. मीरा म्हणाली, अलीकडे विपिन म्हणाला होता कोणीतरी त्याला ओलिस ठेवल्यासारखं वाटतंय. तो म्हणतोय मी स्थानबद्ध आहे. विपिन हे सारं कुठेही न बोलता सहन करत होता. त्याने खूप म्हणजे खूपच समजाविण्याचा प्रयत्न केला होता तिला. पण सगळे प्रकरण हाताबाहेरचे होते. वर्षभरापासून त्यांच्यात कोणतेच फिजिकल रिलेशन नव्हते. इतक्यात विपिनला बाहेर निघण्यासही तिने बंदी घातली होती. विपिनचं नैसर्गिक जगणंच संपलं होतं. खूप अवघडल्यासारखा राहायचा तो. तणावग्रस्त. अशातच दारूला जवळ केलं होतं त्यानं.

दुपारी दीडेक वाजता डॉक्टरांनी आत बोलावलं. म्हणाले, 'शी ईज नो मोर. वुई कुडनॉट सेव्ह हर. शी वॉज बर्नट् डिपली. सॉरी!'

झालं सारं संपलं एका क्षणात. विपिन काहीच बोलत नव्हता. त्याचे सारे शब्दच संपले होते. त्यानंतर पोस्टमॉर्टम साऱ्या थकविणाऱ्या फार्मालिटिज करता

करता चार वाजले. मोजक्याच लोकांच्या उपस्थितीत मोक्षधामवर अंत्यसंस्कार की काय, तो करण्यात आला. तिची राख, विपिनच्या संसाराची राख आणि विपीनची जिवंतपणी राख, विपीन टक्क शून्यात पाहात बसलेला. त्याच्या साऱ्या आसवांचा समुद्र त्याच्या डोळ्यांतच आटलेला. केवळ अनंत शून्यांची अनंत योजने माळ... विपिन टक्कच बसलेला एका कोपऱ्यात... चिफ एडिटरचा निरोप. पत्रकार परिषदेला उपस्थित राहण्याविषयी. हॉटेल रॅडिसनमध्ये कोणीएक सिलेब्रेटी येतोय. त्याचा इन्टरव्ह्यू करायचाहे. असले इन्टरव्ह्यू घेत फिरणं खरं तर आपला प्रांतच नाही, स्वभावही नाही. आपली ओढच शोधपत्रकारितेतली. पंगा घ्यायची आपली जन्मजात इल्ली. सुरुवातीस मिळाली होती एका वृत्तपत्रात शोधपत्रकारिता करायला. एका केमिकल कंपनीचे करोडोंचे फ्रॉड काढले होते बाहेर आपण, चांगल्या फुटेजसह, पहिल्या पानावर बातमीही टाकली होती संपादकांनी एक. पण नंतर सारंच बिनसलं. ती कंपनी एका शहरातल्या प्रसिद्ध वकिलाची. स्थानिक खासदाराचे फोनवर फोन मालकाला. तर त्यांनी बोलवून घेतले घरी. ड्रिंक ऑफर केली. म्हणाले, ''हे बघा सदाकाळे तुम्ही खूप धाडसी पत्रकार आहोत. तुमचं दोन महिन्यांपासून कामही बघतोय मी सगळे खूश आहेत तुमच्यावर. मी तुमच्याबाबत थोडा वेगळा विचार करतोय. आपली पुणे ॲडिशन थोडी प्रॉब्लेममध्ये आहे सध्या. मला वाटते तुम्ही तिथे जावं निवासी संपादक म्हणून. काही चांगलं घडेल तुमच्यामुळे. ऑर्डरचं वगैरे बघू. आर यू रेडी नं?'' मी हो म्हणालो खरा. पण माझ्या लक्षात सगळं आलं होतं. त्याला माहीत होतं हा जाणारच नाही. सरळ राजीनामा देईल त्याचा अंदाज खराच होता. मी दुसऱ्या दिवशी राजीनामा नेऊन फेकला. सारा विचका झाला. पुन्हा आपण दुसऱ्या वृत्तपत्रात. हे असं आहे सगळं.

तो फिल्मी सिलेब्रेटी खूप खूप नॉनफॉर्मल वागत होता. खूप मोकळा. प्रश्नाना सहज घेणारा त्याच्या समांतर फिल्मच्या कामाविषयी इतर पत्रकार त्याला विविध प्रश्न विचारीत होते. मी त्याला त्याच्या अलीकडच्या 'अलिगढ' चित्रपटाविषयी विचारलं. म्हणजे आपण जी अलीगढमध्ये भूमिका केली ती तर अप्रतिमच आहे. त्याबद्दल अभिनंदन. अशा डिफरेन्ट सेक्स आयडेन्टी घेऊन जगणाऱ्याबाबत आपलं काय मत आहे आणि असा अनुभव प्रत्यक्ष लाईफमध्ये आला काय? तो जाम उखडलाच. त्याचा चेहरा प्रचंड आक्रसला. त्याचं नॉनफॉर्मल वागणं एकदम बदललं. म्हणजे आधीचं त्याचं नॉनफार्मल वागणंही एक अभिनय होता तर. त्याच्या सेक्रेटरीनं मध्येच येऊन इन्टरव्ह्यू बंद केला. पत्रकार परिषद आणि इन्टरव्ह्यू सारं बोंबललं. फारसं काही हाती लागलं नाही. तर हे आपलं असं. पत्रकार परिषद सातव्या मजल्यावर होती. बाल्कनीत एका नवशिक्या पत्रकारासोबत सिग्रेट ओढत उभा होतो. सातव्या मजल्यावरून खालची सगळी वर्दळ किडेमुंग्या रेंगाळ्यात तशी दिसत होती. सगळ्या इमारती स्मशानातल्या समाधीसारख्या शांत अचल दिसत होत्या आणि एकाएकी गरगरायला लागलं. पुन्हा तेच उंच सुळक्यावरून दरीत कोसळण्याचा भास... प्रचंड उंची... उंचावरून कोसळतोय...

अंगाला खूप घाम सुटलाहे. शरीर थरथरताहे. सोबतचा पोरगेलासा पत्रकार गोंधळून गेलेला.

''सर, सर काय होतय आपल्याला? आर यू वेल नं सर?''

त्याने तिथेच सोफ्यावर बसवलंय. बॉटलमधलं पाणी दिलं. जरा बरं वाटलं खरं. लिफ्टने त्याच्यासोबतच खाली उतरलो. त्यालाच म्हणालो फ्लॅटवर सोडून दे. कसाबसा घरी आलो...

मीराला माहीत पडलं, तिने नवेशच्या मदतीने अक्षरशः गाडीवर मांडूनच नेलं. डॉ. बदियानीकडे. डॉ. बदियानी शहरातील प्रसिद्ध सायकॅट्रिस्ट... तेथले भयपटासारखे गूढ वातावरण... चित्रविचित्र पेशन्ट... तेथून पळूनच जावंसं वाटलं... पण मीरानं घट्ट हात पकडलेला... घाऱ्या डोळ्यांच्या डॉ. बदियानीने खोल डोळ्यात पाहात केलेले कसलेकसले प्रश्न... त्याचं ते मॉनस्टरसारखं दिसणं... साला घामच फुटला.

Yes, yes this is Carla develops acrophobia! you know... means fear of hight

I prescribe some medicine - take regularly... then on next sitting let us be cognitive behavioral therapy...

आणि तो भयचित्रपटातील मॉनस्टरसारखं भयानक हसला. अंगावर काटाच उभा राहिला सर्रकन. फ्लॅटवर येईपर्यंत कोणीच काही बोललं नाही. ना मीरा, ना नवेश, ना मी शब्दच संपल्यासारखे. वाचाच गेल्यासारखी. फक्त मीराचा आश्‍वासक स्पर्श जाणवत राहिला ...सगळं आठवत राहिलं ओळीनं, भरभर...

गावाकडलं दुमजली घर... गोठ्यातली गुरे,

वासरे ...शेणामुताचा दर्प... अंगणातलं आंब्याचं मोठं सळसळणारं झाड... इकडेतिकडे धावपळ करणारी अक्काची काळीसावळी आकृती... दाजीचा राकट चेहरा... त्याची घरभर दहशत ...माझा हट्ट... कशाच्यासाठीतरी... अन् दाजीचं मला दुसऱ्या मजल्यावरून खाली उलटं बांधून ठेवणं... खाली ...विलक्षण वेगानं पृथ्वी गरगरत्येय... माझा आकांत. ...नाकातोंडात आलेलं पाणी... दाजी मी पडेल ...दाजी मी पडेल ...अक्का अक्का...

माझ्या अकस्मात काळ्याठिक्कर पडलेल्या चेहऱ्याकडे मीरा, नवेश पाहातच राहिलेले कितीतरी वेळ...

• • •

घरी आलो तर दारातून पत्र सरकवलेलं होतं. वळणदार अक्षरांवरूनच समजलं हे दाजीचं पत्र होतं.

चिरंजीव अभि

तुझी इतक्यात काहीच खबरबात नाही. फोन करावा तर तोही तू घेत नाही. तू तर येणेही बंदच केलेस गावाकडे. आणि मीही तिथे आलेलो तुला चालत नाही. कसा संपर्क ठेवावा कळत नाही. मुद्याचे असे की, बँकेचं कर्ज चढलंय खूप. करिता ढाणकीची जमीन विकावी म्हणतो दोन एकर. तू वारसदार नं. संमतिपत्रावर तुझ्या सह्या लागतील. रजिस्ट्रीसाठीही तुला यावे लागेल. म्हणून कळवावे म्हणालो. रजिस्ट्री पुढच्या आठवड्यात आहे. अपेक्षा करतो तू आनंदात असशील.

शेष कुशल.

तुझा

दाजी

इतकेसे पत्र वाचतानाही डोळे दुखायला लागले. आपण वारसदार? वारसदार शब्दावर खूप अस्वस्थ झालो. कशाचा वारसा मिळालाहे आपणास? या निनावी भयाचा, ह्या जीवघेण्या अस्वस्थतेचा की, कमालीच्या एकटेपणाचा. हा वारसा जमिनीचा मानतात दाजी आणि तोही केवळ सहीचा. खरं तर जमीन विकायला केवळ सही हवी आहे दाजीला. बस्स. बाकी काही नाही. आपल्या नजरेत ते केवळ मर्डरर आहेत कोल्ड मर्डरर.

त्यांचं अक्कासोबत पचमढीला फिरायला जाणं काय, अक्काचं पाय घसरून दरीत कोसळणं काय, आठच दिवसांत दुसरी बया घरात आणणं काय ...सारंच अनाकलनीय. सारंच बिनभोबाट झालेलं. कोणाचंच काही ऑब्जेक्शन नाही. माझंही नाही. पण मी नातं तोडलं दाजीशी. एका हुकूमशहा बापाशी. गावाशी. शेतीमातीशीही. असं एकटं भणंगपण स्वीकारलं. जाणीवपूर्वक...

• • •

मीरा म्हणाली कनदोईला ये पार्टी करू. विपिनही जरा मोकळा होईल. कनदोईला सगळे पोहचले; पण विपिनच नाही. त्याचा फोनही बंद. मीराच्या दहा पेंटिंग्स् विकल्या गेल्या होत्या. चांगल्या कींमतीत. काही ऑर्डर्स आणि जे. जे. मध्ये एक्झिबिशनसाठीची ऑफर तिला. मीरा खूश होती. आनंदासाठी तिला छोटी छोटी कारणंही पुरायची. नवेश कसलेतरी विनोद करीत होता. सगळे हसत होते. मला काहीच कळत नव्हतं. सगळे जोक्सवर खिदळत होते आणि मी ओढग्रस्त चेहऱ्याने मख्ख बसलेला. आपलं आयुष्यच सालं एक मोठा जोक झालाय.

मीरा म्हणाली, ''हे काय अभि, किती दिवस हे सारं विसरणार नाहीहेस तू? हा ओढग्रस्त चेहरा आणि काय अवतार करून घेतलास तू. धिस इज नॉट फेअर टू यू अभि. अरे सोड ते आता सारे. ती तर मारे झोपली असेल आपल्या यारासोबत खुशाल, आणि तू देवदास बनून फिरतोहेस.''

मला मात्र मीराचं हे एवढं पटत नाही. असे उद्‌गार अंजलीविषयी काढावेत इतकी अंजली सवंग नव्हतीच. तिची काय अगतिकता होती माहीत नाही. पण हे असं सारे घडलं खरं. अंजलीसोबत घालवलेले दिवस. खूप अनफॉरगेटेबल... खूप वार्मफुल... खूप आनंददायी... ओसंडून वाहणारे...

'लिव्ह इन'मध्ये राहण्याचा निर्णयच घेणार होतो की, ती एकाएकी निघून गेली बेंगलोरला... कुणालाच काही न सांगता. तिची खूप जवळची मैत्रीण-देवयानीलाही नाही. शेवटी मीरानेच शोधून काढलं, ती तिच्या बॉससोबत राहतेय म्हणून. तिने असं का केलं असावं काही कळत नाही. कोणती अगतिकता असेल तिची? कोणती तडजोड? पण ती इतकी सवंग नव्हती ...मनही मानत नाही. हेही खरं मीराने सावरलं नसतं तर आपण अख्खे कोसळलोच असतो.

• • •

खूप वेळची झोपच येत नाहीहे. डोळे चुरचुरायला लागले. लॅपटॉपवर यु-ट्यूबवरील पिक्चर पाहात बसलो -some like it hot १९५९ ची जुनी ब्लॅक अँड व्हाईट मुव्ही. विलक्षण वेगवान क्लोजअपमधले काही खास सीन. संपूर्ण चित्रपट मर्लिन मन्रोच्या जादुई प्रभावाने व्यापलेला. तिचा कमनीय बांधा, मादक सौंदर्य, आव्हान देणाऱ्या ओठांच्या हालचाली, घायाळ करणारं चालणं... येऊन जाऊन नजर तिच्या छातीशी टेकायला लागलेली. अधिक खाली अधिक खाली अधिक खाली...

झोप कधी लागली तर काहीच कळलं नाही.

रात्री दीडच्या सुमारास नवेशचा फोन, विपिन ॲक्सिडेन्टमध्ये गेल्याचा. फोनवरच त्याला रडू आवरत नव्हतं. विपिन... विपिन ...अंतर्बाह्य हादरून गेलो. कालपर्यंत सगळ्या मित्रांचा आवडता विपिन आज नाही. मन मानत नाहीहे. किती समंजस, अख्खा चैतन्याचा झरा. आज नाही... तसाही वर्षभरापासून विपिन जिवंत होताच कुठे?... त्याच काळंटक्क पडलेलं शरीर दिसत होतं. सगळ्यांना... आत्मा मात्र मरून गेला होता त्याचा ...विपिन विपिन ...कुठे आहेस रे तू...

डोळ्यातून टिपूसही न निघणारे माझे डोळे घळाघळा रडायला लागले. समुद्र होईल की काय त्याचा, आपण त्यात वाहून जाऊ देहासकट ...तिथे अक्का असेल विपिन असेल...

मीरा, नवेश, मी सगळे सुन्न होऊन बसलो होतो. विपिनचं लोळागोळा कलेवर पुढे होतं. अख्खा पांढऱ्या बँडेजनं बांधलेला. ओठ विलग पडलेले ...उठेल अन् म्हणेल, चलो यार पार्टी करते है... पण तो उठलाच नाही. ...मीरा, नवेश, मनिंदर सारेच असाह्य... निःशब्द... डोळ्यांतले अश्रू डोळ्यांतच गोठलेले... एक प्रदीर्घ सुन्नता आणि शून्यता... सर्वांना वेटाळत चाललेली...

नवेश म्हणाला, चलतोस का माझ्या घरी काही दिवसांकरिता... माझा अवतार कदाचित त्याला पाहवत नसावा... मी नाही म्हणालो. मला सोडून तेवढे दे फ्लॅटवर...

दार उघडलं तर दारात पत्र रजिस्टर डिव्हिजनल मॅनेजरचं.

यु हॅव बिन टर्मिनेटेड बाय द मॅनेजमेन्ट अकॉर्डिंग टू द वर्कर पॉलिसी...


पत्र कसलं, नोटीस होती ती, शांतपणे वाचली. नोटिशीचे शंभर तुकडे केले. संडासात कमोडमध्ये टाकून त्यावर फळाफळा मुतलो ...तुकडे दिसेनासे होईस्तोवर...

• • •

रात्री उशिरापर्यंत झोप आली नाही. उठून स्लिपिंग पिल्स घेतली. मध्यरात्री जराशी पेंग आली तर पहाटेला तेच स्वप्न. उंच सुळक्यावरून खोल दरीत कोसळतोय... सकाळ कधी झाली माहीत नाही. किती वाजले होते हेही माहीत नाही... कोणीतरी दारावरची बेल खूप वेळचा वाजवत होता. ...अन् दारात गर्दी जमली होती...



प्रमोदकुमार अणेराव
जन्म : १७ जुलै १९६५
प्रकाशित लेखन :
'प्रस्तराचे स्वप्नभोग' आणि 'विरामचिन्हांचा मृत्यू' हे दोन कवितासंग्रह प्रकाशित.
अनेक ख्यातनाम दिवाळी अंकांतून कथा प्रसिद्ध.
विशेष : • काव्य व कथालेखनासाठी अनेक वाङ्मय पुरस्कार.
• चित्रकार आणि रेखाचित्रकार म्हणूनही ख्याती.
पत्ता : यमुराम सदन, समृद्धीनगर, भंडारा



वाट चुकलेला सूर्य

लखनसिंह कटरे

एके दिवशी पहाटे तीन वाजताच माझी झोप उडाली. काही केल्या पुन्हा झोप लागेना. मला मॉर्निंग वॉकची सवय असल्याने, म्हटलं चला आज थोडं लवकर जाऊ या. तयार झालो व निघालो मॉर्निंग वॉकला.

मी नेहमी पश्चिमेकडे तोंड करून फिरायला जातो, जेणेकरून येताना सूर्यकिरणांचा प्रसाद सहजासहजी मिळतो. त्या दिवशीसुद्धा मी पश्चिमेकडे तोंड करून फिरायला गेलो. अर्धा-एक किलोमीटर गेलो असेन. मला सूर्योदय होताना दिसला. मी घड्याळ्यात पाहिले, तर पहाटेचे सव्वाचार वाजले होते. मी जरा चक्रावलो. डोळे बंद करून पुन्हा उघडले, मी चुकत नव्हतो याची खात्री झाली. इतक्यातच मला आठवले की, मी तर पश्चिमेकडे तोंड करून चालतो आहे आणि सूर्य माझ्या समोरून उगवत आहे. काहीतरी गडबड होते आहे असे वाटून मी पुन्हा डोळे चोळले. मी आताही चुकत नाही, याची खात्री झाली. पण आता मी चांगलाच घाबरलो, घामाघूम झालो. काय करावे काही सुचेना. इतक्यातच मी उत्स्फूर्तपणे ओरडलो-

''सूर्यदेवा आज दिशा आणि वेळ विसरलात काय? अहो अशाने कित्ती घोळ होईल. अजूनही वेळ गेलेली नाही, देवा आपली चूक ताबडतोब दुरुस्त करा...''

शब्द नेमके हेच नव्हते, पण आशय मात्र असाच होता आणि मी जोरजोरात ओरडत होतो. सूर्याने सुदैवाने हे माझे आक्रंदन ऐकले. म्हणाला,

''चूक तर खरोखरीच झाली. काल रात्री जरा जागरण झाल्याने गफलत झाली, पण आता काय करावे हे तूच सांग...''

मी काय सांगू? गडबडलो मी थोडा वेळ. मग मला एक आयडिया सुचलीच. मी त्याला सांगितले,

''अजून कोणीच उठलेला नाही. त्यामुळे तुझीही चूक कोणाच्याही नजरेस पडलेली नाही. तू आता ताबडतोड क्षितिजाला धरूनच धावू लाग, पश्चिम-वायव्य-उत्तर-ईशान्य करत पूर्वेला ये. मी कोणालाही सांगणार नाही, अशी शपथ घेतो.''


सूर्याने अगदी तसेच केले. तो पूर्वेला पोचला. त्याच्या व माझ्याही जीवात जीव आला. आता पहाटेचे साडेचार वाजले होते. लोक 'उठू' लागले होते, दूधवाले, भाजीपालावाले, परसाकडवाले रस्त्यावर दिसू लागले. पण सूर्याची चूक कोणालाही कळली नाही.

आता इतक्या दिवसांनंतर माझी शपथ तोडून मी हे सांगतोय; पण कोणाचा विश्वास थोडाच बसणार आहे!



लखनसिंह कटरे
जन्म : २० फेब्रुवारी १९५५
प्रकाशित लेखन : 'एकोणिसावा अध्याय' हा कथासंग्रह आणि विविध पाच कवितासंग्रह प्रकाशित.
विशेष : २००४ मध्ये वरोरा (जि. चंद्रपूर) येथे संपन्न झालेल्या अकराव्या झाडीबोली साहित्य संमेलनाचे अध्यक्ष.
पत्ता : बोरकन्हार, ता. आमगाव, जि. गोंदिया

अनुक्रमणिका



इच्छांचे झाड

▫ माधवी भट

दूर... खूप दूर जिथे गाव संपलेले आहे ....पण तिथे कुठलाच थांबा नाहीय, पलीकडे कुणाचीच हिरवी शेते नाहीत. ...लांबवर फक्त करडे गवत विखुरले आहे. ...आणि त्या गवताच्या मधोमध एक जुनी, पुरातन पडकी विहीर आहे. ... त्या विहिरीत आता फक्त अंधार आहे. ...अशा आंधळ्या विहिरी या परिसरात बऱ्याच आहेत, त्यातलीच ही एक. या परिसरात एक खूप पुरातन, आदिम, बरेच झुकलेले, असे एक झाड आहे. या झाडाची गंमत आहे... ती अशी की, झाडाला शेकडो रंगीत चिंध्या बांधल्या आहेत...!

चटकदार रंगांच्या, चमकणाऱ्या, रंगीबेरंगी चिंध्या, ...त्या दुरून पताका लावल्यागत सुंदर दिसतात... आणि इतक्या पुरातन झाडाला त्या रंगांनीच शोभाही येते...

पहाट संपून दिवस उगवू लागतो अन् हळूहळू वर चढतो, तशा रंगीत पताका वाऱ्यावर भिरभिरतात... त्यांचे पिवळे, हिरवे, लाल, निळे रंग अधिक देखणे दिसू लागतात... सोळावं लागावं घरातल्या मुलीला अन् तिला अगदी सहज पदराचं भान यावं तसा अर्धा पिकला हिरवा रंग... तृप्त सवाष्ण असावी दुपारी माजघरात लवंडून तसा पिवळसर ...अथांग ...अनावर प्रेमाइतुका आकाशी... आणि उष्ण, सळसळून रक्त वाहावं धमन्यात तसा लाल रंग!

आणि दिवस जसजसा कलू लागतो तशा त्या पताका आधी फार खुपतात डोळ्यात... मग फार केविलवाण्या दिसू लागतात आणि अचानक अंधार भरून आला की त्यांचं चेटूक होत जातं... त्या आपल्याला दिसू नये असं वाटतं... रात्री झाडाला पाहिलंत ना तर गावात लागलेल्या दिव्यांच्या आणि आकाशातल्या चांदण्यांच्या प्रकाशात झाड काळ्या-सावळ्या डोहासारखे दिसते अन् त्या चिंध्या म्हणजे लाटा वाटतात... लपलप करतात!

पौर्णिमेचा चंद्र झाडाच्या घनदाट फांद्यांतून आर्त... आर्त वाटतो!

पण दिवसा त्यांना भुललेला एखादा वेडा रात्री तिथं एकदा तरी जायचं खुळं स्वप्न बघतो... अन् त्यावर त्या झाडाचं गारुड होतं... मग तो जगाचा रहात नाही... स्वतःचाही नाही... जग आणि स्वतःच्या मध्ये त्रिशंकूसारखा झुलत राहातो!

सगळा गाव त्या झाडाला इच्छेचा वृक्ष म्हणते. गावात एक दंतकथाही प्रसिद्ध आहे... त्या वृक्षाला पहिली चिंधी कुणी बांधली ते तसे कुणास माहिती नाहीय... पण ती बांधताना मनात एक इच्छा असावी असे त्यांचे म्हणणे आहे... म्हणजे हा इच्छा पूर्ण करणारा वृक्ष असावा अन् लोक त्याला स्वतःच्या इच्छा अशा बांधत असावेत असे त्यांना वाटते...

अनुक्रमणिका

मग हळूहळू... लोकांच्या धारणा दृढ होत गेल्या अन् झाडावर इच्छांचे ओझे वाढले... आणि असे करता करता झाडभर ह्या नुसत्याच इच्छा लोंबू लागल्या... बरं तर बरं, एखादी इच्छा झाडाला रंगीत चिंधीच्या रूपात बांधावी अन् तिच्या पूर्ततेच्या प्रतीक्षेत त्या व्यक्तीनं मरून जावं हे तर कायमचेच... पण त्या चिंधीचे काय? ती तर झाडाला तशीच ना? ...काहीही म्हणा पण कालांतराने गर्भाला कान, नाक, डोळे फुटतात तसा इच्छांनादेखील जीव फुटतो... माणूस इकडे मरून गेला अन् त्याची ती अवेळी जिवंत झालेली इच्छा तशीच राहिली तर?

वर्षानुवर्षे अशा अनेक मृत जिवांच्या जिवंत इच्छा अजूनही झाडावर आहेत म्हणे...

झाड त्या इच्छांचं ओझं घेऊन झुकू लागलंय... शेवटी ते ओझं अवघडच असणार नाही का?

पण नाही म्हणायला गावात आता लोकांना भय वाटतं की, तरुण पोरी, मिसरूड फुटलेली भाबडी मुलं नकळत झाडाशी जातील अन् घात होईल... मुली भलत्या इच्छा बांधून बसतील झाडाला...

खरंतर झाड आता पोखरत चाललंय... ते स्वतःलाच शिक्षा करीत असावं... किंवा मग त्या भयाण इच्छांनी ते पोखरायला सुरुवात केली असेल... मात्र असंच उभं राहिलं तर एक दिवस ओझ्याने जमीनदोस्त होईल...

शेवटी काल तेच झालं... झाड ओझ्याने उन्मळून पडलं... इतकं आतल्या आत ते स्वतःला शाप देत होतं की, संपूर्ण पोकळ झालं होतं... त्याला इच्छांनी पोखरून टाकलं होतं... पुरातन वृक्ष, केविलवाणा पडलेला अन् फांद्यांना त्या अगणित इच्छा... धुळीत पसरलेल्या!

कुणीसं म्हणालं जाळून टाका ते झाड आता... त्या संपूर्ण इच्छांना मुक्ती द्या!

सर्वांनी मिळून ते झाड पेटवून दिलं... त्या चिंध्या कापरासारख्या जळून गेल्या... झाड बघता बघता राख झालं!

झाडाची सारी राख शिरवून दिलीय आता गावकऱ्यांनी! आता कुठला पुरातन गूढ वृक्ष नको अन् पूर्णत्वाच्या प्रतीक्षेतल्या इच्छाही नकोत... म्हणून गावकरी निश्चिंत झालेत!

पण झाड उन्मळून पडलं तिथेच. त्याची राख फासून एक नवे हिरवे पान जन्माला आलेय... तिथेच...

त्याच जागी... हे अजून कुणालाही ठाऊक नाहीय...

कुणाची चिवट इच्छा पुन्हा जन्म घेतेय, कुणास ठाऊक!




माधवी चंद्रशेखर भट

जन्म : १५ मे १९८२

प्रकाशित लेखन : एक नाट्यकृती व दोन ई-बुक्स प्रकाशित.

विशेष नाट्याभिनयासाठी राज्य शासनाचे पारितोषिक.

पत्ता : २०२, सुखकर्ता अपार्टमेंट, सहकारनगर, पाण्याच्या टाकीजवळ, चंद्रपूर - ४४२४०१.



आत्मा हरवलेली कथा

▫ क्रांती साडेकर

तिला एक कथा लिहायचीय. खरीखुरी, जिवंत कथा, जिच्यातल्या वाऱ्याच्या झुळकेनं मन प्रसन्न व्हावं, जिच्यातल्या झऱ्याचा खळखळाट नुसता कानांतच नाही तर मनातही घुमावा, जिच्यातल्या पाखरांच्या पंखावरची नक्षी तनामनावर उमटावी मेंदीसारखी अन् त्यांच्या भराऱ्यांसह जीवही भरारावा रानोमाळ. कथा अशीही हवी की, जिच्यातल्या सागराच्या लाटांनी रिंगण घालावं सभोवार अन् धीरगंभीर गाजेनं ऐकवत राहावीत सृजनाच्या विलयाची गूढ स्तोत्रं. कथेतलं निरभ्र, संपन्न आकाश मलमली दुलईसारखं पांघरता यावं, तिच्यातल्या वत्सल मातीत इवला अंकुर होऊन रुजता यावं, तिच्यातल्या मेघमालांसह मनभर बरसता यावं, वादळांसारखं उन्मुक्त विध्वंसता यावं, किनाऱ्यांसारखं शांत, स्थितप्रज्ञ राहाता यावं, तिच्यातल्या नद्यांसारखं गुणगुणत, रुणझुणत वळणदार वळसे घेत विहरता यावं तर कधी पुरासारखं दुथडी भरून फुफाटता यावं! कथा अशी हवीय जी जगता यावी प्रत्यक्षात! सुरस, रम्य, लोभस, मोहक, दाहक, अंतर्मुख करणारी, सुन्न करणारी, हसवणारी, रडवणारी, तोडणारी-जोडणारी, घडवणारी, बिघडवणारी, खरी असूनही कपोलकल्पित वाटावी अशी. लिहावी नि तंतोतंत तसंच आयुष्य घडावं!

एक कथा लिहायचीय तिला.

कसा, कुठूनसा कोण जाणे, या गोष्टीचा पत्ता भवतालच्या यच्चयावत पात्रांना लागला आणि एकेक करत मेळा भरवला त्यांनी तिच्याभोवती. मुख्य पात्र आणि त्यांच्याशी संबंधित उपपात्रे, मग या पात्रांशी संबंधित आणखी उपपात्रे... प्रचंड गर्दी करून ठाण मांडून बसली सगळी. तिच्या इवल्याशा मनाची धर्मशाळा करून ठेवली त्यांनी.

'माझ्यावर लिही, माझ्यासाठी लिही'चा धोशा लावला मुख्य पात्रांनी आणि त्या मुख्य पात्रांच्या आयुष्यात आपली भूमिका किती महत्त्वाची आहे हे अहमहमिकेने बरळून दाखवत राहिली इतर संबंधित पात्रे.

''तू पाहिलीस ना माझी अवस्था? ठाऊक आहे ना मी किती किती आणि काय काय सोसलंय ते? मग लिही ना माझ्यावर!''

''माझ्या आयुष्यातल्या प्रत्येक भल्याबुऱ्या घटनेची प्रत्यक्ष साक्षीदार आहेस तू. माझ्यावर लिहिशील तर गाजशील अगदी!''

''मला तुझ्याइतकं जवळून कोण ओळखू शकेल? माझं खरंखुरं आयुष्य जगासमोर आणशील तर असंख्य पात्रे आणि नवनवी कथानकं आपणहून सामोरी येतील तुला.''

अनुक्रमणिका

''माझी जन्मदात्री आहेस तू. माझा हट्ट पुरवायलाच हवा तुला. माझ्या स्टोरीइतकी ट्विस्ट्स कुठल्याही स्टोरीत असणार नाहीत. ती स्टोरी जर का लोकांनी वाचली तर झटक्यात पॉप्युलर होशील याची फुल्ल ग्यारंटी!''

''माझी हक्काची वस्तू आहेस तू. मी आहे म्हणून तुझं अस्तित्व आहे. लक्षात ठेव, मला वगळून काहीही लिहिणं अशक्य आहे तुला.''

''तू सखी ना गं माझी? सख्खी सखी! तुला तर ठाऊकच आहे ना मी कशी फसलेय ते? माझ्यासाठी नाही, पण माझ्यासारख्या आणखी कुणी फसव्या वाटांवर पाऊल टाकू पाहणाऱ्या असतील, त्यांना वेळीच वाचवण्यासाठी तरी माझ्यावर लिही गं.''

''कथेत थ्रिल हवंच गं जरा तरी. म्हणजे ती लोकांना वाचावीशी वाटते. तूच सांग, माझ्यासारखं थ्रिलिंग लाईफ तुला कुठे मिळेल अजून? तू बिनधास्त लिही माझ्यावर. अगदी माझं खरं नाव घेतलेस तरी हरकत नाही. तेवढंच मलाही प्रसिद्ध होता येईल कथेच्या निमित्ताने.''



...माझं दुःख, माझ्या वेदना, माझी फसगत, माझी फरपट, माझी वंचना, माझी प्रगती, माझं अढळपद, माझं पतन, माझा छळ, माझा सूड, माझे अश्रू, माझा खेद, माझी खंत, माझा त्रागा, माझे उत्सव, माझा आनंद, माझं भय, माझं कौतुक, माझा अहंकार, माझं मोठेपण, माझं कर्तेपण, माझं खरं, माझं खोटं, माझं कोतेपण, माझी प्रतिष्ठा, माझा तळतळाट... पात्रे, उपपात्रे, यांच्या चढाओढीनं आपलं महत्त्व पटवून देण्याच्या अहमहमिकेने तिला वेडच लागायचं बाकी राहिलं होतं. त्यांच्या विनंत्या, आर्जवं, हुकूम, धमक्या यांच्या कल्लोळात कथा लिहायची राहिली बाजूलाच; उलट हा गलका, गर्दी, कलकलाटाने भ्रमिष्ट झाली ती. पण कथा लिहिणं फार गरजेचं होतं. त्यासाठी आधी ती शांत झाली अन् मग तिनं गर्दीलाही शांत केलं.

''हे पहा, आधी सारे शांत व्हा. तुमचं प्रत्येकाचं आयुष्य मोठं नाट्यमय आहे आणि मी त्याच्याशी खूप जवळून बांधले गेलेय ना? तुमच्या जीवनातल्या साऱ्या बऱ्या-वाईट घटना मी जाणते ना? मग त्याच त्या पुन्हापुन्हा माझ्यापुढे उगाळण्यात काय हशील? तुम्हाला साऱ्यांनाच यायचंय ना कथेत? मग त्यासाठी मी सांगेन तसं वागावं लागेल, मी जे करीन तुमच्यासोबत ते करून घ्यावं लागेल. आपण त्याला लेखनसंस्कार म्हणू या हवं तर. ते मंजूर असेल तर आणि तरच तुमची प्रत्येकाची- प्रत्येकीची कथा जगासमोर येईल, गाजेल, वाजेल आणि तुम्ही नावाजले जाल.''

या तिच्या बोलण्यावर पात्रे माना डोलावू लागली मुख्य पात्रं, उपपात्रं साऱ्याच्यांच चेहऱ्यावर समाधानाचं हास्य पसरलं. मग तिनं साऱ्यांना एका रांगेत उभं केलं, त्यांचे गट केले आणि एकेक गट उचलून ती त्यांना पिसत गेली पत्ते पिसावेत तसे. बराच वेळ पिसून झाल्यावर तिनं त्यांचे वेगवेगळे डाव मांडले आणि ते खेळत राहिली काळ्या राजाला लाल राणी अन् काळ्या राणीला लाल गुलाम जोडत. आता प्रत्येक मुख्य पात्रासोबतची उपपात्रे आणि त्यांच्यासोबतची उप-उपपात्रे विलग झाली होती. त्यातून काही नवं घडणार होतं. मात्र हे कळूनही सारी चिडीचूप होती केवळ कथेत येण्याच्या हव्यासापोटी.

या खेळातून काहीही हाती न लागल्यानं कंटाळून तिनं सगळे पत्ते गोळा केले आणि त्यांना बुद्धिबळाच्या सारिपाटावर मांडलं. राजाला प्यादं, घोड्याला वजीर, वजिराला उंट अन् प्याद्याला हत्ती बनवत ती अनेक फेऱ्या खेळत राहिली. पत्त्यांच्या खेळातले नव्यानं जुळलेले धागे या पटावर तुटून गेले होते आणि काही वेगळ्याच जडणघडणी व्हायला लागल्या होत्या. मु.पा., उ.पा. आणि उ.उ.पा. मंडळी तरीही मजेत होती.

''कोण जाणे, यालाच म्हणत असतील लेखनसंस्कार! आपल्याला काय, येनकेनप्रकारेण कथेत येण्याशी मतलब! मग सोबतीला कोणी का असेना! आणि तसेही आता आपण एकमेकांशी परिचित झालो आहोतच ना!'' असा पोक्त विचार करत मंडळी संस्कारित होत होती.

काळया-पांढऱ्या या चौरसांतूनही नवं काही हाती लागलं नाही तसं तिनं या मंडळींचे मग सागरगोटे बनवले आणि त्यांना उंच फेकत कधी एकेक तर कधी अनेक उचलून झेलत, पाडत राहिली. पुन्हा पुन्हा

घडणावळी, पुन्हापुन्हा नवनवी मांडणी यातूनही कसदार कथानक उमलेल असं काही चिन्ह दिसेना तेव्हा तिनं सापशिडीच्या खेळाचा आधार घेतला. काहींना सापाच्या तोंडी तर काहींना शिडीवरून उच्चासनावर नेत तिचा नवा डाव सुरू झाला. एव्हाना काही निवडक मंडळींचा कथेतला रस संपून गेला होता आणि विद्रोही विचारांनी त्यांच्या मनात थैमान घातलं होतं. उरलेल्या बिनकण्याच्या मंडळींच्या मनात उठावाचं बीज रोवून बंडाळी घडवून आणण्यासाठी त्यांची धडपड सुरू होती. हे तिच्या लक्षात यायला वेळ लागला नाही. पात्रांचं हे बंड मोडून काढण्यासाठी आता तिनं नवा डाव टाकला. सारिपाटावर इतर मंडळी आणि बंडाचा झेंडा फडकवणाऱ्या पात्रांचे फासे! फासे पडतील तशी इतर मंडळी आयतीच फाशांच्या विरोधात, त्यांनी फसवणूक केली म्हणून!

अखेरीस फाशांसह सारीच मंडळी या जीवघेण्या खेळांनी हैराण झाली, हतबल झाली. व्यथित होत त्यांनी तिला विचारलं,

"हे काय आरंभलं आहेस तू? हे कसले लेखन-संस्कार? का हा असा विचित्र खेळ खेळतेस? नेमकं काय साधणार आहेस, यातून तू?"

"काहीच नाही. काहीही साधणार नाहीय मी यातून. मला फक्त सुटका हवीय तुमच्या आणि माझ्याही त्याच त्या निर्जीव, निष्प्राण रडकथांपासून. आणि खरं सांगू? हा खेळही माझा नाहीय, तर तो माझ्यासोबत आजन्म खेळला जात असलेला, कुणा अदृश्य शक्तीचा खेळ आहे. मीही तुमच्यासारखंच त्यातलं एक प्यादं आहे. तिच्या या खुलाशानं पात्रांचं समाधान झालं की नाही, ठाऊक नाही. मात्र त्या पात्रांनी फिरून कधीही तिच्या नव्या कथेत आपल्याला स्थान मिळावं असा आग्रह धरला नाही.

तसे आता तिच्याकडे अनंत भाव आहेत, अनेक विषय आहेत, असंख्य कथानकं आहेत, पण ती सारी कृत्रिम, बेगडी, फसवी, जुळवल्यासारखी आहेत. कुठेही, कधीही गाठून शिळोप्याच्या गप्पा मारायला सुरू करतील इतकी जवळीक साधणारी, तरीही कधीच जवळची न वाटणारी. रोजच्या त्याच त्या चाकोरीत रखडणारी कसलंही नावीन्य, वेगळेपण नसणारी, निर्जीव निष्प्राण, निष्प्रभ, साचलेल्या डोहासारखी शेवाळलेली.

तिला तर अगदी नवी कथा लिहायचीय. जिवंत, जातिवंत, ताजीतवानी, आत्मा असलेली. हवेच्या स्वच्छंद झुळकेसारखी, पाखराच्या उत्स्फूर्त गाण्यासारखी, नदीच्या उन्मुक्त प्रवाहासारखी. या कथेची पात्रं आणि कथानकं तिला आता इथं मिळणार नाहीत कदाचित! पण कथा तर लिहायलाच हवी म्हणून ती निघणार आहे लवकर पात्रांच्या शोधात. मिळतील तिला हवी ती पात्रे आणि होईल तिची आत्मा असलेली कथा सुफळ संपूर्ण. होईल ना?




क्रांती साडेकर

जन्म : २० ऑक्टोबर १९६२

प्रकाशित लेखन : 'अग्निसखा', 'असेही तसेही' आणि 'अजून बाकी' हे तीन कवितासंग्रह प्रकाशित.

विशेष : 'असेही तसेही' साठी विदर्भ साहित्य संघाचा पुरस्कार.

पत्ता : पसायदान, रॉयल इंपीरियल, न्यू पुनर्वसन, वर्धा रोड, पोस्ट खापरी रेल्वे, नागपूर - ४४११०८



पिंडदान

:: नितेश राऊत

श्याम पाच-सहा वर्षांचा असताना एक गोड कुत्र्याचं पिल्लू घरी घेऊन आला. खुराड्यासारख्या भाड्याच्या खोलीत चार लेकरं घेऊन राहणाऱ्या श्यामच्या आईवडिलांना ही कुठली ब्याद पोरगा घेऊन आला असं वाटलं... इथे माणसाला जागा नाही अन् हे पिल्लू कुठे पोसायचं म्हणून श्याम्याच्या बापानं ते गोजिरं पिल्लू दूर कुठेतरी नेऊन सोडलं. त्या चिमुकल्या पिल्लाला नेताना केविलवाण्या नजरेनं ते लहानग्या श्यामकडे बघत कुईSS कुई करत राहिलं आणि त्याच्या डोळ्यांतले केविलवाणे भाव बघत छोटा श्याम रडत राहिला. पुढे श्याम जरा मोठा झाला, पण त्या कुत्र्याच्या पिल्लाची नजर विसरला नाही. तो पुन्हा एक पिल्लू घेऊन आला. बापाने ''कोणते चाये सुस्ते बे तुले, अभ्यास कर पैले.'' असे दरडावून सांगितले आणि ते पिल्लू पुन्हा नेऊन सोडले. पुन्हा तेच केविलवाणे भाव याही पिल्लाच्या डोळ्यांत उमटले... श्यामने ठरवले ज्या दिवशी स्वतःच्या पायावर उभा होईन तेव्हाच कुत्रा आणेन. श्याम पुढे नोकरीला लागला. लग्न झाले. श्यामचा श्यामराव झाला. एक दिवस श्यामराव अचानक कुत्र्याचं छानसं पिल्लू घरी घेऊन आला. श्यामरावची बायको बोलली

''शी... हे काय? मला नाही आवडत, काही दिवसांनी आपल्या घरी छोटं बाळ येणार आहे. आणि तुम्ही...?''

आता ते पिल्लू नेऊन सोडायची जबाबदारी श्यामरावावर आली. श्यामरावने त्या पिल्लाच्या डोळ्यांतले भाव बघायचे टाळले... पुढे श्यामराव प्रौढ झाले. मुलं मोठी झाली. कुत्र्याचे पिल्लू आणण्याचे विचार श्यामरावच्या मनात पुन्हा घोळू लागले. पण श्यामरावच्या बायकोने साफ सांगितले, ''मी जिवंत असेपर्यंत कुत्रा घरात येणार नाही...''

पुढे श्यामराव म्हातारे झाले. बायकोसुद्धा म्हातारी झाली. सून आली, नातू झाला. एक दिवस श्यामरावची बायको मेली... बायकोची तेरवी आटोपताच श्यामरावने एक दिवस एक गोड कुत्र्याचं पिल्लू घरी आणलं... कुत्र्याचं गोजिरवाणं पिल्लू पाहून श्यामरावचा नातू आनंदाने उड्या मारू लागला...

सायंकाळी मुलगा घरी आल्यावर सून नवऱ्याच्या कानाशी लागली. ''तुमच्या बापाला म्हातारचळ लागलाय, मी कुत्रा वागवणार नाही.'' श्यामरावच्या मुलाने सकाळी श्यामरावच्या नकळत कुत्र्याचे पिल्लू दूर कुठेतरी नेऊन सोडले. यावेळी केविलवाणे भाव आणि अश्रूचे दोन थेंब श्यामरावच्या डोळ्यांत तरारले. एक दिवस श्यामराव हे जग सोडून गेले. श्यामरावच्या पिंडाला कावळा शिवलाच नाही...

एक केविलवाणे मरतुकडे कुत्र्याचे पिल्लू ते पिंड घेऊन गेले...



नितेश ग. राऊत
जन्म : २१ नोव्हेंबर १९७७
प्रकाशित लेखन : विविध नियतकालिकांतून वाङ्मय प्रकाशित.
पत्ता : प्लॉट नं. १४ ब, प्रकाश कॉलनी, सावरकर वाडीच्या मागे, नवसारी रिंग रोड, अमरावती.

अनुक्रमणिका

विदर्भ साहित्य संघ

मकर संक्रांत १९२३

आमची प्रकाशने

- **मराठी वर्णोच्चार विकास** : डॉ. द . ह. अग्निहोत्री — १००.00 रु.
- **लोकसाहित्य संपदा** : संपादक : ना. रा. शेंडे — १००.00 रु.
- **आणखी गडकरी** : डॉ. मधुकर आष्टीकर — २५.00 रु.
- **तीन भाषणे : गणेश व्याख्यानमाला १९७७** : डॉ. र. शं. केळकर — ६0.00 रु.
- **'प्रातिभ' : प्रातिनिधिक लघुकथासंग्रह (१९८०)** : संकलन : प्रा. ज. रा. फणसाळकर — १००.00 रु.
- **समग्र वजावा** : संपादन / संकलन - द. भा. प्रधान — १००.00 रु.
- **ज. के. उपाध्ये यांची कविता (१८८३ - १९९३)** : संपादन : डॉ. आशा सावदेकर — १००.00 रु.
- **दक्षिणेतील दोन आचार्य** : तर्कतीर्थ लक्ष्मशास्त्री जोशी — २0.00 रु.
- **कविता विदर्भाची** : संपादन : डॉ. आशा सावदेकर — १२५.00 रु.
- **छंदःशास्त्र : एक अध्ययन** : कुंदर दिवाण — ४0.00 रु.
- **वसंतवैभव : (कै. व. कृ. वऱ्हाडपांडे)** : संपादन : डॉ. सौ. कुंदा केळापुरे/डॉ. मदन कुलकर्णी — १५0.00 रु.
- **धन्यतेची थाप** (निवडक प्रस्तावना) : डॉ. वि. भि. कोलते — १००.00 रु.
- **वक्ता दशसहस्रेषु** : (प्रा. राम शेवाळकर यांची भाषणे) - संपादक : डॉ. वि. स. जोग — १५0.00 रु.
- **विदर्भ साहित्य संमेलने : अध्यक्षीय भाषणे : खंड १** : संपादक : सा. भू. तु. ना. काटकर — २००.00 रु.
- **विदर्भ साहित्य संमेलने : अध्यक्षीय भाषणे : खंड २** : संपादक : डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी — २५0.00 रु.
- **विविध प्रवाही साहित्य संमेलनांची अध्यक्षीय भाषणे** : संपादक : डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी — ३००.00 रु.
- **युगवाणी साहित्य सूची** : संपादक : केशव जोशी — १००.00 रु.
- **युगवाणी साहित्य सूची** (पुरवणी) : संपादक : केशव जोशी — ७५.00 रु.
- **वैदर्भीय मराठी प्रबंध सूची (१९३९-९८)** : संपादक : डॉ. व. वि. कुलकर्णी — १००.00 रु.
- **कै. वा. ना. देशपांडे यांचे स्फुटलेखन, ३ खंड : तुलाधर, चित्रगुप्त, त्रिविक्रम** : संपादक : प्रा. राम शेवाळकर — १०००.00रु.
- **विदर्भ साहित्य संघ - अमृत महोत्सवी स्मरणिका (१९९९)** : संपादन : वामन तेलंग — २००.00 रु.
- **युगवाणी : ग. त्र्यं. माडखोलकर विशेषांक १९९८** : संपादन : डॉ. सुलभा हेर्लेकर — १००.00 रु.
- **युगवाणी : कुसुमावती देशपांडे जन्मशताब्दी विशेषांक (२००४-०५)** : संपादन : डॉ. सुलभा हेर्लेकर — १००.00 रु.
- **युगवाणी : वसंत आबाजी डहाके विशेषांक** : संपादक - प्रा. अजय देशपांडे - २०११-१२ — १००.00 रु.
- **युगवाणी : ग्रेस विशेषांक** : संपादक : प्रा. अजय देशपांडे २०१२-१३ (आवृत्ती संपली)
- **युगवाणी : नामदेव ढसाळ विशेषांक** : संपादक : प्रा. अजय देशपांडे - २०१३-१४ — १००.00 रु.
- **निवडक युगवाणी भाग १** : संपादक : वामन तेलंग - २०१४-१५ — ३५0.00 रु.
- **निवडक युगवाणी : भाग २** : संपादक : वामन तेलंग - २०१५-१६ — ३५0.00 रु.

विदर्भ साहित्य संघाने आजवर प्रकाशित केलेल्या दुर्मिळ २० ग्रंथांचा संच २००० रुपयांत उपलब्ध (पार्सल खर्च वेगळा). महाविद्यालये, ग्रंथालये आणि अभ्यासकांनी संपर्क करावा.

अनुक्रमणिका


मराठी साहित्यसंस्कृतीच्या
आणि
नव्या साहित्यप्रवाहांच्या समृद्धीसाठी
विदर्भ साहित्य संघाचे वाङ्मयीन नियतकालिक

युगवाणी


एप्रिल २०१६ ते मार्च २०१७ या कालावधीतील चार अंक



एप्रिल-मे-जून २०१६



जुलै-ऑगस्ट-सप्टेंबर २०१६



ऑक्टोबर-नोव्हेंबर-डिसेंबर २०१६




जानेवारी-फेब्रुवारी-मार्च २०१७

श्री विदर्भ साहित्य संघ
विदर्भ विबुध: सारस्वतीजन्मभू: ॥
मकर संक्रांत १९२३

विदर्भ साहित्य संघ
सांस्कृतिक संकुलाचा चौथा माळा,
झाशी राणी चौक, सीताबर्डी
नागपूर ४४० ०१२
दूरभाष : ०७१२-२५२३९२९

अनुक्रमणिका



With Best Compliments From...
Pt. Shankarprasaad Agnihotri
Chairman
Shri Sachin S. Agnihotri
Secretary
Jai Mahakali Shikshan Sanstha
AGNIHOTRI GROUP OF INSTITUTIONS, WARDHA
Agnihotri College Campus, Bapuji Wadi, Sindi (Meghe) Wardha 07152 661111, 243575
Running Various Courses in the field of
• Engineering
• Pharmacy
• Polytechnic
• Computer Science
• Management
• Law
• Physical Education
• Colleges of Education
• Public School (CBSE Board)
• Junior College
• State Board Schools
A temple of learning which open the Doors to New Era of Education...

अनुक्रमणिका